**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)**

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) :** लक्षवेधी क्रमांक 1.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना उपस्थित करणारे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. तथापि, अन्य सन्माननीय सदस्यांनी ती पुकारावी, मी उत्तर देण्यास तयार आहे.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य उपस्थित नसल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना मी पुढे ढकलतो.

आता लक्षवेधी क्रमांक 2 वर चर्चा सुरु करु

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना महसूल विभागाशी संबंधित असून महसूल मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. हे बरोबर आहे का ? शासनाची उत्तर देण्याची तयारी नाही का ?

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक मी अर्ध्या तासासाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.00 ते 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वसाहती आणि अग्निशमन दलाच्या इमारती मुद्दाम धोकादायक ठरविणे

**मु.शी.**: मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वसाहती आणि अग्निशमन दलाच्या इमारती मुद्दाम धोकादायक ठरविणे यासंबंधी सर्वश्री सुनील तटकरे, हेमंत टकले, नरेंद्र पाटील, किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वसाहती आणि अग्निशमन दलाच्या इमारतींचे महानगरपालिकेच्या पॅनलवरील दोन-तीन ठराविक कंपन्या स्ट्रक्चरल ऑडिट करीत असून त्या इमारती व वसाहती मुद्दाम धोकादायक ठरवून तेथील कर्मचाऱ्यांना माहुलला पाठविण्याचे काम करीत असणे, त्यातच राज्यात शाळा आणि महाविद्यालये सुरू झाली असल्याने सदर वसाहतीतील नागरिकांमध्ये निर्माण झालेली निराशेची भावना, याबाबत पालिका कर्मचाऱ्यांच्या आणि अग्निशमन दलाच्या वसाहतींच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट शासनामार्फत करुनच वसाहती खाली करण्यात याव्यात म्हणून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांच्या वसाहतींची जी दुर्दशा झालेली आहे त्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे. आपण लक्षवेधी सुचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, माहुल परिसरात ज्या इमारती तयार आहेत त्या ठिकाणी आपण त्यांची वास्तव्याची व्यवस्था करणार आहोत. परंतु, आपल्याला कल्पना आहे की, या भागात रिफायनरी आहेत आणि केंद्रीय पर्यावरण विभागाने हा धोकादायक भाग असल्यामुळे या भागात कोणीही निवासी असता कामा नये, असा अहवाल दिलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात अन्य ठिकाणी तातडीने कशी करता येईल, हे आपण बघणार आहात काय ? तसेच, त्या ठिकाणी विना परवानगी ज्या 700 इमारती बांधलेल्या आहेत त्या संदर्भात चौकशी करून तेथील धोकादायक इमारतीमध्ये कोणीही राहता कामा नये याबाबत माहिती घेऊन आपण पुढील योग्य ती कार्यवाही करणार आहात काय आणि त्यांना केव्हा पर्यंत दुसरीकडे निवासाची व्यवस्था मिळू शकेल ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, आपण मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये राहणाऱ्या लोकांची दुसरीकडे पर्यायी व्यवस्था करतो. आपण अशा इमारतींमध्ये राहणाऱ्या जवळपास सर्वच लोकांना माहुल येथे पाठवितो. कारण, तेथे मोठ्या प्रमाणावर सदनिका आहेत. माहुल, चेंबर येथे जवळपास 8,581 पर्यायी सदनिका आहेत आणि त्यापैकी आपण जवळपास 3 हजार सदनिका अलॉट देखील केलेल्या आहेत. आज तेथे लोक राहत आहेत. तरी देखील आपण म्हणतात त्याप्रमाणे माहुल परिसर राहण्यायोग्य नाही, तेथे बरेच प्रदूषण असल्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होतो, असा पर्यावरण खात्याचा अहवाल असेल तर तो अहवाल मागवून त्याची पाहणी करण्यात येईल आणि त्यामध्ये असे तथ्य आढळून आले तर येथून पुढे मोडकळीस आलेल्या इमारतींमुळे जी मंडळी विस्थापित होणार असेल त्यांना आपण माहुल सोडून इतर ठिकाणी राहण्यास योग्य असेल अशा ठिकाणी शिफ्ट करू. तसेच, आपण धोकादायक इमारतींच्या संदर्भात दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. महानगरपालिकेच्या रूटीन प्रोसिजर प्रमाणे प्रत्येक वर्षी

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.......

धोकादायक इमारती नोटिफाय केल्या जातात. त्यासाठी जे निकष आहेत ते पाळले जातात. सी-1, सी-2, सी-3 अशी त्याची वर्गवारी असते. सन 2015 च्या सर्व्हेमध्ये 712 इमारती सी-1 मध्ये आहेत. त्यापैकी 153 इमारती आपण डिमॉलिश केलेल्या आहेत आणि 180 इमारतींचे वीज व पाण्याचे कनेक्शन बंद केलेले आहे. त्यामुळे सी-1 वर्गवारीच्या इमारतींकडे महानगरपालिकेचे लक्ष आहे. कोणाच्याही जीवितास धोका निर्माण होऊ नये, बाबू गेनू रोडवरील घटनेची पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महानगरपालिका प्रशासन आणि शासन सर्वंकष प्रयत्न करीत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे. अलीकडेच मुंबईत काळबादेवी येथील अग्निकांडात तीन अधिकारी मृत्यूमुखी पडून शहीद झाले. त्या अधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी आपण कोणते प्रयत्न केले ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, त्या अधिकाऱ्यांची मुले लहान आहेत, ती मुले तिकडे शिक्षण घेत आहेत. त्यामुळे त्यांची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत ती निवासस्थाने तूर्तास कायम ठेवावीत, अशी त्यांच्या कुटुंबीयांनी विनंती केली होती. आपण त्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत काय करणार आहात ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी अग्निशमन दलाच्या इतर कर्मचाऱ्यांनी वृत्तपत्रांकडे आपला आक्रोश व्यक्त केल्यामुळे महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना निलंबित केले आहे. ती निलंबनाची कारवाई अत्यंत अन्यायकारक आहे. आपण त्या कर्मचाऱ्यांचे निलंबन त्वरित मागे घेणार काय ? तसेच, या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांचा मृत्यू झालेला आहे त्यांना शहीद घोषित करणार काय ? त्यांना शहीद घोषित करून त्यांचे पुनर्वसन करणार काय, असा मी पहिलाच प्रश्न विचारलेला आहे. तसेच, इतर कर्मचाऱ्यांवर जी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे ती तातडीने मागे घेणार काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, विधानसभेत काल अशी मागणी करण्यात आली होती की, सिमेवर लढताना ज्या जवानांचा मृत्यू होतो त्यांना आपण शहीद घोषित करतो. परंतु, माननीय राष्ट्रपतींकडे ही मागणी केली जाईल आणि आम्ही त्यांना शौर्यपदक पुरस्कार मिळाला पाहिजे, असा प्रस्ताव देखील सादर करू. यासाठी आम्ही सर्वंकष प्रयत्न करू. तसेच, त्यांच्या

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.........

कुटुंबीयांसाठी काय केले, असा आपला दुसरा प्रश्न होता. मी सांगू इच्छितो की, महानगरपालिकेचे जे प्रचलित धोरण आहे त्या पद्धतीने आपण संपूर्ण कार्यवाही केलेली आहे. प्रत्येक कुटुंबीयांना जवळपास 17 ते 18 लाख रूपये रोखीने मिळालेले आहे. त्यांच्या मुलांच्या पुढील शिक्षणाचा संपूर्ण खर्च शासन करणार आहे आणि बऱ्याच सेवाभावी संस्था देखील यासाठी पुढे आलेल्या आहेत. त्यामुळे आता याबाबत काही प्रश्न आहे, असे मला वाटत नाही. त्यांच्या मुलांच्या प्रोफेशनल करीअरच्या दृष्टीने त्यांच्या कुटुंबीयांना आपण अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घेऊ शकतो काय, असे सर्व विकल्प त्यांच्यासाठी खुले आहेत. यापैकी एका कुटुंबीयांनी तो विकल्प स्वीकारलेला आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, शहिदांच्या पाल्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना सेवेत सामावून घेताना योग्य पद उपलब्ध करून द्यावे. अन्यथा असा अनुभव आहे की, उच्च शिक्षित उमेदवारांना अनुकंपा तत्वावर घेताना शिपाई किंवा तत्सम पद दिले जाते.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी तेच सांगत होतो. आज अशी परिस्थिती आहे की, एका कुटुंबातील मुले इयत्ता चौथी, पाचवीत शिक्षण घेत आहेत आणि त्यांच्या धर्मपत्नी आज नोकरी स्वीकारायला तयार नाहीत. आपण त्यांच्यासाठी तो देखील विकल्प ठेवलेला आहे की, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्या मुलाची जी शैक्षणिक अर्हता असेल त्यानुसार आपण त्यांना नोकरीत सामावून घेऊ. तसेच, या प्रकरणी इतर सहकर्मचाऱ्यांनी काही आक्रोश व्यक्त केला असेल किंवा काही तक्रार करण्याचा प्रयत्न केला असेल तर अशा कर्मचाऱ्यांविरूद्ध कपोलकल्पित बुद्धिने किंवा इन्टेंशनली कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही. आपल्या बोलण्याचा ओघ तसा होता. परंतु, हे देखील पाहिले जाईल की, एखादा सहकारी काही सांगण्यासाठी जातो आणि त्यावेळी 2-4 लोक त्यांच्या बरोबर जातात. म्हणून त्यांच्यावर इन्टेंशनली.....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझे एवढेच म्हणणे होते की, आपण त्यांचे निलंबन मागे घ्यावे. आपण मघाशी पुनर्वसनाच्या दृष्टीने अत्यंत चांगले उत्तर दिले. ज्यावेळी पोलीस

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कारवाई किंवा नक्षलवादी चळवळीत पोलीस अधिकारी शहीद होतात अशा वेळी त्यांचा पगार

..5...



श्री.कपिल पाटील........

त्यांच्या पत्नीला दिला जातो, नोकरीची गरज नाही. त्याच पद्धतीने हे तीन अधिकारी त्या अग्निकांडात लोकांचा जीव वाचविण्यासाठी गेले आणि ते बळी पडले. त्यामुळे त्यांचा पगार म्हणजे ते अधिकारी सेवेत असते तर ते निवृत्त होईपर्यंत त्यांचा पगार चालू ठेवावा. कारण, अनुकंपापेक्षा हे जास्त संयुक्तिक ठरेल आणि यामुळे लोकांची अग्निशमन दलात येण्याची इच्छाही वाढेल. म्हणून आपण हे करावे आणि त्यांचे निलंबन मागे घ्यावे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, दोन्ही बाबींच्या संदर्भात प्रचलित धोरण आहे, त्यासाठी सूत्र आहे. आपण त्यांच्या कुटुंबीयांना अगोदरच नुकसान भरपाई दिलेली आहे. आपण निलंबनाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. ती पूर्ण बाब तपासून पाहण्यात येईल. ते आंदोलन कोणत्या पद्धतीने झाले होते किंवा त्यांनी कशा प्रकारे आक्रोश व्यक्त केला याबाबत सहानुभूतिपूर्वक विचार करुन त्यांच्या निलंबनाबाबत निर्देश देण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, माहुल परिसर राहण्याच्या दृष्टीने धोकादायक आहे. माहूल गावामध्ये आरसीएफ, एचपी गॅस आणि पेट्रोलियमची रिफायनरी आहे. मागील आठवड्यात विधानसभेत चर्चा सुरु असताना म्हाडाचे पुनर्वसन करताना शासनाने तेथे म्हाडाच्या इमारतीची वसाहत करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, पर्यावरणाच्या दृष्टीने तो परिसर राहण्यासाठी योग्य नसेल तर आम्ही तो प्रोजेक्ट रद्द करू याबाबत पर्यावरण विभागाला देखील विचारण्याची आवश्यकता नाही. आपण रोज फ्रीवे वरुन जात असतो. माहुल परिसर त्याला लागूनच आहे. हा संपूर्ण पट्टा चेंबूर आणि कुर्ल्यापर्यंत जातो.

यानंतर श्री.खर्चे वि.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

त्या भागात ज्या नवीन वसाहती होणार आहेत, त्या ठिकाणी पर्यावरण विभागाची परवानगी न घेता इमारती तयार करण्याचा निर्णय राज्य शासन घेणार आहे काय ?

सभापती महोदय, दुसरा थोडा वेगळा प्रश्न मी विचारीत आहे, अग्निशमन दलामध्ये ज्या सीडी आहेत किंवा ज्या गाडया आहेत, त्या गाड्यांवर ज्या सीडी आहेत, त्यांची क्षमता 8 ते 9 मजल्यांपर्यंतच आहे. आज मुंबईत 40 मजल्यांच्या इमारती उभारल्या जात आहेत. त्या दृष्टीकोनातून अग्निशमन दलासाठी अशा गाड्या तयार करण्याचे कोणतेही तंत्रज्ञात आज आपल्या देशात नाही. या गाड्या आयात कराव्या लागत आहेत, अशा प्रकारची यंत्रणा महानगरपालिकेकडे जोपर्यंत उपलब्ध होत नाही तोपर्यंत 40 मजली किंवा त्यापेक्षा जास्त मजल्यांच्या इमारतींना महानगरपालिकेने परवानगी देऊ नये. या बाबत राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ? अशा प्रकारच्या गाड्या तातडीने उपलब्ध कराव्यात अशा सूचना महानगरपालिकेला राज्य शासन देणार आहे काय ?

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या विषयाला जोडून मी प्रश्न विचारीत आहे. लोटस इमारतीला आग लागली होती. त्यावेळी 20 मजल्यांपर्यंत अग्निशमन दलाकडे सीडी होती. ती सीडी 21 व्या मजल्यापर्यंत पोहचू न शकल्यामुळे तेथील अग्निशमन कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला होता. आज मुंबई शहरात 55 ते 70 मजल्यांच्या इमारतींना परवानगी देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेकडे 20 मजल्याच्यावर जाणारी सीडी नाही. त्यामुळे अशा प्रकारची व्यवस्था झाल्याशिवाय जास्त मजल्यांच्या इमारतींना परवानगी देण्यात येऊ नये. याबाबत शासनाने काही व्यवस्था केलेली आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी पहिला प्रश्न म्हाडा पुनवर्सनाच्या संदर्भात विचारला होता. माहुल या परिसरात जळपास 8500 घरे बांधण्यात आली आहेत, त्या ठिकाणी पर्यावरण व प्रदूषणाचा जास्त प्रादूर्भाव असेल आणि ती जागा लोकांना राहण्यायोग्य नसेल तर याबाबत वेगळा विचार करता येईल. याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी अगोदर जाहीर केल्यामुळे त्याबाबत जास्त बोलणे योग्य होणार नाही. पर्यावरण खात्याचे काहीही धोरण असले तरी राज्य शासनाच्या स्तरावर पुन्हा त्या जागेची पाहणी करण्यात

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

येईल. त्या ठिकाणी परिस्थिती राहण्याजोगी नसेल तर प्रयोग म्हणून लोकांना तेथे राहण्यासाठी पाठविले जाणार नाही याची काळजी शासन घेणार आहे.

दुसऱ्या प्रश्नाबाबत मी असे सांगू इच्छितो की, डीसीआर प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. 14 मजल्यानंतर एक स्पेस देण्यात येतो, त्याला लिपेज एरिया म्हणतात. यासाठी बांधकामाची बरीच प्रकरणे रखडली होती. शासनाने याबाबत कोणतीही तडजोड न करता कंत्राटदाराकडून लिपेज एरिया आल्याशिवाय पुढील मजल्यांना परवानगी दिली नाही. इंडियन बिल्डींग कोड नुसार नवीन सुधारणा करण्यात आली आहे. कलकत्ता येथे एक घटना घडली होती, त्यानंतर काही जळीत प्रकरणे झाली होती, त्यानंतर अशा सुधारणा करण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाकडील इंडियन बिल्डींग कोडप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. यामध्ये कोणतीही तडजोड न करता पुढील मजल्यांची परवानगी देण्यात येत नाही, अशा प्रकारच्या सुधारणा मागच्या वर्षात करण्यात आल्या आहेत.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, लिपेज एरिया करण्यात आला आहे, परंतु तो प्रत्येक सात मजल्यानंतर 14 व्या मजल्यावर आहे, समजा 55 मजल्याची इमारत असेल तर त्या ठिकाणावरुन कसे काय येणार आतापर्यंत सर्व लोक लिफ्टनेच आलेली आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी पुन्हा सांगतो की, इंडियन बिल्डींग कोडच्या नॉर्मस् प्रमाणे ज्या सुधारणा करावयाच्या होत्या त्या सर्व सुधारणा करण्यात आल्या आहेत. अग्निशमन दलासाठी गाड्या आयात कराव्यात असे सन्माननीय सदस्य म्हणाले आहे, त्याबाबत शासनाकडून निश्चित विचार करण्यात येईल.

--------------

.....3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विकास समितीकडून अनियमित कामे करण्यात येणे

**मु. शी.** : यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विकास समितीकडून अनियमित कामे करण्यात येणे या संबंधी श्री.संदिप बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संदिप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील इमारतींच्या देखभाल व्यवस्थापनासाठी सन २००८ मध्ये विकास समिती स्थापन करण्यात येणे, मात्र आजतागायत प्रशासकीय इमारत परिसर विकास समिती स्थापन करण्याबाबत तसेच निधी जमा करण्याबाबत शासनाची परवानगी घेण्यात न येणे, त्यामुळे सदर बाबत शासनाकडून कोणतीही पूर्व परवानगी नसताना समितीची बैठक घेवून त्यामध्ये नियमबाह्य पध्दतीने निर्णय घेणे व निधी उभारण्याकरिता संगीत रजनी या चॅरिटी शो चे आयोजन करण्याबाबत शासनास कोणतीही पूर्व कल्पना न देता परस्पर ठरविण्यात येणे, सदर समितीच्या कामकाजाबाबत कोणतेही अंदाजपत्रक तयार न करता मनमानी कारभार करुन खाजगी कंत्राटदारांना सदरचे काम मिळवून देण्याचा होत असलेला प्रयत्न, समिती स्थापन झाल्यापासून समितीने जमा करण्यात आलेला अनियमित निधीचा ताळमेळ न लागणे, परिणामी शासकीय निधीचा गैरव्यवहार होत असल्याचा निर्माण झालेला संशय, याबाबत यवतमाळ जिल्ह्यात इमारत देखभाल व व्यवस्थापनासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीची सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.) ...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, याबाबत कोणतीही अनियमितता झालेली नाही. मंत्री महोदयांना ही बाब मान्य आहे काय ? या उत्तराशी मंत्री महोदय सहमत आहेत काय ? या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मंत्री महोदयांना काही सुधारणा किंवा दुरूस्ती करावयाची आहे काय ?

सभापती महोदय, निवेदनात असे नमूद केले आहे की, कोणतीही अनियमितता झालेली नाही. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, यवतमाळ जिल्हाधिकारी हे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या वास्तुचे पदसिध्द अध्यक्ष आहेत, या वास्तुमध्ये गैरव्यवहार होत आहेत, या वास्तूत अवैधरित्या कामे चालू आहेत म्हणून तीन कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. काही कर्मचाऱ्यांवर नियम 420 सारखे गुन्हे दाखल केले आहेत, त्यासंदर्भातील एफआयआरची प्रत माझ्याकडे आहे. मंत्री महोदय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सांगत आहेत की, या ठिकाणी कोणतीही अनियमितता झालेली नाही. असे असेल तर त्या कारणासाठी या कर्मचाऱ्यांना निलंबित का करण्यात आले आहे. दोन दिवसात त्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर हजर करुन घेण्यात आले आहे. काही कर्मचाऱ्यांवर 420 सारखे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी व निवासी उप जिल्हाधिकारी यांनी हेतुपुरस्सर व जाणुनबजून अधिकाराचा गैरवापर केलेला आहे, मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या कर्मचाऱ्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे परत घेण्यात यावेत. त्या कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयातून जामीन मिळाला आहे. जे अधिकारी दोषी आहेत त्यांना निलंबित करावे, त्यांची चौकशी करुन मंत्री महोदय कारवाई करतील काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संदिप बाजोरिया यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो विषय उपस्थित केला त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयात विकास समिती स्थापन करण्यात आली आहे. सन 2008 पासून येथे प्रशासकीय इमारत आहे, त्या इमारतीमध्ये जवळपास 24 कार्यालये आहेत, या इमारतीमध्ये पाणी पुरवठा व प्रसाधन गृहाची देखभाल व स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून जो खर्च होत होता तो खर्च एकत्रित करण्यासाठी ही विकास समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. संस्था नोंदणी अधिनियम 1960 अन्वये ही विकास समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी यवतमाळ हे स्वत: आहेत, सहाय्यक संस्था निबंधक, यवतमाळ यांनी

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड...

दिनांक 6-10-2008 रोजी या संस्थेची नोंदणी केली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या अनुषंगाने शासनाने या समितीची माहिती घेतली आहे, ही समिती वर्षभरात साडेसात ते आठ हजार रुपये गोळा करते. प्रसाधनगृहाची स्वच्छता व पाणी पुरवठा ही कामे या संस्थेमार्फत केली जातात. या ठिकाणी इतर कर्मचाऱ्यांची वेगळी कल्याण समिती स्थापन करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांची तक्रार त्या समितीबाबत असेल तर ती तक्रार मिळाली असे समजून त्याबाबत देखील चौकशी करुन माहिती देण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, जिल्हाधिकारी कार्यालयातील परिसरामधील प्रशासकीय इमारतीचा हा प्रश्न आहे. या परिसरात एकूण किती कार्यालये आहेत, त्याचा उल्लेख मंत्री महोदयांनी केला आहे. या ठिकाणी दुसरी कोणतीही व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे अशा प्रकारे स्वच्छता व पाणी पुरवठा करण्यासाठी असे करावे लागणे ही प्रशासनाच्या दृष्टीने योग्य गोष्ट आहे काय ? या सर्व इमारतींची देखभाल दुरुस्ती, स्वच्छता या सर्वांची कामे नियमितपणे दिलेली असतात. ज्या कर्मचाऱ्यांना ही कामे दिलेली आहेत ते ही कामे करीत नाहीत. म्हणून अशा प्रकारची समिती नोंदणी करणे हे कायदेशीररित्या बरोबर आहे काय ? जिल्हाधिकारी स्तरावर अनेक खेळांच्या व लोक कल्याणाच्या कमिट्या असतात, या समितीच्या माध्यमातून साडेसात ते आठ हजार रुपये निधी गोळा करण्यात आला आहे तो मर्यादित दाखविण्यात आला आहे. साडेसात आठ हजार रुपयांचा हिशोब लावला तर या कामासाठी जे सफाई कर्मचारी लागतात त्यांच्या महिन्याच्या पगारासाठी साडेसात ते आठ हजार पुरेसे होत नसावेत असे मला वाटते.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

त्यामुळे ही संपूर्ण व्यवस्था कोणत्या तरी दुस-या हेतूने करण्याचा प्रयत्न होत आहे का, त्या माध्यमातून गैरव्यवहार होत आहे का, जिल्हाधिकाऱ्यांना अशी समिती स्थापन करण्यास शासनाने परवानगी दिली होती का, परवानगी दिली असेल तर समितीच्या नावाने बँकेत खाते उघडले होते का आणि या समितीच्या व्यवहाराचे 2008 ते 2015 पर्यंत ऑडिट झालेले आहे का?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, अशी समिती स्थापन करण्यास शासनाने कोणतीही परवानगी दिलेली नव्हती. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये वेगवेगळी 24 कार्यालये आहेत. सर्व कार्यालयांचा प्रशासकीय खर्च शासनाकडून केला जातो. त्या ठिकाणी प्रसाधनगृह व पाणी पुरवठयाची व्यवस्था कार्यालये करतात. प्रशासकीय इमारतीमध्ये एकच प्रसाधनगृह आणि पाण्याची व्यवस्था कम्बाईन असल्यामुळे सर्व कार्यालयांनी खर्च देण्यापेक्षा एकत्रित खर्च करण्याच्या हेतूने जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक 6.10.2008 रोजी प्रशासकीय इमारत परिसर विकास समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. स्वत: जिल्हाधिकारी या समितीचे अध्यक्ष असून समितीचे सचिव हे सुध्दा शासकीय अधिकारी आहेत. प्रसाधनगृहाची साफसफाई, पाणी पुरवठयाची व्यवस्था करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली. त्या माध्यमातून साफसफाई आणि इतर कामावर खर्च केला जातो.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हे वेगळे रॅकेट आहे. शासकीय कार्यालयाकडे निधी नाही म्हणून वेगळ्या मार्गाने निधी गोळा केला जातो. रायगड जिल्हयामध्ये सुध्दा असा प्रकार झाला होता. कोणत्याही शासकीय कार्यालयाला शासनाच्या परवानगी शिवाय निधी उभारता येत नाही. कोणत्याही प्रकारची दुरूस्ती, साफसफाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना नसून या कामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविलेली आहे. मंत्री महोदयांना योग्य प्रकारे ब्रिफिंग दिलेले दिसून येत नाही.

माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी म्हटल्याप्रमाणे 7000 रूपयांचा निधी गोळा केल्याचे दाखविले आहे. 7000 रूपयांमध्ये काम करण्यास कोणी माणूस उपलब्ध होतो का? अशा प्रकारे गोळा केलेल्या निधीचा हिशोब ठेवला जात नाही. कोणत्याही शासकीय कार्यालयातील आर्थिक व्यवहाराचे महालेखापालांकडून ऑडिट होते. कोणत्याही सरकारी कार्यालयाकडे येणारा निधी व खर्च होणारा निधी याचे ऑडिट होणे सक्तीचे असते. मंत्री महोदयांनी सांगितले की, ऑडिट होत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

नाही. हा निधी 7000 रुपये एवढा मर्यादित नाही. लोकांना दिल्या जाणाऱ्या कामाच्या मोबदल्याच्या नावाखाली ठेकेदारांकडून निधी गोळा केला जातो. या निधीला 'बोकड फंड' असे संबोधले जाते. वेगवेगळया संस्थांची, आलेल्या पाहुण्यांची बडदास्त ठेवण्यासाठी हा निधी वापरला जातो. शासन अशा प्रकारचा निधी गोळा करण्यावर बंधन घालणार आहे काय, शासनाच्या परवानगी शिवाय निधी गोळा करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय?

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, प्रशासकीय इमारतीतील प्रसाधनगृह आणि पाणी पुरवठ्याच्या संदर्भातील व्यवस्था सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जाते. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी नसतो, मात्र इमारतीतील प्रसाधनगृहाची स्वच्छता ठेवणे अतिशय आवश्यक असते. या प्रशासकीय इमारतीमध्ये वेगवेगळी 24 शासकीय कार्यालये आहेत. .....(अडथळा)....प्रशासकीय इमारत परिसर विकास समितीच्या माध्यमातून कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. याची चौकशी करु आणि गैरव्यवहार आढळल्यास निश्चितपणे कारवाई सुध्दा करु.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, मी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. या प्रकरणी अनियमितता झालेली नाही असे म्हणणे असेल तर कर्मचाऱ्यांना निलंबित का केले होते? मंत्री महोदयांनी स्वत: तेथे भेट दिली होती आणि त्यांच्या मध्यस्थीने तीन दिवसात त्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले, काही लोकांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला.

सभापती महोदय, पालकमंत्री हे क्रांतीवीर आहेत, त्यांना हे प्रकरण चांगल्याप्रकारे माहीत आहे. त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष घालून हे प्रकरण मार्गी लावले होते. 1.79 कोटी रुपये कल्याण निधीमध्ये जमा झालेली रक्कम 18 टक्के व्याज दराने बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात आली होती. हा निधी त्या खात्यातून काढण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना नसताना दुसऱ्या बँकेत 6 टक्के व्याज दराने हा निधी का वळविण्यात आला, याला जबाबदार कोण, कोणाच्या परवानगीने ही मुदत ठेव अन्य बँकेत ठेवण्यात आली? जर या प्रकरणात अनियमितता झालेली नसेल तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अधिकाऱ्यांना निलंबित का करण्यात आले होते व त्यांना पुन्हा सेवेत का घेण्यात आले, फौजदारी गुन्हा का दाखल करण्यात आला? या प्रश्नांचे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही.



श्री.संजय राठोड : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना प्रशासकीय इमारत परिसर विकास समितीच्या संदर्भात दिलेली होती. प्राप्त अनुदान कार्यालयीन प्रसाधनगृहाच्या स्वच्छतेसाठी खर्च करण्यात आले होते. या समितीने दुसरा कोणताही निधी उभारलेला नाही अशी माहिती प्राप्त झाली आहे. माननीय सदस्यांनी कर्मचारी कल्याण निधीच्या संदर्भात जी माहिती दिली आहे ती सत्य समजून त्याची चौकशी केली जाईल. त्यामध्ये कोणी दोषी आढळला तर शासनामार्फत कारवाई सुध्दा केली जाईल, हे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कोणत्याही सरकारी इमारतीवर खाजगी व्यक्तीला खर्च करता येत नाही. माझी बहिण महाराष्ट्र राज्याची खार व बंदरे विभागाची राज्यमंत्री असताना तिला जो शासकीय बंगला देण्यात आला होता, त्या बंगल्यामधील पडदे व इतर साहित्य स्वखर्चाने बदलण्याचा मी प्रयत्न केला असता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आक्षेप घेण्यात आला. शासनाची त्याकरिता परवानगी घ्यावी लागेल असे मला सांगण्यात आले होते. त्यानंतर मी तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांची परवानगी घेऊनच त्या बंगल्यातील पडदे बदलणे व इतर किरकोळ दुरूस्तीचे काम केले होते. शासकीय कार्यालयांमध्ये फोटो लावण्याबाबत केंद्र सरकारने निकष ठरवून दिले आहेत. कोणाच्या मनात आले म्हणून शासकीय कार्यालयात कोणाचाही फोटो लावता येत नाही. त्यामुळे मंत्री महोदयांनी शासनाच्या वतीने उत्तर देत असताना निकष, कायदे, Account code च्या अनुषंगाने उत्तर द्यावे अशी आमची अपेक्षा आहे. कोणत्याही शासकीय अधिकारी शासनाच्या परवानगी शिवाय निधी गोळा करु शकत नाही. अन्यथा सत्ता, खुर्ची आणि अधिकाराचा गैरवापर होऊ शकतो. जी चूक झालेली आहे त्याची उच्च पातळीवरुन चौकशी केली जाईल काय?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल असे मी यापूर्वीच सांगितले आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला, ती महसूल कर्मचारी कल्याण संघटना वेगळी आहे. प्रशासकीय इमारत परिसर विकास समितीच्या संदर्भात लक्षवेधी सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

देण्यात आली होती, त्या संदर्भात मी उत्तर दिले आहे. तरी देखील माननीय सदस्यांचे समाधान होण्यासाठी शासनाकडून या गोष्टीची चौकशी केली जाईल आणि दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

------

नंतर इ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : अंबरनाथ येथील आय.टी.आय. प्रशिक्षण केंद्राच्या वसतिगृहाचे काम पूर्ण करुन त्या ठिकाणी होणाऱ्या चोऱ्यांना आळा घालण्याची आवश्यकता

**मु. शी.** : अंबरनाथ येथील आय.टी.आय. प्रशिक्षण केंद्राच्या वसतिगृहाचे काम पूर्ण करुन त्या ठिकाणी होणाऱ्या चोऱ्यांना आळा घालण्याची आवश्यकता यासंबंधी श्री.रामनाथ मोते,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अंबरनाथ येथे आय.टी.आय. प्रशिक्षण केंद्रात जिल्हयातील व राज्यातील मोठया संख्येने विद्यार्थी प्रशिक्षणासाठी येत असणे, या विद्यार्थ्यांचा प्रवासाचा वेळ वाचावा म्हणून साडेचार कोटी खर्च करुन 300 विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेतल्यानंतर चार वर्षानंतर या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम होणे, सरकारी विभागांमधील लालफितीच्या कारभारामुळे व त्यातील अनेक कामे बाकी असल्याने वसतिगृह अद्याप सुरु झालेले नसणे, समाजकंटकानी या वसतिगृहाच्या इमारतीमधील ग्रील, इलेक्ट्रीक वायर्स, पाण्याच्या टाकीची झाकणे, दरवाजे इ. चोरी करणे, वसतिगृहाचे उद्‌घाटन झाले नाही तर वसतिगृहाची नासधूस होऊन केवळ भिंतीच शिल्लक राहतील अशी नागरिकांकडून तक्रार होणे, आयटीआयमध्ये एकूण तीन शिफ्टसाठी सहा शिपाई कार्यरत असणे, अनेकदा डयुटीवर असलेल्या शिपायांनाही मारहाण करुन साहित्य चोरुन नेत असल्याची तक्रार आयटीआयचे प्राचार्य पी.आर.शिवदे यांच्याकडून स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये करुनही कोणतीही कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास येणे, वसतिगृहासाठी आवश्यक असलेले फर्निचर नसणे तसेच वसतिगृह अधिक्षकाचे पद रिक्त असणे, या वसतिगृहाची प्रलंबित कामे पूर्ण

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते...

करुन ते लवकरात लवकर सुरु करण्याकामी जनतेकडून व लोकप्रतिनिधींकडून वारंवार होत असलेली मागणी, या वसतिगृहातील सामानाच्या चोऱ्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भूमिका."

श्री.रवींद्र वायकर (उच्च व तंत्र राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ग्रामीण भागातील जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ शकत नाही असे विद्यार्थी अंबरनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये तांत्रिक शिक्षण घेतात. अशा विद्यार्थ्यांची संख्या सुमारे 2200 पेक्षा अधिक आहे. आपण अनेक वेळा त्या आय.टी.आय.मध्ये गेलेले आहात. अंबरनाथ येथील आय.टी.आय. 11 एकरच्या जागेत सुरू आहे. येथील विद्यार्थ्यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून 4 वर्षा पूर्वी वसतिगृहाची व्यवस्था निर्माण करण्यात आली. पाच कोटी पेक्षा अधिक निधी त्यासाठी मिळालेला आहे. ती इमारत अत्यंत चांगल्या स्थितीत उभी आहे. या इमारतीमध्ये साधारणत: 60 खोल्या आहेत. एका खोलीमध्ये पाच विद्यार्थी राहू शकतात. तेथे 300 विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होऊ शकते. ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्याचा माझा उद्देश असा आहे की, गेल्या पाच वर्षात ही इमारत उभी राहून देखील अद्यापि ते वसतिगृह सुरू झालेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची सोय झालेली नाही. माननीय मंत्र्यांनी शासनाच्यावतीने उत्तर दिले आहे की, ही इमारत पूर्ण झाली आहे. परंतु, अद्यापि त्या इमारतीला ओ.सी.मिळालेली नाही. त्यामुळे हे वसतिगृह हस्तांतरित करण्यात आलेले नाही. त्यामुळे माझा पहिला स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या इमारतीला ओ.सी.मिळवून देण्याचे काम किती दिवसांमध्ये पूर्ण करण्यात येईल आणि हे वसतिगृह विद्यार्थ्यांना उपयोगासाठी केव्हा उपलब्ध करून देण्यात येणार आहे? येथे सर्व प्रकारची सुविधा आहे. विजेचा पुरवठा आहे. प्रत्येक खोलीमध्ये फॅन आहे. फक्त तेथे अन्य काही सुविधा उपलब्ध करून देणे बाकी आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तेथे कर्मचाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. तेथे अधीक्षक, लिपिक, वॉचमन इत्यादी अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. तेव्हा हे सर्व कर्मचारी नियुक्त करण्यासंबंधी शासन किती दिवसांमध्ये कार्यवाही करणार आहे ? अजून एक अनुपूरक प्रश्न मला विचारावयाचा आहे. तो मी आपल्या अनुमतीने नंतर विचारतो.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, अंबरनाथ येथील वसतिगृहासंबंधातील प्रश्न विचारलेला आहे. औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, अंबरनाथ येथे तळमजला + तीन मजल्याचे वसतिगृह बांधण्याचे काम हाती घेण्यात आले

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रवींद्र वायकर...

होते. या कामास खरे म्हणजे उशीर झालेला आहे. त्यामुळे पहिल्या कंत्राटदाराला काढून दुसऱ्या कंत्राटदाराला नेमण्यात आले व त्या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. या इमारतीला ओ.सी.कधी पर्यंत मिळणार, वसतिगृह अधीक्षक व विद्यार्थ्यांसाठी अन्य सुविधा कधी देणार यासंबंधातील प्रश्न विचारलेले आहेत. मी या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ इच्छितो की, एक महिन्यांच्या आत यास ओ.सी.दिली जाईल. बाकीच्या सुविधा दिल्या जातील. कर्मचारीवर्ग पुरविला जाईल. एक महिन्यामध्ये हे वसतिगृह मुलांसाठी सुरू करून देण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. चांगले उत्तर दिलेले आहे. एक महिन्यामध्ये माझ्या विद्यार्थ्यांची सोय होऊ शकेल. हे वसतिगृह अंबरनाथ आय.टी.आय.च्या परिसरात आहे. येथे प्रचंड मोठी जागा आहे. या वसतिगृहामध्ये केवळ अंबरनाथ प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होईल असा काही मुद्दा नसावा. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी ठाण्याच्या आय.टी.आय.मध्ये जातात. उल्हासनगर, कल्याणच्या आय.टी.आय.मध्ये जातात. हे विद्यार्थी फार लांबून येतात. शहापूर येथून आमचा आदिवासी विद्यार्थी देखील येतो. या वसतिगृहात 300 विद्यार्थ्यांची राहण्याची, निवासाची सोय होणार आहे. जे विद्यार्थी अंबरनाथच्या आय.टी.आय.मध्ये नाहीत पण त्याच जिल्ह्यातील अन्य आय.टी.आय.मध्ये शिक्षण घेत आहेत अशांना सुद्धा या वसतिगृहामध्ये जागा उपलब्ध असल्यास सामावून घेणार आहात काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. हे विद्यार्थ्यांचे वसतिगृह आहे. ग्रामीण भागातील गोरगरीब, कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी, जे उच्च शिक्षण घेऊ शकत नाही त्यांच्यासाठी बांधलेले हे वसतिगृह आहे. त्यामुळे या वसतिगृहामध्ये आपल्याला भोजनाची देखील व्यवस्था करावी लागणार आहे. प्रायव्हेट ठेकेदाराकडून आपण जेवण्याची व्यवस्था केली तर ते विद्यार्थ्यांना परवडणारे नाही म्हणून आपण अन्य ठिकाणी सुविधा देतो त्या प्रमाणे या वसतिगृहासाठी जे कंत्राटदार नेमणार आहात त्याला शासनाकडून सबसिडी देण्यात येणार आहे काय ?

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, या वसतिगृहाची क्षमता 300 आहे. तेथे कमी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर उर्वरित जागेसाठी इतर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला पाहिजे. त्यामुळे इतर शिक्षण घेणारे विद्यार्थी असतील मग ते कोणत्याही फॅकल्टीचे असले तरी त्यांना तेथे नक्कीच प्रवेश दिला जाईल. सन्माननीय सदस्यांनी वसतिगृह सुरू झाल्यानंतर किचन देखील सुरू झाले पाहिजे असा मुद्दा उपस्थित केला आहे. किचन सुरू झाले नाही तर तेथील जे बचत गट असतील त्यांच्या माध्यमातून ते तात्काळ सुरू करण्यात येईल. नंतर पाहिजे तर कॉन्ट्रॅक्ट पद्धत सुरू करण्यात येईल. परंतु, तेथे आलेल्या विद्यार्थ्याला जेवण देण्याचे पहिले काम तात्काळ सुरू करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : धन्यवाद.

.........

**लक्षवेधी सूचनेसंबंधी**

**उप सभापती :** आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्यात आली आहे.

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : नाशिक आयुक्त कार्यालयाने अन्नधान्य खरेदी करण्यासाठी काढलेली निविदा

**मु.शी.** : नाशिक आयुक्त कार्यालयाने अन्नधान्य खरेदी करण्यासाठी काढलेली निविदा यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत रघवंशी, हरिसिंग राठोड, ॲड. हुस्नबानू खलिफे, सर्वश्री संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"नाशिक आयुक्त कार्यालयाच्या अन्नधान्य खरेदी निविदा दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत ऑनलाईनवरुन काढण्यात येणे, या निविदात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यापाऱ्यांना निविदा अर्ज न मिळणे, ऑनलाईनवर पासवर्ड न मिळणे, साईट हॅक करण्यात आल्याने फक्त ३ व्यापाऱ्यांना निविदा अर्ज उपलब्ध होणे, यापूर्वी सुध्दा संबंधित तीनही व्यापाऱ्यांनी सहकार्याने एकमेकांच्या नावावर आदिवासी विकास विभागामध्ये पुरवठा केलेला असल्याने इतर व्यापाऱ्यांना निविदा अर्जाअभावी स्पर्धात्मक दर न देता येणे, त्यामुळे शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होवू नये म्हणून आदिवासी विकास मंत्र्यांकडे १० दिवस निविदा अर्ज विक्रीची मुदतवाढ देण्याबाबत मागणी करण्यात येणे, त्यावर अद्याप कुठलाही निर्णय न होणे, शासनाचा कोट्यावधी रुपयांचा फायदा होत असतांना शासनाने दाखविलेली उदासिनता, मुदतवाढ देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही यावर राज्य शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.विष्णू सवरा (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..6

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, शासनाच्या प्रत्येक निविदेमध्ये काही ठराविक ठेकेदारांना मदत होण्यासाठी जाचक अटी टाकण्यात येतात. नाशिकचे उदाहरण देखील तसेच आहे. या निविदेमध्ये दुसरा कोणीही ठेकेदार पात्र होणार नाही याची काळजी खात्यानेच घेतलेली आहे. निविदेमध्ये एवढ्या जाचक अटी टाकल्या जातात की, दुसरा कोणीही त्या निविदेसाठी पात्र ठरू शकत नाही. यासंबंधी मी माननीय मंत्र्यांकडे तक्रार केली होती. माननीय मंत्र्यांनी तसे आदेश देखील दिले होते. माननीय मंत्र्यांनी दिलेल्या आदेशामुळे 10 दिवस मुदत वाढ मिळालेली नाही. तीन टेंडर पैकी दोनच टेंडर पात्र झाले व एक अपात्र झाल्यामुळे दहा दिवसांची मुदतवाढ मिळालेली आहे. माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे. आपण आयुक्त कार्यालयाच्या स्तरावर निविदा मागवितो. त्यामुळे दर जास्तीचे येतात. त्यामुळे पी.ओ. किंवा आर.एम.पातळीवर आपण टेंडर मागविले तर अटी देखील कमी होतील. आज आपण कोट्यवधी रूपये डिपॉझिटच्या स्वरूपात मागत आहात. कोट्यवधी रूपयांचा टर्न ओव्हर असलेल्याच संस्था पात्र होतील, त्यांचा टर्न ओव्हर एवढा पाहिजे अशी अट आपण टाकतात. अशामध्ये कन्झ्युमर्स फेडरेशन शिवाय कोणीच पात्र होत नाही. कन्झ्युमर फेडरेशन हे ठराविक लोकच चालवितात. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील कुठल्याही खात्यातील निविदा असली की कन्झ्युमर्स फेडरेशनला मिळते. अंडी, केळी तसेच अन्नधान्य यांचा पुरवठा करायचा असेल तर ती निविदा कन्झ्युमर्स फेडरेशनला मिळते. कन्झ्युमर्स फेडरेशनच्या नावाने ठराविकच मक्तेदार येतात. त्यामुळे माझी मंत्र्यांना विनंती आहे की, यामध्ये पारदर्शकता आणावी. आपण प्रामाणिक आहात. अजूनही आपला उद्देश पूर्ण होत नाही. त्यामुळे पी.ओ., आर.एम.स्तरावर प्रकल्पनिहाय निविदा काढल्या तर स्पर्धात्मक दर येतील. पर्यायाने महाराष्ट्र सरकारचे कोट्यवधी रूपये वाचतील. त्यामुळे यापुढे पी.ओ.किंवा आर.एम.स्तरावर निविदा काढण्यात येणार आहे काय ? तसेच, ज्या जाचक अटी टाकल्या जातात त्या तपासून ज्या आवश्यक नाहीत त्या रद्द करून जास्तीत जास्त स्पर्धा कशी होईल हा विचार डोळ्या समोर ठेवून तशा अटी बदलण्यात येतील काय ? ..9

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, आता पर्यंत आपण आयुक्त स्तरावरच म्हणजे एकाच ठिकाणी टेंडर काढत होतो. परंतु, यावेळी आपण अपर आयुक्त स्तरावर ही कार्यवाही केलेली आहे. निविदा प्रक्रिया पी.ओ.स्तरावर करण्यात यावी अशी सन्माननीय सदस्यांची सूचना असून त्याचा शासन निश्चितपणे विचार करेल. परंतु आता जी निविदा काढलेली आहे त्याची मुदत अजूनही आहे. ही मुदत 27 तारखेपर्यंत आहे. यात आपण सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करतो. विद्यार्थ्यांपर्यंत या वस्तू वेळेवर पोहोचल्या पाहिजेत, त्या चांगल्या असल्या पाहिजेत असा देखील प्रयत्न करीत आहोत. पूर्वी एका ठिकाणी निविदा प्रक्रिया होत होती. ती आता चार ठिकाणी करीत आहोत. आपली सूचना आहे त्याप्रमाणे त्या पेक्षाही खाली जाण्याचा आमचा विचार सुरू आहे व तशा प्रकारे शासन कार्यवाही करेल.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी केलेली मागणी अतिशय योग्य आहे. कन्झ्यूमर्स फेडरेशन हे राज्य शासनाचेच आहे. मार्केटींग फेडरेशनमध्ये राज्य शासनाचे 95 टक्के शेअर्स असतात. खरे म्हणजे कन्झ्यूमर्स फेडरेशनमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. मी सुध्दा मार्केटींग फेडरेशनमध्ये सुधारणा करुन घेतलेली आहे. मार्केटींग फेडरेशनमध्ये खरे म्हणजे टेंडरींग बरोबर केले पाहिजे. राज्याच्या बाहेर आपला व्यवहार जाऊ नये यासाठीच कन्झ्यूमर्स फेडरेशन आणि मार्केटींग फेडरेशन असते. असे झाले नाही तर पर राज्यातील व परदेशातील सप्लायर सुध्दा त्या ठिकाणी येऊ शकतात. त्यामुळे कन्झ्यूमर्स फेडरेशनमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे काय ? मी कन्झ्यूमर्स फेडरेशनमध्ये काम केलेले आहे. कन्झ्यूमर्स फेडरेशनमध्ये टेंडरींग झाले पाहिजे,पारदर्शकता राहिली पाहिजे व त्यासंदर्भातील काळजी राज्य शासन घेणार आहे काय ? मार्केटींग फेडरेशन व कन्झ्यूमर्स फेडरेशनमध्ये राज्य शासनाचा आएएस दर्जाचा अधिकारी असतो त्यामुळे तेथे कोणालाही काही गडबड करता येणार नाही. त्यामुळे राज्य शासन मार्केटींग फेडरेशन व कन्झ्यूमर्स फेडरेशनमध्ये कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने प्रभावीपणे पावले उचलील काय ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात पूर्ण निविदा आल्या नाही म्हणून आपण ही प्रोसेस रद्द केली आणि पुन्हा निविदा काढल्या. या व्यवहारात पारदर्शकता असली पाहिजे, जास्तीत जास्त लोकांना यामध्ये भाग घेता आला पाहिजे यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यासंदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मी नम्रपणे सांगू इच्छितो की, या प्रक्रियेला आपण मुदतवाढ दिली नाही तर पात्र ठेकेदार न आल्यामुळे मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या निविदेमध्ये खूप कंडिशन्स टाकलेल्या असल्यामुळे एक दोन ठेकेदाराच्या व्यतिरिक्त इतर लोक पात्रच होत नाहीत. तिसऱ्यांदा सिंगल टेंडर आले तरी ते पात्र होते. खरे म्हणजे यासंदर्भातील प्लॅनिंग सुध्दा तेच लोक करीत असतात. महाराष्ट्रामध्ये या कंडिशन्समध्ये बसणारे लोक नसल्यामुळे ही निविदा दोनदा रिकॉल करण्यात आली होती. पुन्हा पुन्हा टेंडर काढण्याची आपली इच्छा नव्हती परंतु निविदेच्या अटीमुळे पुन्हा पुन्हा टेंडर निघत गेले. तिसऱ्या वेळेस तीन टेंडर आले परंतु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत रघुवंशी .....

त्यातील एका टेंडरच्या संदर्भात अटी व शर्थी पात्र झाल्या नाही म्हणून 10 दिवसांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मागच्या वेळेस ऑनलाईन टेंडर फॉर्म सुध्दा मिळत नव्हते. समजा शेवटच्या दिवशी टेंडर फॉर्म मिळाला तर त्याच्या 48 तास अगोदर आरटीजीएस करावयास पाहिजे अशी अट होती. ही अट खरे म्हणजे आपल्या बुध्दीला तरी पटते काय ? शेवटच्या दिवशी टेंडर फॉर्म घेतल्यानंतर त्याच्या 48 तास आरटीजीएस करावयास पाहिजे अशी जर टेंडरमध्ये अट असेल तर कोणताही ठेकेदार पात्र होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. नाशिक विभागाचे हे टेंडर रिकॉल झाल्यामुळे आपण लोकांना 10 दिवसाची संधी दिली. वह्यांचे टेंडरची काय परिस्थिती झाली आहे याची आपल्याला माहिती आहे. वह्यांचे टेंडर ज्यांनी भरले होते तेच हे लोक आहेत. हेच लोक तुमच्याकडे अंडी पासून, केळीपासून ते आरोग्य विभागात साहित्य पुरविण्याचे ठेके घेत असतात. त्यामुळे या सर्व प्रकारावर अंकुश बसला पाहिजे यासाठी मंत्री महोदय कठोर कारवाई करणार काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना व्यक्त केलेल्या आहेत त्यांचे निश्चितपणे पालन केले जाईल. टेंडर प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त लोकांनी सहभागी होणे आवश्यक आहे. यामध्ये जाचक अटी असतील तर त्या सुध्दा शिथील करण्यात येतील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या खात्यांतर्गत होणाऱ्या खरेदीबाबत या सभागृहात प्रश्नोत्तरे, लक्षवेधी आणि इतर आयुधांच्या माध्यमातून अनेक वेळा प्रश्न उपस्थित झालेले आहेत. आता ही सर्व पध्दत आपण ई-टेंडरींगवर केलेली आहे. ई-टेंडरींगवर सुध्दा अशा गोष्टी होणार असतील तर ते योग्य नाही. खरे म्हणजे अटी आपला विभागच तयार करीत असतो. अटी तयार करण्यामध्ये जे इच्छूक आहेत व त्यांच्यापैकी काही लोकांचा त्यामध्ये संबंध असेल तर त्या अटी आपले खाते तयार करते की, पुरवठादार अटी तयार करीत असतात ? असे जर झाले तर पुरवठादारानाच त्या अटी सोयीस्कर होतील. प्रोसेस प्रमाणे दोन वेळेस निविदा निघाल्यानंतर तिसऱ्या वेळेस एक जरी ठेकेदार राहिला तर ते काम त्या एकटया ठेकेदारालाच मिळणार आहे. इ-टेंडरींगची प्रणाली पराभूत करण्यासाठी ठेकेदार आपापसात संगनमताने नियोजन करुन आपली ई-टेंडरींग प्रणाली पराभूत करीत आहेत. त्यामुळे यासंदर्भात आपण कोणती वेगळी उपाययोजना करणार आहोत ?

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, मी अगोदरच यासंदर्भात उत्तर दिलेले आहे. या प्रणालीमध्ये जाचक अटी किंवा शर्थी असतील तर त्या शिथिल केल्या जातील. याठिकाणी कोणाचीही मक्तेदारी चालू दिली दिली जाणार नाही. शासनाने सर्व व्यवहार पारदर्शीपणाने करण्याचे ठरवलेले असल्यामुळे त्या प्रमाणेच टेंडर काढले जातील व तसाच प्रयत्न शासनाचा राहणार आहे.

-----

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. : *मौजे वाढवण ता. डहाणू जि. पालघर येथील प्रस्तावित बंदराला स्थानिकांचा विरोध होणे***

**मु.शी. : *मौजे वाढवण ता. डहाणू जि. पालघर येथील प्रस्तावित बंदराला स्थानिकांचा विरोध*** होणे यासंबंधी सर्वश्री ***कपिल पाटील, धनंजय मुंडे, आनंद ठाकूर, जयंत पाटील, किरण पावसकर*** ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मौजे वाढवण ता. डहाणू जि. पालघर येथे येऊ घातलेल्या महाकाय बंदराला स्थानिक नागरिकांचा विरोध असणे, तसेच सन १९९७-९९ मध्ये याच ठिकाणी बंदर उभारल्यास स्थानिक ग्रामस्थ व मच्छिमारांनी एकजुटीने केलेला विरोध, सरकारने रद्द केलेले बंदर, सदर भाग डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाच्या कक्षेत येत असल्यामुळे आतापर्यंत पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून आजपर्यंत नाकारण्यात आलेली परवानगी, सागरी जैव विविधता असलेले देशातील हे सर्वात संपन्न सामुद्रिक क्षेत्र नष्ट होण्याची दाट शक्यता, त्यामुळे मासेमारीवर होणाऱ्या विपरित परिणामांची भिती, सदर विभागातील समुद्र किनारा मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाला असून तारापूर औद्योगिक वसाहतींमधून सांडपाणी प्रक्रिया न करता सोडले जाणे, त्याबाबत केंद्र शासनाच्या समुद्र विज्ञान संस्थेने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाला सादर केलेला अहवाल, राज्याच्या मत्स्योत्पादनावर झालेला विपरित परिणाम, मच्छीमार, शेतकरी, डायमेकर यांच्यावर येऊ घातलेले विस्थापन आणि बेरोजगारीचे संकट, तसेच पालघर तालुक्यातील मौजे नांदगाव तेथे येऊ घातलेले जेएसडब्लू कंपनीचे खाजगी बंदर होत असल्याने अशाच प्रकारची उद्भवलेली परिस्थिती, तारापूर अणुशक्ती केंद्राला समुद्रीमार्गाने येणाऱ्या अतिरेक्यांकडून संभावणारा धोका, ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन बंदराचा निर्णय तातडीने रद्द करण्याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले त्यापेक्षा परिस्थिती वेगळी आहे. वाढवण बंदराला स्थानिक नागरिकांचा प्रचंड विरोध आहे. वाढवण बंदर झाले तर या ठिकाणचे मच्छीमार, शेतकरी व डायमेकर्स उद्ध्वस्त होतील. या ठिकाणी मत्स्यबीजचे ठिकाण आहे. या ठिकाणीच रामाचे शंकोधर आहे. त्यामुळे या ठिकाणी बंदर होऊ नये अशी स्थानिक जनतेची मागणी आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात असे म्हटले आहे की, प्रकल्प स्थळी बंदर उभारण्याबाबत कुठल्याही प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच परवानगी मिळाल्याचे दिसून येत नाही असे दुसरे उत्तर दिलेले आहे. परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती काय आहे ? महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे दि.20 जोनेपवारी, 2015 च्या पत्रात स्पष्टपणे म्हटले आहे की, "The Government of Maharashtra had decided to develop modern and all weather port at Wadhwan, Taluka-Dahanu...." पुढे जाऊन असे म्हटले आहे की, रिजनल प्लॅनमध्ये बंदराची तरतूद नसल्यामुळे बंदर होणे शक्य नाही. "In view of the above, it is requested that the matter may be taken up with UDD to include Wadhwan port in the proposed regional plan of Dahanu taluka."
या संदर्भात केंद्र सरकारकडून मेरीटाईम बोर्ड तसेच नेहरु पोर्ट ट्रस्ट यांच्यात 4 जून, 1915 रोजी सामंजस्य करार झाला असून मॅकेन्झी कंपनी बरोबर या बंदराचा विकास करण्याची कार्यवाही देखील सुरु झाली आहे. आजुबाजूच्या 19 गावांचे 7/12 चे उतारे सुध्दा काढून झालेले आहेत. या 19 गावांमध्ये गेल्या दोन आठवडयामध्ये ग्रामस्थांच्या ग्रामसभा झाल्या असून त्यामध्ये त्यांनी एकमताने विरोध केलेला आहे. मे महिन्यात सुध्दा वाढवण येथे निसर्ग हिरवागार असतो. या ठिकाणी उप सभापती महोदय सुध्दा फिरलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे व सन्माननीय सदस्य आंनद ठाकूर यांचा संबंध वाढवण बंदराच्या परिसराशी आहे.

सभापती महोदय, हे वाढवण येथे 1995 मध्ये बंदर होणार होते त्यावेळेला हे बंदर होऊ नये यासाठी आजच्या पर्यावरण मंत्र्यांनी पुढाकार घेतला होता. या ठिकाणी माननीय उद्धवजी ठाकरे स्वत: येऊन हे बंदर होऊ देणार नाही, सरकार करणार नाही असे छातीठोकपणे जाहीर केले होते. परंतु आता पुन्हा 20 वर्षानंतर चोरपावलाने बंदर केले जात आहे. त्यामुळे माननीय

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील....

मंत्री महोदय हे माननीय उद्धवजींने सांगितल्या प्रमाणे, "हे बंदर होऊ देणार नाही" असे सांगतील काय ? तसेच "या ठिकाणची निसर्ग संपदा नष्ट होऊ देणार नाही व येथील लोकांच्या विस्थापनाला आम्ही परवानगी देणार नाही" असे मंत्री महोदय सांगतील काय ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सभागृहात या विषयाच्या संदर्भात जे काही सांगितले आहे ती वस्तुस्थिती असल्यामुळे ती नाकारण्याचा प्रश्न येत नाही. 1997 मध्ये त्याठिकाणी मी सुध्दा मा.उद्धवजींबरोबर सुध्दा होतो. त्यावेळेस मी बंदरे राज्यमंत्री होतो. आम्ही त्या ठिकाणी तेथील मच्छीमारांबरोबर सभा देखील घेतल्या होत्या तसेच त्यांचे म्हणणे सुध्दा आम्ही ऐकून घेतले होते. त्यावेळी सगळयाच मच्छीमारांचा बंदराला विरोध असल्यामुळे माननीय उद्धवजी यांनी "कोणत्याही परिस्थितीत बंदर होऊ देणार नाही" अशा प्रकारचा निर्णय घेतला होता. परंतु आता काही अंशी का होईना वस्तुस्थिती बदलली आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम...

मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की, आता वाढवण येथे बंदर होणार नसून ते समुद्र किनाऱ्यापासून आत 8 ते 10 कि.मी. अंतरावर होणार आहे. आपण ठिकाण बदलले आहे. न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने बंदर उभारण्याबाबत हरकत घेऊन बंदर उभारण्यासाठी परवानगी देता येणार नाही असे कळविले होते. आता आपण जे बंदर उभारत आहोत ते समुद्र किनाऱ्यापासून 8 ते 10 कि.मी. आत आहे व ही बाब न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या कक्षेत येत नाही. बंदर उभारण्याबाबत केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्यामध्ये 76:24 असा एमओयु झालेला आहे. हा एमओयु दिनांक 4 व 5 जून रोजी झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्याकडे माझ्यापेक्षा बरीच माहिती आहे. त्यांची तळमळ माझ्या लक्षात येत आहे. या प्रकल्पास केंद्र सरकारने परवानगी दिलेली आहे. तेव्हा आता या कामाची सर्व परवानगी मिळविणे, मच्छीमारांची ना हरकत घेणे ही सर्व जबाबदारी जेएनपीटीची आहे.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या बंदरासंबंधी माहिती दिली. तसेच त्यांनी सांगितले की, आता चोरपावलाने हे काम करण्यात येत आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून 76:24 अशा भागीदारातून हे बंदर उभारण्यात येत आहे. चार नॉटीकल माईल्सच्या अंतरावर हे बंदर उभारण्यात येणार आहे असे देखील सांगण्यात आले. त्या ठिकाणी आणण्यात येणारा माल हा रस्ते आणि रेल्वेने जाणार आहे. त्यासाठी प्रचंड जागा लागणार आहे. हा अतिशय समृद्ध असा भाग आहे. जवळपास 100 टक्के आदिवासी लोकसंख्या असलेला हा भाग आहे. या भागामध्ये असलेली बिगर आदिवासी वस्ती ही समृद्ध आहे. त्या ठिकाणी प्रत्येक घरातील व्यक्तीच्या हाताला काम आहे. आज आशिया खंडातील सर्वात मोठा डायमेकरचा उद्योग प्रत्येक घरामध्ये आहे. त्या ठिकाणच्या सर्व जमिनी खाजगी मालकीच्या आहेत. त्या परिसरामध्ये कोणतीही सरकारी जमीन नाही. त्यामुळे या सर्व जमिनी सरकारला संपादित कराव्या लागणार आहेत. सन 1996 आणि 1998 साली त्या भागातील लोकांनी बंदर बांधण्यास विरोध केला होता. डहाणू तालुका एन्व्हायर्मेंट प्रोटेक्शन ऑथॉरिटीने बंदर बांधण्यास विरोध केला होता, त्यामुळे ती परवानगी नाकारण्यात आली. आता शासन पुन्हा त्या ठिकाणी बंदर बांधण्यासाठी

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर.....

प्रयत्न करीत आहे. मी चोर पावलाने यासाठी म्हणत आहे की, या कामासाठी मॅकेन्सी कंपनीने तेथील 7/12 चे उतारे जमा केले आहेत आणि त्याची स्थानिकांना काहीही कल्पना नाही. ही माहिती स्थानिकांनी शोधून काढली. तेथील स्थानिकांचा बंदर होण्यास विरोध आहे. स्थानिकांना विश्वासात घेऊन पुढे पावले उचलणे आवश्यक होते. या भागाला ऐतिहासिक महत्व आहे. त्या ठिकाणी शंखोधर आहे. प्रभू रामचंद्रानी आपल्या वडिलांचे कार्य त्या ठिकाणी केले होते. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे त्या बंदरपट्टीला गाव आहे. आम्हाला देखील ते जवळ आहे. या बंदराला स्थानिकांचा विरोध असल्यामुळे त्यांना विश्वासात घेऊन हा प्रकल्प केला पाहिजे. त्या ठिकाणी वरोर, वाढवण, तडीयाल अशी गावे असून तेथे 50 हजारांची लोकवस्ती आहे. या प्रकल्पामुळे हे सर्व लोक उद्ध्वस्त होणार आहेत. माझा प्रश्न आहे की, स्थानिकांना विश्वासात घेतल्याशिवाय आणि त्यांच्या संमतीशिवाय सरकारने हा प्रकल्प करु नये अशी आमची मागणी आहे. आमची ही मागणी सरकार मान्य करेल काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी "चोरपावलांनी" असा शब्दप्रयोग केलेला आहे, तो सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावा अशी विनंती आहे. कारण या प्रकल्पास केंद्र सरकारने खुले आम परवानगी दिलेली आहे. त्या संदर्भात केलेल्या एमओयुची माहिती नेटवर आहे. सरकारने कोणतेही काम गुपचूप केलेले नाही. मी अगोदरच स्पष्टीकरण केलेले असल्यामुळे चोरपावलाने काम करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तेथील स्थानिक मच्छीमारांच्या जागा या प्रकल्पासाठी जाणार आहेत, त्यांना विश्वासात घ्यावे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. मी त्यांच्या मताशी सहमत आहे. त्याबद्दल कोणतेही दुमत नाही. या ठिकाणी जी काही चर्चा होईल ती सर्व चर्चा मी माननीय केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देईन. परंतु आम्ही चोरपावलाने कोणतीच कामे करीत नाही. स्थानिकांना न्याय मिळाला पाहिजे या भूमिकेशी शासन 100 टक्के सहमत आहे. त्याबद्‌दल देखील कोणतेही दुमत नाही. आम्ही मच्छीमारांसोबत आहोत, जनतेसोबत आहोत. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने परवानगी दिलेली आहे.या प्रकल्पाच्या कामामध्ये राज्य शासन 26 टक्के भागीदार आहे त्यामुळे राज्य शासनाला परवानगी देणे भाग आहे. स्थानिक जनतेला विश्वासात घेतले पाहिजे या सन्माननीय सदस्यांच्या मागणीशी मी निश्चितपणे सहमत आहे आणि त्याप्रमाणे प्रयत्न केला जाईल.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, तारापूर औद्योगिक वसाहतीमधून सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते पाणी तसेच समुद्रामध्ये सोडले जाते त्यामुळे मोठ्या प्रमाणात माशांची हानी होत आहे. मागील वर्षी देखील स्थानिक मच्छीमारांचे फार नुकसान झाले होते आणि त्याबाबत भरपाई देण्याची त्यांची मागणी देखील सरकारने मान्य केलेली नाही. सन 1997 मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार लॉब्स्टर, शिवणमाशांच्या 200 विविध प्रजाती त्या ठिकाणी अस्तित्वात आहेत आणि त्या माशांचे प्रजोत्पादन त्याच भागात होते. तेव्हा त्या ठिकाणी बंदर झाल्यास त्याचे अनेक वाईट परिणाम होणार आहेत. ज्या प्रमाणे जैतापूर प्रकल्पासंबंधी आपली भूमिका आहे, त्या प्रकल्पाबाबत आपण ज्या संवेदनशीलपणे पाहत आहात त्याच संवेदनशीलतेने या ठिकाणी पाहणार काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, तारापूर येथील एमआयडीसीमधून बाहेर पडणाऱ्या पाण्यामुळे प्रदूषण झालेले आहे. आपण तेथील सीईपीची नमुने देखील घेतलेले आहेत. जवळपास 100 कंपन्यांवर कडक कारवाई केलेली असून त्या कंपन्यांवर कोट्यवधी रुपयांचा दंड देखील लावलेला आहे. आठ दिवसापूवी एक मोहीम उघडून 22 कंपन्यांना पुन्हा नोटीस दिलेली आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमधून समुद्रामध्ये सांडपाणी जाऊ नये म्हणून पर्यावरण विभाग फक्त प्रयत्न करणार नाही तर ते पाणी समुद्रात जाणार नाही याची देखील दक्षता घेईल.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, एखाद्या ठिकाणी औद्योगिक विकास होतो तेव्हा डेव्हलपमेंट कमिशनर, इंडस्ट्री विभाग जमीन अधिग्रहणासाठी परवानगी देते. केंद्र शासनाचा जमीन अधिग्रहणाचा कायदा आहे त्यामध्ये सोशल इम्पॅक्ट ॲसेसमेंटचा विषय आहे. पर्यावरण विभाग परवानगी देते त्यावेळी सोशल इम्पॅक्ट ॲसेसमेंटचा विचार केला जातो. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले की, या प्रकल्पाला स्थानिकांचा आणि ग्रामपंचायतीचा विरोध आहे. यामध्ये सोशल इम्पॅक्ट निगेटीव्ह आहे. असे असताना पर्यावरण आणि उद्योग मंत्रालयाने या प्रकल्पाला नियम 63 (A) खाली कशी परवानगी दिली याचा खुलासा करण्यात येईल काय ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी या संदर्भात अगोदरच उत्तर दिलेले आहे. माझे उत्तर झाल्यानंतर सन्माननीय सदस्य सभागृहात आले. न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 11 सदस्यांची एक समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या माध्यमातून त्यांची नाहरकत येत नाही तोपर्यंत डहाणू भागामध्ये कोणताही उद्योग घ्यायचा नाही, असा निर्णय झाला होता. मागच्यावेळी याच समितीने वाढवण बंदरासाठी परवानगी दिली नव्हती म्हणून त्या ठिकाणी बंदर झाले नाही. माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांनी तो प्रकल्प रद्द केला. पण आता आपण जे बंदर उभारत आहोत ते समुद्रकिनाऱ्यापासून 8 ते 10 कि.मी. आत आहे. तो विषय त्या समितीच्या कक्षेत येत नाही. त्यामुळे त्या ग्रामपंचायतीच्या परवानगीची आवश्यकता नाही.

यानंतर श्री.बोर्डे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम.....

न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी समितीच्या ना हरकतीची आवश्यकता नाही. बाकीच्या ज्या परवानग्या घ्यावयाच्या आहेत त्या घेण्याची जबाबदारी ही जेएनपीटीची असेल.

**उप सभापती** : सभागृहाची वेळ दुपारी 11.50 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले नाही की, राज्य सरकारचे स्वतंत्र बंदर धोरण आहे. त्यामुळे त्या ठिकाणी इंडस्ट्री ॲक्टनुसार कार्यवाही होत नाही. बंदर धोरणानुसार 63 च्या परवानगीची आणि पंचायतीच्या परवानगीची आवश्यकता नाही. सर्व डेव्हलपमेंट तयार करण्याचा अधिकार बंदर विभागाला आहे. मुळात हे बंदर ओपन-सी मध्ये होत आहे. वास्तविक पाहता या लक्षवेधी सूचनेला पर्यावरण विभाग आणि बंदरे विभागाने एकत्रितपणे उत्तर द्यावयास पाहिजे होते. मी स्पेसिफिक विचारतो की, या बंदराचा ड्राप किती आहे आणि समुद्र किनाऱ्यापासून हे बंदर किती अंतरावर होणार आहे तसेच या बंदराला ब्रेक वॉटर करण्याची आवश्यकता लागणार आहे काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सदरहू बंदर समुद्र किनाऱ्यापासून 8 ते 10 कि.मी. आतमध्ये आहे. त्याची खोली 20 मीटर आहे. समुद्रालगत देखील बोटी येऊ शकतात इतकी ही खोली आहे. मला वाटते बाकी सर्व गोष्टी सन्माननीय सदस्यांना माहीत आहेत, किंबहुना ते यातील तज्ज्ञ आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी कबूल केले की, मच्छीमारांचा विचार करता सरकारने अगोदर हे बंदर रद्द केले होते. हे बंदर जेवढे आत करण्यात येईल तेवढा मच्छीमारांना धोका संभवतो. हा धोका केवळ तेवढ्याच भागापुरता नव्हे तर संपूर्ण पश्चिम किनारपट्टीवर हा धोका संभवतो. कारण हा मत्स्यबीजाचा मोठा पट्टा आहे. मी विचारले की, हा बदल नेमका का घडला ? त्यावर माननीय मंत्री म्हणाले की, आता परिस्थिती बदलली आहे. मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, आपली 56 इंच असलेली छाती आता 5 इंचाची का झाली ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आमची छाती कमी झालेली नाही तर आणखी वाढलेली आहे आणि ती कमी होणार नाही. अगोदर बंदराची जी जागा होती ती समुद्र किनाऱ्याजवळ होती. परंतु आता हे बंदर समुद्र किनाऱ्यापासून

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम....

आतमध्ये करण्यात येणार आहे. आता बंदराची साईट बदलली आहे. आमची छाती आणखी कशी वाढेल असा आमचा निश्चितपणे प्रयत्न राहील. या निमित्ताने मी शब्द देऊ इच्छितो की, तेथील स्थानिक मच्छीमारांवर अन्याय होणार नाही याची दक्षता शासनाकडून निश्चितपणे घेतली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सरकारने मागच्या दाराने येऊन हे बंदर करु घातले आहे आणि त्याला माननीय मंत्री समर्थन देत आहेत. त्यामुळे मी या सरकारचा निषेध करुन सभात्याग करतो.

(सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व आनंद ठाकूर सभात्याग करतात.)

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मराठा समाजाच्या आरक्षणाचा आदेश निघाल्यानंतर ते स्थगितीच्या दरम्यानच्या काळातील विद्यार्थी व सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण धारकाला प्रवेश व नोकरी मिळण्याबाबतचा आदेश काढूनही त्याची अंमलबजावणी न होणे

**मु.शी.** : मराठा समाजाच्या आरक्षणाचा आदेश निघाल्यानंतर ते स्थगितीच्या दरम्यानच्या काळातील विद्यार्थी व सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण धारकाला प्रवेश व नोकरी मिळण्याबाबतचा आदेश काढूनही त्याची अंमलबजावणी न होणे, या संबंधी श्री.विनायक मेटे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठा समाजाला दिनांक 9 जुलै, 2014 रोजी 16% आरक्षण मिळणे, त्यास दिनांक 14 नोव्हेंबर, 2014 रोजी स्थगिती मिळणे, आरक्षणाचा आदेश निघाल्यानंतर ते स्थगितीच्या दरम्यानच्या काळातील विद्यार्थी व सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण धारकाला प्रवेश व नोकरी मिळणे असा शासनाने आदेश काढणे, सदरील आदेशाची अंमलबजावणी शिक्षण संस्था व विविध शासनाचे विभाग यांनी न करणे, यामुळे हजारो मुलामुलींचे नुकसान होणे, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व भरतीमधील आरक्षण धारकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा आणि हजारो मुला-मुलींच्या भवितव्याशी निगडित आहे. या राज्यातील श्रीमंत नव्हे, परंतु मराठा समाजातील गरीब मुला-मुलींना शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षण मिळावे म्हणून अनेक वर्षापासून चळवळ सुरु होती. त्या चळवळीला शासनाने प्रतिसाद देऊन, त्या समाजाला आरक्षण लागू केले. त्यानंतर शासनाने आदेश काढला. परंतु नंतर त्या आदेशाला स्थगिती मिळाली. त्यानंतर शासनाने कायदा केला आणि त्या कायद्याला सुध्दा एप्रिल महिन्यामध्ये स्थगिती देण्याचे काम माननीय उच्च न्यायालयाने केले. आरक्षणाचा आदेश दिनांक 9 जुलै, 2014 रोजी काढला आणि दिनांक 14 नोव्हेंबर, 2014 रोजी आरक्षणाच्या कायद्याला स्थगिती दिली गेली. दरम्यानच्या पाच-सहा महिन्याच्या काळात ज्या मुला-मुलींनी शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. या दरम्यानच्या काळात शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी नोकर भरतीच्या जाहिराती दिल्या असतील, परीक्षा घेतल्या असतील, उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या असतील किंवा त्यांची निवड केली असेल. अशा उमेदवारांना नोकरीत रूजू करुन घेण्याचा प्रश्न निर्माण झाला. सभापती महोदय, मी मागणी केल्यानंतर दिनांक 21 फेब्रुवारी, 2015 रोजी पुन्हा एक आदेश काढण्यात आला. तो आदेश काढत असताना त्यात काही त्रुटी राहिल्या. त्या आदेशामध्ये अ, ब, क, ड, इ, ई, प अशी विगतवारी केली गेली. माननीय उच्च न्यायालयाने एप्रिल महिन्यामध्ये आरक्षण कायद्याला स्थगिती देताना काही निर्देश दिलेले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याचे काम या शासनाने करावयास पाहिजे. तसेच त्या अनुषंगाने शुध्दी पत्रक काढले पाहिजे. माननीय उच्च न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले आहे की, या दरम्यानच्या काळात ज्यांनी शैक्षणिक प्रवेश घेतला असेल किंवा ज्यांच्या मुलाखती घेतल्या असतील, निवड केली असेल त्यांना 11 महिन्यांचे आदेश द्यावेत किंवा या संदर्भातील निर्णय होईपर्यंत त्यांची निवड करावी. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मराठा समाजातील उमेदवारांची नोकरी संरक्षित करण्याच्या दृष्टीने शासनाच्या माध्यमातून शुध्दी पत्रक काढण्यात येईल काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी मराठा आरक्षणाचा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. महोदय, शासनाने दिनांक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

9 जुलै, 2014 रोजी मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण देण्याच्या बाबतीत अध्यादेश काढला

..5..



श्री.राजकुमार बडोले....

होता. त्याला दिनांक 14 नोव्हेंबर, 2014 रोजी स्थगिती देण्यात आली. त्यानंतर अध्यादेशाचे दिनांक 9 जानेवारी, 2015 रोजी कायद्यात रुपांतर झाले. त्यानंतर शासनाने जे आरक्षण दिले होते त्या बाबत माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 7 एप्रिल, 2015 रोजी आदेश दिला. त्यामध्ये माननीय उच्च न्यायालयाने मराठा समाजाच्या लोकांना नोकरीमध्ये ज्यांना आरक्षण दिले होते त्यांना ओपनमध्ये गृहित धरावे अशा सूचना केल्या. त्या सूचनेचा संदर्भ लक्षात घेऊन या पुढे सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक 21 फेब्रुवारी, 2015 रोजी जी.आर. काढला होता. त्या जी.आर. मध्ये सुधारणा करण्यासाठी दि.7 एप्रिल, 2015 रोजीच्या आदेशानुसार ईएसबी प्रवर्गाला ओपनमध्ये घेण्याच्या संदर्भातील आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून 15 दिवसांत काढण्यात येईल.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी मांडलेला विषय हा छोटा नसून फार मोठा आहे. या सरकारने निवडणुकीपूर्वी धनगर, मराठा आणि मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबद्दल काही प्रमाणात रणशिंग फुकले होते. त्या आधारावर त्यांनी निवडणुका जिंकल्या. परंतु अद्यापपर्यंत या समाजाला न्याय मिळालेला नाही, याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आणि त्यांना न्याय देण्यासाठी सातत्याने मागणी करीत आहेत. आज ते सत्ताधारी बाजूत असताना सुध्दा अशा प्रकारची मागणी करीत आहेत, याबद्दल मला मनापासून आनंद वाटतो. त्यांनी जरी पक्ष बदलला असला तरी त्यांची मागणी तशीच आहे. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी धनगर समाजाला आरक्षण मिळण्याकडे थोडेसे लक्ष केंद्रीत करावे, अशी माझी विनंती आहे. निवडणुकीच्या काळात या समाजांना न्याय दिला जाईल, असे सांगितले गेले. परंतु हे सरकार आल्यानंतर आरक्षणाच्या संदर्भात कोर्टकचेऱ्या सुरु झाल्या. तसेच नवीन समितीच्या माध्यमातून आर्थिक दुर्बल मराठा समाजाला 16 टक्के आरक्षणाचा फायदा मिळेल असे बऱ्याच नेत्यांनी जाहीर भाषणातून सांगितले होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....
बाकीच्या ठिकाणचे जाऊ द्या. परंतु शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनी यांची फार मोठी अडचण निर्माण झाली आहे. मुलामुलींना आरक्षणानुसार प्रवेश मिळाले. परंतु नंतर पुन्हा ते न्यायालयाचे कारण दाखवून थांबविण्यात आले. विषय असा आहे की, आरक्षणानुसार प्रवेश मिळालेल्या मुलामुलींना परत खुल्या वर्गात समाविष्ट करून घेण्यासाठी काही सूचना केल्या गेल्या. मुलामुलींना प्रवेश आरक्षणानुसार मिळाले आहेत. आपण त्यांना परत रेग्यूलर करणार का, न्यायालयाचा आदेश आहे, त्या संदर्भात लवकरात लवकर पाठपुरावा करून समाजाला न्याय मिळवून देणार का ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, दिनांक 9 जुलै ते दिनांक 14 नोव्हेंबर, 2014 पर्यंत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले होते, ते माननीय उच्च न्यायालयाने ऑलरेडी सुरक्षित केले आहेत. नोकरीतील आरक्षणाच्या संदर्भातील प्रश्न होता, त्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 7 एप्रिल, 2015 ला असे म्हटले होते की, " The appointment of 16% posts reserved for Marathas under the above legislation, in the advertisement already issued, shall be made from among the open merit candidates." माननीय उच्च न्यायालयाने अशा प्रकारचा आदेश दिला होता. स्पेसिफाईड प्रश्न होता. मी मघाशी उत्तर दिल्याप्रमाणे या संदर्भात दिनांक 7 एप्रिलचा माननीय उच्च न्यायलयाचा आदेश आहे. मी सांगितले आहे की, या संदर्भातील शासन निर्णय 15 दिवसांत काढत आहोत. आरक्षणाच्या संदर्भातील पुढील सुनावणी दिनांक 29 जुलै, 2015 ला आहे. शासनाने सर्व वैधानिक मते घेऊन माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ॲफिडेव्हिट दाखल करण्यात आले आहे. पुढील कार्यवाही सरकार करणार आहे. मराठा समाजाचे आरक्षण अबाधित राहील, आरक्षणाला कोणत्याही प्रकारचा धक्का पोहचू नये अशी सरकारची कार्यवाही सुरू आहे.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, मराठा, धनगर व मुस्लीम समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी उपस्थित केला आहे आणि त्यास सन्माननीय



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. महादेव जानकर ....

सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी अनुमोदन दिले. मी सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देऊ इच्छितो. देशात शाहू राजांनी सामाजिक समतेचे पहिले आरक्षण 1903 साली देण्याचा प्रघात केला. मी सर्वप्रथम माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे व सरकारचे अभिनंदन करू इच्छितो. माननीय सर्वोच्च न्यायालयाने बॅन आणून मराठा समाजाच्या आरक्षणाला स्टे दिला होता. परंतु तरीही विधानसभेत स्पेशली ॲक्ट करून मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका त्यांनी घेतली या गोष्टीकडेही आपण गौर केला पाहिजे. आज मराठा समाजातील मुलांना बऱ्याच ठिकाणी अपॉईंटमेंट लेटर मिळून सुध्दा अपॉईंटमेंट दिलेली नाही हा विषय आहे. आमचे सरकार त्या संदर्भात जरूर लवकरात लवकर कार्यवाही करील असे मी आपल्याला आश्वस्त करू इच्छितो. (अडथळा) मी माननीय मंत्र्यांना या संदर्भात विनंती करतो. मराठा समाजात आज देखील फक्त 10 टक्के सधन वर्ग आहे आणि 90 टक्के वर्गाची अवस्था फार बेकार आहे. शिरूर, माण, उस्मानाबाद येथील काही मुले मला भेटल्यानंतर मी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे साहेबांशी चर्चा केली. माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, आपल्याला या संदर्भात स्पेशल जीआर काढता येतो का ते पहावे आणि त्या मुलांना अपॉईंटमेंट देऊन काही करता येईल का या संदर्भात लवकर कार्यवाही करावी.

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गांकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीकरिता, शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांकरिता माननीय उच्च न्यायालयाच्या दिनांक 7 एप्रिल, 2015 च्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या संदर्भातील आदेश शासन 15 दिवसांत काढत आहे.

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, उत्तरात मराठा समाजाच्या मुलांना ईएसबीसीमध्ये 16 टक्के आरक्षण देण्याबाबत उल्लेख केला आहे. माझे सांगणे आहे की, ज्या मुलांनी इंजिनिअरिंग, मेडिकल अशा क्षेत्रामध्ये, संस्थांमध्ये प्रवेश घेतले आहेत, त्यांच्या संदर्भात संस्थांनी काय भूमिका घेतली पाहिजे, ते ईएसबीसीमध्ये आहेत की आरक्षणामध्ये आहेत, याबाबतीत शासनाचे कोणतेही सुस्पष्ट आदेश कोणत्याही संस्थांना किंवा विद्यापीठांना नाहीत. शासन त्या संदर्भात भूमिका स्पष्ट करणार का ?

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, शासन सदर विषयाच्या संदर्भातील स्पष्ट शासन निर्णय 15 दिवसांत काढत आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांचे आभार व्यक्त करतो. शासनाने शुध्दीपत्रक काढण्याचे मान्य केले आहे. राज्यातील अनेक मुलांचे अर्ज माझ्याकडे आहेत, ज्यांच्या नोकरीच्या संदर्भातील जाहिराती निघून मुलाखती झाल्या, निवड झाली, पण त्यांना जॉईन करून घेण्याच्या ऑर्डर दिल्या नाहीत. अनेक जण आहेत. जिल्हा परिषदेच्या अनेक ठिकाणी निवड झालेल्या आहेत, मुलाखती होऊन सर्व प्रक्रिया पार पडली आहे. परंतु मुलांवर अन्याय झाला आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अनेक भागांमध्ये असे झाले आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की, शुध्दीपत्रक काढताना, आज ज्यांची संपूर्ण निवड प्रक्रिया पूर्ण झाली आहे, त्यांना ताबडतोब 15 दिवसांच्या आत ऑर्डर देण्यास सांगणार का ? सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डवखरे यांनी उपस्थित केलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. फक्त मेडिकलचे ॲडमिशन झाले नव्हते. परंतु तोपर्यंत ते संपले होते आणि त्यामुळे इंजिनिअरिंग, औषधशास्त्र, आयटीआय या क्षेत्रांमध्ये प्रवेश झाले हाते. शासनाने 21 तारखेला आदेश काढला, त्यामध्ये असा उल्लेख केला आहे की, दिनांक 14 नोव्हेंबर, 2014 रोजी दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी, शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील. परंतु ही ओळ कोणतीही शिक्षण संस्था मानत नाही किंवा काहीही कार्यवाही करीत नाही. मी माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांना या संदर्भात फोन करण्यास सांगितले, तेव्हा प्रवेश झाले. नुसते प्रवेश होऊन उपयोगाचे नाही. प्रक्रिया झाली. परंतु त्यांचे पुढील वर्षापर्यंत, शेवटपर्यंत, माननीय उच्च न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत ज्यामधून प्रवेश झाले, ज्या सवलतीमध्ये प्रवेश झाले, त्या सवलतीचा लाभ त्यांना मिळण्याचे ते हक्कदार आहेत, त्या सवलती त्यांना मिळाल्या पाहिजेत आणि त्याकरिता शुध्दीपत्रकामध्ये त्याचा सुध्दा अंतर्भाव करणे अत्यंत आवश्यक आहे, मग फीच्या किंवा अन्य सवलतीच्याबाबत असेल, त्याचा सुध्दा अंतर्भाव करणार का ? जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभागापासून ते अन्य विभागांनाही या सर्व लोकांना ताबडतोब नोकरीचे आदेश देण्याचे आदेश शासन देणार का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे साहेबांनी प्रश्न विचारला आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे, माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 7 एप्रिल, 2015 ला आदेश दिला आहे, त्याप्रमाणे शासन पुढील आदेश काढण्याची कार्यवाही 15 दिवसांत करणार आहे.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, मराठा आरक्षणाला अभेद्य ठेवणे, मराठा आरक्षण अभेद्य ठेवण्यासाठी कार्यवाही करणे ही शासनाची भूमिका आहे. उच्च न्यायालयाचा दिनांक 7 एप्रिलचा निर्णय आल्यानंतर या अंतरिम आदेशाच्या विरूध्द एसएलपी फाईल करण्याची भूमिका शासनाने घेतली आहे का ? आज शासनाकडे शासनाची बाजू मांडण्यासाठी कोणी नाही, 1 महिन्यापासून ॲडव्होकेट जनरलची नेमणूक झालेली नाही. मग असे असताना शासन आपली बाजू ठामपणे न्यायालयासमोर कशी मांडणार आहे याचा खुलासा माननीय मंत्री करतील का ?

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण देण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी प्रश्न उपस्थित केला असून त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.राहुल नार्वेकर यांनी उपप्रश्न विचारला आहे. शासनाची अशी ठाम भूमिका आहे की, मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर आणि कोर्टाचे स्थगिती आदेश आल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे, त्यांना संरक्षण दिले जाईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी जी शंका उपस्थित केली आहे, त्याबाबत मी स्पष्ट करु इच्छितो की, या वर्षापासून ते कोर्स पूर्ण होईपर्यंत या आरक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळेल आणि कोर्टामध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी चांगल्या वकिलांची नेमणूक करण्यात येईल.

**उप सभापती :** सभागृहाची वेळ सकाळी 11.55 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, वकिलांची नेमणूक केलेली आहे. तारखेच्या वेळी कोर्टामध्ये शासनाच्या वतीने वकील उभे राहतील. मी दिशाभूल करीत नाही. मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची ठाम भूमिका आहे.

**उप सभापती :** मंत्री महोदय उत्तर देत आहेत. सन्माननीय सदस्यांनी शांतपणे त्यांचे उत्तर ऐकून घ्यावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती :** सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.52 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>**

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती** : माननीय मंत्री महोदय सभागृहात आलेले आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आज माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेब आणि सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार साहेबांचा वाढदिवस आहे. आपण चांगल्या प्रकारे सभागृहाचे कामकाज करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झाले होते. आम्ही तीन दिवसापासून रोज सकाळी 10.00 वाजता सभागृहात येतो. परंतु, सभागृहात कधी मंत्री उपस्थित नसतात, तर कधी प्रश्नकर्ते उपस्थित नसतात. मी सकाळी 4.00 वाजता उठतो आणि अलिबाग येथून मुंबईत येतो. परंतु, सभागृहात आल्यानंतर मंत्री किंवा प्रश्नकर्ते उपस्थित नसल्यामुळे सकाळी एक-एक तास सभागृहाचे कामकाज स्थगित होते. हे गंभीर आहे. (...अडथळा...) माननीय श्री.रणजित पाटील साहेब, आपण आज सकाळी सभागृहात उपस्थित होता. माझी विनंती आहे की, आपण रोज सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु करु. सभागृहाचे कामकाज सकाळी 10.00 वाजता सुरु झाले तर आपण सायंकाळी 6.00 वाजता घरी जाऊ शकतो. म्हणून यामध्ये काही तरी सुसूत्रता आली पाहिजे. आम्ही आज सकाळी 9.30 वाजता येथे आलो. सकाळी 9.55 वाजता सभागृह सुरु होण्याची घंटा वाजली आणि सकाळी 10.00 वाजता सभागृह सुरु झाल्यानंतर माननीय तालिका सभापतींनी सकाळी 10.30 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित केले.

**सभापती** : मला असे वाटते की, मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात आले होते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सकाळी मंत्री महोदय सभागृहात उपस्थित होते. परंतु, प्रश्न विचारणारे संबंधित सदस्य उपस्थित नव्हते.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सकाळी सभागृह सुरु झाले त्यावेळी माननीय नगर विकास राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील साहेब सभागृहात उपस्थित होते. माननीय तालिका सभापतींनी दुसरी लक्षवेधी सूचना पुकारली. परंतु, संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृह स्थगित करण्यात आले.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेब, आपली जी सूचना आहे त्याचा आपण सन्माननीय गटनेत्यांच्या बैठकीत गांभीर्याने विचार करू. आता आपण प्रश्नोत्तरे घेऊ.

-------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**ठाणे जिल्ह्यातील अनुसूचित जमातीसाठी असलेले २२ टक्के आरक्षण ७ टक्के करण्याबाबत**

**(१) * ८०७३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासींची लोकसंख्या विचारात घेता विभाजनापूर्वी ठाणे जिल्ह्यासाठी अनुसूचित जमातीकरिता आरक्षणाची टक्केवारी २२ टक्के होती, हे खरे आहे काय,
(२) ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती झाल्याने ठाणे जिल्ह्यासाठी अनुसूचित जमातीकरिता ठेवलेले आरक्षण २२ टक्के वरुन ७ टक्के करण्यात यावे असे निवेदन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

आदिवासी जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये दि. ६ जून, १९७२ च्या शासन निर्णयान्वये ठाणे जिल्ह्याकरिता अनुसूचित जमातीकरिता सरळसेवा भरतीसाठी वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदांकरिता २२ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा ठाणे जिल्ह्यातील सरळसेवा भरतीबाबत घटनात्मक आरक्षणाच्या संदर्भातील प्रश्न आहे. यापूर्वी ठाणे जिल्ह्यात अनुसूचित जमातीसाठी 22 टक्के आरक्षण होते. ऑगस्ट महिन्यात ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती झाली. ठाणे आणि पालघर एकत्र असताना लोकसंख्येच्या आधारे अनुसूचित जमातींची, आदिवासींची लोकसंख्या जास्त असल्यामुळे इतर घटनात्मक तरतुदीनुसार 7 टक्के आरक्षण असताना ठाणे जिल्ह्यात मात्र 22 टक्के आरक्षण होते, याबद्दल आमची तक्रार नाही. ते आम्हाला मान्य आहे. परंतु, आता ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती झालेली आहे. म्हणून घटनात्मक तरतुदीनुसार अनुसूचित जमातीसाठी ठाणे जिल्ह्यात 7 टक्केच आरक्षण असावयास पाहिजे. परंतु, ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन देखील आजही 22 टक्केच आरक्षण आहे. शासनाने लेखी उत्तरात असे म्हटलेले आहे की, हा धोरणात्मक निर्णय आहे. हा धोरणात्मक निर्णय नाही.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8073......

श्री.रामनाथ मोते..........

अनुसूचित जमातीसाठी 7 टक्के आरक्षण असावे, असा धोरणात्मक निर्णय झाला होता. आपण त्यामध्ये बदल केला. आता ठाणे जिल्ह्याचे विभाजन झालेले आहे. म्हणून आता मूळ 7 टक्के आरक्षण असावयास पाहिजे. म्हणून आपण या संदर्भातील शासन निर्णय तातडीने निर्गमित करणार आहात काय आणि ठाणे जिल्ह्यात पूर्वी प्रमाणेच अनुसूचित जमातीसाठी 7 टक्के आरक्षण देणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही बाब सत्य आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते साहेबांनी ठाणे जिल्ह्याच्या विभाजनानंतर घटनात्मक आरक्षण आणि सरळसेवा भरतीमध्ये लोकसंख्येच्या गुणोत्तराप्रमाणे जे घटनादत्त आरक्षण मिळावयास पाहिजे आणि ते आरक्षण पूर्ववत करावयास पाहिजे, असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. परंतु, आपल्याला या संदर्भात काही प्रोसिजर पूर्ण करावयाच्या असतात. त्याच प्रमाणे, आपण समाज कल्याण विभाग, विधी व न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागाकडून मत व अभिप्राय मागविले होते. समाज कल्याण विभाग आणि विधी व न्याय विभागाने आपला अभिप्राय दिलेला आहे. अद्याप आदिवासी विकास विभागाकडून अभिप्राय प्राप्त झालेला नाही. परंतु, लवकरात लवकर अभिप्राय प्राप्त करुन तीन महिन्याच्या आत याबाबत निर्णय घेऊन तो जाहीर करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, शासनाच्या वतीने तीन महिन्यात निर्णय घेण्यात येईल. परंतु, यामध्ये कोणतीही खर्चाची बाब नाही. सभापती महोदय, अन्य घटकांवर अन्याय होत आहे. पूर्वी 7 टक्के आरक्षण होते ते 22 टक्के करताना आपण अनुसूचित जातीचे 13 टक्के आरक्षण 8 टक्के केले आणि अनुसूचित जातीचे 5 टक्के आरक्षण कमी केले. ओबीसीचे आरक्षण 19 टक्के होते, ते 9 टक्के केले आणि ओबीसीचे 10 टक्के आरक्षण कमी केले. जोपर्यंत आपण 22 टक्के आरक्षण 7 टक्के करीत नाही तोपर्यंत अनुसूचित जाती आणि इतर मागासवर्गीयांच्या घटनात्मक आरक्षणावर गदा येते. याबाबत तीन महिन्याच्या आत निर्णय घेऊ असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेतला पाहिजे. शासनाला फक्त आदेश निर्गमित करावयाचे आहेत. म्हणून शासन याबाबत तातडीने निर्णय घेणार आहे काय ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8073......

**सभापती** : मंत्री महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांच्या भावनेचा आदर करावा.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, जी प्रोसिजर आहे ती पूर्ण करुन 15 दिवसात होत असेल तर 15 दिवसात निर्णय घेण्यात येईल.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याच्या दृष्टीने आणि आता नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्याच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. ठाणे जिल्ह्यात शहापूर तालुका आहे. शहापूर तालुका टीएसपी अंतर्गत येतो. तेथे पेसा ॲक्ट प्रमाणे शंभर टक्के आरक्षण लागू आहे. तेथे फक्त 35 टक्के बिगर आदिवासी लोकवस्ती आहे. त्याच प्रमाणे, पालघर जिल्ह्यातील जवळपास 80-90 टक्के भागात तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी पेसा ॲक्ट प्रमाणे आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर राहणारे जे बिगर आदिवासी आहेत त्यांची लोकसंख्या पालघर जिल्ह्यात 30 ते 35 टक्के आहे. त्यांच्यावर शंभर टक्के अन्याय होणार आहे. ते लोक शेकडो वर्षापासून तेथे वास्तव्य करीत आहेत. आदिवासी समाजाला पालघर जिल्ह्यात 22 टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण वाढवून द्यावे. परंतु, त्या ठिकाणी तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरतीमध्ये बिगर आदिवासींना शून्य टक्के आरक्षण मिळणार असेल तर तो त्यांच्यावर मोठा अन्याय होणार आहे. कारण, पेसा ॲक्ट केंद्र शासनाचा आहे. माननीय राज्यपालांनी त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. शासनाने मध्यस्थी करुन यातून मार्ग काढावा आणि स्थानिक लोकांना न्याय द्यावा, अशी माझी विनंती आहे.शासन यासाठी प्रयत्न करणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, बिगर आदिवासींवर गदा येईल आणि त्यांना सरळसेवा भरतीमध्ये स्थानच मिळणार नाही, असे नाही. पालघर ठाणे जिल्ह्यात असताना तेथे एसटीसाठी 22 टक्के आरक्षण होते. आजही पालघरमध्ये तिच परिस्थिती राहणार आहे. सन्माननीय सदस्यांनी बिगर आदिवासींवर अन्याय होणार आहे काय, असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. तशी वस्तुस्थिती नाही. (...अडथळा...) सन्माननीय सदस्य शहापूर तालुक्याच्या संदर्भात बोलत होते. जे घटनादत्त आहे ते आपल्याला बदलता येणार नाही. म्हणून सध्या पालघरमध्ये जे आरक्षण दिलेले आहे त्या आरक्षणाच्या सूत्रानुसारच तेथे काम केले जाईल. ..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8073......

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ट्रायबल सब प्लॅनचा एरिया आणि जी गावे आहेत त्या ठिकाणी ही अडचण आहे. उर्वरित जो समाज आहे त्यांच्या आरक्षणाची तरतूद आपण कशी करणार आहात आणि तो उर्वरित समाज प्रामुख्याने ओबीसी आहे. त्यामध्ये मच्छीमार, कुणबी किंवा इतर समाज आहे. सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाूर यांनी सांगितले की, त्यांना एक टक्के देखील आरक्षण नाही, शून्य टक्के आरक्षण आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे यामध्ये पर्याय काढावा लागेल. ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर ठाणे आणि पालघर जिल्ह्यात जमाती आणि जमातीतर लोकसंख्येचे प्रमाण किती आहे आणि आज जमातीतर म्हणजे एसटी व्यतिरिक्त जो समाज आहे त्यांच्या आरक्षणाची स्थिती काय आहे आणि ती कशी राहणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबतची आकडेवारी माझ्याकडे आहे. ती आकडेवारी खूप मोठी आहे. मी ती आकडेवारी सभागृहाला वाचून दाखवितो. ठाणे तालुक्याची एकूण लोकसंख्या 37 लाख 87 हजार आहे. ठाणे तालुक्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या 74 हजार आहे. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी 1.98 लाख आणि अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी 6.79 आहे. भिवंडी तालुक्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी 3.79, शहापूर तालुक्यात 5.74, कल्याण तालुक्यात 9.70, उल्हासनगर तालुक्यात 17.12, अंबरनाथ तालुक्यात 13.39......

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8073..

डॉ.रणजित पाटील...

मुरबाड तालुक्याची 5.77 टक्के लोकसंख्या आहे, ठाणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 7.97 टक्के आहे, म्हणजे जवळपास आठ टक्के आहे. पालघर जिल्ह्यातील तलासरी, डहाणू, विक्रमगड, जव्हार मोखाडा अशा सर्व तालुक्यांतील एकूण अनुसूचित जातीतील लोकसंख्येची टक्केवारी 2.91 इतकी आहे. अनुसूचित जमातीची लोकसंख्या 37.39 टक्के इतकी आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरात नमूद केले आहे की, वर्ग-3 व वर्ग-4 च्या पदांसाठी 22 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्याचप्रमाणे शासन स्तरावरुन निर्णय घेण्याची कार्यवाही अजूनही चालू आहे, वारंवार जिल्हाधिकारी कार्यालय व तेथील प्रशासनाकडून मागणी होत आहे की, तेथील लोकांचे असे म्हणणे आहे की, एकत्रित जिल्हा असताना कामे लवकर होत होती. माझा प्रश्न असा आहे की, अधिवेशन संपण्याच्या आत पालघर जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्यात येतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, पालघर जिल्ह्यातील रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आरक्षणाच्या संदर्भात प्रत्येक जिल्ह्यात थोड्याफार प्रमाणात वाद आहेत, नंदूरबार जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला आहे. त्या ठिकाणी 67 टक्के आदिवासी लोकसंख्या आहे व 33 टक्के लोकसंख्या ही बिगर आदिवासी आहे, आरक्षणाचे सूत्र ज्याप्रमाणे ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी तपासून पाहण्यात येत आहे त्याच धर्तीवर इतर जिल्ह्यातील आरक्षणाचे सूत्र शासन तपासून पाहणार आहे काय ? नंदूरबार जिल्ह्यात बिगर आदिवासी लोकांवर अन्याय होतो अशी भावना बिगर आदिवासी लोकांची आहे, त्याअनुषंगाने आदिवासी व बिगर आदिवासीचे सूत्र शासन तपासून घेणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सदर प्रश्न हा तारांकित प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेर आहे, तरी देखील नंदूरबार जिल्ह्याची माहिती घेण्यात येईल. धुळे जिल्ह्यातून नंदूरबार जिल्हा जेव्हा वेगळा झाला, तेव्हा देखील तेथे 22 टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. याबाबत जास्तीची माहिती हवी असेल तर ती पटलावर ठेवण्यात येईल.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8073..

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, पालघर जिल्ह्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी माननीय राज्यपाल यांच्या नावाने काही आदेश काढले आहेत. ओबीसी समाजाच्या लोकांचे शिष्टमंडळ भेटल्यावर देखील तेथे शिपाई पदांची भरती करताना अनेक अडचणी येतात. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, एस.टी.समाजासाठी जरूर जास्तीची तरतूद करण्यात यावी. त्याचप्रमाणे जे बिगर एस.टी.समाज आहे त्यांच्यासाठी देखील शासनाने न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी प्रश्न विचारला तेव्हाच मी सांगितले आहे की, याबाबत शासन सकारात्मक विचार करणार आहे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, आदिवासी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात घटनात्मक आरक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्रात अशा जाती आहेत, उदा. महादेव कोळी, यांची सर्व लोकसंख्या आदिवासी म्हणून नोंदविलेली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, आमची लोकसंख्या 65 ते 70 लाख इतकी आहे. या लोकांच्या जणगनणेच्यावेळी आदिवासी म्हणून नोंद झालेली आहे. परंतु त्यांना आरक्षणाचा फायदा दिला जात नाही. याबाबत शासन पुनर्विचार करणार आहे काय या लोकांच्या समावेशामुळे आदिवासी फंड वाढला आहे, त्यांच्या आरक्षणाची टक्केवारी वाढली आहे, ज्या लोकांवर अन्याय झाला त्यांच्याबाबत शासनाकडून काही दुरूस्ती करण्यात येणार आहे काय ? याबाबत शासनाकडून आढावा घेण्यात येणार आहे काय अशी चुकीची कामे झाली असतील तर शासन संबंधितांवर कारवाई करणार काय याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचा स्कोप ठाणे, पालघर पुरता मर्यादित आहे. सन्माननीय सदस्यांनी या बाहेरील प्रश्न विचारलेला आहे. याबाबत सन्माननीय सदस्यांनी मला लेखी पत्र दिले तर त्याबाबत त्यांना लेखी माहिती कळविण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर तेथे दोन जिल्हा परिषदा निर्माण झाल्या आहेत व त्यांच्या निवडणुका देखील झालेल्या आहेत. निवडणुका होताना त्या ठिकाणी आरक्षण कशा पध्दतीने लागू केले आहे, जुन्या आरक्षणाप्रमाणे कार्यवाही

....3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8073..

श्री.जयंत प्र. पाटील...

करण्यात आली की, नवीन प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. हे आरक्षण जुन्याप्रमाणे गृहित धरुन निवडणुका घेतल्या असतील तर त्या निवडणुका बेकायदेशीर होतील. राज्य शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला होता ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला सामोरे जाताना कोणते सूत्र लावण्यात आले असा प्रश्न विचारला आहे, हा प्रश्न तारांकित प्रश्नाच्या स्कोपमध्ये नाही. 22 टक्के आरक्षण ठेवावे का 7 टक्के आरक्षण ठेवावे इतक्या मर्यादेत हा प्रश्न आहे. पालघर आणि ठाणे जिल्ह्यासाठीचा अद्याप निर्णय झालेला नाही.

**सभापती** : मंत्री महोदय, मी आपणाला याबाबत सोल्यूशन देतो. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नांच्या स्कोपमध्ये नसला तरी इतर सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती पटलावर ठेवण्यात येणार आहे, त्याप्रमाणे यासंदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात यावी.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

----------

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**परभणी पोलिसांनी दाखल केलेल्या खोट्या गुन्ह्यांची सीआयडी चौकशी करणेबाबत**

**(2) * 7269 श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) परभणी येथील पोलीस अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक व इतर अधिकाऱ्यांनी सुड बुध्दीने व मानहानी करण्याच्या हेतूने स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी व स्थानिकांविरुध्द खोटे गुन्हे नोंदवून मानसिक व शारीरिक त्रास देण्याच्या प्रकाराची सीआयडी चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकप्रतिनिधींनी मा. राज्यपाल महोदय व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे नोव्हेंबर 2014 मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, पूर्वग्रह दूषित हेतूने एकाच दिवशी 6-7 खोटे गुन्हे नोंदविणे, तसेच सर्व प्रकरणांमध्ये तेच आरोपी दाखवित पदाचा दुरुपयोग करणे असे प्रकार करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची सीआयडी मार्फत चौकशी करुन त्या दोषी पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्यावर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, लोकप्रतिनिधींना अवमानकारक वागणूक व कायद्याचा व पदाचा दुरुपयोग करणाऱ्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांवर विहित मुदतीत कारवाई न करता त्यांचा बचाव करण्याचे धोरण मुख्य सचिव स्तरावरुन राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(4) नसल्यास, संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा.राम शिंदे,श्री. देवेंद्र फडणवीस, यांच्याकरिता :** (1) होय.
(2) व (3) नाही.
पाथरी पोलिसांनी पुर्वग्रह दूषित हेतूने कोणावरही गुन्हे दाखल केलेले नाहीत. जे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ते रितसर फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुनच दाखल करण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणात कोणीही पोलीस अधिकारी दोषी नसल्याने त्यांची सीआयडी चौकशी करणे किंवा त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांना निलंबित करण्याचा प्रश्नच येत नाही.
पोलिसांनी कोणालाही अवमानकारक वागणूक दिलेली नाही, रितसर कायदेशीर कार्यवाही केलेली आहे.
(4) सदर प्रकरणी कोणीही अधिकारी दोषी नसल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सभापती महोदय, 15 ऑक्टोबर, 2014 रोजी विधानसभेच्या निवडणुकीच्या दिवशी घडलेली ही घटना आहे, मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, फिर्यादीवरुन आम्ही गुन्ह्याची नोंद केली आहे. विधानसभेच्या निवडणुकीच्या दिवशी दोन गटामध्ये किरकोळ हाणामारी झाली होती. असा प्रकार घडला असे मला समजल्यावर मी माझा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7269..

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी...

मुलगा आणि माझा पुतण्या घटनास्थळी जाऊन आम्ही हे प्रकरण मिटविले होते. त्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही. ही घटना घडल्यानंतर रात्री 9 ते 10 वाजता श्री.प्रभाकर शिंदे व श्री.प्रतिक शिंदे यांच्या वतीने नियती ठक्कर ॲडिशनल एसपी यांनी हेतुपुरस्सर त्यांना बसवून फिर्याद नोंदवून घेतली होती. त्या फिर्यादीमध्ये कलम 307 चा गुन्हा 40 ते 50 लोकांवर नोंदविण्यात आला होता. लेखी उत्तरात असे सांगण्यात आले आहे की, फिर्यादीवरुन गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. कलम 307 चा गुन्हा नोंदविताना गंभीर स्वरुपाची जखम किंवा इजा झाली असायला पाहिजे, असे काहीही नसताना 400 ते 500 पोलिसांची कुमक आणून आम्हाला 15 तारखेला अटक करण्यात आली होती. आम्हाला कोर्टासमोर हजर करण्यात आले होते. कोर्टाने मेडीकल प्रमाणपत्र पाहिल्याबरोबर ही किरकोळ जखम आहे त्यामुळे कलम 324 नुसार सर्व लोकांना कोर्टाने सोडून दिले. आम्हाला सोडल्यानंतर यांनी दुसरा फिर्यादी तयार केला होता. त्या फिर्यादीनुसार आम्हाला सर्वांना पुन्हा अटक करण्यात आली. या प्रकरणाची सविस्तर माहिती मला सभागृहासमोर द्यावी असे वाटते. पोलीस कॉन्स्टेबल श्री.उमेश बारहाटे यांना किरकोळ मार लागला होता त्यांनी फिर्याद नोंदविताना कोणाचेही नाव घेतले नाही, ॲडिशनल एसपी यांनी तू बाबा दुर्राणी यांचे नाव घे अशा प्रकारे त्याच्यावर दबाव टाकला होता. ते म्हणाले की, मला कोणाची लाठी लागली, कोणाचा दगड लागला याबाबत मी कोणाचेही नाव घेऊ शकत नाही. दोन्ही बाजूचे लोक तेथे होते, मी गर्दीमध्ये असल्यामुळे ते मला माहिती नाही. तेव्हा त्याला एस.पी.ने सांगितले की, मी तुला सस्पेंड करीन असा दबाव त्याच्यावर टाकण्यात आला होता. त्यांनी कोणाचेही नाव घेतले नसताना या गुन्ह्यात देखील हेच आरोपी नमूद करण्यात आले होते. या सर्वांचा पीसीआर घेतला व कोर्टाने पुन्हा त्यांना सोडून दिले. आम्हाला सोडल्यावर पुन्हा तिसरा ॲट्रॉसिटीचा गुन्हा आमच्यावर दाखल करण्यात आला. त्या गुन्ह्यात देखील याच आरोपींची नावे टाकण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा चौथा गुन्हा देखील नोंदविण्यात आला होता. त्या गुन्ह्यात देखील तेच आरोपी नोंदविण्यात आले होते. या सर्व प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी झाली पाहिजे. दूध का दूध व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पानी का पानी झाले पाहिजे. जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे व त्यांना सस्पेंड केले पाहिजे. .....6...

22-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-6

VVK/ AKN/ ST/ प्रथम श्री.बोरले... 12:10

ता.प्र.क्र.7269...

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यामध्ये निश्चित स्वरुपात एकाच दिवशी सहा गुन्ह्यांची नोंद पोलीस स्टेशमध्ये झालेली आहे.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7269....

प्रा.राम शिंदे......

त्यामुळे गुन्हयाची नोंद होत असताना त्यांनी क्रमवारी सांगितली आहे. 15 ऑक्टोबर रोजी आचारसंहिता लागू होती. पोलिसांतर्फे तीन गुन्हे दाखल आहेत. स्वत: हजर राहून व्यक्तींनी दाखल केलेल्या गुन्हयांची संख्या 3 आहे, ते Riot स्वरुपाचे आहेत. त्यांनी हेही सांगितले की, कलम 307 सारख्या गुन्हयामध्ये मेडिकल सर्टिफिकेट तितक्या गंभीर स्वरुपाचे नसल्यामुळे आम्हाला जामीन देण्यात आला. त्यानंतर ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला. एकंदरीत आचारसंहिता सुरु असल्याच्या कालखंडामध्ये एकाच दिवशी घडलेल्या सहा घटना आहेत. माननीय सदस्यांनी मागणी केली त्या संदर्भात एकाच दिवशी एकानंतर एक अशा क्रमाने माननीय सदस्यांवर सहा गुन्हे दाखल करुन त्यांना अटक करण्याच्या संदर्भात कोणाचा दबाव होता का, त्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक काही पूर्वग्रहदूषित भावनेने काम केले का, या संदर्भात सखोल चौकशी त्या रिजनच्या आय.जी.मार्फत करुन न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय सदस्य अब्दुल्लाखान दुर्राणी यांनी म्हटल्याप्रमाणे पहिला गुन्हा कलम 307 अन्वये नोंदविण्यात आला, त्या गुन्हयामध्ये त्यांना जामीन मिळाला. त्या गुन्हयातील मेडिकल सर्टिफिकेटची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यात म्हटले आहे की, जखमेचे स्वरुप साधारण आहे. खटल्यातील जखमी व्यक्तीला मेडिकल ट्रिटमेंट देण्यासाठी रुग्णालयात नेले जाते व त्यानंतर एफआयआर नोंदविला जातो. हा एफआयआर मनात असलेल्या मागील घटनेचा आधार घेऊन पूर्वग्रहदूषित भावनेने माननीय सदस्यांविरुध्द नोंदविण्यात आला आहे. एकानंतर एक असे 7 गुन्हे नोंदविल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, त्या रिजनच्या आय.जी.मार्फत या प्रकरणाची चौकशी केली जाईल. माननीय सदस्यांचा आग्रह आहे की, या प्रकरणाची चौकशी सीआयडी मार्फत झाली पाहिजे. माननीय सदस्यांनी जे वर्णन सभागृहात केले आहे ते सत्य मानून, गृहित धरुन पुढील भूमिका निश्चित करताना सीआयडी मार्फत या प्रकरणाची चौकशी केली जाईल काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित आणि अब्दुल्लाखान दुर्राणी यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्या संदर्भात उत्तर देण्याचा मी प्रयत्न करीत आहे. या प्रकरणातील पाच गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत. एक गुन्हा तपासावर आहे. आचारसंहितेचे

..2...



ता.प्र.क्र.7269....

प्रा.राम शिंदे......

उल्लंघन केल्याबद्दलचे दोन गुन्हे आहेत. पोलिसांवर हल्ला केल्याचा एक गुन्हा आहे. माननीय सदस्यांनी जी सीआयडी मार्फत चौकशी करण्याची भावना व्यक्त केली आहे त्या अनुषंगाने निश्चित स्वरूपात त्यांची मागणी मान्य करून या सर्व गुन्हयांची चौकशी सीआयडी मार्फत केली जाईल.

---------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबईतील आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यांत निर्माण झालेली पाणी टंचाई**

(३) ***७३५२ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे वसाहतीतील आदिवासी पाडयात महापालिकेने २० कोटी रुपये खर्च करुन नळजोडणी आणली, मात्र या नळजोडणीला पाणी नसल्यामुळे या आदिवासी पाड्यांवर पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसाहतीत २७ आदिवासी पाडे असून जवळपास ४००० ची लोकवस्ती आदिवासी पाड्यांमध्ये आहे, वर्षानुवर्षे राहत असलेल्या या आदिवासी पाड्यांमध्ये आजही नागरी सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आदिवासी पाड्यातील आदिवासी महिलांना बोअरवेल तसेच विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीनुसार सदर पाड्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ.रणजित पाटील, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेमध्ये एकूण १४ प्रस्ताव मंजूर झाले होते.

त्यापैकी ११ ठिकाणी काम पूर्ण झाले असून या ११ ठिकाणांमध्ये एकुण २२ आदिवासी पाडे समाविष्ट आहेत. सदर २२ आदिवासी पाड्यांपैकी १८ आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

उर्वरित ४ ठिकाणी आदिवासी पाड्यांमधून यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे अद्यापि पाणी पुरवठा सुरु करता आलेला नाही.

उरलेल्या ३ प्रस्तावांपैकी २ ठिकाणी चित्रनगरी व १ ठिकाणी फोर्स वन यांचे ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे ५ आदिवासी पाड्यांना पाणी पुरवठा होऊ शकलेला नाही.

(२) आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यांत नागरी सुविधांचा अभाव आहे हे अंशतः खरे आहे.
(३) हे अंशतः खरे आहे.
(४) व (५) आरे वसाहतीतील १८ आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

४ आदिवासी पाड्यांमधून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे अद्याप पाणी पुरवठा सुरु करता आलेला नाही.

५ आदिवासी पाडयांसाठी चित्रनगरी व फोर्स वन यांचे ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे सदर ठिकाणच्या पाडयांना पाणी पुरवठा करता आलेला नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. या आदिवासी पाड्यांचा इतिहास आपण सर्वांनी जाणून घेणे आवश्यक आहे. हे आदिवासी या मुंबईचे मूळ निवासी नागरिक आहेत, मुंबईचे मालक आहेत. हजारो वर्षापासून ते या ठिकाणी वास्तव्य करीत असून त्यांना अद्याप वीज, पाणी उपलब्ध होऊ शकत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.७३५२.....

**सभापती** : माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी मूळ प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांना प्रथम प्रश्न विचारण्याची संधी देण्यात येत आहे. त्यानंतर माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी प्रश्न विचारावा.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मी माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे. चित्रनगरी महामंडळाने परवानगी दिलेली नाही. या आदिवासी भागात चित्रनगरी अगोदर अस्तित्वात आली की आदिवासी बांधव अगोदरपासून रहात आहेत? १८६० पासून हे आदिवासी बांधव त्या ठिकाणी रहात आहेत. त्या भागातील आदिवासी लोकसंख्या ४००० पेक्षा जास्त आहे. या भागातील २२ पैकी १८ आदिवासी पाड्यांना जलजोडणी देण्याचे काम केले असून ४ पाड्यांना अद्याप पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला नाही. दुर्दैवाने ज्या ठिकाणी जलजोडणी केली आहे त्या ठिकाणचा पाणी पुरवठा अद्याप सुरु झालेला नाही. चित्रनगरी आणि आरे या संस्थांचे सीईओ एनओसी देत नाहीत म्हणून ३ पाड्यांना जलजोडणी देता आली नाही असे कारण सांगण्यात येते. १८६० पासून या आदिवासी पाड्यांमध्ये राहणाऱ्या आदिवासी नागरिकांवरील अन्याय शासन केव्हा दूर करणार आहे, त्या ठिकाणी जलजोडणी नव्हे तर नळ जोडणी करुन पाणी पुरवठा केव्हापासून सुरु करणार आहात? आजही या मुंबई शहरातील मूळ निवासी आदिवासी नागरिकांना ४ ते ६ कि.मी.अंतरावरुन या पाणी आणावे लागत आहे, यासारखे दुसरे दुर्दैव नाही. या आदिवासी पाड्यांमध्ये जलजोडणी करण्यासाठी चित्रनगरीच्या एनओसीची गरज नाही. तेथे शासन किती दिवसात पाणी पुरवठा सुरुकरणार आहे?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सन १८०० पूर्वीपासून भूमीपुत्र म्हणून मुंबईमध्ये राहणारे हे खरे मूळ निवासी आदिवासी बांधव आहेत. त्यांना पायवाटा, पिण्याचे पाणी यासारख्या प्राथमिक नागरी सुविधा हव्या आहेत. हे काम करण्यासाठी एनओसी दिली जात नाही. २७ आदिवासी पाड्यांपैकी १८ पाड्यांना जलजोडणी देऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. ९ पाड्यांचा प्रश्न आहे. तरी देखील ही गंभीर बाब आहे. माननीय सदस्यांच्या मताशी शासन सहमत आहे, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की, आरे किंवा चित्रनगरी नव्हे तर फोर्स-१ च्या दृष्टीने सुरक्षेचा प्रश्न आहे. त्याबाबत आम्ही बैठक घेऊ. बैठक घेण्याच्या बाबतीत सेकंड ओपिनियनचा प्रश्न नाही. याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून समज देण्यात येईल आणि तेथील आदिवासी पाड्यांना मूलभूत नागरी सुविधा देण्यामध्ये संविधानिक अडचण नसताना कोणी अडचण निर्माण करीत असतील तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

२२-०७-२०१५ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M.५

SGB/ AKN/ ST/ १२:२०

ता.प्र.क्र.७३५२.....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांचा हेतू चांगला आहे. फक्त आपण फोर्स-१ बद्दल बोलला आहात म्हणून माहितीकरिता सांगतो. या फोर्स-१ कडून तेथील चार आदिवासी पाडे हलवावे अशा प्रकारची मागणी मागच्या वेळी केली, असा घाट घातला होता. तेथील १०० एकर जागा फोर्स-१ ला देण्यात आली आहे. त्यावेळी आम्ही देखील विरोध केला होता. तत्कालीन खासदार श्री.गुरुदास कामत यांनी देखील विरोध केला होता. माननीय राज्यमंत्री श्री.रवींद्र वायकर यांनी देखील विरोध केला होता. त्यावेळी अंडरस्टॅंडिंग असे होते की, तेथील केलटीचा पाडा फोर्स-१ च्या बाजूला आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांना कोणतीही अडचण येऊ नये. आम्ही यामध्ये राजकारण करु इच्छित नाही. चित्रनगरी किंवा आरे यांच्या एनओसीची काहीही आवश्यकता नाही. फोर्स-१ च्या एनओसीची गरज नाही असे मी म्हणणार नाही. परंतु याबाबत पूर्वी चर्चा झाली होती. तत्कालीन अपर मुख्य सचिव (गृह) श्रीमती अय्यंगार यांच्यासमवेत बैठक झाली, त्या बैठकीला मी आणि स्थानिक माजी खासदार श्री.गुरुदास कामत उपस्थित होतो. त्यावेळी असे मान्य करण्यात आले होते की, तेथील आदिवासी पाड्यांना प्राथमिक सुविधा देण्यामध्ये जरी करार झालेला नसला तरी फोर्स-१ कोणतीही आडकाठी आणणार नाही. फोर्स-१ ची एनओसी आवश्यक आहे की नाही याबाबत मी बोलू इच्छित नाही. ती एनओसी आवश्यक असेल तर आपण गृह राज्यमंत्री या नात्याने ती त्वरित द्यावी आणि त्या आदिवासी बांधवांना पाणी पुरवठा सुरु करावा. फक्त पाण्याचा प्रश्न नाही.

नंतर एन.१...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7352

श्री.भाई जगताप...

येथे पाण्याच्या प्रश्नासह इतर मूलभूत सुविधा देखील पुरविण्यात आलेल्या नाहीत. येथील लोक कित्येक वर्षापासून वीज, पायवाट,शाळा या सुविधांपासून वंचित आहे. या सर्व सुविधा महापालिकेने पुरविल्या पाहिजेत. त्या देखील पुरविल्या जात नाही. त्याबाबतीत आपण काय करणार आहात ? यात राजकीय अभिनिवेश येऊ नये म्हणून मी येथेच थांबतो. कारण हा विषय फार मोठा आहे. येथे एका बाजूला सेव्हन स्टार हॉटेल आहे. पण त्याच्या खाली असणाऱ्या आदिवासी पाड्यांना वीज नव्हती. ती आम्ही आणून दिली. हे सांगताना मला अभिमान वाटतो. तेथून मी निवडणूक हरलो तरी त्या भागातील खासदारांना घेऊन मूलभूत सुविधांसाठी आम्ही लढलो. त्यामुळे येथील लोकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आपण काय करणार आहात ?

**सभापती :** संबंधित सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले तर बरे होईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय पोटतिडकीने प्रश्न विचारला आहे. फोर्स-वन स्थापनेपासून ते बाळसे धरण्यापर्यंत सुरुवातीला ज्या अडचणी येतील त्या ॲन्टीसीपेट करुन त्याच्या क्लोज प्रोक्झिमिटीमध्ये असणाऱ्या सर्व पाड्यांबद्दल तेव्हा पासून साकल्याने विचार झाला होता. यामध्ये जरी लिखित नसले तरी अंडरस्टँडिंग होते. फोर्स-वन करणे हे देखील गरजेचे होते. 26/11 नंतर एक चित्र समोर आले. त्यानंतर फोर्स-वन स्थापन करण्यास आपली प्रायॉरिटी होती. ती या शहराची गरज होती. मी आरे आणि चित्रनगरीबद्दल काही बोलत नव्हतो. मी अनुषंगिक एवढेच म्हटले होते की, यासंबंधात आधीच चर्चा झालेली असेल आणि या 100 एकरातून ते पाडे बाजूला गेले असतील तर त्यांना प्राथमिक सुविधा देणे हे आपले कर्तव्यच आहे. त्यामुळे मी यासंबंधात तातडीने सात दिवसांच्या आत बैठक घेऊन यातील मार्ग सुद्धा मोकळा करीन एवढे सांगतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7352

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हे पाडे अगोदरचेच आहेत. त्यांनी चित्रनगरीचे मान्य केले आहे. पण फोर्स-वनची परवानगी का लागते हेच आम्हाला कळत नाही. कारण रस्ता हा सगळयांच्याच असतो. पाईप लाईन टाकत असताना ती फोर्स-वन ला द्यावी, चित्रनगरीला द्यावी किंवा अन्य कुणालाही द्यावी. मात्र आदिवासींना पाणी पुरवठा करत असताना ना हरकत प्रमाणपत्राची गरज का भासावी ? आदिवासींवर सातत्याने होणारे अन्याय दूर करण्याकरिता कुठल्याही पद्धतीची अडचण न आणता ताबडतोब आठ दिवसांच्या आत त्यांना पाणी पुरवठा होणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, होय. मी आधी सुद्धा सांगितले आहे की, सभागृहाचीच भावना नाही तर, सन्माननीय सदस्यांची, या राज्याची, शासनाची देखील तीच भावना आहे. हा राजकीय प्रश्न नाही. येथील भूमिपुत्रांच्या पाड्यांना नैसर्गिक अधिकार असायला हवेत. त्यांना पायाभूत मूलभूत सुविधा मिळायला पाहिजेत. येथे पी फॉर्मची गरज नाही. मी येथे सात दिवसांच्या आत मार्ग काढू असे देखील सांगितले आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, क्रमांक 4 च्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, 4 आदिवासी पाड्यांमधून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे अद्यापि पाणी पुरवठा सुरू करता आलेला नाही. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी कागदपत्रांची पूर्तता न करता 24 तासांच्या आत अनधिकृत पाण्याच्या जोडण्या दिल्या जातात. परंतु, आदिवासींकडे वारंवार कागदपत्र मागवून बेजार केले जाते. आरे कॉलनीमध्ये बालाजी टेलिफिल्मस्‌चे अनधिकृतपणे शुटींग सुरू आहे. त्या सगळ्यांना परवानगी दिली जाते. पण जे आदिवासी 1856 पासून येथे रहात आहेत त्यांना मूलभूत सुविधा म्हणजे वीज, पाणी, शौचालय, रेशनकार्ड, अंगणवाडी यापासून वंचित ठेवले जात आहे. कागदपत्रांची पूर्तत करावी, पैसे द्यावेत असे बीएमसीचे धोरण सुरू आहे. त्यास आपण ताबडतोब आवर घालणार आहात काय ? येथे श्रीमती एकता कपूर यांचे अनधिकृत स्टुडिओज आहेत. त्यांनी आपल्याकडे कोणत्या कागदपत्रांची पूर्तता केली आहे तसेच या स्टुडिओज पासून शासनाला किती भाडे मिळते याची माहिती सभागृहाला देण्यात येणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7352

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

**सभापती :** ठीक आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. मुंबई महानगरपालिकेचे बजेट 40 हजार कोटी आहे. त्यांची रूपये 42 हजार कोटी रूपयांची एफ.डी.आहे. राज्य व केंद्र शासनाच्या गाईड लाईन्सप्रमाणे दलित वस्तीमध्ये, आदिवासी वस्तीमध्ये एकूण बजेटच्या 9 व 5 टक्के रक्कम खर्च करावी लागत आहे. आपण येथे चर्चा करून आदिवासींची फसवणूक करीत आहात. आपण नुसते बोलत आहात. तेथे आदिवासी वस्ती असताना देखील आपण 9 टक्के रक्कम खर्च केलेली नाही. सदर निधी खर्च करीत नाही म्हणून राज्य शासनाची समिती जाते. विधि मंडळाची समिती देखील किती निधी खर्च झाला हे पाहण्यासाठी जाते. आमच्या सारख्या छोट्या नगरपालिकांना राज्य शासन त्रास देते. यात मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी होती. येथे मुंबई महानगरपालिकेने काम का केले नाही याची विचारणा करून संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार आहात काय, महापालिका आयुक्तांवर आपण कारवाई करणार आहात काय ? आयुक्तांनी यातील काहीच बघितले नाही काय, सचिव काय काम करीत आहेत ? या मुंबईचे मालक कोळी, आगरी आणि आदिवासी आहेत. या तीन जमाती या मुंबईचे मालक आहेत. येथे पैशाचा प्रश्न नाही. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप पोटतिडकीने बोलत आहेत. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेला यासंबंधातील कार्यवाही सहा महिन्यांमध्ये करण्यासाठी राज्य शासन भाग पाडणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, येथे अगदी मूलभूत प्रश्न विचारलेला आहे. कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ॲन्युअल प्लॅन प्रमाणे आदिवासींसाठी 9 टक्के बजेट असावयास पाहिजे. येथे देखील तरतूद होती. नाही असे नाही. येथे फक्त परवानग्यांमुळे प्रश्न राहिलेला आहे. मागच्या वर्षी सव्वा कोटी रूपये तरतूद होती आणि या वर्षी देखील प्रावधान दिसत आहे. पण ते खर्च करता आले नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7352

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, यासंबंधी आपण निदेश द्यावेत.

**सभापती :** राज्यावर 9 टक्क्याचे बंधन हे घटनात्मक आहे. हा निर्णय आपल्या राज्याने घेतलेला आहे. तो निर्णय महानगरपालिकेला लागू असेल तर त्याची पडताळणी करून महानगरपालिकेने बजेटमध्ये सोय केली नसेल तर त्यास जबाबदार कोण आहे हे पाहून उचित कारवाई करावी.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, महानगरपालिकेने तरतूद केलेली आहे. आदिवासींसाठी 9 टक्के आणि अनुसूचित जातींसाठी 13 टक्के निधी राखून ठेवण्याची तरतूद ही राज्य शासनाची आहे. ते वेगळा विषय बोलत आहेत. आरे सी.ओ.यांनी परवानगी न दिल्यामुळे अनेक वर्षापासून हे काम रखडलेले आहे. यासाठी मुंबई महानगरपालिकेने 20 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. केल्टी पाडा, चाफा पाडा क्रमांक 1, 2, असे एकूण 4 पाडे मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. पण त्याच्या बाजूला असलेल्या ऑबेरॉय टॉवरला सगळ्या सुविधा मिळालेल्या आहेत. हा टॉवर फोर्स-वनच्या बाजूला आहे. तेव्हा या चार पाड्यांना मूलभूत सुविधा पुरवाव्यात. येथे नाला देखील आहे. त्यावर पूल बांधण्याची देखील परवानगी नाही. तेव्हा पूल, वीज, रस्ते इत्यादी मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी शासन किती दिवसांमध्ये परवानगी देणार आहे, सदर परवानगी शासन लवरात लवकर देणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी चार पाड्यांसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. या चार पाड्यांना रस्ते, वीज, पायवाटा वगैरेंना परवानग्या 7 ते 15 दिवसामध्ये मिळवून देण्याचा प्रयत्न करू.

.....

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**रिसोड (जि.वाशिम) नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत**

**(४) *७४१२ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्याधिकारी नगर परिषद रिसोड, जि.वाशिम यांना तात्काळ निलंबित करणे, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करणे आणि फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत रिसोड नगरपरिषदेतील सर्व नगरसेवकांनी प्रधान सचिव (नवि-२) नगरविकास विभाग यांचेकडे दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीवर तत्काळ कार्यवाही न केल्यास दिनांक २० मे, २०१५ पासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर आमरण उपोषणास बसणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार शासन स्तरावर पुढे काय कार्यवाही केली आहे काय ?

**डॉ.रणजित पाटील,श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय. उपविभागीय अधिकारी, रिसोड यांनी श्री. इंगोले यांची चौकशी करुन ते दोषी असल्याचा अहवाल सादर केला होता व त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी सहमती दर्शविली आहे.
(४) जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल, नगरपरिषद सदस्यांकडून प्राप्त तक्रारी, तसेच राज्य निवडणुक आयोगाने केलेली शिफारस इत्यादीचा विचार करुन सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने श्री.दिपक इंगोले, मुख्याधिकारी यांची दि. १२.०६.२०१५ च्या शासन आदेशान्वये अन्यत्र बदली करण्यात आली आहे. सदर आदेशास मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांनी जैसे थे (Status Quo) आदेश दिला आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, वाशिम जिल्हयातील रिसोड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. रिसोड नगरपरिषदेतील मुख्याधिकाऱ्यांनी अनेक खोटया नोंदी, निधींचा अपहार केलेला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी वाशिम यांच्या आदेशानुसार चौकशी करुन श्री. दीपक इंगोले, मुख्याधिकारी नगरपरिषद, रिसोड, जि.वाशिम हे दोषी आढळून आल्या बाबतचा अहवाल दिलेला आहे. तसेच श्री. दीपक इंगोले यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणे व महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम 1979 तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी अशा प्रकारची शिफारस शासनाला केलेली आहे. त्यानुसार शासनाने तत्काळ कारवाई करुन त्यांची दुसरीकडे बदली केली. श्री. इंगोले हे एकच वर्ष रिसोड नगरपरिषदेत असल्या कारणाने ते मॅटमध्ये जाऊन त्यांनी स्टेटस्को आणलेला आहे. या विषयाच्या संदर्भात ऑनरेबल मॅटने श्री. इंगोले यांना स्टेटस्को दिल्यामुळे श्री. इंगोले हे पुन्हा रिसोड नगरपरिषदेत आले असून त्यांनी पूर्वी सारखेच प्रकार या ठिकाणी सुरु केले आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माझा माननीय मंत्र्यांना प्रश्न आहे की, श्री. इंगोले याने मॅटला असे सांगितले होते की,

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:7412.....

श्री.गोपीकिशन बाजोरिया......

माझी रिसोड नगरपरिषदेत एकच वर्ष सेवा झाल्यामुळे माझी त्या ठिकाणावरुन बदली होऊ नये. त्यामुळे मॅटने त्यांना स्टेटस्को दिलेला आहे. परंतु श्री. इंगोले यांनी रिसोड नगरपरिषदेत गैरप्रकार केले असल्यामुळे श्री. इंगोले यांना सस्पेंड केले जाईल काय ? तसेच श्री. इंगोले यांना सक्तीच्या रजेवर पाठविले जाईल काय ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट सत्य आहे की, रिसोड येथील मुख्याधिकारी श्री. दीपक इंगोले यांच्या गैरकारभाराबद्दल उपविभागीय अधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल शासनाला प्राप्त झालेला असून यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचा देखील अहवाल प्राप्त झालेला आहे. चौकशी करुन जो अहवाल पाठविला आहे त्या अहवालामध्ये जी काही कारणे दिलेली आहेत किंवा जे काही दोषारोप ठेवलेले आहेत त्यामध्ये त्यांनी शिस्तभंगाच्या कारवाई संबंधीच उल्लेख केलेला आहे. परंतु तरीही, सदर मुख्याधिकाऱ्यांनी मॅटमध्ये जाऊन दाद मागितली. हे प्रकरण महत्वाचे असल्यामुळे यासंदर्भात शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे की, मॅटने दिलेली स्थगिती उठवणे व त्या संदर्भात शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी सरकारी वकीलांना आयुक्तांनी सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांचा या विषयाचा जो अभिप्राय आहे तो स्पेसिफिक नमूद असून श्री. इंगोले यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. श्री. इंगोले यांच्यावर जे काही दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले आहे त्यासंदर्भात आपण जे दोन पर्याय दिले आहेत. त्यामध्ये आपला पहिला पर्याय संबंधितांना सक्तीच्या रजेवर पाठवावे व दुसरा पर्याय त्यांना निलंबित करावे. जोपर्यंत मॅटमध्ये आपली बाजू मांडली जात नाही, निर्णय येत नाही तोपर्यंत श्री. इंगोले यांना रजेवर ठेवू. याबाबतीतला विचार तपासणी केल्यानंतर, प्रावधानामध्ये जे असेल ते केले जाईल.

**सभापती :** माननीय मंत्री महोदयांनी कायद्याला धरुन उत्तर दिलेले आहे. परंतु यासंदर्भात माझी सूचना अशी राहील की, जर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे असतील तर सरळ तुम्ही त्यांच्यावर फौजदारी गुन्हा लावा. फौजदारी गुन्हा लावल्यानंतर ते 48 तास आतमध्ये राहिले तर ते आपोआप सस्पेंडच होतील.

-----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबईतील काळबादेवी येथील इमारतीला लागलेली आग**

**(५) * ७७९४ श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.कपिल पाटील, श्री.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.धनंजय मुंडे, अॅड.अनिल परब, श्री.विजय गिरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधववःव** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळबादेवी येथील गोकूळ निवास इमारतीत दिनांक ९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या भीषण आगीमध्ये इमारत कोसळून अग्निशमन दलातील तीन अधिकाऱ्यांचा मृत्यु व सहा जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या श्री.महेंद्र देसाई, श्री.संजय राणे व श्री. सुधीर अमीन यांना हुतात्मा घोषित करुन त्यांच्या दोन मुलांचा शिक्षणाचा खर्च मुंबई महानगरपालिकेने उचलावा आणि त्यांना कायमस्वरुपी नोकरी देऊन मुख्यमंत्री कोटयातून एक फ्लॅट देण्याची मागणी त्यांच्या कुटूंबियांनी महापालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कर्तव्य बजावत असताना मृत्यूमुखी पडणाऱ्या अग्निशमन दलातील जवान व अधिकारी यांच्या कुटुंबियांना निर्वाहाचे साधन देणेबाबत व सदर कर्मचाऱ्यांचा ५० लक्ष रुपये पर्यंतचा विमा उतरविणे बाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) आगीच्या दुर्घटनांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच अग्निशमन जवानांना अत्याधुनिक साधनसामुग्री व यंत्रणा पुरविण्यासंदर्भात आणि याविभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.रणजित पाटील,श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता** (१) हे खरे आहे.

सदर दुर्घटनेमध्ये अग्निशमन दलाच्या ४ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यु झाला तसेच ५ अग्निशमन दलाचे कर्मचारी व ६ व्यक्ती जखमी झाल्या होत्या.

(२) हे खरे आहे.

(३) कर्तव्य बजावत असतांना मृत्युमुखी पडणाऱ्या अग्निशमन दलातील जवान व अधिकारी यांच्या कुटुंबियांना महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे रोख रक्कम देण्यात आलेली आहे.

सदर घटनेत मृत पावलेल्या दोन अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्यात आली असून, उर्वरित २ अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना वैयक्तिक अडचणीमुळे सद्यपरिस्थितीत त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही. तथापि योग्य वेळी त्यांच्या कुटुंबियांच्या मागणीप्रमाणे महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यात येईल. या व्यतिरिक्त अग्निशमन दलातील अधिकारी व जवान यांना रुपये पाच लाखापर्यंत गट विमा योजना लागू करण्यात आली आहे.

(४) आगीच्या दुर्घटनांचा सामना करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाकडे उपलब्ध असून, त्यामध्ये पर्सनल प्रोटेक्टीव्ह इक्वीपमेंट (पी.पी.ई) श्वसन उपकरणे यंत्रे विविध प्रकारचे रेस्क्यू गियर्स व आधुनिक दळणवळण साधने यांचा समावेश आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्यासंबंधी कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, हा गंभीर स्वरुपाचा प्रश्न असल्यामुळे आपण पाच मिनिटांचा वेळ मला जास्त द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो. शहरात आग लागली किंवा इमारत पडली तर घटनास्थळावरील लोकांचे प्राण वाचवण्यासाठी अग्निशमन दलच धावत असते.

मुंबई महानगरपालिकेचा 36 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे. असे असतानाही मुंबई महानगरपालिकेने अग्निशमन दलाला सोयी-सुविधेपासून लांब ठेवले आहे. मुंबईत मागे घडलेल्या

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:7794.....

श्री.किरण पावसकर ........

काळबादेवीच्या घटनेमध्ये अग्निशमन दलाचे अधिकारी संजय राणे तसेच महेंद्र देसाई यांचा ऑन दि स्पॉट मृत्यू झालेला आहे. परंतु या घटनेनंतर अग्निशमन दलाचे प्रमुख अधिकारी सुनील नेसरीकर व उपप्रमुख अधिकारी एस.जी.अमिन यांचा काही दिवसानंतर हॉस्पिटलमध्ये मृत्यू झालेला आहे. अशा प्रकारच्या घटनेत अधिकाऱ्यांचे निधन झाल्यानंतर त्यांना आपण हुतात्म्याचा दर्जा देत असतो. परंतु या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना सोयी-सुविधा दिल्या गेल्या होत्या काय ? जर अशा प्रकारच्या सोयी-सुविधा मुंबई महानगरपालिकेने दिल्या नसतील तर त्यासाठी आपण काय करणार आहोत ? मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात अग्निशमन दलासाठी किती रुपयांची तरतूद करण्यात आली होती ? करण्यात आलेली तरतूद वापरली गेली आहे काय ? अमेरिकेत पोलीस दलापेक्षा अग्निशमन दलाचे पगार जास्त आहेत. परंतु आपल्या अग्निशमन दलाची परिस्थिती अशी आहे की, आपला नवरा शहीद झाल्यानंतर, अंत्यसंस्काराच्या नंतर या मृत अधिकाऱ्यांच्या पत्नीला मला नोकरी मिळाली तर मी माझ्या दोन मुलांना वाढवू शकेन. शहीद झालेल्या अधिकाऱ्याचे कुटुंबही आजही सुरक्षित राहिलेले नाही. या परिस्थितीच्या कारणामध्ये खोलवर गेलो तर आपल्याला यामध्ये अनेक कारणे दिसून येतील. आग विझवण्यासाठी 3.2 कि.मी.प्रति सेंटीमीटर दाबाने पाण्याचा पुरवठा आवश्यक असतो. परंतु या दाबाने मुंबईमध्ये पाणी पुरवठा होऊ शकत नाही आणि झाला तर पाईपची कॅपेसिटी त्या प्रमाणे नाही. अग्निशमन दलासाठी जे हेल्मेट दिलेले आहेत ते 500 ग्रॅमचे आहे. परंतु इंटरनॅशनल स्टँडर्ड हे 300 ग्रमचे आहे. हे हेल्मेट मुंबई महानगरपालिकेने कोठून घेतले त्याची आम्हाला माहिती नाही. अग्निशमन दलाला देण्यात आलेले वॉकी टॉकी चालत नाही. चांगल्या प्रकारचे रोप्स सुध्दा त्यांना उपलब्ध नाही. अग्निशमन दलाला जे फायर कोट दिलेले आहेत त्यामध्ये पॉलिस्टरचे प्रमाण जास्त असून हा कोट सुध्दा निकृष्ट दर्जाचा आहे.

सभापती महोदय, मंत्रालयाला आग लागल्यानंतर समिती नेमली गेली. या समितीने उच्च न्यायालयाच्या एका इमारतीचे ऑडिट केले. आपण इमारतींना 5 आणि 8 चा एफएसआय देत आहात. परंतु आपल्याकडील अग्निशमन दलाची शिडी फक्त 70 मीटर पर्यंत जाऊ शकते. 70 मीटर पेक्षा जे उंच टॉवर्स आहेत त्यांना आग लागली तर ती आग आपण विझवू शकत नाही अशी

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:7794.....

श्री. किरण पावसकर ......

आपली परिस्थिती आहे. त्यामुळे यावर नियंत्रण आणण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ? अग्निशमन दलाचे जे कर्मचारी शहीद झाले आहेत त्यांना मुख्यमंत्री कोटयातून सदनिका दिली जाईल असे सांगण्यात आले होते त्या प्रमाणे अग्निशमन दलाच्या शहीदांना सदनिका देण्यात आली आहे काय ? चारही शहीद झालेल्यांना सदनिका देण्याच्या संदर्भात शासनाचा प्रस्ताव काय आहे ? मुंबई महानगरपालिकेने अग्निशमन दलाला योग्य निधी दिलेला नाही. अग्निशमन दलाला सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यामध्ये झालेला भ्रष्टाचार सदनासमोर ठेवला जाणार आहे काय ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पावसकर साहेबांचा पहिला प्रश्न अग्निशमन दलाच्या सोयी-सुविधेबद्दल होता. काळबादेवीमध्ये दुर्दैवी घटना घडली होती. काळबादेवीची इमारत जुनी होती तसेच या इमारतीमध्ये ज्वलनशील पदार्थ साठवले गेल्यामुळे आग वाढत गेली. काळबादेवी प्रकरणानंतर मूलभूत गोष्टीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. काळबादेवीच्या दुर्घटनेचा आपण आंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. आग विझवण्यासाठी पाण्याचा जो काही दाब लागतो त्यापासून आपण सांगितल्या प्रमाणे हेल्मेट, वॉकी टॉकी, फायर कोट तसेच फायरकोटमध्ये पॉलिस्टरला देखील काही प्रमाण असेल. याच्या प्रॉक्यूअरमेंटमध्ये सदोषता आढळून आली किंवा आपल्याला वाटते की, वॉकी टॉकी आणि इतर गोष्टींचा पुरवठा होत असताना एसओपी पाळल्या गेल्या नाहीत. तर त्यासाठी निश्चितपणे चौकशी केली जाईल. 70 मीटर उंचीपेक्षा मोठी इमारत असेल व त्या इमारतीला आग लागली आणि अग्निशमन दलाकडे केवळ 70 मीटर पर्यंतची शिडी असेल तर त्यासंदर्भात आपण डीसीआर रुल मध्ये काही प्रावधान केले आहेत.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7794...

डॉ.रणजित पाटील...

दहा ते चौदा मजल्याच्यामध्ये एक रेफ्यूज एरिया करावा अशी तरतूद आहे. त्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर असल्याशिवाय टॉवरच्या हाईटला कशी परवानगी दिली जाते याबद्दल फेर व्हिझीट करायला पाहिजे. कोलकाता येथे जी दुर्घटना घडली त्यानंतर देशामध्ये नॅशनल बिल्डींग कोड अस्तित्वात आला. नॅशनल बिल्डींग कोडच्या अंतर्गत जे काही नॉर्म्स आणि रिफॉर्म्स आहेत, ते देशासाठीच लागू आहेत. त्यामधून कोणीच सुटलेले नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, ना हरकत प्रमाणपत्र दोन पद्धतीने दिले जाते एक प्रत्यक्ष आणि दुसरे अप्रत्यक्ष. ..

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण ऐकून घ्यावे त्यानंतर उपप्रश्न विचारावा.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मला येथे सांगण्यात आनंद वाटतो की, अग्निशमन दलासाठी 90 मीटरच्या वर पोहोचणारी शिडी महानगरपालिकेसाठी खरेदी करीत आहोत. त्या शिडीची ऑर्डर झालेली आहे, त्याबाबतची प्रोसिजर पूर्ण झालेली आहे. आज मुंबई शहरात कोठेही मोकळी जागा नाही. त्यामुळे आपणास व्हर्टीकल जाण्याशिवाय पर्याय नाही. जे.जे.रुग्णालयाचे एक्स्टेंशन करायचे होते, त्यासाठी आपण होरीझन्टल जाऊ शकत नाही. आपणास ते व्हर्टीकल राईज करावे लागेल. आपण जे.जे. रुग्णालयाला तशी परवानगी देत असताना आपल्याकडे फायर फाईटींगचे अप्लायन्सेस येईपर्यंत आपल्याला करता ते येणार नाही असे सांगितले. मुंबई महानगरपालिकेच्या ॲन्युअल प्लानमध्ये फायरफायटींगच्या ज्या काही बाबी आहेत, त्या होतात की नाही याबाबत सांगितले. ते सुद्धा तपासण्यात येईल. काळबादेवी येथे लागलेल्या आगीत अग्निशमन दलातील तीन अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला, त्यांना शहीद नाही, पण शौर्य पदक देण्याबाबत राज्य सरकार निश्चितपणे माननीय राष्ट्रपतींकडे आग्रह धरेल. त्याचप्रमाणे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च महानगरपालिका उचलेल. जर एनजीओ पुढे आल्यातर त्यांची शहानिशा केली जाईल. त्यांच्या पाल्यांचा शिक्षणाचा पूर्ण खर्च त्यामध्ये उच्च शिक्षणाचा खर्च देखील आहे,शेवटपर्यंत शिक्षणाचा खर्च करण्यात येईल.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7794...

डॉ.रणजित पाटील...

सभापती महोदय, मृत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. मी त्याबाबत सांगू इच्छितो की, सर्व कुटुंबीयांना विचारण्यात आले. परंतु त्यांची छोटी मुले असल्यामुळे प्रत्येकाने आपापला चॉईस दिलेला आहे. त्यानुसार त्यांच्या ज्या काही मागण्या आहेत, त्याबाबत त्यांच्या पात्रतेनुसार त्यांना संधी दिली जाईल.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्याच्या कोट्यातून सदनिका देण्याबाबत विचारणा झाली. या संदर्भात महानगरपालिकेकडून प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. सदनिकेबाबत सहानुभतिपूर्वक विचार केला जाईल एवढेच मी सांगू शकतो.

सभापती महोदय, या मृत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्यात आली काय असा प्रश्न विचारण्यात आला. कै.सुनील नेसरीकर यांच्या कुटुबीयांना 16 लाख 39 हजार इतकी रक्कम अदा करण्यात आली. कै.सुधीन अमीन यांच्या कुटुंबीयांना 18 लाख 20 हजार, श्री.संजय राणे यांच्या कुटुंबीयांना 18 लाख 20 हजार, महेंद्र देसाई यांच्या कुटुंबीयांना 17 लाख 35 हजार इतकी रक्कम अदा करण्यात आली.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मला सदनाच्या निदर्शनास एक बाब आणून द्यायची आहे की, आज आपण सकाळच्या विशेष बैठकीत लक्षवेधी सूचनांवर चर्चा केली. सकाळच्या विशेष सत्रामध्ये एकूण सहा लक्षवेधी सूचना चर्चेसाठी होत्या, त्यापैकी पाच लक्षवेधी सूचनांवर चर्चा केली. आता प्रश्नोत्तराच्या तासातील शेवटची फक्त पाच मिनिटे शिल्लक आहेत. आपण प्रश्नोत्तराच्या तासामध्ये फक्त पाच प्रश्नांवर चर्चा केली आहे. प्रश्नोत्तराचा तास हा लक्षवेधी सूचनांचा झालेला आहे असे आपण मानायचे काय ? प्रश्नोत्तराच्या तासामध्ये किमान 10-11 प्रश्नांवर चर्चा झाली पाहिजे. प्रत्येक प्रश्नाच्या बाबतीत सदस्यांनी भाग घेतला पाहिजे असे आपल्यावर बंधन आहे काय, याचा देखील विचार केला पाहिजे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7794....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपण निर्णय दिल्यावर त्यावर आम्ही कधी बोलत नाही. पण महत्वाचा प्रश्न असेल आणि आम्ही कधी तरी हात वर केला तर आपण आम्हाला संधी द्यावी, अशी विनंती आहे.

**सभापती** : माझ्याकडून आपल्यावर अन्याय झाला अशी आपल्याकडून भावना येणे हा माझ्यावर झालेला अन्याय आहे, असे मी मानतो.

---------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**यवतमाळ शहरात शालेय पोषण आहारातील तांदूळ खुल्या बाजारात विकल्याबाबत**

**(6) * ७८४७ श्री.संदीप बाजोरिया, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.सुनील तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यवतमाळ शहरात विद्यार्थ्यांसाठी आलेला शालेय पोषण आहाराचा १३१ कट्टे तांदूळ कलश ब्रान्डच्या नावाखाली खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना विभागीय पोलीस अधिकारी यांनी पकडल्याची घटना दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली तसेच हजार क्विंटल तांदूळ असलेले गोडावून सील केले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता :** (१) दिनांक २१ मार्च, २०१५ रोजी यवतमाळ शहरात विद्यार्थ्यांसाठी आलेला शालेय पोषण आहाराचे ४० कट्टे तांदूळ कलश ब्रान्डच्या नावाखाली खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना विभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांनी पकडला आहे. ९१ कट्टे तांदूळ असलेले गोडाऊन सील करण्यात आले आहे.

(2) व (३) सदर प्रकरणी गुन्ह्याचा तपास केला असता असे आढळून आले की, मुलांचे शालेय पोषण आहाराचे तांदूळ वाहतूक करुन पुरविण्याचे काम ठेकेदार विनोद रमेशराव डोंगरे यांना देण्यात आले होते. त्यांनी अरशद बेग यांच्यासोबत करार करुन त्यांना वाहतूक करण्यासाठी नेमले होते. अरशद बेग यांनी पांढरकवडा बायपास रोड येथे गोडाऊन भाड्याने घेऊन तेथे तांदूळ ठेवले होते. त्यातील तांदूळ खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना अरशद बेग यांना पकडण्यात आले. या प्रकरणी अरशद बेग व त्यांच्या वाहनचालकाविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे गु.र.क्र.३०४५/२०१५, जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३, ७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यांच्याविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ यांच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 7847....

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, शालेय पोषण आहाराचा 131 कट्टे तांदूळ जप्त करण्यात आल्याचे उत्तरात मान्य केलेले आहे. श्री.विनोद डोंगरे यांना शालेय पोषण आहाराचे तांदूळ पुरविण्याचे काम देण्यात आले होते. परंतु त्यांना अटक न करता श्री.अरशद बेग नावाच्या इसमास अटक करण्यात आली. शालेय पोषण आहाराचे कंत्राट पुरविण्याचे काम ज्या कंत्राटदारास देण्यात आले त्याने सब कॉन्ट्रॅक्टर नेमला. नियमात सब कॉन्ट्रॅक्टर नेमण्याची तरतूद आहे काय ? शालेय पोषण आहार पुरविण्याचे कंत्राट ज्या व्यक्तीला दिले होते त्याच्यावर पोलिसांनी कोणती कारवाई केली, ज्या कंत्राटदाराने बेकायदेशीर काम केले त्याचा परवाना रद्द करण्यात आला काय, त्याच्यावर कोणत्या स्वरूपाची फौजदारी कारवाई करण्यात आली ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत निश्चितपणे तपास केलेला आहे. तपासाअंती जीवनावश्यक वस्तुच्या संदर्भामध्ये जो अधिनियम आहे त्याचे उल्लंघन केले, काळाबाजार केला, पोषण आहाराचा तांदूळ उचलून घेऊन जात असताना 40 कट्टेचा पिक-अप मिळाला. श्री.विनोद रमेश डोंगरे यांनी श्री.अरशद बेग यांच्याबरोबर सब कॉन्ट्रक्टचा करार केला होता म्हणून तो वाहतूक करून तांदूळ नेत होता. श्री.अरशद बेग व वाहनचालक श्री.आशिष ढाले यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली. आता हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, शालेय पोषण आहारा देण्याचे काम ज्या ठेकेदारास दिले आहे त्याच्यावर शासनाने कोणती कारवाई केली, ज्याला कॉन्ट्रॅक्ट दिले त्याला सब-कॉन्ट्रॅक्टर नेमण्याचा अधिकार आहे काय ? हा शाळेतील विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराचा प्रश्न आहे, या कामामध्ये भ्रष्टाचार चालू आहे.सरकारने निविदा न काढता या ठेकेदाराला एक महिन्याची मुदतवाढ दिलेली आहे. मी हे येथे जबाबदारीने सांगत आहे. त्या ठेकेदाराला एक महिन्याची मुदतवाढ दिलेली आहे हे माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांनी मान्य केलेले आहे. आपण ज्याला कॉन्ट्रॅक्ट देतो ते सब-कॉन्ट्रॅक्टर नेमतात आणि ते सब-कॉन्ट्रॅक्टर आणखी सब-कॉन्ट्रॅक्ट करतात. हा अतिशय गंभीर विषय आहे. जे लोक असे कंत्राट घेतात त्यांची शासन सीआयडीमार्फत चौकशी

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 7847....

श्री.संदीप बाजोरिया.....

करणार काय ? शासनाने शालेय पोषण आहाराचे कंत्राट पुरविण्याचे काम दिलेले आहे अशा कंत्राटदाराची नावे हे अधिवेशन संपण्यापूर्वी पटलावर ठेवण्यात येतील काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, शालेय पोषण आहाराचे मूळ कंत्राट श्री.विनोद रमेश डोंगरे यांना दिले होते. त्यांनी श्री.अरशद बेग करार यांच्याशी करार करुन त्यांना वाहतुकीसाठी दिले होते. श्री.अरशद बेग हे माल घेऊन जात असताना एसडीपीओ मार्फत आणि जिल्हा मार्केटींग ऑफीसरच्या माध्यमातून त्याच्यावर केस नोंद करण्यात आली. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. जर आपणास प्रश्नांची उत्तरे मिळाली नाहीत जर आपण जरुर उपप्रश्न विचारावेत. मूळ कंत्राटदारावर का केस करण्यात आली नाही, ज्यांनी करार केला त्याच्यावर केस का करण्यात आली, त्याला असे सोडता येते का, एक्स्टेशन कसे केले इत्यादीची चौकशी करण्यासाठी रिजनल लेव्हलवरुन अधिकारी नेमण्याची आवश्यकता असेल त्या अधिकाऱ्यामार्फत संपूर्ण चौकशी करण्यात येईल. एक महिन्याच्या आत चौकशीअंती जे काही निष्पन्न होईल त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7847....

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, हा लहान विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराचा विषय आहे. चिक्की सुध्दा या विषयासमोर फिक्की आहे असा हा घोटाळा आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, चार-सहा महिन्यांपूर्वी आर्णी तालुक्यात अशाचप्रकारे घोटाळा झाला होता. त्या घोटाळ्या प्रकरणी हमाल किंवा दुय्यम दुर्जाचे काम करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले गेले. वास्तविक छोट्या लोकांवर कारवाई केल्यामुळे मोठे मासे तसेच सुटतात. अशा घोटाळेबाज लोकांना मासे म्हणणे म्हणजे एकप्रकारे माशांचा सुध्दा अपमान आहे. त्यामुळे अशा घोटाळेबाज लोकांवर खऱ्या अर्थाने कारवाई करुन, या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या स्कोप बाहेरील आहे. या विषयाच्या अनुषंगाने सांगतो की, एका पीक-अप मध्ये 40 कट्टे आढळून आले. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या अनुषंगाने मी सविस्तर आणि तपशीलवार उत्तर दिलेले आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, एक महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करुन, दोषींवर कारवाई करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विनोद रमेशराव डोंगरे या व्यक्तीला वाहतुकीचे कंत्राट दिले होते. त्यामुळे त्याला सब कॉंट्रॅक्टर नेमता येत नव्हता. या प्रकरणी ड्रायव्हर आणि सब कॉन्ट्रॅक्टरवर केस दाखल करण्याऐवजी कायद्याने मूळ कंत्राटदार असलेल्या विनोद डोंगरे याच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता होती. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारते की, विनोद डोंगरे याच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, अर्शद बेग आणि डोंगरे यांच्यामध्ये करार झाला होता. त्या करारातील अटी व शर्ती काय होत्या आणि तो करार कोणाच्या समोर झाला होता हे...(अडथळा)

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या प्रकरणी काय उचित कारवाई करणार एवढेच सांगावे. सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग हे छोटे मासे, मोठे मासे म्हणाले. त्यामुळे आपण शार्क माशापासून सर्व मासे कसे जाळ्यात येतील ते पहावे.

..2..

ता.प्र.क्र.7847...

प्रा.राम शिंदे : महोदय, कोणत्याही माशाला सोडण्याचा प्रश्नच नाही. ज्या व्यक्तीने हा घोटाळा केला होता त्याच्यावर गुन्हा नोंदविला असून त्याचा तपास केला आहे. तसेच चार्जशीट सुध्दा दाखल केले.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, या प्रकरणी ड्रायव्हरवर कारवाई सुरु आहे. सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे हे नुकतेच सभागृहात आलेले आहेत. त्यांनी सुध्दा असे घडल्याचे मान्य केले आहे. हा शालेय पोषण आहाराचा विषय आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी द्यावयास पाहिजे होते. परंतु माननीय मंत्री, श्री.विनोद तावडे यांनी करार न करता, या चोर ठेकेदाराला एक महिन्याची मुदतवाढ दिली आहे. महोदय, चिक्की घोटाळ्यामध्ये, शालेय पोषण आहाराच्या घोटाळ्यामध्ये एकच व्यक्ती गुंतली आहे का, याची चौकशी सी.बी.आय. च्या माध्यमातून करण्यात येईल काय ? राज्यात जेवढे घोटाळे सुरु आहेत त्या सर्वांमध्ये एकच मालक गुंतलेला आहे की काय, या बाबतची चौकशी करण्यात येईल काय ?

**सभापती** : मला वाटते या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना वेळ देऊ या. त्यामुळे आता मी हा प्रश्न राखून ठेवतो.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.:** तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.रविंद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबईत एसआरए योजनेच्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम नियमावलीप्रमाणे करण्याबाबत" या विषयावरील श्री.प्रकाश बिनसाळे व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 3822 ला दिनांक 08 एप्रिल, 2015 रोजी अनुपूरक ***प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.***

***सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.***

***(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)***

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***पृ.शी.मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे***

***श्री.दीपक केसरकर (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने***, सन 2012-13 चा महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थांच्या लेख्यांवरील बेचाळीसावा लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ***ठेवतो.***

***सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.***

--------

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, सन 2013-14 चे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली/ सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली या 33 जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

**पृ.शी.मु.शी.** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री.जयवंतराव जाधव (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा सन 2015-2016 या वर्षाचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी माझी दालनात भेट घेऊन एक गंभीर प्रश्न निदर्शनास आणून दिला आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे जो विषय मांडणार आहेत त्याकडे सर्वांनी गांभीर्याने पहावे. मी सन्माननीय सदस्यांना अपवाद म्हणून सदरहू विषय मांडण्यास अनुमती देत आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**म्हाळुंगे, ता.मुरुड, जि.रायगड येथे एका माथेफिरुने**
**शाळकरी मुलींवर केलेल्या गोळीबाराबाबत**

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, एका गंभीर आणि संवेदनशील विषयाकडे मी केवळ शासनाचेच नव्हे तर सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. रायगड जिल्ह्याच्या मुरुड तालुक्यातील म्हाळुंगे या गावी परवा संध्याकाळी एका अज्ञात माथेफिरुने 7 शाळकरी मुलींवर गोळीबार केला. आपल्या सर्वांचे सुदैव असे की, यामध्ये कुठल्याही मुलीच्या जीवावर बेतले नाही. त्यांच्या खांद्याला किंवा शरीराच्या इतर भागाला गोळ्या लागल्या. घटनेनंतर त्या ठिकाणी पोलीस रितसर गेले. मला जी माहिती मिळाली त्या माहितीच्या अनुषंगाने सांगतो की, सदरहू माणूस मानसिकदृष्ट्या रुग्ण आहे. पूर्वी त्या शहरात आणि राज्यात अनेक प्रकारच्या साखळी खूनाच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी या घटनेकडे गांभीर्याने बघण्याची आवश्यकता आहे. ही घटना घडून तीन दिवस उलटून सुध्दा पोलिसांची त्या ठिकाणी गस्त सुरु आहे. रॅपीड ॲक्शन फोर्स सुध्दा त्या ठिकाणी गेले आहे.

सभापती महोदय, मुरुड तालुका हा नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. त्या परिसरात फणसाळ अभयारण्य आहे. ते अभयारण्य अतिशय घनदाट आहे. मला माहिती मिळाली आहे की, त्या मनोरुग्णाच्या नातेवाईकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. परंतु त्यांनी सांगितले की, ती व्यक्ती मनोरुग्ण असल्यामुळे त्याचा आणि आमच्या कुटुंबाचा काही संबंध राहिलेला नाही. त्यामुळे या गंभीर घटनेकडे माननीय गृह राज्यमंत्र्यांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, हा माथेफिरु अजून काही गंभीर प्रकार करणार नाही या दृष्टीने शासनाच्या माध्यमातून कार्यवाही झाली पाहिजे. मी अगोदर सांगितले की, फणसाळ अभयारण्य हे अतिशय दाट आहे. ते अभयारण्य लपण्यासाठी चांगली जागा आहे. त्या माथेफिरुकडून माणसांबरोबरच दुर्मिळ पशुंची हत्या होता कामा नये. त्यामुळे या संपूर्ण घटनेसंदर्भात आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्यापर्यंत शासनाने सविस्तर निवेदन करावे, अशी मी मागणी करतो.

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर बाहेरचे गुन्हेगार येऊन अशी कृत्ये करीत आहेत. मुरुड आणि अलिबागमध्ये पर्यटन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर होतो. त्या ठिकाणी असणारा पोलीस बंदोबस्त आणि संरक्षणाची जबाबदारी वेगळ्या प्रकारे करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर येऊन पडली आहे. पर्यटनाला चालना देण्याबरोबरच अशा गुन्हेगारांचा बंदोबस्त करीत असतना सरकारला व्यापक स्वरुपाचे वेगळे धोरण ठरवावे लागेल. कारण त्या ठिकाणी समुद्र किनारा आणि रेल्वे मार्ग जवळ आहे. मुरुडपासून रोह्याचा रेल्वे मार्ग जवळ आहे. त्यामुळे त्या भागात गुन्हा करुन गुन्हेगार प्रवृत्तीचे लोक रेल्वेने बाहेर निघून जाऊ शकतात. त्यामुळे मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी निदर्शनास आणून दिलेल्या घटनेबाबत आपण दालनामध्ये बैठक घ्यावी आणि या विषयावर चर्चा करुन काही तरी निर्णय घ्यावा. जेणेकरुन यामध्ये व्यवस्थितपणा आणि सुसूत्रता येईल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याला मी समर्थन देतो.

---------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले : सन्माननीय सदस्य श्री. अनिल तटकरे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे सुरक्षिततेचा मुद्दा मांडला, विशेषतः कोकणातील विशिष्ट भागाबाबत सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी देखील त्या संदर्भात उल्लेख केला. या भागामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने सातत्याने वारंवार ये-जा होणारी लोकसंख्या खूप मोठी आहे.

**सभापती** : फ्लोटिंग पॉप्युलेशन म्हणता येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, फ्लोटिंग पॉप्युलेशन आहे आणि अशी स्थिती असताना त्या भागात शाळकरी मुलींवर गोळीबार होणे गंभीर आहे. अमेरिकेत अशा घटना घडतात असे ऐकले आहे, वाचले आहे. पण अशी परिस्थिती येथे निर्माण होते त्यावेळी ते गंभीर होते. या भागात उपलब्ध असलेली शस्त्रे परवानाधारकांचीच आहेत की नाहीत हे पाहणे महत्त्वाचे आहे. आपण त्या भागात पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. आपण त्यांच्या गस्तीसाठी कशा प्रकारचे नियोजन केले आहे ? अशा घटनामुंळे त्या भागात राहणाऱ्या सर्वच नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. वेगवेगळ्या ठिकाणाहून, लांबून येथील शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांवर अत्याचार होणार असतील आणि त्यामधून कोणाला जीव गमवावा लागत असेल तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ? शालेय मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. विद्यार्थ्यांच्या शाळा लांबवर आहेत त्यांना शाळेत पायी जावे लागते. राज्यात अशा प्रकारच्या घटना घडणे हे अतिशय दुर्दैवी आहे. ही गंभीर घटना आहे, त्याची शासनाने दखल घ्यावी आणि सांगितल्याप्रमाणे निवेदनही करावे. सभापती महोदय, शक्य झाल्यास, आपण या विषयाच्या संबंधी आपल्याकडे एक बैठक बोलावून या प्रश्नावर मार्ग काढावा.

**सभापती** : सखोल चर्चा झाली. सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र झाल्या आहेत. माननीय मंत्र्यांनी या संदर्भातील माहिती घेऊन उद्या सकाळपर्यंत अहवाल सभागृहासमोर ठेवावा. सदर विषयाच्या संदर्भात प्रश्न तयार झाले आहेत. कोकण विभागात टूरिस्ट सेंटर्स आहेत. बाहेरच्या लोकांकडून येथे येऊन बेकायदेशीर हत्यारे वापरली जात असतील आणि अशी कृत्ये होत असतील तर हे गंभीर आहे. ही केस माथेफिरूची दिसत आहे. हा सायकोटिक पर्सन दिसत आहे. सदर विषयाच्या संदर्भात या आठवड्यात किंवा पुढील आठवड्यात माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल आणि या संदर्भात काही धोरणात्मक निर्णय करण्याची आवश्यकता असेल तर त्याप्रमाणे निर्णय करण्यात येईल.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती ....**

आता नियम 93 अन्वयेच्या सूचना घेण्यात येतील. औचित्याचे मुद्दे नंतर घेण्यात येतील.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना अपवाद म्हणून परवानगी दिली होती.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला विशेष हक्कभंगाची सूचना मांडावयाची आहे. काल सुध्दा कागदपत्रे नाहीत, उद्या संधी देतो असे आपण सांगितले आहे.

**सभापती** : ठीक आहे. आपण बोलावे.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सभागृहात कोणत्याही सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख करण्यापूर्वी नियमानुसार संबंधितांना सूचना देणे क्रमप्राप्त असताना सुध्दा ती न देणे

**मु.शी.** : सभागृहात कोणत्याही सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख करण्यापूर्वी नियमानुसार संबंधितांना सूचना देणे क्रमप्राप्त असताना सुध्दा ती न देणे या विषयाबाबत श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांनी श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याविरुध्द दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी "सभागृहात कोणत्याही सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख करण्यापूर्वी नियमानुसार संबंधितांना सूचना देणे क्रमप्राप्त असताना सुध्दा ती न देणे" या विषयाबाबत श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी 20 जुलैला विधानसभेत शेतकऱ्यांची आत्महत्या आणि कर्जमाफी संदर्भातील प्रस्तावाच्या चर्चेला उत्तर देताना माझ्या नावाचा उल्लेख केला. त्यासाठी त्यांनी माननीय सभापती, विधानपरिषद यांची कोणतीही परिवानगी घेतली नव्हती किंवा मला तशी कोणतीही नोटीस दिली नव्हती. विधानपरिषद व विधानसभा यांच्या नियमाप्रमाणे एखाद्या सन्माननीय सदस्यांचे नाव घ्यायचे असेल तर तशी नोटीस देणे क्रमप्राप्त आहे. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी हक्क मोडलेला आहे, नियम पाळलेले नाहीत. माझ्याकडे विधानसभेतील भाषणाचे इतिवृत्त आहे. त्यामध्ये त्यांनी दोन वेळा उल्लेख केला आहे. सूत गिरणींच्या व्याजाचा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

संसाराकरिता, उदरनिर्वाहकरिता वापर करतात असा संदर्भ त्यांनी दिला होता आणि तरीही विधानपरिषदेत आपल्यासमोर सांगितले होते की, मी असे बोललेलो नाही. सभापती महोदय, दोन वेळा असा उल्लेख त्यांनी केला आहे. व्याजाच्या संदर्भात तुमचा संसार चालविण्याची परवानगी दिली नव्हती असे पहिला उल्लेख केला आणि नंतर विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. नसीम खान यांना उद्देशून, तुम्ही पैसे दिले होते, ते त्यावेळी यांना व्याजावर संसार चालविण्याकरिता दिले होते का असा उल्लेख केला. मी ज्यावेळी या संदर्भात उल्लेख केला, त्यावेळी मी 'संसार' शब्द वापरलेला नाही असे त्यांनी म्हटले. ते कबूल केले पाहिजे. सूत गिरणींच्या संदर्भात सांगितले की, 1991 साली परवानगी मिळाली होती तरी देखील 10-12 वर्षे काम सुरू करण्यास वेळ लागला. कारण सुरूवातीला शेतकऱ्यांचे ....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पष्टीकण करू नये, विशेषाधिकार भंग कसा झाला ते सांगावे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी तेच सांगत आहे. कुठेही माझ्या संसाराकरिता किंवा उदरनिर्वाहाकरिता त्यामधील एक पैसा गेला असेल तर चौकशी करावी, मी विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा देण्यास तयार आहे, राजकाराणातून सुध्दा निवृत्त होईन. असे खोटे आरोप करणे योग्य नाही. जे त्या सदनाचे सदस्य नाहीत त्यांच्या संदर्भात कोणतीही नोटीस न देता, आपली परवानगी न घेता असे खोटारडे आरोप करायचे यामुळे माझा पूर्णपणे विशेषाधिकार भंग झाला आहे. मी सदनाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना सुध्दा विनंती करू इच्छितो. आपण ही विशेषाधिकार भंगाची सूचना विशेषाधिकार भंग समितीकडे पाठवावी आणि त्याकरिता पुढील ज्या काही प्रोसेस असतील त्या पूर्ण कराव्यात. एका सन्माननीय सदस्यांचा, सभागृहाचा अपमान झाला आहे. त्यामुळे मी माननीय मुख्यमत्र्यांच्या विरूध्द विशेषाधिकार भंगाची सूचना देत आहे. आपण ही विशेषाधिकार भंगाची सूचना विशेषाधिकार भंग समितीकडे पाठवावी अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी दिलेल्या विशेषाधिकार भंग सूचनेच्या बाबतीत गुणवत्तेनुसार निकष तपासून घेतो. तसेच संबंधितांकडून अधिक माहिती घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल.

----

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : काल मंगळवार, दिनांक 21 व आज बुधवार, दिनांक 22 जुलै, 2015 रोजी मला प्राप्त झालेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांच्या संदर्भातील निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी "दिनांक 15 जुलै, 2015 रोजी अहमदनगर, पारनेर या तालुक्यांतील कडूस पाडळी येथील पंचशिल शिक्षण प्रसारक मंडळाच्या शाळेतील लिपिकाने नववीच्या वर्गातील 12 विद्यार्थीनींना एका वर्ग खोलीत कोंडून जबर मारहाण केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी "राज्यातील अनेक गरजू रूग्णांसाठी जीवनदायी ठरलेली "राजीव गांधी जीवनदायी आरोग्य" योजना अधिकाधिक लोकाभिमूख करण्यासाठी या योजनेची व्याप्ती वाढवून 30 खाटांवरील सर्व खाजगी रूग्णालयांचा या योजनेत समावेश करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये यांनी "महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात भरती प्रक्रियेद्वारा पदे भरण्यासाठी विलंब होत असून रूग्णसेवा व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकतेवर होणारा परिणाम विचारात घेता सदर पदे तत्काळ भरणे शक्य व्हावे यासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने स्वतःचे निवड मंडळ तयार करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी "पोलीस कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठता आणि गुणवत्ता या निकषावर पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती देण्याची मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी "औरंगाबाद शहरालगतच्या 28 गावांसाठी झालर आराखड्याचे काम करण्यासाठी सिडकोची विशेष विकास प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात येणे, प्राधिकरणाने चुकीच्या पध्दतीने आरक्षण टाकल्याने हरकती तक्रारीवर सुनावण्या घेऊन आराखडा रद्द केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी "राज्यामध्ये ऑनलाईन शॉपिंगच्या माध्यमातून कोट्यवधी रूपयांच्या मालाची विक्री करूनही संबंधित कंपन्या कोणताही कर भरत नसल्यामुळे शासनाचे होणारे कोट्यवधी रूपयांचे आर्थिक नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी "नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील 250 मागासवर्गीय गरीब महिलांवर उपजीविकेचे साधन म्हणून अंत्यविधीनंतर मृतांच्या नातेवाईकांनी ठेवलेल्या नैवेद्यावर उदरनिर्वाह चालविण्याची आलेली वेळ, या महिलांना शासकीय कार्यालयात काम देण्यास शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दीपकराव साळुंखे यांनी "राज्यातील दूध तसेच इतर खाद्य पदार्थांतील भेसळीच्या प्रकरणांवर नियंत्रण मिळविण्यासाठी अन्न व औषध प्रशासनातील रिक्त असलेली औषध निरीक्षकांची पदे भरणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी "दिनांक 16 जुलै, 2015 रोजी मिरा रोड पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण अंतर्गत एस.के.स्टोन पोलीस चौकीला लागून असलेल्या व्हाईट हाऊस बारवर पोलिसांनी टाकलेल्या धाडीचे वृत्तांकन करण्यास गेलले 2 पत्रकार यांच्यावर बारमालकासह 20 ते 30 कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्राणघातक हल्ल्यात एका पत्रकाराचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचा मुद्दा

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक अतिशय महत्वाचा औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागितली आहे. या ठिकाणी अर्थ राज्यमंत्री महोदय देखील उपस्थित आहेत. एक अपवाद म्हणून मी त्यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी देत आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय दत्त : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपण मला हा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल मी आपला मनापासून आभारी आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाने नियोजन आयोगाऐवजी नीती आयोगाची स्थापना केल्यामुळे राज्य सरकारला केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीत वाढ केल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात 20 योजनांमधील राज्य सरकारचा हिस्सा 50 टक्के केल्याने आणि 26 योजनांकरिता निधी देणे बंद केल्याने राज्याला मिळणाऱ्या निधीत 3554 कोटी रूपयांची घट करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने नीती आयोगामार्फत देऊ केलेल्या रकमेत वाढ केली असली तरी केंद्रीय अर्थसहाय्यामधील बहुतांश योजनांमधील राज्याचा हिस्सा जो पूर्वी केवळ 20 टक्के होता तो आता 50 टक्क्यांवर आला असून राज्य सरकारवरील आर्थिक बोजा किती वाढणार आहे, हे स्पष्ट झ ालेले नाही. त्यामुळे या महत्वाच्या योजनांवर परिणाम होऊ शकतो.

सभापती महोदय, सेंट्रल फंडिंग स्किममध्ये मिड-डे मिल, सर्व शिक्षा अभियान, नॅशनल रूरल ड्रिंकिंग वॉटर प्रोग्रॅम, राष्ट्रीय कृषी विकास योजना, स्वच्छ भारत अभियान, राष्ट्रीय हेल्थ मिशन, इंटिग्रेटेड वॉटरशेड मॅनेजमेंट प्रोग्रॅम आणि त्या बरोबरच ज्या 26 योजनांना सेंट्रल

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त........

फंडिंग होऊन डिलिंक करण्यात येणार आहे त्यामध्ये राजीव गांधी सक्षमीकरण अभियान, बॅकवर्ड रिजन ग्राम फंड, नॅशनल ई-गव्हर्नन्स प्लॅन, मॉर्डनायझेशन ऑफ पोलीस फोर्स अशा आणखी काही महत्वाच्या योजना आहेत.

**सभापती :** त्यामध्ये अे.आय.बी.पी.सारख्या महत्वाच्या योजनेचाही समावेश आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, असे वातावरण निर्माण झाले आहे की, या योजना बंद झाल्यानंतर गोरगरिबांच्या, मागासवर्गीयांच्या, इतर समाजाच्या योजनांचा फायदा त्यांना मिळणार नाही. या योजनांसाठी राज्य सरकारकडून फंडिंग केले जाईल, असे सांगितले गेले तरी राज्य सरकारकडे तेवढा निधी उपलब्ध आहे का, याचाही खुलासा होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सभागृहात अर्थ राज्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. मी आपल्या माध्यमातून त्यांना विनंती करतो की, त्यांनी याबाबत निवेदन करावे.

**सभापती :** अर्थ राज्यमंत्री महोदयांना माझ्या स्पष्ट सूचना आहेत की, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. हा विषय तपासून, त्याबाबतचा योग्य अभ्यास करुन आपण सभागृहात निवेदन केले तर बरे होईल. विशेषकरुन वर्तमानपत्रात या संदर्भातील बातम्या येत आहेत. राज्य सरकारला केंद्र सरकारकडून जी काही आर्थिक मदत मिळते त्यामध्ये वाढ झालेली आहे आणि म्हणून कदाचित केंद्र सरकारच्या योजना कट होत आहेत. त्यामुळे या विषयी अर्थ मंत्री महोदय किंवा आपण स्वत: निवेदन करावे. सभागृहात सभागृहाचे माननीय सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे-पाटील हेही उपस्थित आहेत. ते ज्येष्ठ आहेत, अर्थ मंत्री म्हणूनही त्यांनी यापूर्वी काम पाहिले आहे. त्यांनीही याबाबतीत निवेदन करण्यास हरकत नाही. राज्यात या विषयाबाबत संभ्रमाचे वातावरण आहे. अे.आय.बी.पी.सारखी योजना बंद होणार आहे किंवा कसे, हे देखील मला माहीत नाही. उत्तर महाराष्ट्राला या योजनेची किती गरज आहे, याची आपल्याला कल्पना आहे. त्यामुळे या विषयी शासनाने निवेदन करावे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपल्याला या विषयाचे गांभीर्य पटल्यामुळे आपण निवेदन करण्याबाबतच्या सूचना शासनाला केल्या आहेत.

सभापती महोदय, साधारणपणे 3500 कोटी रुपयांचा भूर्दंड शासनावर येणार आहे. कारण, ज्या 20 ते 30 टक्क्यांपर्यंतच्या योजना होत्या, त्या 50 टक्क्यांपर्यंत केल्या आहेत. काही योजनाच त्यामधून वगळून टाकल्या आहेत. मागासवर्गीयांच्या योजना वगळण्यात आल्या आहेत. आदिवासींच्या योजना कमी केल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रावर दूरगामी परिणाम होणार आहे. साधारणपणे 3500 कोटी रुपयांच्या योजना जवळ जवळ रद्द करण्याचा निर्णय नीती आयोगाने घेतला आहे. त्यामुळे या संदर्भात शासनाकडून स्पष्ट निवेदन करीत असताना त्यावरील प्रश्नोत्तरांना आपण संधी दिली पाहिजे. जेणेकरुन सन्माननीय सदस्य या संदर्भात काही सूचना करु शकतील. राज्य सरकारला मदत होण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांकडून काही सूचना आल्या तर आपण केंद्र सरकारला विनंती करु शकतो. त्यामुळे या विषयावर एखादी चर्चा सभागृहात होऊ शकते का, याबाबत आपण गांभीर्याने विचार करावा. आपण हा विषय गांभीर्याने घेतला आहे. त्यामुळे या विषयावर कशा प्रकारे सदनामध्ये चर्चा होईल, याबाबत आपण विचार करावा. शासनाकडून निवेदन सादर करीत असताना त्यावर प्रश्नोत्तरे व्हावीत, अशीही आमची अपेक्षा आहे.

ॲड.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, नीती आयोगामार्फत 30 टक्क्यांऐवजी 40 टक्के निधी राज्य शासनाला मिळणार आहे, असे सांगितले गेले आहे. या धोरणानुसार राज्य शासनाला 8500 कोटी रुपयांचा निधी जास्त मिळणार आहे. काही योजनांचे सेंट्रल फंडिंग बंद होणार आहे व त्या माध्यमातून केंद्र शासनाकडून मिळणारा 3 हजार कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाला मिळणार नाही. तरीही यामधील फरकातून राज्य शासनाला 5000 कोटी

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहूल नार्वेकर.......

रुपये अधिकचे मिळणार आहेत. या परिस्थितीत राज्य शासनाने कोणत्याही योजना बंद करु नयेत, आहे ते योजना पुढे सुरु ठेवाव्यात. कारण, राज्य शासनाला 40 टक्के वाट्यापैकी 5000 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी नीती आयोगाच्या माध्यमातून मिळणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक महत्वपूर्ण औचित्याचा मुद्दा सभागृहात मांडला आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या काही योजनांना 40 ते 50 टक्क्यांचे फंडिंग होत नाही. ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याच्या योजनांसाठी केंद्र सरकारकडून 10 टक्केच निधी मिळत होता. राज्य शासनाकडून 10 टक्के हिस्सा भरण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. 100 टक्के निधी खर्च करुन आपण ही योजना राबवीत आहोत. अर्थसंकल्प तयार करीत असताना या योजनांसाठी राज्य शासनाचा 10 टक्के, 20 टक्के हिस्सा गृहित धरण्यात आला आहे. आता यामध्ये बदल झ ाला असल्यामुळे राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात बदल होणार आहे. नियोजन आयोग होता त्यावेळी 10 ते 20 टक्क्यांवर केंद्र शासनाच्या निधीचे मार्जिन ठेवले होते. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सूचना केल्याप्रमाणे या विषयावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे. किमान एक तासाची चर्चा पुढील आठवड्यात होईल, असे आपण पहावे. त्या चर्चेत केवळ गट नेत्यांनाच बोलण्याची संधी आपण दिली तरी चालेल. या झालेल्या बदलामुळे राज्यावर परिणाम होणार आहे किंवा नाही, हे आम्हाला कळले पाहिजे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, नियोजन आयोगाचे नाव बदलून नीती आयोग असे ठेवण्यात आले आहे. परंतु, या आयोगाचे नाव नीती आयोगाऐवजी नियती आयोग केले असते तर बरे झाले असते. राज्य सरकारला मदत करण्यासाठी नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. आपले अहोभाग्य की, या मुंबई शहराचे डॉ.भालचंद्र मुणगेकर आणि

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये.......

त्यानंतर श्री.नरेंद्र जाधव यांनी या आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे. परंतु, दु:खाने सांगावेसे वाटते की, या राज्यातील मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सबसिडी आता बंद करण्यात आल्या आहेत. मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी केंद्र सरकारकडून 40 हजार कोटी रुपयांचा निधी मिळत होता. तो आता मिळणार नाही. म्हणून सभागृहाच्या माध्यमातून केंद्र सरकारला आपण शिफारस केली पाहिजे की, यापूर्वी सुरु असलेल्या मागासवर्गीय कल्याणकारी योजना, सबसिडी जशाच्या तशा सुरु ठेवाव्यात.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सूचविल्याप्रमाणे आणि मी मघाशी निदेश दिल्याप्रमाणे या विषयावर आपण कोणत्या तरी संसदीय आयुधाच्या माध्यमातून सविस्तर चर्चा सभागृहात ठेवू आणि शासन त्यावर उत्तर देईल.

------------

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 93 च्या सूचनांबाबत**

**सभापती :** सन्माननीय गृहनिर्माण मंत्री श्री.प्रकाश महेता यांनी विनंती केल्यामुळे कामकाज पत्रिकेत दर्शविलेल्या अ.क्र.6 वरील सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांच्या नियम 93 च्या सूचनेवरील चर्चा आपण क्रम बदलून प्रथम घेत आहोत.

नियम 93 च्या सूचनेवर केवळ एक प्रश्न विचारण्याची संधी मी सन्माननीय सदस्यांना देणार आहे. कृपया, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेसारखी ही चर्चा लांबवू नये.

-------------

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** 10 लाखांपेक्षा अधिक बांधकाम खर्च असणाऱ्या बांधकाम व्यवस्थापकांकडून बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे या कामगारांच्या हितासाठी रक्कम जमा करावी लागणे बंधनकारक असताना काही बांधकाम व्यावसायिकांनी जमा केलेले धनादेश न वठल्याचे कॅगच्या अहवालात नमूद करणे याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.प्रकाश महेता (गृहनिर्माण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढील निवेदन करीत आहे.

(प्रेस : येथे निवेदन छापावे.)

...8.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, कामगारांच्या कल्याणकारी योजनांसाठी 205 कोटी रुपयांचा निधी आला. त्यामधील 182 कोटी रुपयांचा निधी वापरला गेला. 23 कोटी रुपयांचा निधी वापरला गेला नाही. ही रक्कम कशासाठी खर्च केली, हे पटत नाही. याबाबतची चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या माध्यमातून किती कामगारांना मदत देण्यात आली आहे, याबाबतची माहिती मंत्री महोदय पटलावर ठेवतील काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, होय.

------------

...9....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** मुंबई शहर व उपनगरांमध्ये लेप्टोचे रुग्ण आढळून येणे, या रोगाच्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्यास मुंबई महानगरपालिकेस आलेले अपयश याबाबत ॲड.निरंजन डावखरे,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढील निवेदन करीत आहे.

(प्रेस : येथे निवेदन छापावे.)

...10....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मी एक स्पेसिफिक प्रश्न मंत्री महोदयांना विचारणार आहे. या निवेदनात असे म्हटले आहे की, 60 लोकांना लेप्टोचा प्रादुर्भाव झाला असून त्यापैकी 16 रुग्ण मृत्युमुखी पडले आहेत. सन 2014 मध्ये 79 लोकांना प्रादुर्भाव झाला असून 4 रुग्ण मृत्युमुखी पडले आहेत. सन 2013 मध्ये 233 लोकांना प्रादुर्भाव झाला असून 4 रुग्ण मृत्युमुखी पडले आहेत. वेळेअभावी ही पूर्ण आकडेवारी मी वाचणार नाही.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे..........

माझा प्रश्न असा आहे की, 50 टक्क्यापेक्षा जास्त लेप्टोच्या रुग्णांचा मृत्यू झालेला आहे. म्हणून आपली आरोग्य व्यवस्था ढासळलेली आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो. आता पावसाळा सुरु झालेला आहे. म्हणून आपण या संदर्भात खबरदारी घेऊन योग्य ती कार्यवाही करणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी मुंबई शहरात लेप्टो स्पायरोसिसमुळे रुग्णांचा झालेल्या मृत्यू या संदर्भात नियम 93 अन्वये सूचना दिली होती. साधारणतः जून महिन्यात 18 आणि 19 तारखेला पहिला पाऊस पडला. त्यानंतर लेप्टो डिसीसचे रुग्ण आढळून आले. त्याचे कारण असे आहे की, या रोगाचा 'इन्क्युबेशन पिरिअड' याचा मराठी शब्द मला माहीत नाही. त्याचा कालावधी साधारणतः 3 ते 21 दिवसांचा असतो. पाऊस फक्त मुंबई महानगरपालिका क्षेत्रातच पडला असे नाही. मुंबई आणि मुंबई उपनगरामध्ये पाऊस पडला आणि त्यानंतर 15-20 दिवसात लोकांची मोबिलीटी होती. त्यामुळे त्यांना आजाराची लक्षणे, साईन्स व सिम्पटम्स झाले. मग ते फिवर असेल, बॉडी-एक असेल, गिडीनेस असेल या सर्वांसाठी ते रुग्णालयात जाऊ लागले. सुरुवातीला हे रुग्ण प्रथमोपचारासाठी आजुबाजूच्या दवाखान्यात गेले आणि त्यामध्ये त्यांचा गोल्डन पिरिएड निघून गेला. हे सर्व रुग्ण उशिरा रिपोर्ट झाल्यामुळे इनिशियल फेजमध्ये त्यांच्या जास्त कॅज्युलिटीज झाल्या असे लक्षात आले. आता याबाबत उपाययोजना करण्यात आलेली आहे. इनिशियल स्टेजमध्ये युरिन कॉन्टॅमिनेशन झाल्यामुळे हे सर्व होते. आता संपूर्ण खबरदारी घेण्यात आलेली आहे.

--------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.:** अभिनेत्री श्रीमती जुई गडकरी यांना युवकाकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात येणे याबाबत श्री.धनंजय मुंडे यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

प्रा.राम शिंदे (गृह राज्यमंत्री (ग्रामीण)) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 7 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लेखी निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, श्रीमती जुई गडकरी यांच्या सुरक्षिततेसाठी पेट्रोलींग नेमण्यात आले आहे. मराठी कलाकारांना अशा प्रकारे धमक्या मिळतात आणि त्यांच्याकडे आर्थिकदृष्ट्या संरक्षणाची व्यवस्था नसते. अनेक मराठी कलाकार मालिकांमध्ये किंवा चित्रटपटांमध्ये काम करतात. श्रीमती जुई गडकरी या अभिनेत्रीला तिसऱ्या व्यक्तीकडून धमकी आलेली आहे. तो मुलगा जखमी होता आणि दबाव आणून त्याने ते पत्र दिले, असे म्हटले जात आहे. माझा प्रश्न असा आहे की, शासन श्रीमती जुई गडकरी यांना संरक्षण देणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मराठी कलाकार खास करुन मालिकांमध्ये काम करणाऱ्या मराठी कलाकारांच्या सुरक्षिततेबद्दल पाठपुरावा करण्यासाठी आपण एखादी खास समिती किंवा टास्क फोर्स नियुक्त करणार आहात काय ? कारण, मराठी कलाकारांना धमक्या मिळत असल्याच्या तक्रारी सातत्याने येतात. हिंदी चित्रपट सृष्टीतील अनेक लोक स्वत:चे सुरक्षा रक्षक नेमतात. मराठी कलाकारांना धमक्या येतात या संदर्भात आपण कशा प्रकारे लक्ष घालणार आहात ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सिने कलाकार श्रीमती जुई गडकरी यांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, त्यांना ठाणे कमिशनरेट यांनी प्रोटेक्शन दिलेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी साधारणतः मराठी कलाकारांवर असा प्रसंग निर्माण होतो, असे सांगितले. सन्माननीय सदस्यांचा एखाद्या कलाकाराच्या संदर्भात काही मुद्दा असेल तर तो तपासून घेण्यात येईल आणि योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** : मंत्री महोदय, कोणतीही महिला कलाकार किंवा कोणत्याही महिलेवर अशा प्रकारची वेळ येणार नाही, हे बघावे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.:** आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध भुकटीच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाल्यामुळे देशातील दूध भुकटीच्या दरावर परिणाम होणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.एकनाथराव खडसे (दुग्धव्यवसाय विकास मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 13 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, काल मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात दुधाच्या दराबाबत उत्तर दिलेले आहे. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी आपल्या दालनात बैठक घेऊन दुधाच्या दरासंदर्भात दूध उत्पादक शेतकऱ्यांना आणि दुग्ध व्यावसायिकांना न्याय मिळावा यासाठी निश्चितच प्रयत्न केलेले आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आपल्याला दुधाला हमीभाव मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे तातडीने पाठपुरवा करावा लागणार आहे. दुधाला हमीभाव मिळण्याकरिता आणि आता दुधाच्या भावात जी घसरण होत आहे, दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रती लिटर 20 रुपयांपेक्षा कमी भाव मिळत आहे, या संदर्भात शासन तातडीने पावले उचलणार आहे काय ? कारण, मुळात आता पाऊस नाही, चाऱ्याची टंचाई निर्माण झालेली आहे. म्हणून शासन याबाबत तातडीने कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दुधाच्या संदर्भात दुधाची खरेदी आणि दुधाची विक्री असे दोन विषय आहेत. दूध खरेदीच्या संदर्भात राज्यातील सर्व सहकारी संस्थांना महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, 1979 नुसार नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत की, दुधाची प्रती लिटर 20 रुपयापेक्षा कमी दराने खरेदी करता काम नये. ज्या सहकारी संस्था 20 रुपयापेक्षा कमी दराने दुधाची खरेदी करतील आणि तशी तक्रार प्राप्त झाली तर चौकशी करुन त्या संस्थेविरुद्ध कारवाई करण्यात येईल आणि प्रसंगी संचालक मंडळही बरखास्त करण्यात येईल. दूध विक्रीच्या संदर्भात बंद पिशव्यांमध्ये जे दूध विकले जाते अशा दूध विक्रीच्या संदर्भात किमान 2 रुपये कमी भावाने दूध विकले पाहिजे, या संदर्भात सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्या ठिकाणी योग्य आणि चांगल्या रितीने दूध मिळाले पाहिजे यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या माध्यमातून त्यावर आपण नियंत्रण ठेवत आहोत. तसेच, अतिरिक्त दुधाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध भुकटीचे दर कोसळल्यामुळे दूध भुकटी तयार करुन ती विकण्याच्या संदर्भात केंद्र शासनाला विनंती करण्यात आलेली आहे की, यामध्ये एक्सपोर्ट करण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाने काही मदत दिले पाहिजे. दुसरे म्हणजे, राज्यात ज्या ठिकाणी डेअरीत दूध भुकटी तयार करण्याच्या सोयी आहेत त्या ठिकाणी दूध भुकटी तयार करण्यासाठी राज्य शासनाने कार्यवाही सुरु

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे..........

केलेली आहे. आपण इंदापूर येथील वरवंडला येथे दूध भुकटी तयार करण्यास सुरुवात केली आहे. आता आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर दूध भुकटी उपलब्ध आहे आणि यासाठी शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत देण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे.

**सभापती** : मंत्री महोदय, माझे म्हणणे असे आहे की, आपण सहकारी संस्थांना किमान हमी दराने दूध संकलित करावे, अशा प्रकारच्या सूचना देत आहात. परंतु, सहकारापेक्षाही खाजगी क्षेत्रातून जास्त दूध संकलित होत आहे त्याबाबत आपण काही उपाययोजना करणार आहात काय ? खाजगी क्षेत्राकडून दूध उत्पादकांना कमी दर दिला जात आहे. या संदर्भात आपण काही उपाययोजना करणार आहात काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्य शासनाने काही ठिकाणी खाजगी उत्पादकांकडून मोठ्या प्रमाणावर दूध विकत घेतलेले आहे. परंतु, राज्य शासनाची काही कॅपॅसिटी आहे. त्यामुळे आपल्याकडे जेवढी कॅपॅसिटी आहे त्याच्या अधिन राहून....

**सभापती** : मंत्री महोदय, माझे असे म्हणणे आहे की, आपण सहकार क्षेत्रातील संस्थांना सांगत आहात की, मिनिमम दराने दूध खरेदी करावे. मी दूध उत्पादकांच्या बाजूने आहे. आपण खाजगी दूध संकलन करणाऱ्यांवरही काही बंधने घालू शकणार आहात का, हे तपासून घेऊन उचित कार्यवाही करावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, तपासून घेण्यात येईल.

-------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.:** औरंगाबाद जिल्ह्यातील शेंद्रा औद्योगिक वसाहतीत मद्यनिर्मिती करणाऱ्या रॅडिको एन्व्ही डिस्टीलरी कंपनीमधून निघणाऱ्या रसायनांचा शेतकऱ्यांना त्रास होत असणे याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, विजय सावंत, कपिल पाटील, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रेय सावंत यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

..8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य शासन झिरो डिस्चार्ज करण्यासाठी या कंपनीवर कारवाई करणार आहे काय ? श्री.दुबे नावाच्या शेतकऱ्याची 12 एकर जमीन आहे. त्या शेतकऱ्याच्या शेतात 5 टँकर रसायन टाकल्यामुळे त्याची संपूर्ण जमीन नष्ट झालेली आहे. म्हणून राज्य शासन त्या कंपनीला संबंधित शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याचा आदेश देईल काय ?

यानंतर श्री.खर्चे वि......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

आज ती कंपनी बंद करण्यात यावी. कंपनी झिरो डिस्चार्ज करु शकतात, झिरो डिस्चार्जचा प्लाँट ताबडतोब लावण्याचे आदेश राज्य शासन देईल काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, झिरो डिस्चार्जचे आदेश देण्यात आले आहेत, त्यानुसार कंपनीचे काम चालू आहे. कंपनीमधून कोणतेही प्रदूषण झालेले नाही, तेथे कंपनी जे खताचे उत्पादन करीत आहे, तेथे भरपूर पाऊस झाल्यानंतर ते पाणी खाली गेले आहे. त्यातून हे प्रदूषण निर्माण झाले आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे काही नुकसान झाले असेल तर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई कशा पध्दतीने देता येईल या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न करण्यात येतील.

------------

**सभापती** : नियम 93 चे निवेदन क्रमांक 5.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. नियम 93 अन्वये जी सूचना दिलेली असते ती सार्वजनिक निकडीची बाब असते, तो सेन्सर मोशन असतो, मताला टाकण्याइतकी त्याची ताकद असते. आपण केवळ मंत्री महोदयांकडून निवेदन मागत आहोत.

**सभापती** : शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी माझ्याकडे चिठ्ठी पाठविली आहे की, त्यांना विधानसभेत लक्षवेधी सूचनेवर उत्तर द्यावयाचे आहे. आपण त्यांची थोडा वेळ वाट पाहू, ते आले नाही तर हा विषय उद्या घेण्यात येईल. त्यामुळे काही मोठा गंभीर प्रश्न तयार होत नाही.

---------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : चंपावती अर्बन को.ऑ.बॅक मर्यादित बीड या बँकेच्या अवसायक मंडळाने केलेला आर्थिक गैरव्यवहार याबाबत सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. दादाजी भुसे ( सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी निवेदनाच्या परिच्छेद क्रमांक दोन व तीन मध्ये नमूद केले आहे की, काही ठिकाणी 1 कोटी 85 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. चार कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे. त्यांना नंतर सेवेतून कमी केले असले तरी, त्यांना पगार दिल्याने बँकेचे नुकसान झाले आहे. अधिकार नसताना व कोणतीही कायदेशीर पूर्तता न करता तेथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत, हे सर्व निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या संदर्भात गुन्हा नोंदविण्यासाठी शासकीय अभियोक्ता यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात येत आहे. त्याबाबत संबंधित माणूस हे प्रकरण शासकीय अभियोक्ता यांच्या कार्यालयात घेऊन गेलेला नाही याची मला माहिती मिळालेली आहे. आमच्या जिल्ह्यात ते अतिरिक्त जिल्हाधिकारी या पदावर काम करीत आहेत, ती संचिका तेथपर्यंत न पोहचविण्याची व्यवस्था त्यांनी केलेली आहे. ही संचिका तातडीने संबंधित शासकीय अभियोक्ता यांच्याकडे हे अधिवेशन संपण्याच्या आत पोहचविण्याचे काम शासनाकडून करण्यात येईल काय ?

दुसरा प्रश्न असा आहे की, अतिरिक्त उपजिल्हाधिकारी यांची चौकशी असिस्टंट रजिस्ट्रार यांच्याकडून करण्यात येत आहे. त्यांच्या ऐवजी ही चौकशी आयुक्त, सहकार यांच्याकडून केली तर ती पारदर्शक व लवकर होईल. असा निर्णय शासन घेणार आहे की, शासकीय अभियोक्त्याकडे हे प्रकरण अधिवेशन संपण्याच्या आत पोहचविण्याची व्यवस्था शासनाकडून करण्यात येईल काय ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, शासकीय अभियोक्ता यांच्याकडे हे प्रकरण लवकरात लवकर पाठविण्यात येईल. त्यांचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्या अभिप्रायामध्ये ज्या डायरेक्शन्स दिल्या असतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून या प्रकरणाची चौकशी होते असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे, अधिकारी कनिष्ठ की वरिष्ठ हा विषय नाही.

**सभापती** : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांचा मुद्दा मला स्वतःला रास्त वाटत आहे.

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, डीडीआर स्तरावरील अधिकाऱ्याकडून अतिरिक्त उप जिल्हाधिकारी यांच्या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, बँकेत ज्या वेळी ते प्रशासक म्हणून काम करीत होते तेव्हा डीडीआर त्यांच्यासोबत काम करीत होते. त्यामुळे त्यांच्याकडून चौकशी पारदर्शक होणार नाही असे मला वाटते.

**सभापती** : या चौकशी मध्ये सहकार क्षेत्रातील डायरेक्टर यांना घेण्यात यावे.

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, जॉईंट रजिस्ट्रार यांच्याकडून ही चौकशी करण्यात येईल.

----------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औरंगाबाद शहरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता शासनाच्या बृहत आराखड्यानुसार स्त्री रुग्णालयाच्या स्थापनेसाठी जागा न मिळणे याबाबत श्री.सतिश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 10 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, रुग्णालयाच्या जागेसंदर्भातील हा प्रश्न आहे, आपल्या बाजूला महसूल मंत्री महोदय बसले आहेत, पालकमंत्री येऊन गेले आहेत, औरंगाबाद शहरात फक्त सात एकर जागा आज मिळत नाही. म्हणून या रुग्णालयाची इमारत होत नाही. संबधित मंत्री महोदयांशी चर्चा करुन आपण जागा मिळविण्याबाबत ठोस आश्वासन द्यावे अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, महिला रुग्णालयाची जागा बृहत आराखड्यात समाविष्ट करण्यात आली आहे. सात एकर जागा मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करण्यात आले आहेत. वक्फ बोर्डाची जागा पाहिली, हिमायत बागेची जागा पाहिली, रोशन गेट येथील जागा पाहिली आहे, कांचन वाडी, नक्षत्र वाडी येथील जागा पाहिली आहे. या सर्व ठिकाणच्या जागा पाहण्यात आल्या आहेत, या जागा सुयोग्य नसल्यामुळे व काही जागा न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्या मिळू शकल्या नाहीत. मी व पालकमंत्री महोदय तसेच महसूल मंत्री महोदयांच्या सहकार्याने एक जागा पाहण्यात येईल. संभाजीनगर येथे राज्य शासनाला महिला रुग्णालय आरोग्य विभागाच्या माध्यमातून उभारावयाचे आहे. त्यामुळे पुढील आठ ते दहा दिवसात या प्रकरणाचा निपटारा करण्यात येईल.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : वाडा तालुक्यातील नेहरोली गावातील चैताली मुकणे या मुलीचा विजेच्या खांबाचा शॉक लागून झालेला मृत्यू, त्यामुळे महावितरण अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करणे व मुलीच्या कुटुबियांना नुकसान भरपाई देणे याबाबत श्री. आनंद ठाकूर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, वाडा तालुक्यामध्ये 14 वर्षाची एक मुलगी तिची बहीण कु.चैताली हरिष मुकणे हिला अंगणवाडीतून घेऊन येत असताना 10 जून रोजी सुरुवातीच्या पावसात त्या ठिकाणी असलेल्या डीपीमधून करंट लागून ती मुलगी मृत्यू पावली आहे. याबाबत तेथील महावितरणाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ? त्याचप्रमाणे अशाच प्रकारची घटना 15 जून, 2015 रोजी डहाणू येथे घडली आहे, आपल्या मुलाला शाळेत सोडून येत असताना श्री. मिनिष कर्नावल हा 40 वर्षाचा माणूस रस्त्याने येत असताना त्याच्या अंगावर विजेची तार तूटून पडली व त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. पहिल्या प्रकरणाची माहिती मंत्री महोदयांना दिलेली आहे. या दोन्ही प्रकरणाबाबत मंत्री महोदय योग्य ती कार्यवाही करतील काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, महावितरणच्या लघुदाब वाहिनीच्या पोलवरील चालू फेजवरील कंडक्टर वादळी वाऱ्यामुळे शॅकल इन्सुलेटरवरुन निसटून टू पिनवर आल्याने त्या संपूर्ण पोलमध्ये करंट आला होता. संपूर्ण पोलमध्ये करंट चालू होता, वादळी वारा सुरु होता त्याच वेळेस ती अंगणवाडीची मुलगी तेथून जात होती व तिचा हात त्या पोलला लागल्यामुळे तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात झालेला आहे, अशा अपघातामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना दोन लाख रुपये देण्याची महावितरण कंपनीची योजना आहे, त्यापैकी 20 हजार रुपये तेव्हा तातडीने देण्यात आले आहेत, उद्या दुपारपर्यंत 1 लाख 80 हजार रुपयांचा चेक त्या परिवाराला देण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, संबंधितांवर गुन्हा दाखल करावा. वादळी वाऱ्यामुळे ती तार तुटली होती, तो अपघात होता. शॅकल इन्सुलेटरवरुन निसटून टू पिनवर पडल्यामुळे हा अपघात झाला आहे. सन्माननीय सदस्यांनी जर यापूर्वी त्या पोल मध्ये शॉक होता व अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले अशा प्रकारे जास्तीची माहिती दिली तर त्याची चौकशी करण्यात येईल व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. सभापती महोदय, डहाणू येथे घडलेली घटना आताच सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणली आहे, डहाणूच्या प्रकरणाबाबत सविस्तर माहिती दिली तर त्याबाबत नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मराठवाड्यासाठी स्वतंत्र दुसरे महसूल आयुक्तालय, परभणी येथे स्थापन करण्याबाबत राज्य शासनाने वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिणे याबाबत सर्वश्री अब्दुल्लाखान दुर्राणी, रामराव वडकुले, जयवंतराव जाधव वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. एकनाथराव खडसे ( महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 17 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन दुसरे महसूल आयुक्तालय नांदेड किंवा लातूर येथे व्हावे यासाठी अनेक दिवसांपासून प्रयत्न करण्यात येत आहेत. भौगोलिक दृष्ट्या नेहमी परभणी जिल्ह्यावर सातत्याने अन्याय झालेला आहे. परभणी जिल्हा हा मराठवाड्याच्या मध्यभागी आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, परभणी जिल्हयातील लोक मोठ्या प्रमाणात या मागणीसाठी आंदोलन करीत आहेत, या विषयाबाबत उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आलेली आहे.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी......

माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, दुसरे आयुक्तालय सुरु करावयाचे आहे ते परभणी जिल्हयात सुरु करण्यात येईल काय?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, संभाजीनगर औरंगाबादच्या ठिकाणी असलेल्या विभागीय आयुक्त कार्यालयाचे विभाजन करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. लातूर किंवा नांदेड येथे विभागीय आयुक्त कार्यालयाचे मुख्यालय असावे या संदर्भात विवाद निर्माण झाले. दोन्ही बाजूच्या मागण्या तीव्र होत्या. आता परभरणी जिल्हयात आयुक्तालय सुरु करावे ही तिसरी मागणी पुढे आली आहे. या संदर्भात संभाजीनगरचे महसूल आयुक्त श्री.दांगट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केलेली आहे. नेमके कोणत्या ठिकाणी आयुक्तालय केले पाहिजे, त्या संदर्भात काय उपाययोजना केल्या पाहिजेत, लातूर येथे मुख्यालय व्हावे की नांदेड येथे व्हावे वा नव्याने मागणी केल्यानुसार परभणी येथे व्हावे याबाबत सूचना देण्यात येतील आणि त्यांचा अहवाल आल्यानंतर त्यांच्या शिफारशींचा विचार करुन योग्य असेल त्या ठिकाणी हे विभागीय आयुक्त कार्यालय सुरु करण्यात येईल.

**सभापती :** नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने संपली आहेत.

-----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडते.

सभापती महोदय, या सभागृहात पंढरपूरच्या विठ्ठलाच्या महापुजेच्या संदर्भात यापूर्वी मी माझा मुद्दा मांडला आहे. राज्यातील मोठमोठया देवस्थानामध्ये सरकारी कायद्यानुसार कामकाज चालते. पंढरपूरच्या विठ्ठलाची महापूजा आणि नित्य पूजा या आतापर्यंतच्या परंपरेप्रमाणे केल्या जात आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडून होणारी शासकीय महापूजा या संदर्भात राज्य शासनाने योग्य तो निर्णय घेण्याच्या संदर्भात सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी यापूर्वी सभागृहात आश्वासित केले होते. अधिकाऱ्यांना बोलावून घेऊन त्याबद्दलची वस्तुस्थिती माहीत करुन घेऊन कायद्याच्या कोणत्याही बंधनाबाबत आम्ही मार्ग काढू असे सांगितले होते. मी प्रथम माननीय सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे आभार मानते. चंद्रभागेच्या वाळवंटी राहुट्या उभारुन धर्मश्रध्दा आणि पूजा करण्याच्या संदर्भात न्यायालयाने सद्‌भावना व्यक्त केलेल्या आहेत. राज्य सरकारने ताबडतोब सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाकडे पाठपुरावा केलेला आहे. विठ्ठलाची महापूजा सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणे या संदर्भात अनेक मुद्दे मी निवेदनाद्वारे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय महसूल मंत्र्यांकडे दिलेले आहेत.

सभापती महोदय, सफाई कामगारांवर आजही हाताने मैला उचलण्याची वेळ येते. तेथे काही यंत्रे आणली आहेत. जेणेकरुन काही प्रमाणात मैलाचे निराकरण होते. खास करुन महापूजेच्या संदर्भात माननीय महसूल मंत्र्यांनी मार्गदर्शन करावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पंढरपूरच्या वारीच्या संदर्भात वर्षानुवर्षे जी प्रथा होती ती आजही सुरु आहे. तेथे लाखो भाविक चंद्रभागेच्या वाळवंटी काही दिवस निवास करतात, राहुटी उभारतात. मागील वर्षी उच्च न्यायालयात एक पी.आय.एल.दाखल झाली होती. त्या अंतर्गत उच्च न्यायालयाने असे आदेश दिले की, पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीकोनातून त्या शहरामध्ये 6 हजार शौचालये बांधण्यात यावीत. त्या बरोबरीने वाळवंटी अशा प्रकारच्या राहुट्या उभारु नये अशा प्रकारचा निर्णय हायकोर्टाने दिल्यामुळे बंदी घालण्यात आली होती. राज्य सरकारने 6 हजार शौचालये बांधण्याच्या संदर्भात प्रतिज्ञापत्र दिले. त्याच बरोबर आता नव्याने बंदी आली त्यावेळी संपूर्ण वारकरी संप्रदायाने आणि आपणही मान्य केल्यानुसार पुन्हा

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

हायकोर्टाला विनंती करण्यात आली की, हा वारकऱ्यांच्या भावनेचा प्रश्न आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे चंद्रभागेच्या वाळवंटी राहुट्या उभारण्यासाठी परवानगी देण्यात यावी. हायकोर्टाने या संदर्भात राज्य सरकारला वर्षातून 20 दिवस परवानगी देण्यास अनुमती दिली आहे. आषाढी एकादशी, कार्तिकी एकादशी, इतर तत्सम दिवशी वारी असेल त्यानुसार 20 दिवस कशा रितीने वापरायचे याचा निर्णय राज्य सरकारने घ्यायचा आणि परवानगी द्यायची आहे. त्यामुळे राहुट्यांच्या प्रश्न मार्गी लागला आहे.

सभापती महोदय, न्यायालयाची अपेक्षा एवढीच आहे की, त्या ठिकाणी स्वच्छता राहिली पाहिजे. त्यानुसार स्वच्छतेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात शौचालये उभी करणे, त्या संदर्भात अन्य व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्याची कार्यवाही सुरु आहे. पंढरपूर येथे डोक्यावर मैला वाहून नेण्याची प्रथा पूर्वी होती. मागील वर्षी या संदर्भात पावले उचलली असून आता 100 टक्के ही प्रथा बंद करण्यात आली आहे. असे प्रकार त्या ठिकाणी आढळले किंवा कोणी प्रवृत्त करीत असेल तर त्याबाबत कठोर कारवाई करण्याच्या सूचना राज्य सरकारच्या माध्यमातून दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, पांडुरंगाच्या पुजेच्या संदर्भात वर्षानुवर्षे ज्या नित्यनेमाने पूजा होत असतात त्या नियंत्रित करणे, वेळ नियंत्रित करण्याच्या दृष्टीने मंदिर समिती बरखास्त झाल्याने सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित मंदिर समिती आहे. त्यांनी निर्णय घेतला की, एकच पूजा झाली पाहिजे. जेणेकरुन भाविकांना दर्शनाचा अधिक लाभ होईल. विठ्ठलाच्या मंदिरामध्ये तीन पूजा होत असताना 5 तास मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद ठेवावे लागत होते. जिल्हाधिकाऱ्यांचा हेतू एवढाच होता की, 5 तासांऐवजी 1 तासामध्ये सर्व पूजा आटोपून घेतल्या तर उर्वरित वेळ भाविकांच्या दर्शनासाठी उपलब्ध होईल. त्या दृष्टीने त्यांनी निर्णय घेतला होता. परंतु त्या ठिकाणी वारकऱ्यांच्या आणि माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन त्या निर्णयामध्ये काही फेरबदल केला पाहिजे. या संदर्भात कालच जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा झाली. जिल्हाधिकाऱ्यांची आणि वारकऱ्यांचीही भूमिका समजून घेतली आहे. आता त्या ठिकाणी ज्या पूजा होत आहेत त्या व्हाव्यात, फक्त वेळ कमी करावा अशा स्वरुपाचा निर्णय घेतल्यामुळे आता जी

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

शासकीय महापूजा आहे ती आणि अन्य नित्यपूजा या प्रत्येक पूजेतील अंतर कमी करुन 5 तासाचा वेळ लागत होता त्याऐवजी तासाभराच्या अंतराने सर्व पूजा झाल्या पाहिजेत. कमीत कमी वेळेमध्ये पूजा पूर्ण झाल्या पाहिजेत व भाविकांना दर्शन झाले पाहिजे अशा स्वरुपाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. माननीय सदस्यांनी वेगवेगळया मुद्यांबाबत व्यवस्था करण्याकरिता निवेदन दिले आहे. राज्य सरकार नक्की त्या निवेदनाचा विचार करुन उचित कार्यवाही करणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपले आणि माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे व राज्य सरकारचे मन:पूर्वक आभार मानते.

--------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो.

सभापती महोदय, आताच माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पंढरपूर येथील पंढरीच्या वारीतील सफाई कामगारांना डोक्यावरुन मैला न्यावा लागत असल्याचा मुद्दा मांडला आहे. राज्यामध्ये सफाई कामगारांची संख्या मोठी आहे. त्यांना महापालिकेकडून किमान वेतन मिळत नाही अशी स्थिती आहे. आज हजारो सफाई कामगारांनी मुंबईमध्ये मोर्चा काढला आहे. ते मोर्चा घेऊन वर्षा बंगल्यावर जाणार होते. परंतु त्यांना तेथे पाहोचता आले नाही. सफाई कामगारांचे नेते माननीय श्री. विवेक पंडित यांना अटक करण्यात आली आहे. महापालिकेमध्ये कार्यरत असलेल्या सफाई कामगारांना किमान वेतन किती द्यायचे हे ठरलेले आहे. तेवढे वेतन त्यांना मिळते का? ते मिळाले पाहिजे. भंगी मुक्ती झाली. त्यांना किमान वेतन मिळाले पाहिजे. राज्य सरकारने सफाई कामगारांच्या मुलांचे शिक्षण, त्यांना इतर सुरक्षेच्या सुविधा पुरविणे आवश्यक आहे. सफाईचे काम करताना अनेक प्रकारचे संसर्ग होण्याचा धोका असतो. या संदर्भात सरकारने तातडीने लक्ष घालावे अशी मी विनंती करतो.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जो भंगी मुक्ती शब्द उच्चारला आहे तो रेकॉर्डवरुन वगळण्यात यावा. हा ॲट्रॉसिटीचा विषय होऊ शकतो.

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : ही बाब तपासून घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सफाई कामगारांच्या संदर्भात भाष्य केले पाहिजे. सफाई कामगारांना सन्मानपूर्वक वेतन मिळाले पाहिजे. तो शब्द मी मागे घेतो.

श्री.भाई गिरकर : तो शब्द सभागृहाच्या रेकॉर्डवर राहू नये.

श्री.कपिल पाटील : मी तो शब्द मागे घेतो. परंतु त्यांना सन्मान वेतन मिळाले पाहिजे.

**तालिका सभापती** : तपासून घेण्यात येईल.

श्री.एकनाथराव खडसे : सफाई कामगारांचा आज मुंबईमध्ये मोर्चा आलेला आहे असा माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी उल्लेख केला आहे. त्यांनी काही अपेक्षा व्यक्त केली आहे. सफाई कामगारांच्या संदर्भात किमान वेतन मिळाले पाहिजे, राज्य सरकारने तसा निर्णय घेतला.

नंतर डब्ल्यू.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे ....

राज्यातील सफाई कामगारांना किमान वेतन कायदा लागू केलेला आहे. या कायद्यानुसार सफाई कामगारांना वेतन मिळत नसेल व त्यासंबंधातील तक्रारी राज्य शासनाकडे आल्या तर त्यासंबंधात राज्य शासन आवश्यक ती कारवाई करेल. डोक्यावरून मैला वाहण्याची पद्धत आता बंद करण्यात आलेली आहे. जे सफाई कामगार आहेत त्यातल्या त्यात मेहतर समाजाच्या सफाई कामगारांना 100 टक्के अनुदानावर घरे बांधून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. सफाई कामगारांच्या मुलांना शिकण्यासाठी विशेष बाब म्हणून शिष्यवृत्ती सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. त्यांच्या शिक्षणासाठी वेगळ्या व्यवस्था झाल्या पाहिजेत. त्यांना किमान वेतन मिळाले पाहिजे. त्यांना निवासासाठी जागा आणि घर सरकारकडून उपलब्ध झाले पाहिजे अशा स्वरूपाचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे.

.....

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** विशेष उल्लेखाच्या सूचना.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

आदिवासी विभागाच्या भोंगळ कारभाराला कंटाळून प्रकल्पस्तरीय इंग्रजी माध्यम पालक समितीचे अध्यक्ष श्री.श्याम सुंदर यांनी दिनांक 6.7.2015 रोजी डहाणू रोड जर्नादन आर्केड येथील (जि.पालघर) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर स्वत:च्या अंगावर रॉकेल ओतून आत्मदहनाचा केलेला प्रयत्न, सदर घटनेप्रकरणी श्री.श्याम सुंदर चौधरी यांच्यावर डहाणू पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात येणे, एकात्मिक आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे म्हणून शासनाने काही इंग्रजी माध्यमाची सुविधा उपलब्ध करून देणे, परंतु, तेथील बहुतांशी शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध नसल्यामुळे शिवाय तेथे काही दिवसांपूर्वी विषबाधाची घटना घडल्यामुळे प्रकल्पस्तरीय इंग्रजी माध्यम पालक समितीने ही शाळा बदलून मिळावी म्हणून डहाणू प्रकल्प कार्यालय तसेच आयुक्तालय, नाशिक येथे केलेले आंदोलन, शाळा सुरु होऊन वीस दिवस झाले तरी आदिवासी विकास विभागाकडून तेथील विद्यार्थ्यांची कुठलीच सोय न केल्याने विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, विद्यार्थ्यांचे होत असलेल्या नुकसानी संदर्भात संतापलेल्या पालकांनी डहाणू आदिवासी कार्यालयासमोर आत्मदहनाचा दिलेला इशारा, डहाणू आदिवासी विभागाच्या उपरोक्त भोंगळ व गैरकारभारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

राज्यात अल्पसंख्याक समाजाच्या उन्नतीसाठी त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत अनेक निकष लावण्यात येत असून त्यांची शिष्यवृत्ती, शैक्षणिक कर्ज, शैक्षणिक फी मिळविण्यासाठी पालकांचे उत्पन्न रूपये 2,50,000/- पेक्षा कमी असणे आवश्यक असणे, तथापि, सध्याच्या महागाईचा आलेख पाहता अल्पसंख्याक समाजातील मुलांच्या शिष्यवृत्ती तसेच शैक्षणिक कर्जाकरिता पालकांची उत्पन्नाची मर्यादा रूपये 6.00 लक्ष पर्यंत वाढविणे जरूरीचे असणे, अल्पसंख्याक समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षणाचा फायदा मिळावा यासाठी पालकांची उत्पन्नाची मर्यादा रूपये 6.00 लाखा पर्यंत करण्यात यावी. तसेच, अल्पसंख्याक समाजातील मुलांना मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत शैक्षणिक कर्ज बिनव्याजी देण्यात यावे जेणे करून अल्पसंख्याक समाजातील मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणून त्यांची उन्नती करता येईल या करिता मी हा विषय विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मांडीत आहे.

....

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मराठी भाषा हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. यात माननीय मंत्री खूप बारकाईने लक्ष देत आहेत याची आम्हाला खात्री आहे. मराठी भाषेचे पुढील 25 वर्षाचे धोरण ठरविण्यासाठी दि. 22 जून 2010 मध्ये डॉ.नागनाथ कोतापल्ली यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आली. समितीने आपले कामकाज पूर्ण करून मसुदा संकेत स्थळावर देखील उपलब्ध करून दिलेला आहे. आक्षेप आणि हरकती दाखल झाल्यानंतर मसुदा अंतिम करण्याचे काम आता बाकी होते. डॉ.कोतापल्ली समितीची मुदत दिनांक 8 एप्रिल 2015 रोजी संपत होती. त्यांचे काम अजून पुष्कळ बाकी आहे. असे असताना त्यांना केवळ आता 11 दिवसांची मुदत वाढ खात्याने देऊ केलेली आहे. कोषांचे पुनर्मुद्रण करताना नवीन शब्दांची भर टाकणे, आयुर्वेद, सागर विज्ञान, संगणक शास्त्र, पर्यावरण शास्त्र, या शाखातील परिभाषाची निर्मिती करणे, शब्द व्युत्पत्तीसह भाषा विषयक कामकाजासाठी ही समिती कायमस्वरूपी काम करणारी आहे. तयार केलेला मसुदा आता संकेतस्थळावर आहे. पण अंतिमीकरणासाठी देण्यात आलेली मुदत अत्यंत अल्प आहे. एवढ्या अल्प मुदतीत हे काम होण्याची शक्यता नाही. त्यामुळे या भाषा सल्लागार समितीला अंतिम प्रस्ताव तयार करण्यासाठी अधिक मुदत वाढ द्यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे. आता सभागृहात सन्माननीय मराठी भाषा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी या संदर्भात सभागृहाला अवगत केले तर मला अधिक समाधान वाटेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आदरणीय श्री.कोतापल्ली सरांनी फार उत्कृष्ट काम केले आहे. त्याचा उपयोग आपण अभिजात मराठी भाषेसाठी देखील केलेला आहे. भाषा सल्लागार समिती ही भाषा तज्ज्ञांपेक्षा साहित्यिकांची जास्त झाली. त्यात वेगवेगळ्या भाषेतील भाषा तज्ज्ञ आले तर वेगवेगळ्या क्षेत्रातील शब्दांचा समावेश आपल्याला करता येईल. आपण त्या समितीतील नावे वाचली तर असे लक्षात येईल की, त्यात भाषा तज्ज्ञ कमी आहेत. या समितीतील सर्व हे श्रेष्ठ आहेत. त्यांचा मी सन्मान राखतो. ते सर्व सदस्य विविध कामांसाठी श्रेष्ठ आहेत हे मानून या कामासाठी अजून काही तज्ज्ञांचा अंतर्भाव करून ही समिती बनवायची आहे. एवढाच आमचा त्यातील विचार आहे. मला असे वाटते की, भाषा तज्ज्ञ जास्त आले तर मराठी भाषेच्या विषयी अधिक काही तरी चांगले करू शकतो. त्यामुळे आम्ही ते तेवढ्या पुरतेच करीत आहोत.

.....

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील येणाऱ्या शासकीय व खाजगी अनुदानित शिक्षण संस्थातील प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची संख्या जवळपास सात लाख आहे. शासनाच्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर वर्षाला 30 ते 32 कोटी रूपये खर्च होत असणे, शिक्षण विभागाकडून महिन्याच्या महिन्याला किंवा फार तर दर तीन-तीन महिन्यांनी अनुदान वितरित केले जाते त्याचे वाटप संबंधित संस्थांमार्फत शिक्षक व कर्मचाऱ्यांना केले जाते. परंतु, सन 2012-2013, व 2013-2014 या दोन वर्षात शासनाकडून पुरेसा निधी वितरीत केला असतानाही या कालावधीत वेतनाचे वाटप न करता सुमारे 1200 कोटी रूपये शासनास परत करण्यात आल्याचे माहे जून 2015 च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस येणे, याबाबत सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षातील शिक्षकांचे 1200 कोटींचे रोखलेले वेतन देण्यात यावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

.....

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, राज्यात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जंगलात मोठ्या प्रमाणात वन औषधी असून कायफळ, डिकमोली, मूरड शेंग, बिब्बे यासारखी महत्त्वाची 185 प्रकारची औषधी वनस्पती जंगलात असणे, त्यावर आजपर्यंत कधीच विचार केला गेला नसणे, त्यातच त्यावर कोणतेही संशोधन केले न जाणे, त्याबाबतीत वन विाागाने यावर अभ्यास करण्याकरिता एखादी समिती न नेमणे, केवळ वाघ हाच एक विषय घेऊन आदिवासींची कुचंबणा करणे, आदिवासी मध्ये त्यामुळे पसरलेला असंतोष, शासनाचे वन औषधीकडे होणारे दुर्लक्ष, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही याकडे मी शासनाचे विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधीत आहे.

.....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने चिकू बागायतदार यांच्या दृष्टीने अतिशय निकडिच्या अशा महत्त्वाच्या बाबीवर पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात डाळिंब, केळी, द्राक्ष या पिकांचा हवामानावर आधारित फळ पीक विमा योजनेत सामवेश करण्यात येणे, चिकू, फळ पीक हे कोकण विभागातील पालघर जिल्ह्यातील डहाणू, घोलवड, तलासरी, वाणगाव, पालघर या भागातील असून या फळ पिकाला विम्यापासून वंचित ठेवण्यात येणे, पावसाळी वातावरणात चिकू पिकावर बुरशीजन्य रोगांचा प्रादूर्भाव होतो व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले नुकसान, चिकू फळपिकाला विमा कवच पासून डावलले जात असल्यामुळे चिकू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष,

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर ....

चिकू उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे नुकसान पाहता मा.कृषी मंत्र्यांनी चिकू बागायतदारांची मुंबईमध्ये एक बैठक आयोजित करुन चिकू उत्पादक शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्याची गरज आहे. सदर विषय सार्वजनिक महत्वाचा असल्याने माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, घोलवडचा चिकू सगळीकडे ओळखला जातो. परंतु या ठिकाणच्या चिकू उत्पादक शेतकऱ्यांना चिकूचे पीक परवडत नसल्यामुळे चिकूच्या बागा कापण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने लक्ष घालून उपाययोजना करावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"कल्याण तालुक्यातील गांधारी पुलाजवळ महाराष्ट्र वस्त्रोद्योग महामंडळाने निधी उपलब्ध करुन दिलेल्या मासेमारी जेट्टी, ओपन शेड आणि उतरत्या रस्त्याचे काम मागील एक वर्षापासून सुरु असूनही ते अपूर्णावस्थेत असणे, कामात नाहक दिरंगाई व विलंब करणारा संबंधित ठेकेदार मत्सोद्योग महामंडळाकडे मुदत वाढ मागण्याच्या तयारीत असून, पुढे या कामासाठी वाढीव खर्च मागण्याची शक्यता लक्षात घेता शासकीय निधीचा अपव्यय टाळण्यासाठी सदर अपूर्ण काम विनाविलंब पूर्ण करण्याबाबत संबंधित ठेकेदारास शासनाने आदेश द्यावेत अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"नागपूर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या विद्युतीकरण व नविनीकरणाकरिता सन 2010 मध्ये 1 कोटी 80 लाख 94 हजार 452 रुपयांच्या कामाला प्रशासकीय मंजुरी देण्यात येणे, परंतु सदर कामाला अद्यापही निधी उपलब्ध न झाल्याने विद्युतीकरणाची कामे न होणे, त्यामुळे अद्यायावत असलेले 40 कोटी रुपयांची उपकरणे धोक्यात येणे, त्यामुळे शॉर्टसर्किट होऊन वीज खंडीत होण्याचे प्रकार मोठया प्रमाणात सुरु असणे, त्यामुळे रुग्णांना अंधारात रहावे लागणे, त्यामुळे मेडिकलच्या प्रत्येक विभागातील महत्वाची यंत्रसामुग्री, शस्त्रक्रियागृह,सिटी स्कॅन, एक्सरे सारखे मशीन वांरवर बंद राहणे, त्यामुळे रुग्णांना बाहेरुन एक्सरे व सिटी स्कॅन करावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सोसावा लागणे, त्यामुळे सदर विद्युतीकरण व नविनीकरणाच्या कामाला निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, त्याकरिता मी विशेष उल्लेखाद्वारे मुद्दा उपस्थित करीत आहे."

----

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"डोंबिवली शहर हे देशातील सगळयात जास्त प्रदूषित असलेल्या शहरांपैकी एक शहर असल्याचे उघड झाल्यानंतर डोंबिवली शहर व कल्याण शहराच्या प्रदूषणाचे गांभीर्य सर्वांच्या निदर्शनास आले. या परिसरात प्रदूषणाशी संबंधित तसेच एमआयडीसीशी संबंधित बरेच प्रश्न प्रलंबित असून हे प्रश्न मी या सभागृहात वेळोवेळी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात दोन महिन्यापूर्वी संबंधित खात्याचे राज्यमंत्री श्री. प्रवीण पोटे-पाटील यांनी या भागात भेट दिली व या ठिकाणचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडविण्याचा प्रयत्न केला होता. भेटीच्या वेळी मंत्री महोदयांनी काही सूचनाही केल्या होत्या. परंतु या ठिकाणचे अधिकारी मंत्री महोदयांच्या सूचनांची अंमलबजावणी करीत नाहीत. माझी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती राहणार आहे की, या ठिकाणच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची बैठक बोलावून त्या बैठकीमध्ये केलेल्या सूचनांच्या संदर्भात एक आढावा बैठक घ्यावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे सूचना करीत आहे."

श्री. प्रवीण पोटे-पाटील : (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : यासंदर्भात आढावा बैठक घेतली जाईल.

-------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड(विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र शासनाने शिधापत्रिका कार्यालय व आरटीओ कार्यालय दलाल मुक्त करण्याची घोषणा करण्यात येणे, मात्र पुण्यातील शिवाजीनगर गोडाऊनच्या आवारात दिनांक 16 जुलै, 2015 रोजी शिधापत्रिकेवरील नाव कमी केल्याचा दाखला आणा, 8 दिवसात सर्व काही ॲडजेस्ट करुन 8 दिवसात शिधापत्रिका देतो असे बोलणारे दलाल आढळून येणे, याबाबत शिधापत्रिका कार्यालय दलाल मुक्त होण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----------

...6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये(नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"नागपूर विभागात 16 मोठे, 40 मध्यम व 4310 लघु पाटबंधारे असून मृग नक्षत्र वगळता आद्रा व पुनर्वसू नक्षत्र कोरडे गेल्याने जलसाठयाची परिस्थिती गंभीर बनणे, पाऊस लांबल्याने शेती आणि पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असणे, सद्या नागपूर विभागातील मोठया प्रकल्पात 32 टक्के, मध्यम प्रकल्पात 21 टक्के व लघू प्रकल्पात 18 टक्के जलसाठा शिल्लक असणे, गतवर्षीच्या तुलनेत जलाशयात बराच साठा कमी असणे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आलेले नैराश्येचे वातावरण निर्माण होणे त्यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असणे याबाबत नागपूर विभागातील पाणी साठयाची पाहणी करुन नागपूर विभागातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यावा अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

-------

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दिनांक 6 जून,2015 रोजी वा त्यासुमारास मुंबईच्या पवई येथील लेक होम या इमारतीच्या 14 व्या मजल्यावर लागलेल्या भीषण आगीमध्ये 2 महिलांसह 7 जणांचा मृत्यू होण्याची घडलेली दुर्घटना, सदर दुर्घटनेमध्ये आणखी 28 जण गंभीर जखमी होऊन त्यापैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याचे निदर्शनास आली आहे, सदर आग दुर्घटना प्रकरणी अग्निशमन दलाचे अधिकारी व पवई पोलीस स्थानकाचे पोलीस अधिकारी यांचेकडून एकत्रितपणे चौकशी करुन त्याबाबत अहवाल सादर करण्याबाबत शासनाने आदेश दिले आहेत. तथापि, सदर आगी प्रकरणी अद्याप अहवाल प्राप्त न झाल्यामुळे त्या परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, त्यामुळे याप्रकरणी शासनाने कार्यवाही करण्याची तसेच मृत्यू पावलेल्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य करण्यात यावे, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

---

...8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सरल या संगणक प्रणालीद्वारे राज्यातील शिक्षण क्षेत्राचे एकीकरण करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. या योजनेअंतर्गत शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याची जन्म नोंदणी क्रमांक मिळविणे शिक्षक व शाळेच्या मुख्यापकांना सक्तीचे व बंधनकारक केले आहे. आदिवासी पाडयावर किंवा पारधी बेडयावर भटकंती करणारी कुटुंबातील अनेक मुले शाळांमध्ये शिकत असून त्यांचा जन्म झाल्यानंतर त्यांची जन्मनोंद कुठेच मिळणे शक्य नाही. त्यामुळे शिक्षक व मुख्याध्यापक हतबल झाले आहेत, त्यांच्या असंतोष निर्माण झाला आहे. तेव्हा विद्यार्थ्यांचे आधारकार्ड ग्राह्य मानावे, जन्म नोंदणी क्रमाची अट शासनाने रद्द करावी, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

-------

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" राज्य शासनाने असुरक्षित कामगारांना संघटित करून विविध सेवा पुरविण्यासाठी सन 1969 साली माथाडी कामगार मंडळाची स्थापना केली. परंतु नवी मुंबईतील किराणा बाजार व दुकाने मंडळामध्ये गत 10 वर्षापासून अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरली नसल्याने तेथील माथाडी कामगारांची कार्यालयीन दैनंदिन कामे होण्यास दिरंगाई होत आहे. तसेच कारकुनाची कामे तेथील शिपाई करीत आहेत. परिणामी कर्मचाऱ्यांवर कार्यालयीन कामाचा ताण वाढत असल्याने सदर मंडळातील कर्मचारी व अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता आहे." अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझी देखील विशेष उल्लेखाची सूचना आहे.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपणास अगोदर विशेष उल्लेखाची सूचना द्यावी लागते. त्या सूचनेवर माननीय सभापती निर्णय देतात, त्यानंतर ती सभागृहात मांडण्यासाठी येते.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" मौ.माकटी, ता.माणगाव, जि.रायगड येथील श्रीमती नंदा विजय मोरे या बौद्ध समाजातील विधवा महिलेच्या घरावर दिनांक 7 जून, 2015 रोजी रात्री ठिक 9.00 वाजता दहा ते बारा हल्लेखोरांनी हल्ला करुन सदर महिलेला,तिच्या मुलांना व सुनेला लाथाबुक्क्यांनी व लाठीकाठीने बेदम मारहाण करुन त्या महिलेचा विनयभंग करणे. या संदर्भात पीडित महिला स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यास गेली असता त्या पीडित महिलेची तक्रार नोंदवून न घेणे. स्थानिक नागरिकांनी या संदर्भात आवाज उठविला असता स्थानिक पोलिसांनी पीडित महिला व त्यांच्या परिवारालाच दम देऊन गुन्हा दाखल करताना मुख्य कलमेच वगळणे, स्थानिक पोलीस गुन्हेगारांनाच मदत करत असल्याचा स्थानिक जनतेत निर्माण झालेला संशय, पीडित महिलेने आपल्याला न्याय मिळविण्यासाठी माणगाव पोलीस स्टेशनवर जाऊन गुन्हेगारांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यास यावा, अशी मागणी पोलीस अधीक्षक, रायगड यांचेकडे दिनांक 29 जून, 2015 रोजीच्या अर्जान्वये करणे, राज्यात बौद्ध समाजातील लोकांवर हल्ले होण्याच्या वाढलेल्या प्रमाणामुळे या समाजातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. तेव्हा या पीडित महिलेला न्याय मिळवून देण्यात यावा व संबंधित गुन्हेगारांवर ॲट्रॉसिटीच्या कलमानुसार गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे."

-------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./ मु.शी.** : राज्यातील अपंग विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ नियमित शिक्षकांची नेमणूक करणे याबाबत श्री.कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनोद तावडे ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी याच विषयावर पण स्पेशल स्कूलमधील शिक्षकांसंबंधी चर्चा केली. आपण हे शिक्षक नियमित शाळांसाठी देतो. राज्यात अपंग विद्यार्थ्यांची संख्या जवळपास दोन लाखांहून अधिक आहे. या विद्यार्थ्यांसमोर शारीरिक आणि मानसिक आव्हाने आहेत. राज्यात असलेल्या अपंग विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता, अशा विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी राज्यात किती शिक्षकांची गरज आहे, जे शिक्षक नियुक्त केले आहेत ते नियमित शिक्षक आहेत काय ? विशेष प्रशिक्षण घेतलेले 1948 शिक्षक आहेत आणि विषयतज्ज्ञ 814 शिक्षक आहेत, हे शिक्षक पुरेसे आहेत काय ? या शिक्षकांची कंत्राटी पद्धतीवर नियुक्ती केल्यामुळे अपंग विद्यार्थ्यांना ते पाहिजे तशी सेवा देऊ शकत नाही. तेव्हा या विद्यार्थ्यांना पूर्णवेळ शिक्षक आणि तेही पुरेशा संख्येने देणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना येथे उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. कर्णबधीर, गतिमंद, बहुविकलांग, अंशता अंध, अंध, अस्थिव्यंग, सेरेबल पाल्सी अशा विद्यार्थ्यांची संख्या किती आहे याची सविस्तर आकडेवारी निवेदनामध्ये दिलेली आहे. आपल्याकडे अशाप्रकारचा विद्यार्थी आहे हे ध्यानात येणे हे माझ्या दृष्टीने सर्वात मोठे आव्हान आहे. आपला मुलगा गतिमंद आहे, त्याला काही स्पेशल कोचिंगची आवश्यकता आहे, हे पालक मान्य करीत नाही अशी अडचण आहे. शिवाय शिक्षकांना अशी मुले आयडेन्टीफाय करता येत नाहीत. सर्वशिक्षा अभियानामध्ये अशा गोष्टींबाबत लक्ष केंद्रीत करण्याचा विचार सुरु झाला त्यावेळी मी असे सांगितले की, शिक्षकांवर निधी खर्च करण्याऐवजी ही मुले कशी आयडेन्टीफाय करायची याचे प्रशिक्षण शिक्षकांना देणे गरजेचे आहे. एखाद्या मुलाला कमी ऐकू येते, पण तो मुलगा गतिमंद ठरविला जातो. या सर्व गोष्टी नाजूक आहेत. पण त्या गोष्टी शिक्षकांच्या लक्षात आल्या पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे अशा विद्यार्थ्यांसाठी शिक्षक उपलब्ध करुन दिले पाहिजेत. त्यासाठी आम्ही नेटवर्क करीत आहोत. अशा शाळांना पूर्णवेळ शिक्षक न देता काही शाळा क्लब करता आल्या तर या विद्यार्थ्यांना सामान्य विद्यार्थ्यांबरोबर शिकविता येऊ शकेल. आज शहरामध्ये अशी मुले आयडेन्टीफाय करणे तसे सोपे आहे आणि आता पालक सुद्धा मान्य करीत आहेत. तुम्ही आताच इलाज केला तर तो मुलगा

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

चौथी पाचवी इयत्तेपर्यंत नॉर्मल मुलांबरोबर येऊ शकतो असे आपण पालकांना पटवून दिले तर ते लगेच इलाज करतील. काही मुलांना एल.डी. आजार तर काही स्लो लर्नर असतात, असे वेगवेगळ्याप्रकारचे आजार आहेत. अशी मुले नंतर को-अपसुद्धा करु शकतात. गावांमध्ये अशी मुले असतील तर त्यांचे पालक ते मान्य करीत नाहीत आणि त्यांना ते समजावून सांगणे हे आपल्यासमोर मोठे आव्हान आहे. अशा पालकांना धीर देण्याची आवश्यकता आहे. त्यांना सांगितले पाहिजे यामध्ये काही चुकीचे नाही. एखादे मूल 40 टक्के मार्क्स मिळविते तर दुसरे 80 टक्के मार्क्स मिळविते. त्या पद्धतीचे हे आहे. अशा मुलाला स्वतःच्या पायावर उभे राहता येईल अशाप्रकारचे शिक्षण आम्ही देणार आहोत. त्यामुळे आयडेन्टीफाय केले आहे हे आपण मान्य करावे, अशाप्रकारचे कौन्सलिंग शाळाच्या माध्यमातून करणे आवश्यक आहे. असे समुदेशक शिक्षकांच्या बरोबर घ्यावे लागतील. असे विशेष विद्यार्थी आयडेन्टीफाय करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे, त्यांना समुदेशन करणे यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबई बॉम्बस्फोटातील गुन्हेगार याकूब मेनन याच्याशी नागपूर मध्यवर्ती कारागृहात श्री.शैबुल फारुक नावाच्या व्यक्तीने एक तास चर्चा केल्याबाबत पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आताच एक घटना घडलेली आहे. ती महत्वाची असल्यामुळे मला ती सभागृहाच्या निदर्शनास आणावयाची आहे. मुंबई शहरातील साखळी बॉम्बस्फोटात फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेला गुन्हेगार याकूब मेनन याच्या सुरक्षिततेमध्ये हलगर्जीपणा झाला आहे काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे. आताच श्री.शैबुल फारुक या व्यक्तीने ती वकील असल्याचे सांगून त्यांनी याकूब मेननबरोबर एक तास चर्चा केली. श्री.शैबुल फारुक यांनी याकूबला मेननला भेटण्यासाठी जेल प्रशासनाला स्वतःची ओळख म्हणून दिल्ली कौन्सिलचे आयकार्ड सादर केले. त्या कार्डाची वैधता 31 जानेवारी 2013 रोजी संपलेली आहे. शिवाय त्यावर नमूद केलेला मोबाईल नंबर हिमाचल प्रदेशचा असल्याचे समजले आहे. त्यामुळे श्री.शैबुल फारुक हे खरोखरच वकील आहेत काय असा संशय निर्माण झालेला आहे. त्यांनी जुने ओळखपत्र दाखवूनही जेल अधिकाऱ्यांनी त्यांना याकूब मेनन बरोबर चर्चा करण्यासाठी एक तास दिला. विशेष म्हणजे शैकुब फारुक यांनी वैधता संपलेले आयकार्ड दाखवून याकूब मेनन बरोबर चर्चा केली त्याबाबत आजही कोणताही अधिकारी काहीही बोलण्यास तयार नाही. याचे कारण म्हणजे याकूब मेननला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. कालच वर्तमानपत्रात बातमी होती की, याकूब मेननने माननीय राष्ट्रपतींकडे केलेली याचिका देखील फेटाळण्यात आली आहे. अशा गुन्हेगाराला खोटया कागदपत्रावर भेटण्यास कोणी व्यक्ती जात असेल तर सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. यापूर्वी नागपूरच्या जेलमधून पाच आरोपी पळून गेले आहेत. आताची घटना पाहता त्यावर शिक्कामोर्तब होत आहे. हा सुरक्षिततेचा प्रश्न सरकारने गांभीर्याने घ्यावा आणि यातील सत्यता काय आहे, हे सभागृह संपण्यापूर्वी माननीय गृहमंत्र्यांकडून निवेदन व्हावे, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सभागृहाला अत्यंत महत्त्वाची माहिती दिली आहे. याकूब मेमनला 30 तारखेला फाशी होणार आहे. याकूब मेमन हा बॉम्ब स्फोटातील आरोपी आहे. अशा आरोपीला कारागृहात जाऊन कोणीही भेटत असेल किंवा अधिकार पत्र नसताना सुध्दा भेटत असेल तर ती गंभीर बाब आहे. शिवाय ही घटना नागपूरमध्ये घडली आहे. खरे म्हणजे नेहमी येरवडा कारागृहात फाशी दिली जाते. परंतु आता याकूब मेमनला फाशी देण्यासाठी नागपूरच्या कारागृहात नेले गेले. परंतु तेथील अधिकाऱ्यांनी या विषयी गंभीरता दाखवू नये, ही गंभीर बाब आहे. नागपूर येथील अधिकारी आणि कारागृह आरोपींना फाशी देण्यासाठी सक्षम आहे की नाही, याची पडताळणी केली पाहिजे. त्यामुळे केवळ नागपूर कारागृहातच फाशी देण्याचा आग्रह धरण्याऐवजी, येरवडा येथे सुध्दा आरोपींना फाशी देऊ शकतो. त्यामुळे या घटनेतील आरोपीला फाशी होईपर्यंत सुरक्षिततेवर देखरेख ठेवण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने निवेदन करणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : हा विषय गंभीर आहे. शासनाने याची दखल घ्यावी.

--------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत करावयाच्या उपाययोजना

**मु.शी.** : विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत करावयाच्या उपाययोजना, या संबंधी शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबतच्या उपाययोजना करण्यासाठी राज्य सरकारने समिती नेमली होती. सदरहू समितीने विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत करावयाच्या उपाययोजनेसंदर्भात ज्या सूचना केलेल्या आहेत त्या संदर्भातील निवेदन मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. जेणेकरून, उद्यापासून या सूचना सर्व शाळांना पाठवू शकू.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : सभागृहाची बैठक मध्यंतराकरिता अर्ध्या तासासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3.00 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 2.32 ते 3.00 वाजेपर्यंत मध्यंतर)

--------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा. जनार्दन चांदूरकर)**

**पृ.शी./मु.शी.** : सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

**तालिका सभापती** : आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या माननीय मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पुरवणी मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सन्माननीय सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रस्तुत करण्यात आली आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगावा. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहेच. सदर चर्चा व माननीय मंत्र्यांचे उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सन्माननीय सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**शीर्षक** : विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या

**तालिका सभापती :** खालील माननीय मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील. :-

| | |
|---|---|
| 1 | मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- ए-4, ए-5, ए-8, ए-9, बी-1, बी-4, बी-5, बी-10, एफ-2, एफ-3, एफ-4, एफ-5, एफ-7, जे-1, जे-2, जे-4, झेडए-1, झेडडी-1, झेडडी-2, झेडडी-4 |
| 2 | महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- सी-1, सी-2, सी-5, सी-6, डी-3, डी-4, डी-5, डी-6, डी-9, झेडई-1, झेडई-2 |
| 3 | वित्त आणि नियोजन, वने मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- सी-7, सी-10, जी-1, जी-5, ओ-1, ओ-7, ओ-9, ओ-10, ओ-14, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47, ओ-48 |
| 4 | शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- ई-2, ई-3, ई-4, एस-1, एस-4, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6, डब्ल्यू-7, झेडएफ-2 |

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती ....**

| | |
|---|---|
| 5 | गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- के-4, क्यू-3 |
| 6 | सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, व्ही-2, व्ही-3, व्ही-5 |
| 7 | ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- एल-2, एल-3, एल-5, एल-7, ओ-3, एक्स-1 |
| 8 | आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- टी-4, टी-5, टी-6 |
| 9 | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- एम-2, एम-3, एम-4 |
| 10 | जलसंपदा मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- आय-3, आय-4, आय-5 |
| 11 | परिवहन मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- बी-3 |
| 12 | उद्योग मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- के-3, के-7, के-10 |
| 13 | ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- के-6 |
| 14 | पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- वाय-2 |
| 15 | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- आर-1, आर-2 |
| 16 | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- एन-3, एन-4 |

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..3

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्या सदनाला सादर करण्यात आल्या आहेत, त्यातील ठराविक बाबींच्या संदर्भात बोलण्यासाठी मी उभा आहे. आजपर्यंत कधीही नव्हे एवढ्या प्रचंड म्हणजे जवळपास 14 हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागणी सदनात सादर करण्यात आल्या आहेत. राज्य शासनाचे धोरण माननीय राज्यपालांनी जाहीर कले आणि त्यानंतर शासनाने अर्थसंकल्प सादर केला. अर्थसंकल्पामध्ये सर्व बाबींच्या संदर्भात तरतूद असली पाहिजे, त्या बाबी त्यामध्ये अंतर्भूत असल्या पाहिजेत. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, सभागृहात काही विभागांचे माननीय मंत्री उपस्थित नाहीत. प्रथा अशी आहे की, पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरू असताना सर्व विभागांचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित असतात. सन्माननीय सदस्यांना सर्व विभागांच्या पुरवणी मागण्यांवर बोलावयाचे आहे. आपण माननीय मंत्र्यांना बोलवावे अशी मी सूचना करतो. पुरवणी मागण्या मोठ्या रकमेच्या आहेत. राज्यावर आकस्मिक संकट आले आहे. पहिल्यांदा पाऊस झाला नाही, नंतर पाऊस झाला, अवकाळी पाऊस झाला, गारपीट झाली, दुबार पेरणी झाली. राज्यावर अशाप्रकारची संकटे आल्यामुळे कदाचित त्यासाठीची तरतूद शासनाला वाढवावी लागली असेल. अंदाजपत्रकामध्ये सादर केलेल्या बाबी आहेत, त्या संदर्भात पुरवणी मागण्या वाढवून द्यायच्या आणि मूळ अर्थसंकल्प सादर करताना रक्कम दाखवायची नाही असे चालले आहे. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून बऱ्याच बाबींच्या संदर्भातील तरतुदी शासन करू शकले असते.

सभापती महोदय, सभागृहात मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्या महत्त्वाच्या आहेत. महसूल, मदत कार्य व पुनर्वसन या विभागाच्या मागण्या महत्त्वाच्या आहेत आणि त्यासाठी अधिक तरतूद पुरवणी मागण्यात करण्यात आली आहे. महसूल, मदत कार्य व पुनर्वसन विभागाच्या बाब क्रमांक 30, 34, 36 च्या संदर्भात पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याकरिता किंवा त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासन पावले टाकत असून त्यामध्ये त्या संदर्भातील तरतूद केली आहे. कदाचित ती तरतूद पुरेशी नसेल. आम्ही म्हणू की, ती तरतूद कमी आहे. आपण म्हणाल की, ती तरतूद बरोबर झाली आहे, अधिक देऊ. शासन शेवटचे वाक्य वापरते की, आम्ही निधी कमी पडू देणार नाही, आज जी तरतूद केली आहे त्यामध्ये वाढ करू.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

सभापती महोदय, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाना भेटण्यासाठी गेले होते. शासनाने घोषणा केल्या आणि त्याला अनुसरून तशी तरतुदही झाली. परंतु शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही हे वास्तव सभागृहाच्या आणि लोकांच्या समोर येत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी व माननीय महसूल मंत्र्यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांना मदत देण्याच्या संदर्भात घोषणा केली. परंतु त्यासाठी तशी तरतूद झाल्याचे किंवा त्या प्रमाणात झाल्याचे दिसून येत नाही. घोषणा करून फक्त थोडे द्यायचे, पुरसे द्यायचे नाही अशी भूमिका आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या संदर्भात घेतली जात आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे, अडचणीत सापडला आहे. परंतु त्या संदर्भात शासनाची भूमिका, धोरण असल्याचे दिसून येत नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

नागपूर अधिवेशनाची आठवण आपण सर्वांनी काढली. आम्ही त्यावेळी पॅकेजची मागणी कशासाठी केली होती ? राज्यात पाऊस झाला नाही, काही भागात कमी पाऊस झाला, त्यामुळे उशिरा पेरण्या झाल्या व परिणामी शेती उत्पादन कमी आले. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला दर मिळाले नाहीत. या सर्व गोष्टींमुळे शेतकरी अडचणीत आला होता. मागील आघाडी शासन काळात वारंवार शेतकऱ्यांना मदत करण्यात आली होती. आताच्या सरकारकडूनही तशा प्रकारची मदत मिळावी, अशी अपेक्षा आम्ही मंत्री महोदयांकडे व शासनाकडे केली. नागपूरचे अधिवेशन सुरु असतानाच पुन्हा नाशिक आणि जळगाव भागात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. यापूर्वीच शेतकरी अडचणीत सापडला होता. तो पुन्हा अडचणीत सापडला. त्यामुळे त्यांच्यासाठी आम्ही पॅकेजची मागणी करीत होतो. परंतु, पॅकेज देण्याची भूमिका शासनाने घेतली नाही. त्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी असे जाहीर केले की, 19000 गावे दुष्काळाच्या छायेत आहेत. त्यानंतर त्यांनी मुंबई येथे पत्रकार परिषद घेतली. ज्यावेळी पत्रकारांनी त्यांना असा प्रश्न विचारला की, "शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाला किती निधी खर्च करावा लागणार आहे ?" त्यावेळी मुख्यमंत्री महोदयांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले की, "आम्हाला किमान 10 हजार कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. " हे कोणते शेतकरी होते ? सोयाबीन पिकविणारे, कापसाला दर न मिळालेले, कमी उत्पादन झालेले धानाचे शेतकरी, जळगाव आणि संपूर्ण खानदेशातील फळबागा उद्ध्वस्त झालेले शेतकरी, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी, अशा सर्व अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मिळून ही मदत करावयाची आहे, असे मुख्यमंत्री महोदयांनी पत्रकार परिषदेत सांगितले होते. त्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र सरकारकडे मागणी करावयास हवी होती. राज्य शासनाकडे निधी नसल्यामुळे संपूर्ण् रकमेची मागणी केंद्र सरकारकडे करावयास हवी

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

होती. परंतु, राज्य शासनाने केंद्र सरकारकडे केवळ 2 हजार कोटी रुपयांची मागणी केली. दिल्लीहून केंद्र शासनाची समिती राज्यात आली, त्यांनी आपला अहवाल सादर केल्यानंतर बरेच दिवस राज्यात घोळ सुरु होता. प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, पाठविण्यात येत आहे, टेबलवर आहे, केंद्राकडे पाठवित आहोत, अशा प्रकारे सांगितले जात होते. राज्याला 10 हजार कोटी रुपयांची गरज असताना आणि राज्य शासनाकडे एवढी तरतूद नसताना केंद्र सरकारकडे 10 हजार कोटी रुपयांची मागणी करण्यास काय हरकत होती ? 25 हजार गावे दुष्काळाच्या छायेत होती. मुख्यमंत्री महोदयांनी संख्या देखील सांगितली होती. यापूर्वी आपत्ती आल्यानंतर आपत्तीग्रस्त गावे, तालुके आणि जिल्ह्यांची संख्या किती असायची ? आताच्या तुलनेत 25 टक्के गावे देखील आपत्तीग्रस्त होत नव्हती. परंतु, त्यावेळी केलेली मदत आणि यावेळची मदत यामध्ये प्रचंड तफावत आहे.

सभापती महोदय, आज विदर्भामध्ये, पश्चिम विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. सरासरी 8 तासाला एक आत्महत्या होत आहे. असा एकही दिवस जात नाही की, शेतकऱ्याची आत्महत्या झालेली नाही. अशी परिस्थिती असताना मदत देण्यामध्ये केंद्र सरकार कमी पडले आहे, मागणी करण्यामध्ये राज्य सरकार कुठे तरी कमी पडले आहे, असे आम्हाला वाटते. यापूर्वी 2 हेक्टरपर्यंतच्या शेतकऱ्यांना शासनातर्फे मदत दिली जात होती. आता 1 हेक्टरपर्यंतच्या आणि तीही 4500 रुपये एवढी तुटपुंजी मदत दिली जात आहे. आम्ही कृषी मंत्री आणि अन्य मंत्री महोदयांशी चर्चा केली. नाशिक भागातील फळबागधारक शेतकऱ्यांना आम्ही मदत करणार आहोत, आम्ही केंद्र सरकारकडून मदत आणणार आहोत, असे त्यांनी सांगितले. कृषी मंत्री महोदयांनी तर या सभागृहात सांगितले होते की, "केंद्र सरकारकडून निधी आणून आम्ही शेतकऱ्यांना मदत करणार आहोत." परंतु, ही मदत

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

शेतकऱ्यांना मिळाली का ? केंद्र सरकारकडे राज्य सरकारने 10 हजार कोटी रुपयांची मागणी का केली नाही ? राज्य शासनाने मंत्रिमंडळात 2 हजार कोटी रुपयांची तरतूद केली, केंद्र सरकारकडून 4 हजार कोटी रुपये आले आणि आज असे सांगितले जात आहे की, राज्य सरकारने साडेसात हजार कोटी रुपयांची मदत केली. सुरु असलेल्या नियमित योजनांमधील तरतूद या मदतीमध्ये दाखवून आम्ही काही तरी करीत आहोत, अशी मांडणी केली जात आहे. खरे म्हणजे, सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची आवश्यकता होती. अडचणीत सापडलेला शेतकरी निराश झालेला आहे. आत्महत्या करण्यापर्यंत त्याची मानसिकता पोहोचली आहे. अशा शेतकऱ्याला मदत करण्याची गरज होती. परंतु, शासनाची उदासिनता आणि नियोजनशून्यता आहे. केवळ घोषणाबाज अशी शासनाची भूमिका आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्हालाही अशा प्रकारे भाषण करता येईल का ? सन्माननीय सदस्यांनी बाब क्रमांक सांगितली पाहिजे आणि त्या बाबीशी निगडित बोलले पाहिजे. परंतु, सन्माननीय सदस्य जनरलाईज भाषण करीत आहेत. आम्हालाही आपण अशीच संधी दिली पाहिजे.

**तालिका सभापती (प्रा.जनार्दन चांदूरकर) :** सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी बाब क्रमांकाचा उल्लेख सुरुवातीलाच केला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य बाबीपुरते बोलले तर बरे होईल. कृषी विभागाच्या विम्याच्या संदर्भात, केंद्रीय पुरस्कृत योजनेच्या संदर्भात 3 बाबी चर्चेला आहेत. त्यांना बोलायचेच असेल तर आपण परवानगी देऊ शकता. परंतु, अशा प्रकारे सर्वच सन्माननीय सदस्य बोलावयास लागले तर चर्चेला वेळ पुरणार नाही. पूरक मागण्यांवरील चर्चेत बाब क्रमांक सांगून त्या मर्यादेतच बोलले तर बरे होईल.

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आणि सन्माननीय सदस्यांनी शासनाने छापलेले पूरक मागण्यांचे पुस्तक वाचले असेल. मी सुरुवातीलाच बाब क्रमांक 30 चा उल्लेख केला आहे. या बाबीअंतर्गत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना प्रतिबंध घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी तरतूद केली आहे. तशीच तरतूद बाब क्रमांक 33 अंतर्गत करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना प्रतिबंध घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी तरतूद करण्यात आलेल्या बाबीतील विषयाव्यतिरिक्त मी एक शब्द देखील बोललेलो नाही. नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात देखील तरतूद करण्यात आलेली आहे. मी ज्या तीन बाब क्रमांकाचा उल्लेख केला आहे, त्याशिवाय मी अन्य काहीही बोललेलो नाही.

सभापती महोदय, शासनाने केलेली तरतूद अपुरी आहे. शेतकऱ्याला यामधून काहीही मिळणार नाही. शासन ज्याप्रमाणे घोषणा करते त्याप्रमाणे तरतूद करते का, हा विषय आहे. म्हणूनच शेतकरी आत्महत्या करीत आहेत. कालच मुख्यमंत्री महोदयांनी अशी माहिती दिली आहे की, 50 टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेले 11 जिल्हे आहेत, त्यामधील 1 जिल्हा पश्चिम विदर्भातील आणि 4 जिल्हे मराठवाड्यातील आहेत आणि त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या बुलढाणा जिल्ह्याचाही समावेश आहे. जास्त आत्महत्या होणारा पश्चिम विदर्भातील बुलढाणा जिल्हा आहे आणि आपण त्या जिल्ह्याचे आहात. या शेतकऱ्यांना मदत देण्याच्या दृष्टीकोनातून आपण ज्या काही सूचना केलेल्या आहेत तसेच सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेऊन मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. त्याप्रमाणे शासन निर्णय घेत आहे का, शब्द पाळत आहे का, हे सांगण्याचा माझा उद्देश आहे.

सभापती महोदय, राज्यात दुबार पेरणीचा प्रश्न शेतकऱ्यांवर ओढवलेला आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले की, 31 जुलै, 2015 पर्यंत पाऊस आला नाही तर राज्यामध्ये 27 लाख हेक्टर किंवा त्यापेक्षाही जास्त शेती क्षेत्रामध्ये दुबार पेरणी करावी लागेल.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे..........

मला आजच माननीय महसूल राज्यमंत्री श्री.संजय राठोड साहेब भेटले. ते मला म्हणाले की, माणिकराव आपल्या भागात पाऊसच पडत नाही. मी आजच माहिती घेतली. परंतु, आजही पाऊस पडलेला नाही. यवतमाळ, बुलढाणा हे जिल्हे 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडणारे जिल्हे आहेत. या सर्व जिल्ह्यात 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडतो. त्यामुळे चिंता आणखी वाढलेली आहे. मग आपण शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीकोनातून काही निर्णय घेत आहोत की नाही ?

सभापती महोदय, माननीय श्री.दिवाकर रावते साहेब परवा यवमाळ जिल्ह्यात दुबार पेरणी करण्यासाठी गेले हाते. त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतात पेरणी केली. ते बी-बियाणे, खते बरोबर घेऊन गेले असतील. माननीय महसूल राज्यमंत्री श्री.संजय राठोड साहेब त्यांच्या बरोबर होते. कदाचित, ते त्यांना बरोबर घेऊन गेले असतील. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब कॅबिनेट मंत्री आहे. माननीय श्री.संजय राठोड साहेब राज्यमंत्री आहेत. मी त्यांच्या बाबतीत बोलणार नाही. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब कॅबिनेट मंत्री असल्यामुळे शेतकऱ्यांना मदत करण्याची जबाबदारी, अधिकार निश्चितपणे कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांना आहेत. मग असे असताना शेतकऱ्यांना मदत मिळाली किंवा नाही हे न बघता शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन आपण काही तरी करीत आहोत हे दाखविले जाते. परंतु, हे सर्व करण्यापेक्षा मंत्री म्हणून आपणावर जी जबाबदारी आहे ती आपण नीट पार पाडता किंवा नाही, हा महत्वाचा भाग आहे. तुमच्या पक्षाचे नेते बाहेर वेगळेच सांगतात. आपण दैनिक सामना वृत्तपत्रातील आजचा आणि पूर्वीचे काही लेख वाचले तर शेतकऱ्यांना मदत केलीच पाहिजे, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली पाहिजे, कर्जमुक्ती दिली पाहिजे, अशा बातम्या छापून आलेल्या आहेत. मुख्यमंत्री महोदयांनी कर्जमुक्ती आणि कर्जमाफी या संदर्भात सांगितले. कर्जमुक्ती ही शिवसेनेची मागणी आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आम्ही कर्जमुक्ती देणार आहोत. आम्ही भविष्यात सर्व कार्यक्रम राबविणार आहोत. परंतु, आज कर्जमाफी देण्याचा आमचा विचार नाही. आपण शासनामध्ये असताना देखील हा भाग जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न करीत आहात. परंतु, तुमच्यावर जी जबाबदारी आहे, जे अधिकार आहेत, ते



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे..........

अधिकार न वापरता कोठे तरी वर्तमानपत्रातून बातम्या छापून आणि आम्ही किती स्वच्छ आहोत, आम्ही शेतकऱ्यांसाठी मागणी करीत आहोत हे दाखवायचे, हे कोठे तरी थांबविले पाहिजे. तुमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आहे. त्यासाठी कशा प्रकारे आर्थिक तरतूद करावयाची, हे आपल्याला माहीत आहे. आज शासनाकडे पैसे नाहीत असे नाही. शासनाची आणखी कर्ज काढण्याची क्षमता आहे. राज्य शासनावर एवढे कर्ज नाही की, आता आपण कर्जच घेऊ शकत नाही. सन 2008 मध्ये ओव्हर ड्राफ्ट काढावा लागला होता. आज तशी अवस्था नाही. आपल्या राज्याची अर्थव्यवस्था मजबूत आहे. आपले राज्य गुजरात राज्यापेक्षाही सक्षम आहे. त्यामुळे आपण शेतकऱ्यांना किती मदत देणार आहात, हे तरी आपण सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, 5 एकरापेक्षा कमी शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यायची असेल तर किती मदत द्यावी लागेल, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदत द्यावयाची म्हटले तर किती मदत द्यावी लागेल किंवा विदर्भ, मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावयाची म्हटले तर किती मदत द्यावी लागेल ? कारण, विदर्भ, मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत आणि दिवसेंदिवस आत्महत्यांमध्ये वाढ होत आहे. आज आमच्या भाषणात आम्हाला उल्लेख करता आला असता की, तुम्ही शेतकऱ्यांना 25 हजार कोटी रुपये नाही तर निदान 15 हजार कोटी किंवा 10 हजार कोटी रुपये तरी मदत देऊ शकता. परंतु, आम्ही शेतकऱ्यांना अशा प्रकारची मदत देणारच नाही आणि तुम्ही मागील आकडेवारी सांगून तुम्ही कसे नाकर्ते होते हे सांगण्याचा प्रयत्न करता. आमच्या काही चुका झाल्या असतील, हे आम्ही मान्य करतो. म्हणून आम्ही आज विरोधी पक्षात आहोत. परंतु, आज तुमच्यावर जबाबदारी आहे. तुम्ही विरोधी पक्षात असताना सातत्याने रस्त्यावर येऊन सांगत होता की, शेतकऱ्यांना कर्जमाफी दिलीच पाहिजे, वीज माफी दिलीच पाहिजे. तुम्ही यासाठी मोर्चे काढले, आंदोलने केली ? परंतु, आता तुमच्यावर प्रत्यक्षात ती जबाबदारी आलेली आहे, तुम्हाला अधिकार मिळाले आहेत. मग आता तुम्ही गप्प का आहात ? भारतीय जनता पार्टीचे मुख्यमंत्री आहेत म्हणून शिवसेनेने त्यांच्या विषयी काही



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे..........

बोलायचे आणि मुख्यमंत्री महोदयांनी विरोधी पक्ष मागणी करतो, शिवसेना पक्ष मागणी करतो, म्हणून मदत द्यायची नाही ? केवळ खेळ करण्याचा प्रकार सुरु आहे. अशा प्रकारे थातुरमातूर तरतूद करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकणार नाहीत. त्या दृष्टीकोनातून तरतूद करण्याची आवश्यकता होती. परंतु, पुरवणी मागण्यांमध्ये देखील ती करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, मी माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांना एक सूचना करु इच्छितो. आम्ही मागील वेळी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी गेलो होते. अनेक मंत्री महोदयांना त्याचा अनुभव आला असेल. आता तुमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आहे म्हणून आत्महत्या होतात, असे मी म्हणणार नाही. परंतु, आपण शेतकऱ्यांच्या कुटुंबाची व्याख्या केली पाहिजे. एका शेतकऱ्याच्या नावावर ती जमीन असली तरी त्या शेतीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील जी छोटी-मोठी मुले असतील, त्या जमिनीचे वाटप त्या मुलांच्या नावे झाले नसेल, परंतु ती मुले शेतीवरच अवलंबून आहेत, अशा ठिकाणी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपयांची मदत मिळावयास पाहिजे. परंतु, ती मदत मिळालेली नाही, मिळत नाही. त्या शेतकऱ्याच्या मोठ्या मुलाच्या नावावर 5 एकर जमीन असेल आणि दोन भाऊ आणि त्यांचे वडील शेती कसत असतील तर त्यांनी घेतलेल्या कर्जाचा तिघांवरही परिणाम होतो. परंतु, त्या मुलांच्या वडिलांनी आत्महत्या केली तर त्या मुलांच्या नावावर कर्ज नसल्यामुळे त्यांना फायदा मिळत नाही. म्हणून त्या कुटुंबातील जेवढे लोक शेतीवर अवलंबून असतील, मग मुले असतील, वडील असतील, त्यांचा जर यामध्ये समावेश झाला तर बऱ्याच कुटुंबांना आपण आर्थिक मदत देऊ शकतो. नाही तर अशी अनेक कुटुंबे मदतीपासून वंचित राहतात. म्हणून या संदर्भात सुधारणा करणे आवश्यक आहे. राज्य शासन याबाबत निश्चितपणे निर्णय घेईल, अशी मी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री यवतमाळ जिल्ह्यातील पिंपरी गावात गेले होते. त्या ठिकाणी अशीच एक केस झाली होती. एका आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला दोन वर्षापासून मदत मिळत नव्हती. मुख्यमंत्री महोदयांनी त्यांना मदत द्यावी, असे संबंधितांना सांगितले. परंतु,

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे..........

अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांना मदत देता येणार नाही. ज्या शेतकऱ्याकडे 5 एकर जमीन आहे त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. परंतु, ती जमीन त्या शेतकऱ्याच्या मुलाच्या नावावर असल्यामुळे त्या शेतकऱ्याच्या पत्नीला 1 लाख रुपये मदत मिळत नव्हती. आम्ही त्या ठिकाणी गेल्यानंतर त्या महिलेला 2 वर्षानंतर 1 लाख रुपये मदत मिळाली. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, त्यांना लवकरच मदत देण्यात येईल. परंतु, 3 महिने झाले तरी तेथे कोणीही गेले नाही. त्यामुळे त्या शेतकऱ्याच्या पत्नीला वेळेवर मदत मिळू शकली नाही. म्हणून यामध्ये अशा ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. मला आश्चर्य वाटते की, एक तर आपण शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची माफी हा विषय मागे घेतला पाहिजे. याबाबत अनेक वेळा उल्लेख झालेला आहे आणि शासनानेही ते मान्य केले आहे. यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब यवतमाळ जिल्ह्यात जाऊन आले. त्यांनी सांगावे की, यवतमाळ जिल्ह्यात सावकारांकडून कर्ज घेतलेल्या किती शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली ? कोणत्याही शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नाही. तेथील काही सावकार आणि सोन्याचा व्यवसाय करणारे लोक माझ्याकडे आले होते. त्यांनी नागपूर येथे एक संयुक्त बैठक घेतली होती. त्यांनी सांगितले की, आम्हाला यामध्ये फसवू नका, आम्ही देऊ शकत नाही, तसे नियम नाहीत, तसा कायदा नाही. तुम्ही आमच्याकडून मोठा फॉर्म भरुन घेत आहात. तो फॉर्म भरुन दिला तर आम्ही अडचणीत येऊ. त्यांची नागपूर येथे बैठक झाल्यानंतर यवतमाळ येथील सर्व लोक माझ्या घरी मला भेटण्यासाठी आले होते. त्यामध्ये घाटंजी येथील 23 लोक होते आणि इतर लोक दुसऱ्या जिल्ह्यातील होते. त्यांनी मला सांगितले की, बँक शेतकऱ्यांना 12 हजार रुपये कर्ज देते. आम्ही तेवढेच व्याज घेऊन अधिकृतपणे सोने तारण ठेऊन 17-18 हजार रुपये कर्ज देत होतो.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

या वेळी आम्ही एकाही शेतकऱ्यांना कर्ज दिले नाही, आम्हाला अशी भीती होती की, आम्ही कर्ज दिल्यावर शासन आमच्यावर काय कारवाई करेल किंवा शासनाचे काही नवीन धोरण असेल काय. नागपूर येथील अधिवेशनात शेतकऱ्यांनी सावकाराकडून घेतलेले कर्ज माफ करण्यासाठी 400 कोटी रुपये देण्यात येतील असे जाहीर केले होते असे समजते. परंतु त्यासंदर्भातील माहिती दोन तीन महिन्यानंतर घेतली तर याबाबत शासनाने जी.आर. काढला नाही. त्यानंतर जी.आर. काढला तर त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले नाही. जी.आर. काढला त्यामध्ये 194 कोटी रुपये देण्यात येतील असे नमूद करण्यात आले होते. अगोदर 400 कोटी रुपये देण्यात येतील असे जाहीर करण्यात आल्यानंतर आता फक्त 194 कोटी रुपये देण्यात येत आहेत. त्यामुळे शासनाला कोण सजेशन करते याची मला माहिती नाही.

सभापती महोदय, रिझर्व्ह बँकेने नाबार्डच्या माध्यमातून यासंदर्भातील व्यवस्था केलेली आहे. ग्रामीण भागात शेती व्यवसायासाठी कर्जपुरवठा करावयाचा असेल तर प्रत्येक गाव पातळीवर कायदेशीररित्या कंपनी स्थापन करता येते. नॉन बँकिंग फायनन्सीअल सिस्टीम अशा प्रकारची एक योजना केंद्र शासनाकडे आहे. या माध्यमातून शिक्षक कर्ज देतो, गावामध्ये ज्यांच्याकडे चार पैसे आहेत ते कर्ज देतात, ग्रामीण भागातील काही लोकांकडे पैसा आहे, परंतु हा व्यवसाय अधिकृत नसल्यामुळे त्यांना आपण अनधिकृत सावकार म्हणतो व त्यांच्यावर सक्ती करतो, पोलिसांकरवी त्यांना अटक करतो., त्यांना धमक्या देतो असे अनेक विषय उपस्थित होत असतात.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना माझी सूचना आहे की, नेहमीच बँकेच्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांनी कर्ज घेण्याऐवजी गाव स्तरावर कायदेशीररित्या कर्ज देण्यासाठी कंपन्या स्थापन करता येतात, त्यांना ठेवी गोळा करता येत नाहीत. सर्व लोकांनी मिळून पाच ते दहा लाख रुपये गोळा केले व त्यावर थोडे व्याज घेण्याचे अधिकार त्यांना दिले तर गावामध्ये अशा प्रकारे वित्तीय व्यवस्था तयार होऊ शकते. अशा कंपन्या कोणत्या ॲक्टखाली तयार करता येतात काय असा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे दिला असेल. उस्मानाबादचे जिल्हाधिकारी यांना बोलावून या विषयावर त्यांच्यासोबत चर्चा केली तर ते आपणाला सांगतील की, गावागावात कशा प्रकारे वित्तीय व्यवस्था कंपनीच्या माध्यमातून करता येते. त्यातून कर्ज देण्याची

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

व्यवस्था करता येते. त्यामुळे भविष्यात बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज दिले नाही तर या माध्यमातून शेतकऱ्यांना सहज कर्ज उपलब्ध करुन देता येईल. गावामध्ये अनेक लोकांकडे पैसा आहे, कायदेशीर स्वरुप त्याला मिळत नसल्यामुळे ते अशी व्यवस्था करीत नाहीत व काही कामे करावयास गेले तर हे गैरकानूनी आहे असे आपण त्यांना संबोधतो. यातून शेतकऱ्यांची पिळवणूक होणार नाही व शेतकऱ्यांना पैसा उपलब्ध होईल. अशा प्रकारची व्यवस्था सरकारला करता येते काय या दृष्टीकोनातून आपण कार्यवाही केली पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 18 परिवहन विभागावर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, सर्व बस स्थानके चांगली करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे, मागील अधिवेशनात या खात्यासाठी 1100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यावेळी देखील जास्त रकमेची तरतूद परिवहन मंत्री महोदयांनी करुन घेतली आहे, त्यांच्याकडे ते कौशल्य आहे, कसे जुळवून घ्यावयाचे व आपल्या खात्याला अधिक तरतूद कशी करुन घ्यावयाची हे त्यांच्याकडून शिकले पाहिजे. त्यांनी परिवहन खात्याला चांगल्या रकमेची तरतूद करुन घेतली आहे, त्याबाबत आम्ही समाधानी आहोत, आम्हाला आनंद आहे, मंत्री महोदय, परिवहन खाते आपल्याकडे आल्यावर लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, आपण निश्चित कल्पक आहात, अनेक वर्षे आपण विधानपरिषदेमध्ये काम केले आहे, अनेक सुधारणा या विभागात आपण करीत आहात.

सभापती महोदय, एस.टी.महामंडळाचे अध्यक्ष मंत्री महोदय आता स्वतः झाले आहेत, पूर्वी महामंडळाचे वेगळे अध्यक्ष होते त्यांना जास्त अधिकार नव्हते, त्यामुळे यासंदर्भातील सर्व धोरणात्मक निर्णय आता शासन घेणार आहे. त्याची अंमलबजावणी देखील आपण करणार आहात. महामंडळाचे अध्यक्षपद हे पूर्वी निकामी होते हे आपणाला मान्य करावे लागेल. परिवहन मंडळ चांगले व्हावे या दृष्टीकोनातून आपण कारभार सांभाळीत आहात. आज देखील यामध्ये बऱ्याच सुधारणा करण्याची गरज आहे. राज्यात ज्या प्रमाणात अपघात होत आहेत, त्यातून 13 हजार लोकांचे मृत्यू झाले आहेत, 30 ते 35 हजार लोक जखमी होतात, काही लोकांना अपंगत्व येते, मोठ्या प्रमाणात आपणाकडे वाहतुकीची व्यवस्था आहे, परंतु त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत, एखाद्या ड्रायव्हरने अपघात केल्यावर तो पुन्हा गाडी चालवून आणखी दोन तीन अपघात करतो, तेव्हा

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

त्याला थोडीफार शिक्षा होते, पोलीस स्टेशनमध्ये नेले जाते व नंतर सोडून देण्यात येते. हे अपघात कमी कसे होतील, यासाठी शिस्त लावणे आवश्यक आहे, या विभागात कर्मचारी वर्ग कमी आहे असे माझे मत आहे, शहरातील प्रत्येक चौकात वाहतूक कोंडी होत असते. शहरात भरारी पथके असायला पाहिजेत. पुणे-मुंबई हायवेने आपण सर्व लोक प्रवास करतो, त्या मार्गावर लेन तोडू नये असा बोर्ड लावला आहे, परंतु किती लोक लेनची शिस्त पाळतात, माझ्या माहिती प्रमाणे अनेक लोक लेनची शिस्त पाळत नाहीत, लेनची शिस्त अत्यंत महत्वाची आहे, ती जर पाळली तर मोठ्या प्रमाणात अपघात कमी होतील, गाडी थांबविल्यानंतर गाडीच्या पाठीमागे टेललाईट लावला नसल्यामुळे अनेक गाड्या मागून येऊन त्या गाडीवर धडकल्यामुळे अनेक लोकांचे मृत्यू झाले आहेत.

महोदय, या विभागात कर्मचारी कमी असल्यामुळे नियंत्रण राखता येत नाही. आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणात अपघात होऊन लोक मृत्यू पावतात. त्या दृष्टीकोनातून शासनाने पावले टाकली पाहिजेत. मुंबईत किंवा काही मोठ्या शहरात लोक लेनची व सिग्नलची शिस्त पाळतात. वाहतूक पोलीस नसले तरी लाल लाईट लागला तर गाडी बंद ठेवतात, परंतु काही लोक भरधाव गाड्या पुढे घेऊन जातात. एकाने गाडी नेली तर दुसऱ्याला वाटते की, मी का गाडी पुढे घेऊन जाऊ नये, मला देखील काम आहे, असे वाहन सिग्नल तोडून जात असताना त्याचा क्रमांक कळविण्याचा अधिकार जनतेला दिला आणि त्या वाहनाच्या मालकाला दंड आकारला तर त्याचा फायदा होईल. जनता सुशिक्षित आहे, त्यांना देखील वाटते की, अशा घटना होऊ नयेत. परंतु काही लोक अशा प्रकारची शिस्त पाळत नाहीत हे योग्य नाही. या दृष्टीकोनातून अपघात व इतर बाबतीत शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. यासंदर्भात एक समिती नियुक्त करण्यात आली आहे अशी माझी माहिती आहे, ती समिती शासनाला सजेशन व मार्गदर्शन करीत आहे, अपघात झाल्यामुळे लोकांचे मृत्यू होतात, सुधारणा न केल्यामुळे व शिस्त न पाळल्यामुळे लोकांचे प्राण जातात, सुधारणा केल्यातर निश्चित फायदा होऊ शकतो. या दोन बाबीवर माझे विचार मांडले आहेत, इतर बाबीवर सन्माननीय सदस्य बोलतील. दोन्ही मंत्री महोदयांनी मी केलेच्या सूचनांकडे विशेष लक्ष द्यावे अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

----------

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शासनाने 14078 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केलेल्या आहेत. मी मागील चार-पाच वर्षाच्या पुरवणी मागण्या चाळल्या त्यावेळी मला असे दिसून आले की, आतापर्यंतच्या सर्वात जास्त रक्कमेच्या पुरवणी मागण्या या अधिवेशनात सादर झालेल्या आहेत. अर्थसंकल्पाचा चेहेरा बदलण्याचे काम या सरकारने केले आहे. राज्य सरकारकडून दरवर्षी अर्थसंकल्प सादर केला जातो, त्या नुसार खर्चाबाबतचे नियोजन केले जाते. अशा प्रकारे पुरवणी मागण्या मांडल्या जात असतील तर अर्थसंकल्पाला काही अर्थ उरणार नाही. अर्थसंकल्पाचा अशा प्रकारे चेहेरा बदलणार असाल तर ती चुकीची प्रथा ठरणार आहे. आघाडी सरकारने चुकीचे काम केले म्हणून त्यांना लोकांनी विरोधी पक्षात बसविले आहे. त्यांनी जे चुकीचे काम केले त्याचे समर्थन सत्ताधारी पक्षाला करता येणार नाही. तसेच विरोधी पक्षाला देखील सक्षमपणे आणि जबाबदारीने काम करावे लागणार आहे.

सभापती महोदय, 14078 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांचे प्रमाणात विचारात घेतले तर ते अर्थसंकल्पाच्या 8 ते 9 टक्के इतके आहे. शिवसेना पक्षाचे ज्येष्ठ मंत्री कॅबिनेटमध्ये कमी पडतात असे मला वाटते. 14078 कोटी रुपयांपैकी सार्वजनिक आरोग्य विभागाला 1233 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. परिवहन विभागाला 126.39 कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत, हे योग्य नाही. मागील वेळी आम्ही सभागृहात बोललो म्हणून एवढी तरी रक्कम उपलब्ध झाली. गेल्या वेळी काहीच तरतूद केलेली नव्हती. पर्यावरण विभागाला एकही पैसा दिलेला नाही. गृहनिर्माण विभागाला तरतूद केलेली नाही. परंतु म्हाडाने शासनाला आर्थिक निधी उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. सभापती महोदय, हे चित्र बदलले पाहिजे. दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत चालले आहे. केंद्र सरकारकडून किती निधी प्राप्त झाला हे सभागृहाला कळले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 34, महसूल विभागाशी संबंधित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पक्षांतर बंदीच्या संदर्भात विधेयक शासनाने आणले, त्या विधेयकाची अंमलबजावणी होत नाही. सत्ता कोणत्याही पक्षाची असली तरी नियमाची अंमलबजावणी झाली पाहिजे. इतकेच नव्हे तर ज्यांनी पक्षाचा व्हिप जुगारुन ओपन मतदान केले, मतदान कोणाला करायचे याबाबत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

22-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE.2

SGB/ AKN/ KTG/ 15:40

श्री.जयंत प्र. पाटील.....

ज्यांनी सही केली आहे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यास 8 महिने का लागतात? रायगड जिल्हा परिषदेमध्ये ओपन मतदान केले, पक्षाचा व्हिप डावलूनही संबंधिताविरुध्द केस सुरु होत नाही. जिल्हाधिकारी मालक आहेत का? या राज्यामध्ये कायद्याचे पालन होणार आहे की नाही? पुढील आठ महिन्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुका होतील, तोपर्यंत तुम्ही तारखा देत राहणार आहात काय? नगरपालिका असो किंवा जिल्हा परिषदा असो, तेथे नियमांची अंमलबजावणी झाली पाहिजे. अपील दाखल झाल्यानंतर किमान दोन महिन्यात निकाल लागला पाहिजे. ग्रामपंचायतीच्या सरपंचांबाबत नियम केला आहे. आयुक्तांकडे अपील करुन स्टे मिळवला जायचा आणि पद राखून ठेवायचे. आता त्याला पायबंद घालण्यात आला आहे. आता तुम्ही अपील करु शकता, परंतु तुम्हाला पद सोडावे लागते. रायगड जिल्हा परिषदेमध्ये आम्ही अपील केले, मुरुड नगरपालिकेमध्ये आम्ही अपील केले. पक्षांतर बंदी कायद्याबाबत अंमलबजावणी करण्यास भाग पाडले पाहिजे, याबाबत शासनाने निर्णय दिला पाहिजे.

सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय सदस्य विशेष उल्लेखाची सूचना मांडतात, त्या संदर्भात माननीय सदस्यांना उत्तर पाठविले जाते, त्या मुद्याची दखल घेतली जाते. या ठिकाणी गॅलरीमध्ये अधिकारी वर्ग, विभागांचे सचिव उपस्थित आहेत. आम्ही पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने विचार मांडतो, त्याची दखल घेतली जाते का? मनाचे समाधान मानण्यासाठी आम्ही बोलायचे आणि निघून जायचे हे योग्य नाही. आम्ही जे मुद्दे मांडतो त्याची दखल घेतली गेली पाहिजे, अंमलबजावणी झाली पाहिजे. होय किंवा नाही हे आम्हाला कळले पाहिजे. आम्ही जे मुद्दे मांडतो त्याचे उत्तर आम्हाला कळले पाहिजे. आम्ही मांडलेल्या मुद्यानुसार जो काही बदल झाला असेल तो आम्हाला कळविण्यात आला पाहिजे. पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने आम्ही जे काही बोलतो त्याची दखल घेतली जात नाही. त्यामुळे पुरवणी मागण्यांवरील चर्चेला काही अर्थ उरत नाही. सत्ता बदलली आहे, त्यामुळे या प्रक्रियेमध्ये सुध्दा बदल झाला पाहिजे. मंत्री महोदयांनी याबाबत कॅबिनेटमध्ये चर्चा करावी. या प्रक्रियेमध्ये तत्वतः बदल झाला पाहिजे. मी चार मुद्दे मांडले आणि निघून गेलो असे होता कामा नये. त्या मुद्यांची शासनाने दखल घेतली पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, अलिबाग येथील धरमतर ब्रीजजवळ रेतीचे साठे पडून आहेत. संबंधित ठेकेदारांनी त्या रेतीवरील रॉयल्टी भरली आहे. परंतु 10 हजार ब्रास रेती तशीच ठेवली जाते. त्या रेतीच्या आधारे नवीन रेती काढून ती विकली जाते. त्यामुळे तेथील साठे ताबडतोब हलविले

...3...



श्री.जयंत पाटील.......

गेले पाहिजेत. त्या रेतीची ताबडतोब विक्री केली पाहिजे. संबंधित ठेकेदाराने ते साठे तेथून हलविले पाहिजेत. यातून जी रेती चोरी होते ती थांबली पाहिजे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत दोन महत्वाचे मुद्दे प्रभावीपणे मांडले आहेत. राज्य शासनाकडून सांगितले जाते की, कर्जमाफी म्हणजे बँकांना माफी आहे. कर्जमाफी म्हणजे बँकांना माफी नव्हे.

नंतर 2एफ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील....

श्री.रावते साहेब आपण पणन मंत्री होतात. आपण शेतकरी चळवळीमध्ये काम करता. बँक जेव्हा शेतकऱ्यांना कर्ज देते तेव्हा मॉर्गेज घेते. शेतकऱ्यांनी मॉर्गेज ठेवल्यानंतर त्यांना कर्ज देण्यात येते. यात बँकेचे काहीच नुकसान होत नाही. सभापती महोदय, आपण शहरी भागातील आहात. यात उलट बँकेचाच फायदा होईल. उद्या बँकेने शेतकऱ्यांची जमीन लिलावात काढली तर बँकेला निश्चितच जास्त पैसे मिळतील. आपण कर्ज शेतकऱ्यांना देतो. सहकार क्षेत्र उभे करायला भरपूर कष्ट लागते. सहकारी बँक उभी करायला भरपूर कष्ट करावे लागतात. यात एकेकाचे आयुष्य गेलेले आहे. मी माझी 40 वर्षे त्यात घालविली आहे. 35 कोटी रुपयांवरून मी आज 3 हजार कोटींवर बँक नेऊन ठेवली आहे. आम्ही तत्त्वाने चाललो म्हणून हे सर्व झाले. लोक म्हणतात की, ही अशीच बँक आहे. आपण राजकारण केले तर आमच्याकडे डिपॉझिटर येणार नाहीत. आज खऱ्या अर्थाने गरीब माणसाला, शेतकऱ्याला आधार कोणाचा आहे ? ताबडतोब 24 तासामध्ये सहकारी बँका आणि सहकारी पतपेढ्या शेतकऱ्याला पैसे उपलब्ध करून देत आहेत. आपण पतपेढ्यांसाठी, अर्बन बँकांसाठी आदेश काढता. यात अर्बन बँकांचा काहीच संबंध नाही. राज्य शासनाने परिपत्रक काढले. आम्हाला कम्पलसरी बोलाविण्यात आले आणि सांगण्यात आले की, आपणाला देखील फायनान्स करावा लागेल. आम्ही फायनान्स दिल्यानंतर वसुली झाली नाही तर मग काय करणार ? आम्ही लिलाव देखील करू शकत नाही. मला पुनर्गठन म्हणजे काय हेच कळलेले नाही. जो शेतकरी एक वर्षासाठी घेतलेले कर्ज फेडू शकत नाही, त्याचे पाच वर्षाने संपूर्ण व्याज माफ केल्यानंतर, त्याच्या कर्जाचे पुनर्गठन केल्यानंतर तो ती रक्कम भरू शकतो काय याचे उत्तर माननीय मंत्री श्री.रावते साहेबांनी मला द्यावे. त्याचे उत्तर 'नाही' असेच आहे. त्यामुळे कृपया यामध्ये राजकारण आणू नये. आपली आर्थिक ताकद किती आहे याची आम्हाला जाणीव आहे. मी पहिल्यांदाच सांगितले आहे की, याला वेगळे मार्ग आहेत. त्यावर आपण चर्चा करावी. या विषयामध्ये असलेले तज्ज्ञ, या चळवळीमध्ये काम करणारे ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते यांच्याशी विचारविनिमय करून हा विषय कसा सोडवायचा हे ठरवावे. या विषयातील जे तज्ज्ञ आहेत त्यांना

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील...

बरोबर घेऊन हा विषय आपण थांबवला पाहिजे. आपण सांगितले की, आपली कुवत नाही. पण बँका या कुणाच्या खाजगी नाहीत. बँक ही माझी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नाही. बँक ही शेतकऱ्यांच्या मालकीची आहे. सांप्रत परिस्थिती पाहिल्यानंतर महाराष्ट्रातील शेतकरी आज चिंतेत आहे हे दिसून येईल. त्याची चूल कशी पेटेल या विवंचनेत तो आहे. तेव्हा यासंबंधी राज्य शासनाने ठोस असा निर्णय घेणे आवश्यक आहे असे माझे म्हणणे आहे.

यानंतर मी सहकार विभागाच्या बाब क्रमांक 277 वर बोलणार आहे. मी गेल्या दहा वर्षापासून अनेक वेळा या सभागृहात सांगितले आहे की, जिल्हा बँकाचे 'अ', 'ब', 'क' या प्रमाणे ग्रेडेशन केले पाहिजे. आपण जिल्हा बँकेत काम केलेले आहे. 'अ' वर्गाच्या ज्या बँका आहेत त्यात शासकीय निधी ठेवला गेला पाहिजे. राष्ट्रीयकृत बँकांच्या करंट अकौंटमध्ये आमचे करोडो रूपये आहेत. चार बँका बुडाल्या म्हणून बाकीच्या सर्व बँका वाईट नाही. या राज्यातील 14-15 बँका चांगल्या आहेत. आमचे जळगावचे मित्र श्री.महाजन यांनी देखील ती बँक चालविण्यास घेतली आहे. आपणाला श्री.खडसे साहेबांचा देखील आधार आहे. कारण ते आपले नेते आहेत. तेव्हा ही अनुदाने सहकारामध्ये कशी राहतील हे पाहिले पाहिजे. पूर्वी केंद्र सरकारचा निधी आपल्याकडे डायरेक्ट येत नव्हता. आज केंद्र सरकारचा निधी पंचायत समितीपर्यंत येत आहे. तो निधी राष्ट्रीयकृत बँकांकडे जात आहे. तो आपल्याकडे कसा मिळेल हे पाहिले पाहिजे.

यानंतर मी सहकार विभागाच्या बाब क्रमांक 285 वर बोलणार आहे. रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन बँकचे पैसे अजून पर्यंत दिलेले नाहीत. माझी 3.30 वाजता माननीय सहकार मंत्र्यांसमवेत बैठक आहे. त्यावर आम्ही चर्चा करणार आहोत. या बँकेतील 95 टक्के ठेवी या एक लाख रूपयाच्या आतील आहेत. त्यांना इन्श्युरन्सचे पैसे मिळू शकतात. आज आठ वर्षे झाली तरी राज्य शासन एका संस्थेला पैसे देऊ शकत नाही. त्यामुळे आज आपण गरीब ठेवीदारांना फसवत आहात असे मला वाटते. पेण अर्बन बँकेला आपण 700 कोटी रूपये देणे आहात. त्यातील 300 कोटी रूपयांचे बोगस डिपॉझिट आहे. ....(अडथळा)....

**तालिका सभापती :** माझी सन्माननीय सदस्य श्री.गिरकर यांना विनंती आहे की, त्यांनी बसून न बोलता उभे राहून बोलावे. पुरवणी मागण्यांवर बोलत असताना त्या बाबीवरच बोलले पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी चारच बाबींवर बोलणार आहे. किती वेळ बोलायचे हा आमचा अधिकार आहे. आपला निर्णय बरोबर आहे. आम्ही बिलावर बोलू शकतो. या सभागृहामध्ये आता पर्यंत माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे जास्त वेळ बोलले आहेत त्यानंतर सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांचा नंबर लागतो. बिलावर 2-2 तास, 3-3 तास बोलणारे सदस्य या सदनामध्ये आहेत. माजी सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांना एका बिलावर 8 तास बोलताना आम्ही पाहिलेले आहे. सन्माननीय मंत्री श्री.रावते साहेब हे नेहमीच आमच्या बाजूने बोलतात. पण आता त्यांना मंत्री म्हणून बंधने आलेली आहेत. त्या बंधनाप्रमाणे त्यांना वागावे लागेल. त्यांचा काही प्रश्न नाही.

यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 95 वर बोलणार आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम अजून देखील पूर्ण झालेले नाही. गेल्या वेळी झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या वेळी, पुरवणी मागण्यांच्या वेळी माननीय मंत्र्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते की, मे महिन्यामध्ये हा रस्ता पूर्ण झाला नाही तर कंत्राट रद्द करण्यात येईल. पण तसे चित्र दिसत नाही. त्याच संथ गतीने आता देखील काम सुरू आहे. हजारो लोक दरवर्षी तेथे मृत्युमुखी पडत आहेत. या विषयावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. त्या ॲग्रीमेंटमध्ये असे आहे की, एक जरी खड्डा तेथे पडला तर तो त्या कंत्राटदाराने भरून दिला पाहिजे. आज वडखळ ते खारपाडा अंतर पार करण्यासाठी जवळ जवळ एक तास लागतो. हा रस्ता होईल तेव्हा होईल. पण संबंधित कंत्राटदाराकडून खड्डे भरून घेण्याचे काम तातडीने झाले पाहिजे.

यानंतर मी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 183 वर बोलणार आहे. काल अन्न सुरक्षेच्याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली आहे. त्यातील आकडेवारी आता माझ्या लक्षात राहिलेली नाही. पण आमच्या खारेपाटा येथे माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.गिरीश बापट यांनी खास बाब म्हणून पिवळे रेशन कार्ड दिलेले आहे. ही योजना ज्यांची खार जमीन बुडालेली आहे ..... (अडथळा)....

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील ......

सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्र्यांनी योजना जाहीर केलेली आहे. खारेपाट्याच्या शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली गेल्या असल्यामुळे येथील शेतकरी शेती करु शकणार नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या शेतीचे सर्वेक्षण करुन ती योजना आमच्या खारेपाटयाच्या शेतकऱ्यांसाठीही लागू करावी अशी विनंती मी पूरक मागण्याच्या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 80, नगरविकास विभागाच्या संदर्भात मी माझे विचार मांडणार आहे. एमएमआरडी क्षेत्रातील ज्या नगरपालिका आहेत त्यामध्ये पेण,अलिबाग,उरण यांना खास निधी देण्याची आवश्यकता आहे. एमएमआरडी म्हणजे उद्या होणारी मुंबई आहे. हा विषय या पूर्वी मी अनेक वेळा या सभागृहात मांडलेला आहे. उद्या या ठिकाणी मुंबई प्रमाणे झोपडपट्टया होऊ देणार, झोपडपट्टया तयार होत असताना त्यांना कोणताही अडथळा आणणार नाही व त्यांना परत एसआरएमध्ये घेणार हे प्रकार आता कोठे तरी थांबले पाहिजे. त्यामुळे यासंदर्भातील नियोजन 100 टक्के करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, पुरवणी मागण्याच्या निमित्ताने आम्ही या ठिकाणी अभ्यास करुन विचार मांडतो त्याची दखल घेतल्याची पोहच सन्माननीय सदस्यांना मिळण्याची आवश्यकता आहे. आपण अधिवेशनासाठी करोडो रुपये खर्च करीत असतो. अधिकारी येतात, बसतात. त्यामुळे अधिकाऱ्यांनी या या सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागणीत मुद्दा उपस्थित केला होता व त्यासंदर्भात अशी अशी कार्यवाही होत आहे यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना पोहच देण्याची आवश्यकता असून तशा प्रकारची पोहच दिली तर आमचे समाधान होईल. आज तुम्ही तेथे आहात, उद्या येथे याल परिस्थिती बदलतच असते. (अडथळा) आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.
धन्यवाद.

-----

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला पुरवणी मागण्यावर विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथमतः आपले आभार मानतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 283, 285 व बाब क्रमांक 244 व 249 कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकत्रित मानधनावरील खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त तरतूद यावर मी माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, आरोग्य विभागाचे मंत्री हे स्वतः डॉक्टर असून त्यांनी या विषयाच्या संदर्भात अनेक वेळा या सभागृहात प्रश्न मांडलेले आहेत. कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकत्रित मानधनावरील खर्च भागविण्यासाठी आपण केलेली तरतूद फार कमी असून त्यामध्ये आणखी वाढ करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. राज्य कामगार रुग्णालयाची जबाबदारी स्वीकारण्यास केंद्र सरकार तयार नाही. महाराष्ट्रात कामगार विमा योजनेचे एकंदर 13 रुग्णालये आहेत. राज्यात 15 हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कामगारांची व त्यांच्या कुटुंबीयांची संख्या 23 लाख 45 हजार 430 आहे. कामगारांच्या संदर्भात राज्य सरकार आणि केंद्र सरकार हॉस्पिटल्स चालवतील असा करार झाला होता. परंतु केंद्र सरकार आणि राज्य सरकारही कामगारांच्या हॉस्पिटल्सकडे बघत नसल्यामुळे ना घरका ना घाटका अशी परिस्थिती राज्य कामगार रुग्णालयांची झालेली आहे. परंतु 15 हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून यासाठी दर महिन्याला पैसे कापून घेतले जातात. माझी एवढीच विनंती आहे की, जर सरकार एवढा फंड जमवित असेल तर त्यातील काही तरी थोडा भाग कामगारासाठी मिळाला पाहिजे. कामगार रुग्णालयात सुट्टयांसाठी जात होता असे नसून कामगारांना सोयी-सुविधा मिळत असल्यामुळे कामगार त्यांच्या रुग्णालयामध्ये जात होते.

सभापती महोदय, मुंबईला या देशाची आर्थिक राजधानी म्हटले जाते. परंतु या कामगाराला त्यांच्या रुग्णालयामध्ये कसल्याही प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. त्यामुळे यासंदर्भात आपण तातडीने कोणत्या उपाययोजना करणार आहात ? कामगारांना दिलासा देण्यासाठी शासन काय करणार आहे ? या विषयाच्या संदर्भात केंद्र सरकारकडे वारंवार बोट दाखवले जाते. असे चित्र निर्माण केले जाते की, केंद्र सरकार बघणार आहे, राज्य सरकार बघणार आहे असे काही न करता आपण त्यावर लवकरात उपाय कराल अशी मी मंत्री महोदयांकडून अपेक्षा करतो.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. किरण पावसकर .....

सभापती महोदय, राज्यामध्ये 60 हजार व मुंबईमध्ये 25 हजार बोगस डॉक्टर्स आहेत. एकीकडे आपण रुग्णांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणार आहोत असे म्हणतो आणि दुसरीकडे मोठया प्रमाणात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट आहे. बोगस डॉक्टरांची आकडेवारी आमची नसून ही माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.टी.सी.राठोड यांनी दिलेली आहे. ही परिस्थिती फार भयानक आहे. झोपडपट्टयाच्या ठिकाणी राहत असलेले रुग्ण तापाच्या औषधासाठी डॉक्टरांकडे गेले तर ते डॉक्टर रेग्युलरली त्याच त्याच गोळया सर्व रुग्णांना देतात तेव्हा आजुबाजूचे लोक हे डॉक्टर बोगस आहेत असे ठरवित असतात. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात राज्य सरकारची सुध्दा यामध्ये जबाबदारी आहे. तज्ज्ञ मंडळी असे म्हणतात की, जेवढे तुमचे मान्यताप्राप्त डॉक्टर्स आहेत तेवढेच कदाचित बोगस डॉक्टर्स असू शकतील. एकेकाळी दिल्ली येथे बोगस डॉक्टर्सची संख्या जास्त होती परंतु मला असे वाटते की, मुंबईमध्ये जे जनरल प्रॅक्टीशनर्स आहेत त्यांच्याकडे असलेली परिस्थिती मोठया प्रमाणात दिसते आणि जनरल प्रॅक्टीसनर्सला त्याच्यावर कंट्रोल आणण्याची आवश्यकता आहे. मी असे म्हणणार नाही की, ॲलोपॅथीचे 80 हजार डॉक्टर्स असू शकतील, होमिओपॅथीचे 62 हजार डॉक्टर्स असू शकतील, आयुर्वेद-युनानीचे 80 हजार डॉक्टर्स असतील. परंतु या सर्व डॉक्टरांचे शासन सर्वेक्षण करणार आहे नाही,त्यासंदर्भातील ऑडिटींग केले जाणार आहे की, नाही ? बोगस डॉक्टर्सची प्रॅक्टीस थांबवण्यासाठी सरकार कोणती ठोस उपाययोजना करणार आहे यासंदर्भातील माहिती सदनासमोर आली तर त्याचा आपल्याला चांगला उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, आजही आरोग्य विभागाचा कारभार ढिसाळ आहे असे मी म्हणणार नाही. माननीय आरोग्य मंत्र्यांनी आरोग्य विभागाच्या संदर्भात गेल्या दोन तीन महिन्यात चांगल्या प्रकारचे निर्णय घेतलेले आहेत. आपण जे निर्णय घेतले आहेत त्यासंदर्भात मी सुध्दा काही सूचना केल्या होत्या. आरोग्य विभागामध्ये आज 13177 रिक्त पदे असून ही रिक्त पदे भरण्यासाठी ग्रामीण रुग्णालयांना रिक्त पदांमुळे जास्त त्रास होत असतो. औरंगाबाद उच्च न्यायालयाने शासनाच्या सचिवाला 5000 रुपयांचा दंड ठोठावला असून ती आपल्या राज्यासाठी लाजिरवाणी बाब आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

आरोग्य विभागातील 13 हजार 177 रिक्त पदे किती कालावधीत भरणार आहात याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे. त्याचप्रमाणे अनेक रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन, सोनोग्राफी मशीन्स नाहीत. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण भागातील परिस्थिती अतिशय वाईट आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील ग्रामीण भागामध्ये देखील हीच परिस्थिती आहे. काही दिवसांपूर्वी एका चॅनेलवर चंद्रपूर जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिका दाखविल्या. या रुग्णवाहिकांपैकी एकही रुग्णवाहिका चालू स्थितीत नव्हती. आपणास असलेली यंत्रसामुग्री रिपेअर करुन वापरता येईल, पण तीही दुरुस्त करण्यात येत नसेल ते बरोबर नाही. तेव्हा या सुविधा पुरविण्यात येतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. मी सुरुवातीलाच सांगितले की, आरोग्य विभागासाठी मागण्यात आलेली पुरवणी मागणी तुटपुंजी आहे. या विभागासाठी सरकारने जास्त निधी देण्याची आवश्यकता आहे.

दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग विभाग- पृष्ठ क्रमांक 48, बाब क्रमांक 59 व 60. बृहन्मुंबई दूध योजना- वरळी, कुर्ला, व आरे वसाहत येथील निवासी व प्रशासकीय इमारतींची दुरुस्ती व परीरक्षणाच्या कामांसाठी मागणी करण्यात आली आहे. आज सकाळी आरेच्या संदर्भात तारांकित प्रश्नामध्ये चांगली चर्चा झाली.

सभापती महोदय, मत्स्यव्यवसाय विभागाबाबत सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणारे मच्छीमार आणि पर्ससीन नेटद्वारे करणारे मच्छीमार यांच्यामध्ये वाद आहे आणि त्या संदर्भात येथे वारंवार चर्चा झालेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती ते आचरा हे अंतर साधारणतः दीडशे ते दोनशे कि.मी. आहे. त्या ठिकाणी पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणारे मच्छीमार जवळपास 150 ते 200 ट्रॉलर्समधून दगड घेऊन गेले होते. दोघांनी एकमेकांवर दगडफेक केली. कोकणात जास्त पाऊस पडतो म्हणून समुद्रात होड्या घेऊन जाऊ नका असे शासन सांगते. तर दुसरीकडे खोल समुद्रामध्ये पर्ससीन नेटद्वारे दुसरेच कोणीतरी मच्छीमार मासेमारी करीत आहेत. मग स्थानिक मच्छीमारांनी आपले पोट कसे भरायचे ? एकीकडे पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना पोलिसांचा छळवाद असतो आणि दुसरीकडे पर्ससीन नेटद्वारा मासेमारी करणारे मच्छीमार मासे घेऊन जात आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना मागील दोन वर्षे डिझेलचा परतावा दिलेला नाही. त्यामुळे दापोली, हर्णे बंदरात मासेमारीची कोट्यवधी रुपयांची होणारी उलाढाल थांबली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला असताना या समुद्र किनाऱ्यापासून मिळणारा महसूल आपण थांबवित आहोत. मच्छीमारांना त्यांचा डिझेलचा परतावा लवकर द्यावा. त्या शिवाय या मच्छीमारांना आपण काय देऊ शकतो याचा देखील विचार व्हावा. तसेच पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणारे मच्छीमार आणि पर्ससीन नेटद्वारा मासेमारी करणारे यांच्यातील वादविवादातून मार्ग काढावा अशी मंत्री महोदयांना विनंती आहे.

बाब क्रमांक 312,पृष्ठ क्रमांक 347-पर्यटन व सांस्कृतिक विभाग - पर्यटन विभागासाठी करण्यात आलेली पुरवणी मागणीची रक्कम अतिशय कमी आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित होऊन 20 वर्षे झाली आहेत. आमची अपेक्षा एवढीच होती की, त्या ठिकाणी चांगले रस्ते, वीज आणि पाणी मिळावे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बॉर्डरला लागून गोवा राज्य आहे आणि त्या राज्याचा महसूल पर्याटनावर अवलंबून आहे. एक राज्य पर्यटनावर जगू शकते, पण एका जिल्ह्यातील लोक पर्याटनावर जगू शकत नाहीत ही दुर्दैवी बाब. खरे म्हणजे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. आपल्याकडे असलेल्या गोष्टीतून आपण त्यांना काय देऊ शकतो याचा सरकारने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात विमानतळासाठी जागा संपादित करण्यात आल्या. त्या ठिकाणी पेन्सिलने डिमार्केशन करण्यात आले. त्या ठिकाणी विमान केव्हा उतरणार आहे, हे माहीत नाही.

सभापती महोदय, पर्यटन हा विषय सिंधुदुर्ग जिल्ह्यापुरता मर्यादित नाही तर एकेकाळी लोक मुंबई शहर पाहण्यासाठी येत होते. तेव्हा माननीय पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. पूर्वी मुंबई शहरामध्ये राणीचा बाग होती, म्हातारीचा बूट होता. लोक त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भेट देत होते. आज मुंबईतील रस्त्यांची अतिशय दूरवस्था आहे. रस्त्यांवर अनेक खड्डे पडलेले आहेत. आज राणीच्या बागेत मोठमोठे प्राणी देखील शिल्लक राहिलेले नाहीत. हे प्राणी कुठे गेले त्याचा देखील पत्ता लागत नाही. मुंबई शहरात

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

आल्यानंतर पहायचे काय? मुंबईत घाणीचे साम्राज्य पहायचे, सर्वत्र नाले वाढलेले पहायचे, साधी फूटपाथ देखील राहिलेली नाही, चांगला रस्ता नाही. अशा ठिकाणी कोणते पर्यटन करणार आहात ?

सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. आपण विकसनशील देशाच्या राजधानीत गेल्यावर तेथे काही तरी पाहू शकतो. पण मुंबई शहरामध्ये या या पाच गोष्टी दाखवणाऱ्या सारख्या आहेत असे सरकारमधील कोणत्याही मंत्री महोदयांनी उठून सांगावे.. (अडथळा)..मी पर्यटनावर बोलत आहे. मुंबईसाठी पर्यटन विषय महत्वाचा आहे. मी बाब क्रमांक देखील सांगितलेली आहे. आपले त्याकडे लक्ष नव्हते. ज्यांनी मुंबई शहराची वाट लावली त्यांना मी जे बोलत आहे ते लागणारच. मी त्यांच्या भावना समजून घेतो. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे अभ्यासू सदस्य आहेत. पण मी जे काही बोलत आहेत ते त्यांना लागणारच आहे. मुंबई शहरात घाणीचे साम्राज्य आणि जागोजागी वसलेल्या झोपडपट्ट्या दाखविणार आहोत काय ?

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर हे या सदनातील ज्येष्ठ सदस्य आहेत. माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना त्यांना पुरवणी मागण्यांवर बोलताना बाब क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक सांगावा लागतो याची आठवण करुन द्यावी लागते हे त्यांच्यासाठी शोभणारे नाही. त्यांना सर्व नियम माहीत आहेत. सन्माननीय सदस्यांनी बाब क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक सांगून त्यांना जे काही बोलायचे ते बोलावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी बाब क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक सांगितलेला आहे. सन्माननीय सदस्य मोबाईलवर व्यस्त असल्यामुळे त्यांना कदाचित ऐकू गेले नसेल. आज मुंबई शहरामध्ये अनधिकृत झोपडपट्ट्यांचे विदारक चित्र आहे. ग्रॅन्ट हयात या पंचतारांकित हॉटेलमध्ये एक मोठे चित्र लावलेले आहे. त्या चित्रामध्ये विमान उतराना ज्या झोपड्या दिसतात त्या झोपड्यांचे चित्र दाखविलेले आहे. मुंबई शहरामध्ये परदेशातून येणाऱ्या पर्यटकांना मुंबई शहर पहावे असे वाटत असेल, पण त्यांनी मुंबई शहरात कोणते पर्यटनस्थळ पहावे ? आपण त्यांना मुंबईतील झोपडपट्ट्या दाखवावयाच्या काय ? ते झोपडपट्टी पर्यटन होईल. मुंबई शहरात झोपडपट्टी आणि वडापावच्या गाड्या पहावयास मिळतात, हे चित्र अतिशय विदारक आहे. तेव्हा मुंबईच्या पर्यटनावर लक्ष देण्याची गरज आहे. मुंबई शहरामध्ये पर्यटकांना पाहण्यासाठी कोणतेच पर्यटनस्थळ

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

नाही. परंतु मुंबई शहरात जे लोक राहतात त्यांची परिस्थिती पण वाईट आहे. उन्हाळ्यामध्ये पाणी कपात आणि थोडा जास्त पाऊस झाला की, घराघरात पाणी, अशी परिस्थिती आहे...(अडथळा).. मुंबई हे पर्यटनस्थळ नाही असे सरकारने आजच घोषित करावे. एकेकाळी मुंबई शहर पाहण्यासाठी येणाऱ्यांची संख्या जास्त होती आणि श्री.गिरीष महाजनसारखे ज्येष्ठ मंत्री सांगत असतील की, मुंबई शहर पर्यटनस्थळ नाही तर त्यांनी तसे तातडीने घोषित करावे. मुंबई हे आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळ आहे. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे. माननीय मंत्री अशा पद्धतीने बोलत असतील तर ती मुंबईकरांची नव्हे तर देशातील सर्व लोकांची थट्टा होऊ शकेल. आपण अशी थट्टा करु नका. आपणास मुंबई शहरातून पुष्कळ महसूल मिळतो.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 193 वरील बाब क्रमांक 168 व 169 तसेच पृष्ठ क्रमांक 194 वरील बाब क्रमांक 170 ही उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भातील आहे. महोदय, प्रत्येक मंत्री एक-दोन-दहा वर्षांचा कालावधी मिळाल्यानंतर असे म्हणतो की, परदेशात गेल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर उद्योग आले असून आज पासून कामगारांना मोठ्या प्रमाणावर उद्योग मिळणार आहे. मी तर म्हणेन की, यामुळे कामगारांना काम मिळेल असे वाटत नाही. उलट जास्तीत जास्त कामगार निरुद्योगी कसे होतील या दृष्टीने काम सुरु आहे.

सभापती महोदय, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या आणि जास्तीत जास्त महसूल व कर देणाऱ्या मुंबईकडे लक्ष देण्याची गरज आहे. या मुंबईतून 12.5 टक्के एक्साईज टॅक्स, 5 टक्के सेल्स टॅक्स, 33 टक्के इन्कम टॅक्स, 14.36 टक्के सर्व्हीस टॅक्स, 1.5 टक्के प्रोफेशनल टॅक्स, 10 टक्के लक्झरी टॅक्स, 2 टक्के जकात आणि 3 टक्के एलबीटी अशा प्रकारे एकूण 46 टक्के टॅक्स दिला जातो. परंतु टॅक्सच्या मोबदल्यात मुंबई शहराला काय मिळते, असा प्रश्न विचारला तर त्याला आपण काय उत्तर देणार आहात ? महोदय, या मुंबईला आर्थिक राजधानीचा दर्जा मिळालेला आहे. त्यामुळे मुंबईचा हा दर्जा टिकविण्यासाठी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उद्योग मंत्र्यांनी संबंधितांशी चर्चा करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पालघरला कोस्टगार्ड हब होता. परंतु तो आता पोरबंदरला जायला निघाला आहे. हा हब पोरबंदरला का जात आहे, याचा विचार करणे गरजेचे आहे. तसेच आता मुंबईतील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्यालय हटविण्यात येत आहे. पूर्वी विधान भवनच्या बाजूलाच एयर इंडियाची 22 मजली इमारत होती. परंतु आज त्या इमारतीतील केवळ 3 मजले एयर इंडियाकडे राहिले असून उर्वरित सर्व मजले भाड्याने देण्यात आलेले आहेत. आता एयर इंडियाचे मुख्यालय दिल्लीमध्ये गेले आहे. माननीय शिवसेनाप्रमुख सुध्दा त्या ठिकाणी येऊन गेले होते. तसेच दुसरी बाब अशी की, न्हावा-शेवा बंदराचा 80 टक्के व्यवसाय पोरबंदरला निघाला आहे. महोदय, हे सर्व उद्योग त्या ठिकाणी का जातात ? कारण त्या ठिकाणी विविध टॅक्समध्ये बेनिफीट दिला जातो. या उद्योजकांना सोयी-सुविधा देण्यात आपण कोठे कमी पडत आहोत, याचा विचार केला पाहिजे. आज आपल्या राज्यातील हिरे व्यवसाय गुजरात राज्यात गेला आहे. सिप्झमध्ये हिरे व्यवसायात माझ्या असंख्य युनियन होत्या. आज सिप्झ येथे हिरे व्यवसायाच्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

ठिकाणी गेला तर तेथे युनियन तर शिल्लक नाहीच, परंतु आता हिऱ्यांचे कारखाने सुध्दा नाहीत. आज तेथील असंख्य हिरे कारखाने बंद झाले असून, हिरे व्यवसाय इतरत्र निघून गेला आहे. या ठिकाणचे कपडा मार्केट तर कधीचेच निघून गेले आहे. आपल्याकडे केवळ शोरूमचा माल राहिला असून, गोदामे बाहेर गेलेली आहेत.

सभापती महोदय, लोखंड व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या असोसिएशनने राज्य सरकारला उघड धमकी दिली आहे की, आम्ही येथून निघून जातो. मुंबईतील धातू उद्योग गुजरात मधील अडलास येथील अदाणी इंडस्ट्रीयल पार्क येथे हलविण्याचा निर्णय मेटल असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला आहे. ही भयंकर गोष्ट आहे. यामुळे मुंबईतील 15 ते 20 लाख लोकांचा रोजगार बाहेरच्या राज्यात निघून जाणार आहे. यावरून मी विचारतो की, आपण हा महाराष्ट्र कोठे नेऊन ठेवला आहे ? आपण हा महाराष्ट्र वाचवा, अशी मी मागणी करतो. राज्य सरकारने केवळ घोषणा करुन चालणार नाही. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब, या राज्यात नवीन उद्योग नाही आले तरी चालतील, परंतु जे उद्योग आहेत ते योग्यप्रकारे चालविले पाहिजेत. किंबहुना, ते उद्योग सांभाळले तर सर्वांचा रोजगार टिकून राहील आणि तोही मुंबईत राहील. ग्रामीण भागातून शिकलेले तरूण रोजगारासाठी मुंबईत येत असतील तर, त्यांच्या हाताला काम मिळेल या दृष्टिकोनातून सरकारला काम करावे लागेल. नाही तर सुशिक्षित माणसाचे दोन पाय मातीत आणि दोन हात शेतीत ठेवून त्याला ग्रामीण भागातच राहावे लागेल. या निमित्ताने मी मागणी करतो की, मुंबईतील चित्र जिवंत ठेवण्यासाठी राज्यात असलेले उद्योग वाचवावेत आणि त्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये जे काही द्यावयाचे असेल ते जरूर द्यावे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या वतीने पान क्र.15, बाब क्रमांक-16, यंत्र सामुग्री, साधन सुविधा, देखभालीसाठी सुटे भाग खरेदी करण्यासाठी 3 कोटी 52 लाख रूपयांची मागणी करण्यात आली आहे. तसेच याच पृष्ठावर बाब क्रमांक-17 अंतर्गत कार्यालयीन खर्चासाठी अतिरिक्त तरतूदीसाठी आणि पृष्ठ क्रमांक-16, बाब क्रमांक-20 अंतर्गत बक्षीस व्यवसाय सेवा, गुप्त सेवा यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, आजही महाराष्ट्र पोलीस दलात 12,115 पदे रिक्त आहेत. मुंबईवर विविध प्रकारचे हल्ले होतात. मागचा हल्ला झाला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

त्यावेळी असे सांगण्यात आले की, हा मुंबईवरील हल्ला नव्हता तर एक प्रकारचे युध्द होते. सभापती महोदय, पोलिसांचे मनोबल आणि मनोधैर्य वाढविले पाहिजे. त्याच बरोबर पोलिसांना अद्ययावत साधनसामुग्री देऊन, त्यांना वेल इक्यूप केले पाहिजे. परंतु यासाठी राज्य सरकारने काय केले आहे ? केंद्र सरकारने सांगितले होते की, या राज्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे प्रयोजन केले आहे. मी विचारु इच्छितो की, खरोखरच मुंबई शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत काय ? माझ्या माहितीनुसार सीसीटीव्ही खरेदी करण्यासंदर्भात दोन वेळा निविदा काढण्यात आल्या आणि दोन्ही वेळा त्या रद्द झाल्या. त्यानंतर तिसऱ्यांदा निविदा काढण्यात आली, परंतु ती प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नसेल. या निमित्ताने माझी मागणी आहे की, किमान आता तरी सरकारने या संदर्भातील कार्यवाही करावी. महोदय, पूर्वी मुंबई पोलिसांचा दरारा होता. मुंबई पोलिसांची तुलना स्कॉटलँड पोलिसांशी केली जात होती. स्कॉटलँड पोलिसानंतर मुंबई पोलिसांचा नंबर होता. त्या कालखंडात कोठेही सीसीटीव्ही कॅमेरे नसताना सुध्दा विविध गुन्ह्यांची पोलिसांकडून उकल होत होती. परंतु आज प्रत्येक गुन्ह्याचे चित्रीकरण सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये बघावे लागत आहे. दुकानात चोर कशा प्रकारे चोरी करतात हे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बघून तपास केला जातो. त्यामुळे आपण कमी पडतो. महोदय, पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्याबरोबरच पोलिसांना वेल इक्यूप करण्यासाठी जास्तीत जास्त निधी देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सर्वात मोठा प्रश्न हा पोलिसांच्या घरांचा आहे. पोलिसांच्या घरासाठी चांगली योजना तयार केली पाहिजे. मध्यंतरी पोलिसांच्या घरांसाठी बीडीडी चाळीचा सर्व्हे करण्यात आला होता. पोलिसांच्या वसाहतींमध्ये सुधारणा करण्यासाठी आमदार/खासदार निधीतून निधी दिली तरी तो अपुरा पडतो. पोलिसांच्या वसाहतींची तात्पुरती डागडुजी करून उपयोग होणार नाही. या निमित्ताने मी विनंती करतो की, पोलिसांच्या घरांच्या बाबतीत सरकारने चांगली योजना आखून, त्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. जेणेकरुन पोलिसांना 24 तास सेवा करता येईल, या दृष्टिकोनातून सरकारला बघावे लागेल.

सभापती महोदय, मुंबईमध्ये सायबर गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त श्री.राकेश मारिया यांनी एक चांगली घोषणा केली. त्यांनी सांगितले की, सायबर

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

गुन्ह्यांमध्ये वाढ झाली असून त्याची उकल करण्यात प्रत्येक वेळी यश आले आहे. परंतु येत्या काही वर्षांत सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी हे गुन्हे स्वतंत्रपणे हाताळणी करणारी यंत्रणा असावी. सध्या बांद्रा-कुर्ला संकुलात स्थापन करण्यात आलेल्या सायबर पोलीस ठाण्याला गुन्हे दाखल करण्याचे अधिकार आहेत. सभापती महोदय, मी स्वतः सायबर सेलला भेट दिलेली आहे. त्या सेलकडे कमी सुविधा आणि कमी अधिकारी वर्ग असताना सुध्दा तो सेल गुन्ह्यांची उकल करीत आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. शहरात एखादी मोठी घटना घडली तरच त्याचा परिणाम सर्व उद्योगांवर होतो. हे सर्व लक्ष ठेवून सरकारने काम करावे. 1993 मधील बॉम्बस्फोट किंवा त्यानंतर झालेल्या घटना याकडे सरकारने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पोलिसांनी रमजानचा महिना चांगल्याप्रकारे हाताळल्याची बातमी मी वाचली. पोलीस आपली भूमिका चांगल्या प्रकारे पार पाडत आहेत. मी सांगितले की, पोलीस स्वतःच्या जीवावर उदार होऊन आरोपींना पकडतात, त्यांना शिक्षा मिळण्यासाठी प्रयत्न करतात. काल मी एबीपी-माझा या वृत्त वाहिनीवरील मुलाखत ऐकली. त्या मुलाखतीत निवृत्त न्यायमूर्ती प्रमोद कोदे यांनी सांगितले की, 1993 च्या बॉम्बस्फोट घटनेप्रकरणी आरोपी असलेल्या 140 ते 170 लोकांना शिक्षा झाली आहे. याचे खरे श्रेय मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त श्री.एम.एन.सिंग आणि विद्यमान पोलीस आयुक्त श्री.राकेश मारिया यांना जाते. त्यांनी स्वतः या दोन अधिकाऱ्यांची नावे घेतली. महोदय, त्या काळात कोणतेही सीसीटीव्ही कॅमेरे नसताना पोलीस अधिकारी गुन्हेगारापर्यंत पोहचले. या संपूर्ण गुन्ह्याची उकल केल्यामुळेच मेमनला फाशी होणार आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, एखादे बनावट कार्ड दाखवून वकील कारागृहात जाऊन याकूब मेमनला भेटतो, त्याच्याशी चर्चा करतो आणि बाहेर येतो. महोदय, राकेश मारीया आणि इतर अधिकाऱ्यांनी स्वतःच्या जीवावर उदार होऊन काम करावयाचे आणि गुन्हेगारांना कारागृहात आणल्यानंतर तेथील लोकांच्या हलगर्जीपणामुळे हा प्रकार घडणे योग्य नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणी कार्यक्षम अधिकारी नेमून चौकशी करण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. किरण पावसकर ....

मी शासनाला या संदर्भात विनंती करीन. आज झालेला प्रकार योग्य नाही. पूर्वीही नागपूरच्या जेलमधून 5 कैदी पळून गेले, पुण्याच्या जेलमधून 2 कैदी पळून गेले. कैद्यांनी पळून जाण्याची आलेली साथ तातडीने थांबवावी. अकार्यक्षम अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तातडीने कारवाई करावी. कार्यक्षम अधिकारीही आहेत. आम्हालाही एक कार्यक्षम आयुक्त मिळाले आहेत. कार्यक्षम अधिकाऱ्यांच्या पाठीवरून देखील शासनाचा हात फिरला पाहिजे अशी मी भावना व्यक्त करतो.

सभापती महोदय, आता मी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 209 वरील बाब क्रमांक 187 वर बोलणार आहे. औषधे उत्पादक कंपन्या, विक्रेते, रक्तपेढ्या, दूध भेसळ, विषारी द्रव्ये पुरवठा, सौंदर्य प्रसाधने उत्पादक, विक्रेते, गुटखा इत्यादी गोष्टींवर नजर ठेवण्यासाठी असे नमूद केले आहे. खरोखर ही दिलेली रक्कम यासाठी पुरेशी आहे का ? 4 कोटी 30 लाख रूपये फक्त यासाठी दिले आहेत. भेसळयुक्त कामकाज चालले आहे ते या निधीच्या माध्यमातून बंद होईल का ? पाण्याची, दुधाची भेसळ रोखण्यासाठी सुध्दा हे पुरणार नाहीत. विरार-वसईला पाण्याच्या बाटल्या भरल्या जातात हे भयानक वास्तव आहे. टॉयलेट बाजूला असते, तिकडून पाईप येतो, ती पाण्याची बाटली त्याच्या सहाय्याने भरली जाते आणि तेथून आपल्याला पाण्याची बाटली मिळते. सदर बाबतीत चित्रीकरण करून झाले, दूरवाहिन्यांनीही दाखविले. माननीय मंत्री, आम्ही पाहत आहोत, माननीय मंत्री कारवाई करतो असे सांगतात पण कारवाई काही होत नाही. आम्ही कोणाच्या तरी जीवाशी खेळत आहोत. एखाद्याची हत्या केली तर 14 वर्षांची शिक्षा होते. मात्र असले पाणी पिऊन एखादी व्यक्ती मृत झाली तर कोणालाही शिक्षा होणार नाही अशी स्थिती आहे. कायदा बनविण्याचे, त्यामध्ये सुधारणा करण्याचे सदनाचे अधिकार असतील तर हे अधिकार आपण वापरणार आहात का, जर हे अधिकार वापरणार असाल तर ठीक आहे. 4 लाख व्यक्तींसाठी 1 अन्न सुरक्षा अधिकारी आहे. तामिळनाडू राज्यात मात्र सव्वा लाख व्यक्तींसाठी 1 अन्न सुरक्षा अधिकारी आहे. आपण रेरस्टॉरंट कधी जाऊन पाहणार आहात ? रस्त्यावर जेवण तयार होते, ते कशा पध्दतीने विकले जाते या संदर्भात कधी तरी चर्चा करणार का, तपासणी करणार का ? आपल्याकडे त्यासाठी अधिकारीच नाहीत. आताही त्यांची साडे तीनशेच्या वर पदे रिक्त आहेत.

..2

श्री. किरण पावसकर ....

रिक्त पदे जोपर्यंत भरणार नाही तोपर्यंत आपण त्यांच्याकडून नाविण्यपूर्ण कामाची अपेक्षा काय करणार आहोत ? अन्न सुरक्षा कायद्यामुळे 1500 नवीन पदांची गरज आहे असे म्हटले जाते. आपण ती पदे सोडा पण साडे तीनशे पदे तरी भरा. मी सतत 2 वर्षे हा प्रश्न मांडला आहे आणि मांडत आहे. राज्यात साडे तीनशे-चारशे अन्न सुरक्षा निरीक्षकांची गरज आहे. आपण ती पदे भरली तर कदाचित न्याय देता येऊ शकतो आणि बनावटीचे कामकाज बंद होऊ शकते आणि अशा गोष्टींवर चांगला परिणाम होऊ शकतो. गुटख्यावर बंदी आहे. इतर विक्रेत्यांवर देखील बंदी येईल. आपण त्या संदर्भात काम केले पाहिजे.

सभापती महोदय, मालवणीमध्ये दारू पिऊन 107 लोकांचा मृत्यू झाला, त्यासाठी तुम्ही भरपाई द्या, काही करा असे मी सांगणार नाही. स्थानिक पोलीस स्टेशनला नक्की माहीत असेल की, दारूचा गुत्ता कुठे सुरूआहे, त्यामध्ये काय मिश्रित केले जात आहे, कशी विकली जात आहे. विभागातील बाबी त्यांना माहीत होत नाहीत असे होऊ शकत नाही. आपण या संदर्भात नियंत्रण करण्यासाठी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकरिता जास्त निधीची तरतूद करण्याची गरज अहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे वाढदिवसाबद्दल अभिष्टचिंतन**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आज त्यांच्या वाढदिवस आहे. आपण त्यांना शुभेच्छा दिल्या पाहिजेत.

**तालिका सभापती** : आज माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आहे. सभागृहात ते उपस्थित आहेत, त्यांना वाढदिवसाबद्दल हार्दिक शुभेच्छा, त्यांची कारकीर्द यशस्वी होवो आणि त्यांची भरभराट होवो अशी मी माझ्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने त्यांना शुभेच्छा देतो.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी आपला व सभागृहाचा खूप आभारी आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)**

**पृ.शी./मु.शी.** : सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

( चर्चा पुढे सुरू....

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभी आहे. पुरवणी मागण्यांच्या वेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात आले आहेत, आम्हाला त्याबद्दल फार आनंद आहे. पुरवणी मागण्यांच्या बाबत काही मुद्दे मांडताना बाब क्रमांकाचा उल्लेख करून ते मांडणार आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 67 नुसार सर्व शिक्षा अभियानाचा खर्च भागविण्यासाठी 276 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. काही वर्षांपासून मुलांच्या पुस्तके व वह्यांचा बोजा सातत्याने वाढत आहे. शिवसेना पक्ष प्रमुख श्री. उध्दव ठाकरे यांनी मुलांसाठी आठवी, नववी व दहावी इयत्तांच्या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव टॅबमध्ये केला आहे. युवा नेते श्री. आदित्य ठाकरे यांनी नुकताच तो टॅब माननीय शिक्षणमंत्र्यांना सादर केला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना या विषयीची माहिती आहे. सर्वशिक्षा अभियानामध्ये अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून मुलांचे ओझे कमी करण्यात यावे, तसे करण्यात येईल अशी मी शासनाकडून अपेक्षा व्यक्त करते. सामाजिक न्याय विभागाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील निवासस्थान यासाठी बाब क्रमांक 197, पृष्ठ क्रमांक 219 नुसार आर्थिक तरतूद केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान राज्यातील, देशातील व जगातील लोकांच्या दृष्टीने आदराची भावना असणारी वास्तू आहे. मी या निर्णयाबद्दल शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करते. सामाजिक न्याय विभाग पुरवणी मागण्यांमधून वेगवेगळ्या तरतुदी सातत्याने करते. माननीय सामाजिक न्यायमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मला लक्ष वेधले पाहिजे की, एकीकडे कै. अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष यांनी 385 कोटी रुपयांचा घोटाळा केल्याने त्या संदर्भात सीआयडी चौकशी सुरूआहे आणि

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

दुसरीकडे आपण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती साजरी करीत आहोत. सामाजिक न्याय विभागाकडून सर्व विभागांना निधी उपलब्ध करून दिला जातो, जेणेकरून गोरगरीब जनतेपर्यंत तो निधी पोहचावा. गोरगरीब समाजामध्ये जर कोणी गैरफायदा घेऊन असे कोट्यवधी रूपयांचे घोटाळे करीत असेल तर मी म्हणेन की, या संदर्भात सीआयडीमध्ये एखादा विभाग करावा. अनेक जण जनतेच्या योजनांचा गैरफायदा घेताना दिसत आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 293 व 296 नुसार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना निधी उपलब्ध करून दिला आहे. मला माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधायचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना हा प्रश्न माहीत आहे. विद्यापीठ अंतर्गत शि.प्र. मंडळीमधील गैरव्यहारांच्या संदर्भात गेली 3 महिने सातत्याने तेथील विश्वस्त आणि सभासद निवेदने देत आहेत. सरकारच्या जमिनी त्यांनी घेतल्या होत्या, त्यातील काही जमिनी परस्पर इतरांना हस्तांतरित केल्या किंवा दिल्या आहेत. शासनाने या संस्थेच्या चौकशीच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे की नाही, घेतला नसेल तर, तो जरूर घ्यावा. मी याकडेही लक्ष वेधत आहे.

महोदय, मी आता जलसंपदा विभागावर बोलणार आहे. माननीय मंत्री श्री. गिरीष महाजन व माननीय राज्यमंत्री श्री. विजय शिवतारे सभागृहात उपस्थित अहेत. आपण विरोधी पक्षात काम करीत होता आणि आता सत्ताधारी पक्षात माननीय मंत्री आहात. मुद्दाम उल्लेख केला पाहिजे की, आपण चांगल्या प्रकारे पृष्ठ क्रमांक 158 पासून 165 पर्यंत, बाब क्रमांक 147 नुसार कोट्यवधी रूपयांची तरतूद केली आहे. चितळे समितीला सल्ला देण्यापुरतेच अगोदरच्या सरकारने नेमले होते. परंतु आपण तो सल्ला किती प्रमाणात स्वीकारला आहे, त्यामधून कोणत्या स्वरूपाची कृती करण्याचे ठरविले आहे ? पूर्वीच्या शासनाने वेळोवेळी जलनीती तयार केली आहे. संपूर्ण रेकॉर्ड पाहिल्यावर मी विधान करू शकते की, जलनीतीचे नियम काय असणार आहेत याबद्दल दोन्ही सभागृहांत खुली चर्चा कधीही झालेली नाही. जलसंपती प्राधिकरणाने स्वतःच्या अखत्यारित कायम हे नियम ठरविले आहेत. मुळात हा संपूर्ण खोऱ्यांखोऱ्यांतील वाद आहे. आपण निधी उपलब्ध करून देतो. पूर्वी माननीय श्री. मनोहर जोशी सर मुख्यमंत्री असताना सुध्दा खोरेनिहाय नद्यांचा आराखडा

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सरकारने तयार केला होता, आपण त्यावर निश्चितपणे पुढे काम केले आहे आणि त्याबद्दल पारदर्शकता ठेवून नद्यांच्या पाण्याचे वाटप करणार आहोत. शासनाच्या मनात या संदर्भात काय आहे ? याच अधिवेशनात या संदर्भात चर्चा झाली तर उत्तम आहे. शक्य झाल्यास या अधिवेशनात नाही तर डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहांतील सर्व सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन जलनीतीच्या नियमांच्या संदर्भात एकदा चर्चा झाली पाहिजे असे मला सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्र्यांकडे कुंभमेळ्याचाही विषय असून त्यांनी ते काम चांगल्याप्रकारे चालविले आहे. नुकतेच पुणे जिल्ह्यातील पारोंडेश्वर यासाठी निधी दिल्याबद्दल माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे, माननीय मंत्री श्री. गिरीष महाजन आणि अर्थातच माननीय मुख्यमंत्र्यांचे मी आभार मानते.

सभापती महोदय, मला एका गोष्टीबद्दल बोलणे क्रमप्राप्त आहे. आमदारांच्या स्वीय सहायकांना गेली 2-3 महिने वेतन मिळालेले नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे........

एका गोष्टीचे अतिशय वाईट वाटते. आमदारांच्या स्वीय सहायकांना नियमित पगार का मिळू नये ? शेवटी आम्ही त्यांना पैसे देतो. त्यांना असे सांगण्यात आले आहे की, यापुढे दर तीन महिन्यानंतर तीन महिन्यांचा एकत्रित पगार मिळेल. त्यामुळे स्वीय सहायक आमच्याकडे विचारणा करतात. आम्ही या संदर्भात काही बोलण्याचा प्रयत्न केला तर आमदारांना त्यांच्या स्वीय सहायकांची काळजी आहे, असे बोलले जाते. शेवटी हे सर्व लोकही महाराष्ट्रातून आलेले आहेत, दिवसरात्र ते काम करीत असतात. म्हणून मला असे विचारावयाचे आहे की, आमदारांच्या स्वीय सहायकांना दर महिन्याला वेतन मिळण्यासंबंधी निधीची काही अडचण असल्यास पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने तरतूद करुन हे अधिवेशन संपण्याअगोदर थकित वेतनासह नियमित वेतन देण्याची व्यवस्था शासन करणार आहे का ? (अडथळा.........)

सन्माननीय श्री.दिवाकर रावते साहेब आपण आता मंत्री आहात. मला याची कल्पना आहे की, आता आपल्याला पुरवणी मागण्यांवर बोलता येणार नाही. आपल्याला चर्चेच्या शेवटी उत्तर द्यावे लागणार आहे. आता तरी शांत राहून आम्हाला सहकार्य करावे.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांमध्ये एक चर्चा आहे. मला याचीही कल्पना आहे की, मुख्यमंत्री महोदयांचे या कार्यपध्दतीबद्दल ठाम मत आहे. परंतु, एक भगिनी म्हणून विनंती करणे हे माझे काम आहे. ई-टेंडरिंग पध्दतीला सर्वांचाच पाठिंबा आहे, ही पध्दत कुणालाही अमान्य नाही. परंतु, स्थानिक विकास निधीच्या संदर्भातील मर्यादा 3 लक्ष रुपयांवरुन 10 लक्ष रुपयांपर्यंत वाढवावी, अशा प्रकारची मागणी मी या ठिकाणी करणार आहे. आज मुख्यमंत्री महोदयांचा वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांना भेट देण्याऐवजी आम्हीच त्यांच्याकडून भेटी मागत आहोत. त्यांनी ही विनंती मान्य करावी, अशी माझी विंनती आहे.

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभागाच्या बाब क्रमंक 303 अन्वये मनोधैर्य योजनेसाठी 34 कोटी, 27 लाख, 35 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. पात्र पीडित महिलांची संख्या 1045 एवढी असूनही त्यांना निधी मिळालेला नाही. या दृष्टीकोनातून शासनाने पावले उचलावित, अशी माझी विनंती आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे........

सभापती महोदय, राज्य महिला आयोगाला सक्रीय करण्याची आवश्यकता आहे, याकडेही मी लक्ष वेधत आहे. राज्य मानवी आयोगासाठी केलेली तरतुदही योग्य आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय गृह विभागाचा कारभार अतिशय चांगल्या पध्दतीने हाताळीत आहेत. गुन्हेगाराला फाशी देण्याचे जाहीर झाल्यानंतर एक चर्चा सारखी अशी सुरु असते की, फाशी देण्याची तयारीच सरकारकडून झालेली नाही. उगाच कुणी कुणाला फाशी देण्यास निघत नाही. आता ज्या वेगाने सर्वोच्च न्यायालयाचे निकाल लागावयास सुरुवात झाली आहे, ते पाहता गुन्हेगार म्हणून शाबीत झालेल्या आरोपींची फाशी न्यायालय कमी करेल, अशी परिस्थिती नाही. म्हणून मला असे वाटते की, आवश्यक तेवढी तरतूद करुन योग्य प्रकारे फाशी देता येईल, अशी व्यवस्था वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये केली पाहिजे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या बाब क्रमाक 88, पृष्ठ क्रमांक 70 अन्वये नागपूर आणि पुणे मेट्रोसाठी तरतूद केलेली आहे. परंतु, पुणे मेट्रोसाठी आज तरी तरतूद कमी प्रमाणात म्हणजे 10 टक्केच दिसत आहे. ती वाढविण्यात यावी, अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आरोग्य विभागाअंतर्गत लस खरेदीसाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या लसी ठेवण्यासाठी वातानुकुलित गोदामे महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात तयार केली पाहिजेत. तसेच, खाजगी बाजारपेठेमध्ये देखील काही लसी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामधील कोणत्या लसी मान्यताप्राप्त आहेत, याची माहिती ग्राहकांना नसते. स्वाईन फ्लु, कावीळ किंवा पिसाळलेली कुत्री चावणे या संदर्भात अद्ययावत उपलब्ध लसींपैकी कोणत्या मान्यताप्राप्त आहेत, याबाबतचे मार्गदर्शन, ज्यांना या लसी विकत घेणे शक्य आहे, त्यांना केले पाहिजे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाचे आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री येथे उपस्थित आहेत. मी एकदा घोडेगाव येथील आरोग्य केंद्राला भेट दिली होती. त्यावेळी तेथील डॉक्टरांनी मला असे सांगितले की, घोडेगाव आरोग्य केंद्र आदिवासी विभागामध्ये मोडत असल्यामुळे आदिवासी विकास विभागाकडून डिझेल आणि वाहनाची व्यवस्था केली जाते. परंतु, दोन वर्षांपासून तेथील वाहन बंद अवस्थेत आहे. डिझेलही आदिवासी विकास विभागाकडून मिळत

...3....

डॉ.नीलम गोऱ्हे........

नाही. त्यामुळे अशा प्रकारचे जे विभागांतर्गत प्रश्न आहेत त्यासंदर्भात या पुरवणी मागणीच्या निमित्ताने न्याय मिळाला तर चांगले होईल.

सभापती महोदय, माळीण गावचे पुनर्वसन, गारपीट, भूकंप यासाठी शासनाने तरतूद केलेली आहे. तसेच, 150 कोटी रुपयांची तरतूद घरांच्या पुनर्वसनासाठी केलेली आहे. लोकसहभागातून लोकाभिमुख पुनर्वसन व्हावे, एवढीच या निमित्ताने अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानते आणि माझे भाषण पूर्ण करते.

धन्यवाद.

------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## लक्षवेधी सूचना व अशासकीय कामकाजाबाबत

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मला एक सूचना करावयाची आहे. दिनांक 13 जुलै, 2015 रोजी कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांवर गोंधळामुळे चर्चा होऊ शकलेली नाही. तथापि, दिनांक 14, 15 व 16 जुलै, 2015 रोजीच्या लक्षवेधी सूचनांवरील चर्चा नंतरच्या कालावधीत घेण्यात आली. दिनांक 13 जुलै, 2015 रोजीच्या लक्षवेधी सूचना राहून गेल्या आहेत. उद्या, परवा किंवा पुढच्या सत्रात या लक्षवेधी सूचना चर्चेला ठेवाव्यात, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अशासकीय कामकाजाचा आमचा अधिकार आहे. परंतु, आतापर्यंत कोणतेही अशासकीय कामकाज झालेले नाही. ठराव, अर्धातास चर्चा किंवा अशासकीय विधेयके यावर सभागृहात चर्चा झालेली नाही. ज्याप्रमाणे आपण लक्षवेधी सूचनांसाठी विशेष बैठकीचे आयोजन करतो त्याप्रमाणेच या अशासकीय कामकाजासाठी देखील विशेष बैठक आपण बोलवावी व हे कामकाज पूर्ण करावे आणि आम्हाला न्याय द्यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, गेले दोन दिवस सकाळी 10.00 वाजता विशेष बैठक बोलाविण्यात येत आहे. विशेष बैठक सकाळी लवकर बोलाविण्यास आमची हरकत नाही. आपण सकाळी 9.30 वाजताही आलो आहोत आणि रात्री 2.00 वाजेपर्यंतही बसलो आहोत. परंतु, गेल्या दोन दिवसातील चित्र असे आहे की, सकाळी 10.00 वाजता सभागृह सुरु झाले तरी मंत्री महोदय उपस्थित नसतात.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, परवा माननीय पीठासीन अधिकारी वेळेत पोहोचू न शकल्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करावी लागली व आज लक्षवेधी सूचना देणारे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बैठक स्थगित करावी लागली आहे.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) :** ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपले भाषण सुरु करावे.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

(चर्चा पुढे सुरु.........)

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दलित, आदिवासी, ओबीसी, भटका व विमुक्त समाज हा आपल्या समाज व्यवस्थेतील सर्वात शेवटचा, उपेक्षित, वंचित आणि शेवटच्या पायरीवर आहे आणि पुरवणी मागण्यांच्या क्रमवारीतही या समाजाशी संबंधित सामाजिक न्याय विभाग हा शेवटच्या पायरीवर आहे.

सभापती महोदय, सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी औषधे, आरोग्य, शुध्द पाणी, निवास व्यवस्था, कर्मचारी वर्ग यासाठी असलेल्या केंद्रांना मदत करण्यासाठी शासनाने तरतूद केली आहे, त्याचे मी स्वागत करतो. हे करीत असताना वर्तमानपत्रामध्ये मी एक बातमी वाचली. आषाढी एकादशीसाठी संपूर्ण वारकरी लोक पंढरपूरला निघाले आहेत. ते दर वर्षी पंढरपूरला जातात, ही 700 वर्षांची परंपरा आहे.

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

आमच्या सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून वारकऱ्यांना टाळ आणि मृदंग देण्याची व्यवस्था केली जाणार आहे. मला एक गोष्ट कळत नाही की, आपण 14 हजार कोटी 73 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर केलेल्या आहेत. त्यामध्ये वारकऱ्यांना टाळ आणि मृदंग देण्यासाठी 20-25 कोटी रुपयांची तरतूद केली असती तर काय बिघडले असते ? परंतु, वंचित, मागासवर्गीय समाजाच्या तोंडचा घास काढण्याचा हा जो प्रयत्न आहे तो बरोबर नाही. माझी सामाजिक न्याय मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी ही व्यवस्था आपल्या विभागाकडून करण्याऐवजी शासनाच्या माध्यमातून करावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.215, बाब क्र.188, भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्त्यांसाठी अतिरिक्त तरतूद करणे यासाठी ही पूरवणी मागणी करण्यात आली आहे. अनुसूचित जाती, जामातीच्या पात्र विद्यार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे शिष्यवृत्ती प्रलंबित राहिली आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे शिष्यवृत्ती देण्यासाठी आपण जी पूरक मागणी केली आहे, ती उचित आहे. परंतु, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी विलंब होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची मोठी आबाळ होते. म्हणून विभागाने याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.215, बाब क्र.189, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती साजरी करण्यासाठी तरतूद करणे यासाठी ही पूरवणी मागणी करण्यात आलेली आहे. शासनाने सन 2015-16 हे वर्ष सामाजिक न्याय आणि समता वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. याबाबतचा कृती आरखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे, ही बाब देखील अत्यंत आनंदाची आहे. या प्रयोजनासाठी 125 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, याचे देखील मी स्वागत करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.216, बाब क्र.191, विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना दिवंगत वसंतराव नाईक गुणवत्ता बक्षीस योजनेसाठी तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे. आपल्या देशात एक समाज असा आहे की, तो दोन स्वातंत्र्य दिन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

साजरे करतो. आपल्या देशाला दिनांक 15 ऑगस्ट, 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले. देशातील भटक्या विमुक्त जमाती, ज्या डिनोटिफाईड कास्ट होत्या, ज्या गुन्हेगारी जमाती होत्या तो कायदा दिनांक 31 ऑगस्ट, 1952 रोजी तत्कालीन पंतप्रधान श्री.जवाहरलाल नेहरु यांनी रद्द केला आणि त्यातून या जमातींना मुक्त केले. म्हणून आमचा भटक्या विमुक्त समाज 15 ऑगस्ट आणि 31 ऑगस्ट हे दोन्ही दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करतो. मसन जोशी, पारधी, कोल्हाटी, कंजार भट, पोतराज, रायरंद, डोंबारी, मरीआई, माकडवाले, गांधळी, अस्वलवाले, गारुडी, नाथजोगी, भराडी, भामटा, वडार, छारा, सिकलगारा, गोसावी, घिसाडी, कैकाडी, रामोशी, गोपाल, जोशी, नंदीवाले, छप्परबंद, वासुदेव, बहुरुपी हा आमचा भटक्या विमुक्त समाज आहे. या भटक्या विमुक्त समाजासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहेत. विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी नव्याने सुरु करण्यात आलेल्या दिवंगत वसंतराव नाईक गुणवत्ता बक्षीस योजनेसाठी 25 लक्ष 68 हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे, त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.217, बाब क्र.193, इयत्ता 8 वी पर्यंतच्या शारीरिकदृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व उद्योगातील प्रशिक्षण यासाठी अतिरिक्त तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मी या मागणीचे समर्थन करतो. तसेच, पृष्ठ क्र.219, बाब क्र.197, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन येथे वास्तव्य केलेल्या घराची खरेदी करण्यासाठी तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सन 1921-22 मध्ये शिक्षण घेण्यासाठी लंडन येथे गेले होते आणि तेथे ते ज्या घरात राहिले ते घर महाराष्ट्र शासनाच्या वतीने केंद्र शासनाच्या माध्यमातून विकत घेऊन त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे उचित स्मारक तयार करण्यासाठी आपण 40 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी त्यांच्या भाषणात याबाबत उल्लेख केलेला आहे. त्यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या संमतीनंतर इंग्लंडमधील भारतीय उच्चायुक्त यांना महाराष्ट्र शासनामार्फत या संबंधातील करार करणे यासाठी जी तरतूद केलेली आहे, याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

सभापती महोदय, शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण विभाग, पृष्ठ क्र.57, बाब क्र.71, शिक्षक प्रशिक्षण योजनेच्या वेतनावरील खर्चासाठी तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मी एक बाब आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शिक्षकांचे प्रशिक्षण ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. त्यामध्ये केंद्र शासनाचा 75 टक्के आणि राज्य शासनाचा 25 टक्के हिस्सा आहे. अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत ही योजना राबविण्यात येते. केंद्र शासनाने अनुसूचित जातीसाठीच्या विशेष घटक योजने अंतर्गत या योजनेसाठी 4 कोटी 71 लाख 54 हजार रुपये एवढा निधी दिलेला आहे. राज्य शासनाने या योजनेच्या प्रयोजनासाठी 6 कोटी, 28 लाख 72 हजार रुपयांची पुरवणी मागणी प्रस्तावित केलेली आहे. ही पुरवणी मागणी उचित आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.57, बाब क्र.72, आदर्श शिक्षकांना पुरस्कार देण्यासंबंधीचा खर्च भागविण्यासाठी जी पुरवणी मागणी करण्यात आली आहे, त्याचे मी समर्थन करतो. परंतु, मी शालेय शिक्षण विभागाचे एका बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो की, केंद्र शासनाने पुरस्कृत केलेली अपंग सुवर्ण सर्व समावेशी शिक्षण योजना सन 1978 मध्ये सुरु करण्यात आली आणि अलीकडे ती योजना राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत सन 1990 पूर्वी 26 शिक्षक काम करीत होते. सन 2009 पूर्वी 77 शिक्षक काम करीत होते आणि सन 2009 नंतर 1350 शिक्षक काम करीत आहेत. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. श्रद्धानंद पेठ येथे कुरवेज न्यु मॉडेल हायस्कुल आहे. तेथील शिक्षकांचा हा प्रश्न आहे. अपंग सुवर्ण सर्व समावेशी शिक्षण योजने अंतर्गत हे शिक्षक काम करीत आहेत. सन 1990 पूर्वी जवळपास 26 शिक्षक होते. त्यांना मागील 3 वर्षापासून वेतन मिळालेले नाही. ही अत्यंत दु:खाची गोष्ट आहे. त्यांनी या संदर्भात वारंवार संबंधित अधिकाऱ्यांना विनंती केली, पत्रव्यवहार केला. परंतु, सन 2010-11 पासून वेतनाची अदाई प्रलंबित आहे. सन 1990 पूर्वी काम करीत असलेल्या सर्व शिक्षकांना पगार देण्याच्या संदर्भात थोडा गैरसमज झाला, गोंधळ झाला आणि प्रशासनाची चूक झाल्यानंतर किती

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

गोंधळ उडतो याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. या शिक्षकांचे वेतन योजनेतर लेखाशीर्ष 2253-2976 यातून देण्यात यावे. परंतु लेखाशीर्षाचा क्रमांक चुकल्यामुळे त्यांना मागील 3 वर्षापासून वेतन मिळाले नाही. या संदर्भात लवकरात लवकर दुरूस्ती झाली तर या शिक्षकांना देखील न्याय मिळेल आणि ते आणखी उत्कृष्टपणे काम करतील. ते शिक्षक आजही अत्यंत चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. समाजाचा शिक्षकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन अत्यंत वेगळा असतो. आपण समाजाची आदर्श प्रतिमा म्हणून शिक्षकांकडे पाहत असतो आणि अशा प्रकारचे आदर्श शिक्षक घडावेत, निर्माण व्हावेत, यासाठी आपण जी मागणी केलेली आहे त्याचे मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.59, बाब क्र.77, क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यासाठी तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

आमच्या देशाची लोकसंख्या जवळपास 150 कोटीच्या जवळपास आहे, खेळाडुंची संख्या मात्र पाहिजे तशी वाढलेली नाही, राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवर ऑलिम्पिक व एशियन गेम्समध्ये आपल्या राज्यातील खेळाडूंची संख्या वाढायला पाहिजे. उत्कृष्ट खेळाडू निर्माण झाले पाहिजेत. यासाठी उत्कृष्ट प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. तज्ज्ञ क्रीडा शिक्षक असले तर तरबेज खेळाडू तयार होतील. याबाबत शासनाने विशेष प्रयत्न करावेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक 330 व बाब क्रमांक 301 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, मध्यवर्ती जिल्हा व तालुका ग्रंथालयांची संख्या 11996 इतकी आहे. ही सर्व ग्रंथालये राज्यात मान्यताप्राप्त आहेत, सार्वजनिक ग्रंथालयामध्ये सहाय्यक ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी 62 कोटी, 27 लाख 54 हजार रुपये इतक्या रकमेची पूरक मागणी करण्यात आली आहे, त्याचे मी अभिनंदन करतो. कारण ग्रंथालयांचे प्रमाण राज्यात वाढविले पाहिजे. ग्रामीण भागात वाचन संस्कृतीचा प्रसार व प्रचार झाला पाहिजे. वाचनाच्या माध्यमातून आमचा समाज पुढे गेला पाहिजे, शिक्षित झाला पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, शिक्षित व्हा, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा शिक्षणाचा मंत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी फक्त अनुसूचित जाती जमातीसाठी दिला नसून देशातील सर्व जनतेला दिलेला आहे. शिक्षण सर्वव्यापी व्हावे व समाज समंजस व्हावा, शहाणा व्हावा यासाठी ग्रंथालयांची आवश्यकता आहे. यासाठी जी पूरक मागणी केली आहे तिचे मी समर्थन करतो.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती आहे, मुख्यमंत्री महोदयांना याची माहिती असेल, गेल्या दोन वर्षात या समितीच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा एकही ग्रंथ प्रकाशित झाला नाही. यामुळे वर्तमानपत्रातून शासनावर सातत्याने टीका केली जात आहे, या प्रकाशन समितीमध्ये जे सदस्य आहेत त्यांच्यावर देखील टीका केली जात आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समितीसोबतच महर्षी महात्मा ज्योतिबा फुले आणि राजर्षी शाहू महाराजांच्या ग्रंथांचे प्रकाशन करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीचा कारभार देखील व्यवस्थित चालत नाही. मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या थोर पुरुषांच्या चरित्राच्या ग्रंथांचे प्रकाशन करावे त्यांनी जे साहित्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

लिहिले आहे ते लोकांपुढे आले पाहिजे, याकडे आपण विशेष लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण पृष्ठ क्रमांक 297 बाब क्रमांक 260 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, नागपूर येथील मेयो सर्वोपचार रुग्णालय, स्पेशालिटी हॉस्पिटल व अति स्पेशालिटी हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज नागपूर, मुंबईत पोद्‌दार रुग्णालय आहे, त्याचप्रमाणे वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे आहे. यामध्ये यंत्र सामुग्री व इतर साधनसामुग्री दुरुस्ती परीरक्षण व खर्च भागविण्यासाठी 71 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. नागपूर येथे दिल्लीतील एम्स सारखे वैद्यकीय संशोधन व उपचार संस्था निर्माण करण्याचा आपण निर्णय घेतला आहे, परंतु त्याबाबत काय झाले, हा प्रकल्प कोठपर्यंत आला, याची माहिती मिळालेली नाही. नागपूर येथील मयो सर्वोपचार रुग्णालय अत्यंत महत्वाचे आहे, यामध्ये जास्तीत जास्त नूतनीकरण कसे करता येईल, त्याचा लाभ रुग्णांना कसा मिळेल, मेयो हॉस्पिटल येथे मेडिकल कॉलेज आहे, मयो हॉस्पिटल चांगले करण्याचा अनेक वर्षापासून प्रयत्न सुरु आहे. यामध्ये जी यंत्रसामुग्री आहे त्याबाबत काल सभागृहात एक प्रश्न विचारण्यात आला होता, अनेक सरकारी हॉस्पिटल मधील सी.टी.स्कॅन मशीन बंद पडले आहेत, यंत्रसामुग्री बरोबर मिळत नाही. त्यामुळे गरीब लोकांची मोठी आबाळ होत आहे, याबाबत आपण विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण पृष्ठ क्रमांक 282 बाब क्रमांक 242 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी, राज्य सरकारी विमा योजना, मुंबईतील परळ येथील महात्मा गांधी स्मारक रुग्णालय यासाठी जी पूरक मागणी करण्यात आली आहे तिचे मी समर्थन करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 283 बाब क्रमांक 244 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, महाराष्ट्र आरोग्य सेवेतील, कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एकत्रित मानधन देण्यासाठी पूरक मागणी करण्यात आली आहे. कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पध्दत रद्द करुन कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकाऱ्यांना कसे घेता येईल याचा आपण गंभीरपणे विचार केला तर वैद्यकीय सेवा सुधारण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 284 बाब क्रमांक 286 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, नागपूर येथील डागा स्मृती रुग्णालयासाठी यंत्रसामुग्री व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी जी पूरक मागणी करण्यात आली आहे ती योग्य आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांना नागपूरची माहिती अत्यंत चांगल्या पध्दतीने आहे, पृष्ठ क्रमांक 288 बाब क्रमांक 255 वर बोलत असताना सिकलसेल आजाराबाबत मंत्री महोदय डॉ.दीपक सावंत यांना चांगली माहिती आहे. सिकलसेलने जे रुग्ण व्याधीग्रस्त व आजारी आहेत, अशा रुग्णांना एस.टी.महामंडळाने मोफत प्रवास करण्याची सुविधा दिलेली आहे, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते मी आपणाला धन्यवाद देतो, मुख्यमंत्री महोदय व आपण देखील अभिनंदनास पात्र आहात. सिकलसेल हा आजार प्रामुख्याने विदर्भात जास्त प्रमाणात होत आहे. यामध्ये गरीब समाज जास्त आहे, त्यामुळे आपण ही सवलत दिली ती अत्यंत योग्य आहे.

सभापती महोदय, कुटुंब कल्याण पृष्ठ क्रमांक 288 यामध्ये वैद्यकीय महाविद्यालयातून कुटुंब नियोजनाचे शिक्षण देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे, त्याचे मी स्वागत करतो. स्वातंत्र्यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कुटुंब नियोजनाचे महत्व विशद केले होते. आता लोकसंख्येची वाढ व लोकसंख्येचा विस्फोट सुरु झाला आहे, वाढती लोकसंख्या विकास खाऊन टाकते. त्यामुळे विकासाचे चित्र दिसत नाही. लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंब नियोजनाचे धोरण स्वीकारले आहे, अगोदर अशी घोषणा देण्यात आली होती की, 'हम दो हमारे दो', त्यानंतर 'हम दो हमारा एक' अशी घोषणा पुढे आली. कुटुंब नियोजनाची संकल्पना अतिशय चांगली आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, केंद्रीय स्तरावरील काही महंत मंडळी कुटुंबे वाढवा अशा प्रकारची वक्तव्ये करीत आहेत, देशाच्या व सरकारी धोरणाच्या विरोधात अशा प्रकारे बोलले जात आहे त्यावर प्रतिबंद घालण्याची गरज आहे, असे मला वाटते, साधू, संत, सांध्वी यांनी ही वक्तव्ये केली आहेत, मुल्ला मौलवी यांनी अशी वक्तव्ये केली नाहीत.

सभापती महोदय, कृषी विभागाच्या संदर्भात पृष्ठ क्रमांक 26 बाब क्रमांक 30 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या आत्महत्येला प्रतिबंध घालण्यासाठी व त्यासाठी उपाययोजना करण्यासाठी सन 2015-16 मध्ये तरतूद करण्यात आली आहे ती योग्य आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 27 बाब क्रमांक 34 सन 2015-2016 मध्ये दुष्काळग्रस्त व नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी 481 कोटी 74 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळेल असे मला वाटते.

सभापती महोदय, कृषी विभागाच्या संदर्भात पृष्ठ क्रमांक 41 बाब क्रमांक 44 राज्यामध्ये राष्ट्रीय कृषी विमा योजना कार्यान्वित करण्यात आली आहे, लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे व रोगराईमुळे नुकसान होते.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

अशा लोकांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यात येते. भारतीय कृषी विमा कंपन्यांनी 2014 च्या हंगामामधील दाव्यांना मान्यता दिली आहे. विमा कंपन्यांना राज्याच्या वाट्याची रक्कम देण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे, त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये चार कृषी विद्यापीठे आहेत. कोकणातील बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी जिल्हयातील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ ही चार कृषी विद्यापीठे आपल्या राज्यात कार्यरत आहेत. देशात कोणत्याही राज्यात एकापेक्षा अधिक कृषी विद्यापीठे नाहीत. हरियाणा राज्यामध्ये एकच कृषी विद्यापीठ आहे. महाराष्ट्र भाग्यशाली राज्य आहे. ज्या राज्यामध्ये चार-चार कृषी विद्यापीठे आहेत. परंतु कृषी क्षेत्राच्या अनुषंगाने पिकांवरील रोगराई, नवीन वाण निर्मिती या संदर्भात शेतकऱ्यांना मदत होण्याच्या दृष्टीने जे संशोधन झाले पाहिजे तसे संशोधन होताना दिसत नाही, याबाबत शासनाने गंभीरपणे विचार करावा.

सभापती महोदय, नगरविकास विभाग बाब क्रमांक 88, पृष्ठ क्रमांक 70 वर नागपूर आणि पुणे येथील मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे, त्याचे मी समर्थन करतो. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 66, बाब क्रमांक 81 अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान हा कार्यक्रम अत्यंत महत्वाचा आहे. राष्ट्रीय स्तरावर स्वच्छ भारत अभियान सुरु आहे. महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत स्तरावर अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. राज्याने देखील केंद्र सरकारच्या अभियानाचे अनुकरण करून स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरु केलेले आहे. या राज्यात संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता मोहीम सुरु होती, ती बंद झाली की सुरु आहे याची आम्हाला माहिती नाही. नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरु केले आहे. त्यातील सप्तपदी हा प्रकार काय आहे हे आम्हाला कळले पाहिजे. लग्नामध्ये सात फेरे घालतात त्याला सप्तपदी म्हटले जाते. परंतु स्वच्छ महाराष्ट्र अभियानामधील सप्तपदी ही काय भानगड आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. स्व.आर.आर.पाटील हे राज्याचे ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी राज्यामध्ये संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता मोहीम सुरु केली होती. ती मोहीम आजही सुरु आहे की बंद करण्यात आली आहे याचा खुलासा करण्यात यावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र स्थापन करण्याची मागणी प्रलंबित आहे. नागपूरच्या यशवंत स्टेडियमच्या मागील बाजूस असलेली जागा नागपूर महापालिकेच्या ताब्यात आहे. नागपूर महापालिकेमध्ये भारतीय जनता पक्षाची सत्ता होती आणि आजही आहे. त्या महापालिकेने या संदर्भात ठराव केला आणि 2 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आघाडी सरकारच्या काळात महसूल विभागाची अडचण होती, आता भारतीय जनता पक्ष सत्तारूढ असल्यामुळे महसूल विभागाची अडचण दूर करावी. नागपूरच्या यशवंत स्टेडियमच्या मागील जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र व्हावे ही महाराष्ट्राच्या जनतेची अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण करावी. याकरिता महसूल विभागाची अडचण येऊ नये अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभाग बाब क्रमांक 19, पृष्ठ क्रमांक 15 वर राज्य मानवी हक्क आयोगासाठी 35.48 लाख रुपयांची पुरवणी मागणी सादर केली आहे. राज्यामध्ये मानवी हक्क उल्लंघनाचे दररोज अनेक प्रकार घडत आहेत. पत्रकारांना मारले जात आहे. पोलीस ठाण्यामध्ये आरोपीच्या नावाखाली मुडदे पाडले जातात. दलितांवर अनन्वित अत्याचार होत आहेत. दोन दिवसापूर्वी शिर्डी येथे सागर शेजवळ नावाच्या तरुणाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील गाण्याची ट्यून वाजविली म्हणून त्याला मारण्यात आले. खैरलांजी व जवखेडा प्रकरणाचे उदाहरण समोर आहे. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारे मानवी हक्काचे उल्लंघन केले जात आहे. राज्यातील दलितांसाठी ही चिंतेची बाब आहे. या मानवी हक्क आयोगाला जास्तीत जास्त अधिकार कसे देता येतील आणि हा आयोग कृतीशील कसा होईल, दलितांवरील अत्याचार कसे थांबविता येतील या दृष्टीने सरकारने विचार करावा.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाने बाब क्रमांक 9, पृष्ठ क्रमांक 6 वर कोल्हापूर येथील शाहु महाराजांचे स्मारक उभे करण्यासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. परंतु या पुरवणी मागणीद्वारे फक्त 10 लाख रुपयांची तरतूद केली आहे याचे वैषम्य वाटते. मागील सरकारने काय केले ते जाऊ द्या. जूने जाऊ द्या मरणालागुनी. नई गिल्ली नया राज या पध्दतीने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कोल्हापूर येथील शाहु महाराजांचे स्मारक लवकरात लवकर पूर्ण व्हावे. आघाडी सरकारने वाट घालून दिली आहे त्या वाटेवर जोमाने चालावे ही अपेक्षा आहे.

...3...



प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 2 वर महान राष्ट्रीय पुरुषांचे पुतळे उभे करण्यासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. छत्रपती शिवरायांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक अरबी समुद्रात उभारण्यात येणार आहे. इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक लवकरात लवकर व्हावे अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, राज्यामधील पुरातत्व विभागाच्या संदर्भात मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विधानसभेत विनियोजन विधेयक संमत झाले आहे ते विधेयक या सभागृहात तातडीने मंजूर करणे गरजेचे आहे.

**तालिका सभापती** (श्री.दीपकराव साळुंखे) : माननीय सदस्य डॉ.जोगेंद्र कवाडे यांचे भाषण पूर्ण झाल्यानंतर विनियोजन विधेयक घेण्यात येईल. माननीय सदस्यांनी आपले भाषण पूर्ण करावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, पुरातत्व विभागाने किल्ल्यांचे जतन, ऐतिहासिक वास्तूंचे व हेरिटेज वास्तूंचे जतन करण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे.

नंतर 2ओ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

आमच्या राज्यामध्ये बौद्ध संस्कृतीचे अनेक मौल्यवान अवशेष आहेत. पण त्याचे पद्धतशीरपणे विकृतीकरण सुरू आहे. मग नालासोपाऱ्यातील सोपारा येथील स्तूप असेल. आमच्या साताऱ्या जवळ, कराड जवळ आगाशिव लेण्या आहेत, महाड जवळच्या लेण्या आहेत, कोकणातील लेण्या आहेत, कन्हेरीच्या लेण्या आहेत, अशा अनेक लेण्या आहेत की त्यांचे विकृतीकरण करण्यात येत आहे. कार्ला-भजाच्या लेण्या आहेत. कार्ला लेणीच्या पुढे एक देवी बसवून त्या बौद्ध लेण्यांचे विकृतीकरण करण्यात आले. हे विकृतीकरण थांबवले पहिजे. बौद्ध संस्कृती ही या देशाची पुरातन संस्कृती आहे. या पुरातन संस्कृतीचे जतन झाले पाहिजे या दृष्टीकोनातून सरकारने प्रयत्न करावा. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

.....

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक

L.A. BILL NO. XXXVIII OF 2015
( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2016.)

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 38 - दिनांक 31 मार्च 2016 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती :** ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्या अर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**पृ.शी./मु.शी.:** सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आपण मला पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

मी पृष्ठ क्र.70 वरील बाब क्रमांक 88 वर बोलणार आहे. या पुरवणी मागणीद्वारे नागपूर व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. ठाण्याच्या प्रकल्पासंदर्भात फक्त सल्लागार नेमणे व सर्वेक्षण करणे या खेरीज अन्य कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या सभागृहात दिनांक 8 एप्रिल 2015 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हा सर्वांना आश्वासित केले होते की, याच वर्षी ठाणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात येईल. आज जुलै महिना सुरू आहे. पण त्यासंबंधातील चिन्हे काही दिसत नाही. त्यामुळे शासन ठाणेकरांशी दुजाभाव करीत आहे की काय अशी भावना माझ्या सारख्या कार्यकर्त्यांच्या मनात येते. आपण हा प्रकल्प मार्गी लावावा अशी मी माननीय मंत्र्यांना विनंती करीत आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना अशी विनंती करतो की, ठाणे येथे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याबाबत ठाणेकर जनतेची आग्रही मागणी आहे. येथे असणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये सध्या काय स्थिती आहे. तेथे पेशंटला महिनोनमहिने वाट पहावी लागते. ठाण्यामध्ये जागा आरक्षित आहे. जागा आपण निश्चित केलेली आहे. टाटा हॉस्पिटलची तेथे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याची तयारी देखील आहे. त्या जागेचे आपण ताबडतोब भूमिपूजन केले तर काम सुरू होईल. याद्वारे कॅन्सर पेशंटला व त्यांच्या नातेवाईकांना फार सोयीचे होईल. यातून पूर्ण समाजाची फार चांगली सेवा होऊ शकेल. तेव्हा याबाबत देखील आपणाकडून सुस्पष्टता यावी अशी मी विनंती करीत आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे...

यानंतर मी पृष्ठ क्र.45 वरील गृह विभागाच्या बाब क्रमांक 23 वर बोलणार आहे. या पुरवणी मागणीद्वारे सन 2015-16 या वर्षासाठी प्रयोगशाळेसाठी कार्यालयीन इमारत बांधकाम यासाठी आर्थिक तरतुदीची मागणी करण्यात आली आहे. तथापि, गेल्या वर्षी राज्यातील गुन्हा सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक पोलीस आयुक्तांच्या नियंत्रणाखाली अशा एकूण 45 न्यायवैद्यक प्रयोगशाळा निर्माण करण्याचा माहे जानेवारी, 2015 मध्ये राज्य शासनाने निर्णय घेऊन त्याकरिता रक्कम रूपये 1 कोटीची आर्थिक तरतूद देखील करण्यात आली होती. तेव्हा आता पर्यंत 45 पैकी किती न्यायवैद्यक प्रयोयशाळा पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्याबाबतची सद्य:स्थिती उत्तरात द्यावी अशी मी विनंती करतो.

आता मी पृष्ठ क्र.27 वरील महसूल विभागाच्या बाब क्रमांक 34 वर बोलणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य करण्यासाठी पुरवणी मागणीद्वारे आर्थिक तरतूद मागण्यात आलेली आहे. ही मागणी आपण वाढविली असती तर कर्ज माफी देखील देता आली असती. यासंदर्भात सविस्तर चर्चा झालेली आहे. आपल्या उत्तरामध्ये वाढीव रक्कम द्याल अशी आमची अपेक्षा आहे. आमची अपेक्षा आपण पूर्ण करावी ही विनंती.

यानंतर मी पृष्ठ क्र.27 वरील बाब क्रमांक 35 वर बोलणार आहे. या पुरवणी मागणीद्वारे माळीण गावाच्या पुनर्वसनासाठी आथिर्क तरतूद करण्यात आली आहे. तथापि, माळीण गावाच्या बाधित कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याबाबत पुणे जिल्हा प्रशासनाने शासनाकडे वारंवार प्रस्ताव सादर करूनही त्याबाबत अद्याप कार्यवाही झालेली नाही. सदर दुघर्टनाग्रस्त 72 कुटुंबाचे मौ.अडिवरे आणि कशाळवाडी येथे तात्पुरते पुनर्वसन करण्याचे व त्यासाठी सुमारे 6 कोटी 19 रूपये किंमतीच्या दिनांक 3 जून 2015 रोजी निविदा काढण्यात आल्या. त्यामुळे याकरिता त्वरित निधी उपलब्ध करून द्यावा म्हणून पुणे जिल्हा प्रशासनाने वेळोवेळी मागणी केलेली असून शासनाकडून अद्यापही निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. याचे कारण म्हणजे सदरचे पुनर्वसन करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने निधी द्यावयाचा की, मदत व पुनर्वसन विभागाने द्यावयाचा याबाबत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे...

शासन स्तरावर एकमत न झाल्याने निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही. तरी याबाबत मंत्री महोदयांनी लक्ष घालून हा निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

यानंतर मी पृष्ठ क्र.329 वरील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्र.296 वर बोलणार आहे. या पुरवणी मागणीद्वारे तंत्रशिक्षण विद्यापीठे अशासकीय अनुदानित तंत्र महाविद्यालये यांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन प्रदान करण्याबाबत आर्थिक तरतुदीची मागणी सादर केली आहे. तथापि, सन 1988 पासून राज्यातील 1329 संस्थांमधून 10+2 स्तरावरील किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम Former MCVC पूर्णवेळ निदेशक अशी पदे निर्माण करण्यात आली आहेत. हा प्रश्न आपण स्वत: देखील अनेक वेळा सभागृहात उपस्थित केलेला आहे. राज्यातील पूर्णवेळ शिक्षक व पूर्णवेळ निदेशक हे विद्यार्थ्यांना शिकवित असून या दोन्ही पदांच्या कार्यात काहीच फरक नसल्याचे तंत्र शिक्षण संचालनालयाने मान्य करतना तसा अहवाल शासनास सादर केला आहे. असे असताना पूर्णवेळ निदेशकांना पूर्णवेळ शिक्षकांपेक्षा वेतनश्रेणी कमी पे ग्रेड देण्यात येत आहे. वास्तविकत: देशपातळीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सदर अभ्यासक्रमासाठी पूर्णवेळ निदेशक असे कोणतेही पदच निर्माण केले नसताना राज्य सरकारने मात्र पूर्ण वेळ शिक्षक व पूर्ण वेळ निदेशक असे दोन वेगवेगळे संवर्ग निर्माण करून पूर्णवेळ निदेशकांवर आर्थिकदृष्ट्या अन्याय केला आहे. याबाबत मी स्वत: या खात्याचे संबंधित संचालक तसेच माननीय मंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ही विसंगती त्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. तेव्हा माननीय मंत्र्यांना मी विनंती करतो की, त्यांनी या प्रकरणी तातडीने लक्ष घालून संबंधित पूर्ण वेळ निदेशकांवरील अन्याय दूर करावा.

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे...

आता मी पृष्ठ क्र.329 वरील बाब क्रमांक 297 वर बोलणार आहे. या मागणीद्वारे शासकीय माध्यमिक तंत्र शाळांसाठीचा प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी आर्थिक तरतूद मागण्यात आली आहे. सलग 12 वर्षे कायम सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात येत. त्या प्रमाणे काही विद्यालयांमध्ये वरिष्ठ श्रेणी लागू करण्यात आलेली नाही. वास्तविकता शालेय शिक्षण विभागाने आपल्या अखत्यारितील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती दिनांकापासून 12 वर्षे सेवा हा कालावधी ग्राह्य धरून त्यानुसार त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ दिला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे ...

मात्र या प्रकरणी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने वेगळी भूमिका घेऊन या विद्यालयाच्या निदेशाकावर अन्याय केला आहे. तरी, शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर तंत्रशिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांप्रकरणी देखील असाच निर्णय तातडीने घेण्याबाबत कृपया उचित कार्यवाही व्हावी, अशी मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 241, पृष्ठ क्रमांक 275, गृहनिर्माण विभागाच्या मागणीवर मी आता विचार मांडणार आहे. गृहनिर्माण विभागाच्या मागणीद्वारे गृहनिर्माण योजनेसाठी (पायाभूत सुविधा) मुंबई शहर व मुंबई उपनगरातील झोपडपट्टी क्षेत्रात राहत असलेल्या नागरी गरिबांच्या गृहनिर्माण योजनेसाठी आर्थिक तरतूद मागण्यात आली आहे. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांच्या कडून दिनांक 18.6.2014 रोजी वा त्या सुमारास ठाणे येथील बाळकुंम येथे जो गृहनिर्माण प्रकल्प आहे त्या कामाला अजूनही वेग आलेला नाही. कृपया या कामाला वेग यावा अशी मी या माध्यमाने विनंती करीत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 99, पृष्ठ क्रमांक 89, रायगड जिल्हयातील ग्रुप ग्रामपंचायत नाते, ता. महाड, जि. रायगड येथील, काळोसे ते नाते गाव जोडरस्ता पुलाच्या कामास शासनाने सन 2008 मध्ये मंजुरी प्रदान केली होती व त्यावेळी सदरहू कामाची अंदाजित रक्कम रुपये 1.28 कोटी इतकी होती. त्यानंतर ते काम डिसेंबर, 2012 मध्ये सुरु करण्यात येऊन सद्यःस्थितीत 40 टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित 60 टक्के काम सुधारित प्रशासकीय मान्यता व निधी अभावी प्रलंबित असल्याचे समजते. सदरचा पूल हा 7 वर्षे अपूर्ण स्थितीत आहे, त्यामुळे नाते गावातील आढी, आबार्ले, डोंगराली, नांदगाव बु.कवळी, कुंभारकोंड, मिरेकोड इत्यादी गावातील लोकांना पावसाळयामध्ये ये-जा करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. हे लक्षात घेता ग्रुप ग्रामपंचायत नाते येथील काळोसे ते नातेगाव जोडरस्ता पुलाच्या कामासाठी सुधारित प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभाग (परिवहन) बाब क्रमांक 18,पृष्ठ क्रमांक 15. मुंबईला जोडून ठाणे,कल्याण, उल्हासनगर ही शहरे आहेत. मुंबईलगत 7 महानगरपालिका आहेत. या 7 शहरांना

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे ...

युनिफाईड ट्रान्सपोर्टची अत्यंत गरज आहे. रस्त्यावरील वाढती वाहतुक विचारात घेता त्यासाठी युनिफाईड पब्लीक ट्रान्सपोर्ट दिला तर निश्चितपणे त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. केवळ फ्लाय ओव्हर ब्रीज बांधून प्रश्न सुटणार नाही तर एक चांगली इफेक्टीव्ह पब्लीक ट्रान्सपोर्ट व्यवस्था दिली व त्यासाठी स्मार्ट कार्ड व जीपीएसच्या संदर्भात जेएनएनयुआरएमच्या ज्या सवलती अगोदर होत्या त्या सवलती दिल्या तर आपण लोकांना चांगल्या प्रकारे सेवा देऊ शकतो व ही काळाची गरज आहे. त्यामुळे मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो की, युनिफाईड ट्रान्सपोर्ट सिस्टीम व त्यामध्ये स्वाईप कार्डची महत्वाची नोंद असावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 249, पृष्ठ क्रमांक 285, सार्वजनिक आरोग्य विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. स्वाईन फ्लूच्या उपचाराचा खर्च भागविण्यासाठी सदर पुरवणी मागणी करण्यात आली आहे. या विषयावर आज सकाळी नियम 93 अन्वयेची सूचना उपस्थित करण्यात आली होती. लेप्टोने 16 नागरिकांचा मृत्यू झालेला आहे. लेप्टोचा आजार मालाड आणि उपनगराच्या भागात मोठया प्रमाणात झाला असून त्यामध्ये 60 लोकांचे निदान झाले होते त्यापैकी 16 लोकांचा मृत्यू झाला असून जवळपास 50 टक्के लोक या आजारामध्ये मृत्युमुखी पडले आहेत. आता पुन्हा पावसाळयाने जोर पकडला आहे. त्यामुळे या आजाराच्या उपचारासाठी महानगरपालिकेच्या त्या त्या हॉस्पिटल्समध्ये औषधे उपलब्ध आहेत काय ? स्वाईन फ्लूच्या बाबतीतही आर्थिक सहाय्य प्रत्येक हॉस्पिटलला पोहचले आहे की, नाही हे बघणे महत्वाचे आहे.
या ठिकाणी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर): सभापती महोदय, आपण मला पूरक मागण्यांवर विचार मांडण्याची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय,क्रीडा व युवक सेवा अंतर्गत बाब क्रमांक 73, पृष्ठ क्रमांक 58 वर 89 लाख 27 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता विद्यार्थी व युवकांसाठी युवक कल्याण कार्यक्रम राबविणे हे या विभागाच्या माध्यमातून अपेक्षित आहे. परंतु आपल्या असे लक्षात येते की, क्रीडा क्षेत्राच्या पलीकडे जाऊन युवक कल्याणाच्या दृष्टिकोनातून विविध प्रकारचे उपक्रम अत्यंत कमी प्रमाणात राबविण्यात येतात. या निमित्ताने माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण जी तरतूद केली आहे त्याबद्दल अभिनंदन. परंतु ही तरतूद थोडी वाढवून युवक कल्याणाच्या, युवकांच्या कौशल्य विकास, युवकांच्या ॲटीटयूडच्या दृष्टिकोनातून आणि कौन्सिलिंगच्या दृष्टिकोनातून देखील या विभागाच्या माध्यमातून योजना राबविणे अत्यंत गरजेचे आहे अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 260,पृष्ठ क्रमांक 297 वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्यासाठी 1.72 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बाब क्रमांक 261, पृष्ठ क्रमांक 297 यासाठी 71 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बाब क्रमांक 262 व पृष्ठ क्रमांक 297 यासाठी 4.32 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अगोदर जी तरतूद केली होती ती अपुरी पडल्यामुळे या नवीन तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, नागपूरचे मयो रुग्णालय व महाविद्यालय, सरकारी मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल आणि अति विशेषोपचार रुग्णालय या तीनही ठिकाणी यंत्र सामुग्रीची कमतरता आहे. अनेक वेळा प्रोव्हीजन करुनही प्रशासकीय मान्यतेमध्ये सर्व अडकते व तो फंड लॅप्स होतो. त्यामुळे माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, यासंदर्भात तातडीने पावले उचलून यावेळेस आपण जो फंड दिलेला आहे तो पूर्णपणे खर्चित होईल यासंदर्भात विभागाने काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 299, पृष्ठ क्रमांक 333 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. शासकीय कलासंस्थांचा विकास व विस्तार यासाठी 4.42 कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो. राज्यात प्रसिध्द असलेल्या

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले ......

जे.जे. कला महाविद्यालयाला पूर्ण शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता देण्याची आवश्यकता आहे असे माझे मत आहे. हे महाविद्यालय अधिक सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयाच्या अधिष्ठात्याची नियुक्ती ही विद्यापीठाच्या कुलगुरुच्या धर्तीवर व्हावी, जेणेकरुन या विद्यापीठाचे अधिक चांगले व्यवस्थापन होऊ शकेल. त्यामुळे माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, या दृष्टीने त्यांनी काही विचार व्यक्त करावेत.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक नामवंत माजी विद्यार्थी व कलाकारांच्या दुर्मिळ कलाकृती धूळ खात पडल्या आहेत अशी माझी माहिती आहे. त्यामुळे या सगळया कलाकृती बाहेर काढून त्या सामान्य जनतेसाठी खुल्या केल्या पाहिजेत. असे जर झाले तर विद्यार्थ्यांना व कलाकारांना यातून प्रेरणा मिळू शकते. त्यामुळे या दृष्टिकोनातून मंत्री महोदयांनी यासंदर्भातील विचार व्यक्त करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 97,पृष्ठ क्रमांक 89 च्या संदर्भात विचार मांडणार आहे. या अंतर्गत 799.51 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. टोल नाक्यांवर कार, जीप व महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बस गाडयांना सूट देण्यात येते त्यासंदर्भात शासनाने चांगला निर्णय घेतलेला आहे. परंतु यासंदर्भात 799.51 कोटी रुपयांची तरतूद शासनाला करावी लागत आहे. अनेक टोल नाक्यांच्या बाबतीत अशाही तक्रारी आहेत की, काही टोल नाक्यांनी आपली वर्षे वाढवून घेतली, अनेक ठिकाणी अशाही तक्रारी आहेत की, दोन-दोन,तीन-तीन वर्ष ठेका संपला तरी त्यांनी टोल वसुली तशीच सुरु ठेवली होती. त्यामुळे या सर्व प्रकाराची चौकशी होण्याची आवश्यकता आहे. यामधून राज्य शासनाचा पैसा वाचत असेल तर तोही वाचवला गेला पाहिजे अशी माझी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले.....

बाब क्रमांक 285, पृष्ठ क्रमांक 314- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग - बुलढाणा, वर्धा आणि नागपूर जिल्हा सहकारी बँकांचा सीआरएआर सात टक्क्याच्या खाली गेला होता. तो मेन्टेन करण्याकरिता केंद्र शासनाने जे पैसे दिले त्यामध्ये राज्य शासन आपला हिस्सा देत आहे. त्यासाठी 65 कोटी 98 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक वेळा सहकारी बँकेच्या घोटाळ्यासंबंधी चर्चा होते. या बँका किती वेळा पुनरुज्जीवित केल्या पाहिजेत, रिझर्व्ह बँकेच्या मानांकनाप्रमाणे त्यांचे लायसन्स किती दिवस वाचविले पाहिजे या बाबींचा विचार झाला पाहिजे. आपण या बँकांना पैसे दिल्यानंतर त्या पैशाचा विनियोग व्यवस्थित होतो किंवा नाही, बँका पुन्हा अडचणीत येणार नाहीत यादृष्टीने बँकावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा पुन्हा बँकांचा सीआरएआर खाली गेला तर पुन्हा शासन या बँकांना मदत करु शकणार नाही. तेव्हा दर महिन्याला किंवा तीन महिन्यांनी आढावा बैठक घेऊन बँकांना योग्य ते निर्देश देणे आवश्यक आहे. तेव्हा माननीय सहकार मंत्र्यांनी यामध्ये लक्ष घालावे आणि सभागृहाला तसे आश्वस्त करावे अशी विनंती आहे.

बाब क्रमांक 287, पृष्ठ क्रमांक 314 सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग - अवर्षण प्रवण क्षेत्रातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. म्हणजे ज्यांचे अल्प मुदतीचे कर्ज होते त्यांना मध्यम मुदतीच्या कर्जात रुपांतर करीत आहोत. आपण असे केल्यामुळे अनेक थकीत अकाऊन्टस बाहेर निघतील. ही चांगली बाब आहे. मी मागणीचे स्वागत करीत आहे.

बाब क्रमांक 82, पृष्ठ 67 -नगर विकास विभाग - स्वच्छ भारत अभियानासाठी 135 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांना सहाय्य करण्यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. ही केंद्र शासनाची योजना आहे. यामध्ये केंद्र शासनाचा 75 टक्के हिस्सा आणि राज्य शासनाचा 25 टक्के हिस्सा आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, पंढरपूरमध्ये डोक्यावरुन मैला वाहून नेण्याची पद्धत बंद झाली. राज्य शासन महानगरपालिकांना, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना अनुदान देते. तेव्हा या अनुदानाची प्रायॉरिटी लिस्ट ठरवून दिली पाहिजे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले.....

प्रगत महाराष्ट्रामध्ये हाताने मैला साफ करावा लागतो किंवा डोक्यावरून मैला वाहून न्यावा लागतो असे एकही शहर, गाव असता कामा नये. प्रत्येक महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये सॉलिड वेस्ट ट्रिटमेंट प्लान्ट झाले पाहिजेत. स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत राज्य शासन जे अनुदान देते त्याची विल्हेवाट लावण्याचे नॉर्म्स ठरवून दिले पाहिजेत, याकडे मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे, अशी विनंती आहे.

बाब क्रमांक 88, पृष्ठ क्रमांक 70 - नगरविकास विभाग - नागपूर आणि पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी 94 कोटी 45 लाख रुपयांची मागणी केलेली आहे. बजेटेड हेड 4217 खाली 198 कोटी रुपयांची तरतूद त्यावेळी प्रस्तावित केली होती. त्यापैकी आज 84 कोटी रुपये नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी देत आहोत. नागपूर मेट्रो रेल्वेचे काम व्यवस्थितरित्या सुरु झाले पाहिजे आणि या कामातील अडथळे दूर झाले पाहिजेत. केंद्र शासन आणि राज्य शासनाचा एमओयु झाल्यानंतर केंद्र शासनाकडून 143 कोटी रुपये प्राप्त झाले. तर राज्य शासनाने 84 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पण हे सर्व करीत असताना टेंडर प्रोसेस स्पीडअप झाली पाहिजे. या कामातील अडथळे दूर झाले पाहिजेत. या प्रकल्पासाठी अनेक जागा संपादित करावयाच्या आहेत. जो जनरल जी.आर.काढलेला आहे तो महसूल विभागाशी संबंधित आहे. परंतु त्या ठिकाणी काही पोलीस विभागाच्या जागा आहेत, शिक्षण विभागाच्या जागा आहेत, पर्यटन विभागाच्या जागा आहेत, तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी या सर्व विभागाच्या मंत्री महोदयांची एकत्रित बैठक घेऊन काम कसे गतिशील होईल हे पाहिले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमांक 308,पृष्ठ क्रमांक 343, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग - प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाकरिता 49 कोटी 50 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या अभियानास गतिमानता आणण्याची आवश्यकता आहे. या अभियानाच्या अंतर्गत हजारो विद्यार्थी आपला कौशल्य विकास करून घेत आहेत आणि स्वयंरोजगाराच्या दृष्टीने स्वत:च्या पायावर उभे राहत आहेत. या क्षेत्रात अनेक सेवाभावी संस्था काम करीत आहेत त्यांचे देखील सहकार्य घेतले पाहिजे. या ठिकाणी माननीय वित्त मंत्री उपस्थित आहेत. या कौशल्य विकास व उद्योजकता विभागासाठी आणखी निधीची तरतूद केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले.....

बाब क्रमांक 244, पृष्ठ क्रमांक 283,सार्वजनिक आरोग्य विभाग - सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी या विषय येथे मांडलेला आहे. आपण एमबीबीएस डॉक्टर्सची कंत्राटी वैद्यकीय अधिकारी नियुक्त करतो. परंतु या डॉक्टर्सना पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी प्रवेश मिळाल्यानंतर ते ही नोकरी सोडून निघून जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेवर त्याचा फार परिणाम होतो. त्यांना चांगली वैद्यकीय सेवा उपलब्ध होत नाही. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, अशा डॉक्टर्सना रेग्युलर केले पाहिजे. तसेच त्यांना तीन वर्षे सेवा देणे अनिवार्य केले पाहिजे त्यादृटीने विचार व्हावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो व या मागण्यांना पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 188, पृष्ठ क्रमांक 215- सामाजिक न्याय विभागावर मी प्रथम बोलणार आहे. सन 1996 मध्ये भटक्या व विमुक्त जातीसाठी शासनाने पहिली ते सातवीपर्यंत शाळा दिल्या. 1996 सालानंतर त्या ठिकाणी आजतागायत आठवीचा वर्ग दिलेला नाही. जर 200 गावांमध्ये एकच शाळा असेल आणि त्या ठिकाणी आठवीचा वर्ग नसेल तर विमुक्त व भटक्या जमातीच्या मुलांनी सातवीच्या पुढे शिकू नये असे शासनाचे धोरण आहे काय ? ज्या ठिकाणी सोय नाही, त्या ठिकाणी सोय केली पाहिजे असे शासनाचे धोरण असले पाहिजे. जेथे हायस्कूल पाहिजे असेल तेथे हायस्कूल दिले पाहिजे. खरे म्हाजे सन 2002 साली आठवीचा वर्ग मिळावयास पाहिजे होता. मागील अधिवेशनात देखील मी हा मुद्दा मांडला होता. त्यावेळी सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, प्रस्ताव मागवून आठवीचा वर्ग दिला जाईल. मंत्री महोदयांनी प्रस्ताव मागविला परंतु खालचे अधिकारी त्यामध्ये खोडा घालत आहेत. माननीय मंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिल्यानंतर त्या आश्वासनाची पूर्तता झाली पाहिजे. तेव्हा त्या ठिकाणी इयत्ता आठवीचा वर्ग देऊन तेथील विद्यार्थ्यांची पुढील शिक्षणाची सोय करावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाची पृष्ठ क्रमांक-55 वरील बाब क्रमांक 66 अत्यंत महत्त्वाची आहे. राज्य सरकारने क्रिमिलेअरची मर्यादा 6 लाख रुपये केलेली आहे. शाळेत प्रवेश घ्यावयाचा असेल तर ही मर्यादा 6 लाख रुपये धरण्यात येते. परंतु शुल्काची सवलत देताना मात्र ही मर्यादा 6 लाख रुपये नव्हे तर 4.5 लाख रुपये धरली जाते. हा प्रकार म्हणजे दारुला बंदी असताना दारु पिण्यासाठी लायसेन्स देणे असा आहे. त्यामुळे माझी मागणी आहे की, क्रिमिलेअरची मर्यादा सरसकट सर्व बाबींसाठी 6 लाख रुपये केली पाहिजे.

सभापती महोदय, कृषी विभागाच्या मागण्यांच्या बाबतीत सांगतो की, केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून अनेक प्रकारच्या कृषी विषयक योजना राबविल्या जातात. कृषीवर आधारित अनेक उद्योग आहेत. गेल्या वर्षी आणि त्यापूर्वी सुध्दा कृषी विषयक योजनांसाठी प्राप्त झालेला करोडो रुपयांचा निधी परत गेला. यामागील कारण म्हणजे हा निधी कोणत्या कामांसाठी वापरायचा याची खालच्या लोकांना माहिती नाही. या योजनांच्या बाबतीत प्रबोधन होत नाही. तसेच अशा संस्था निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होत नाही. या निमित्ताने मी सुचवू इच्छितो की, हे कृषी विषयक उद्योग उभे राहिले आणि त्यांना अनुदान मिळाले तर शेतकऱ्यांना वेगळे पॅकेज देण्याची गरज राहणार नाही. केंद्रातून जे आले तेच आपण शेतकऱ्यांना दिले असे होईल. यासाठी नवीन काही करण्याची गरज पडणार नाही. या संदर्भात लोकांमध्ये जनजागृती करुन, नवीन योजना तयार करण्याची गरज आहे. महोदय, पुणे येथे निवृत्त आयएएस अधिकाऱ्यांची एक एनजीओ आहे. त्यांनी मला बोलवून सांगितले की, आमचे कृषी माल पूरक उद्योग या नावाचे संघटन आहे. त्यांनी मला सांगितले की, आम्ही लोकांना प्रशिक्षण देतो आणि प्रस्ताव तयार करुन घेतो. शिवाय हे काम विनामूल्य करुन देण्यात येते. या निमित्ताने मी मागणी करतो की, राज्य सरकारने संबंधित एनजीओची या कामी मदत घेऊन, त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे.

सभापती महोदय, पर्यटन विभागाच्या मागण्यांच्या अनुषंगाने सांगतो की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चौंडी येथील जन्मस्थळ राज्य सरकारकडून विकसित करण्यात येत

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

आहे. यासाठी दोन वर्षांपासून नियोजन केले जात आहे. विकास कामे करण्यासाठी निधी उपलब्ध आहे. परंतु ही कामे करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकच घेतली नाही. त्यामुळे कामे अपूर्ण आहेत. त्या ठिकाणी शौचालय करण्यासाठी मोजमाप करण्यात आले. मात्र काम सुरु केले नाही. काही अधिकारी वर्गाकडून ही कामे करण्यासाठी हालचाली केल्या जात नाहीत. त्यामुळे या कामांकडे लक्ष द्यावे, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय वित्त राज्यमंत्री बसलेले आहेत. 5 लाख लोक ज्ञानेश्वरांच्या पालखीबरोबर चालतात. एखाद्या 5 हजार वस्तीच्या गावात 5 लाख लोक रात्रभर मुक्कामी राहिले तर त्या ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या पाणीपट्टी व घरपट्टीच्या रकमेतून गावातील साफसफाई करण्यासाठी तीन महिने लागतात. महोदय, पुणे येथे झालेल्या बैठकीत माननीय मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, या वर्षीच्या अर्थसंकल्पात अशा प्रकारच्या स्वच्छतेच्या कामासाठी 25 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल. या माध्यमातून बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषदेला निधी दिला गेला. परंतु ग्रामपंचायतीला मात्र निधी दिला गेला नाही. मी निदर्शनास आणून देतो की, एखाद्या गावातून पालखी गेल्यानंतर ते गाव जिल्हा परिषद स्वच्छ करीत नाहीत. ते गाव ग्रामपंचायतीलाच स्वच्छ करावे लागते. त्यामुळे या कामासाठी ग्रामपंचायतीला पुरेसा निधी दिला पाहिजे, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, उद्योग विभागाच्या मागण्यांच्या बाबतीत सांगतो की, माननीय उद्योग मंत्र्यांनी नवीन एमआयडीसी बाबत बैठक घेतली होती. आमच्या भागात एमआयडीसीसाठी एकाच ठिकाणी 5-7 हजार एकर जागा मिळू शकत नाही. त्यामुळे मी प्रस्ताव दिला की, आमच्या भागात सलग हायवेच्या दोन्ही बाजूला 20-50 कि.मी. परिसरात थोड्या थोड्या अंतरावर 50-100 एकर क्षेत्रात जमीन मिळाली तर तेथे एमआयडीसी उभारणे शक्य होईल. आमच्या तालुक्याच्या मधून हायवे जातो, रेल्वे जाते, कॅनॉल जातो. त्यामुळे हायवेच्या दोन्ही बाजूवर नवीन एमआयडीसी निर्माण होऊ शकते. अशा प्रकारची एमआयडीसी उभारण्यास आपण ॲप्रेशिएट केले होते. अशा प्रकारची एमआयडीसी स्थापन करण्याचे काम सुरु आहे, परंतु ते अतिशय संथ गतीने सुरु आहे. माझी मागणी आहे की, हे काम वेगाने झाले पाहिजे. मी सुचविल्यानुसार थोड्या थोड्या अंतरावर

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

50-100 एकर क्षेत्रावर एमआयडीसी उभारुन एक-एक युनिट उभे केले तर एमआयडीसीचे चांगल्या प्रकारचे नवीन मॉडेल निर्माण होऊ शकते. हे करीत असताना बागायती जमीन आणि पाणी क्षेत्राला धक्का लावता कामा नये. असे केल्यास आमच्या भागातील प्रदूषण सुध्दा थांबेल.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांच्या अनुषंगाने सांगतो की, सन्माननीय सदस्यांनी ई-टेंडरींग बाबतचा मुद्दा मांडला. सार्वजनिक बांधकाम विभागाचा 1 कि.मी. लांबीचा रस्ता करण्यासाठी 7 लाख रुपये लागतात. अशा परिस्थितीत आपण ई-टेंडरींग किती करणार ? आता सर्वच वस्तूंचे भाव वाढलेले आहेत. पूर्वी 3 लाख रुपये असलेली किंमत आता 15 लाख रुपये झाली आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी 3 लाख रुपयांमध्ये जे काम होत होते तेच काम आता 15 लाख रुपयांत होते. आज छोटी छोटी कामे, आमदार निधीतून दिलेली कामे, समाजकल्याण व जिल्हा परिषदेने केलेली कामे 3 ही लाखांपर्यंतची आहेत. आज ई-टेंडरींगच्या कामांचा जिल्हा परिषदेमध्ये ढिग लागला आहे. पण ती कामे होत नाहीत. ई-टेंडरींगच्या माध्यमातून नागपूरच्या माणसाने कोल्हापूरचे काम घेतले आहे. तो त्या ठिकाणी जात नाही आणि कामही करीत नाही. तो माणूस दुसऱ्यालाच ते काम देतो आणि त्याला त्यातील 2 टक्के रुक्कम द्यावी लागते. ई-टेंडरींग पध्दत आणून आपण चांगले करावयास गेला, परंतु त्यातून वेगळेच घडले आहे. त्यामुळे आपण ही वस्तुस्थिती तपासून घ्यावी. केवळ 3 लाख रुपयांवरील कामे ई-टेंडरींगने करुन उपयोग नाही. कामाच्या वाढलेल्या किंमती लक्षात घेता 15 लाख रुपयांवरील कामे ई-टेंडरींग पध्दतीने केली पाहिजेत. त्यामुळे आपण या कामी लक्ष घातले पाहिजे.

सभापती महोदय, परिवहन विभागाच्या मागण्यांच्या बाबतीत सांगू इच्छितो की, 100 वर्षांपूर्वी पंढरपूर-लोणंद रेल्वे मार्ग मंजूर झाला. त्यासाठी जमीन संपादित झाली. आता फलटणपर्यंत रेल्वे आली आहे. फक्त राज्य सरकार या कामी पुढाकार घेत नाही म्हणून थोडे काम बाकी आहे. हे काम पूर्ण केले तर विजापूर-पुणे हा मोठा रेल्वे मार्ग तयार होणार आहे. 1908 साली या प्रकल्पासाठी जमीन संपादित करण्यात आली आणि शेतकऱ्यांना 1918 मध्ये जमिनीचा मोबदला दिला गेला. त्या ठिकाणी कोठेही पूल वा नदी नाही. हा रेल्वे मार्ग पुणे-पंढरपूर-आळंदी

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

या रेल्वे मार्गाला पॅरलल आहे. हा रेल्वे मार्ग झाल्यास या मार्गावरील ताण कमी होईल. त्यामुळे यामध्ये लक्ष घालून परिवहन विभागाने आपला हिस्सा उचलला किंवा केंद्र सरकारला शिफारस केली तर हे काम होऊ शकेल. त्यामुळे या संदर्भात गांभीर्याने विचार करून या बाबीचा समावेश पुरवणी मागणीमध्ये करावा, एवढीच या निमित्ताने विनंती करतो व येथेच थांबतो.

-------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : माननीय उच्च न्यायालयाने पंढरपूर येथे आषाढी, चैत्री, माघी व कार्तिकी या चार प्रमुख यात्रांसाठी चंद्रभागा नदीच्या पात्रात प्रदूषण न करण्याच्या अटीवर भजन, कीर्तन, जागर व प्रवचन यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी निश्चित केलेल्या वर्षातील 20 दिवसांसाठी राहुट्या व तंबू उभारण्यास सवलत देणे

**मु.शी.** : माननीय उच्च न्यायालयाने पंढरपूर येथे आषाढी, चैत्री, माघी व कार्तिकी या चार प्रमुख यात्रांसाठी चंद्रभागा नदीच्या पात्रात प्रदूषण न करण्याच्या अटीवर भजन, कीर्तन, जागर व प्रवचन यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी निश्चित केलेल्या वर्षातील 20 दिवसांसाठी राहुट्या व तंबू उभारण्यास सवलत देणे, या संबंधी नगर विकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील ( नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

( चर्चा पुढे सुरू....

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ पुढील आदेश होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे. राज्याचे माननीय वित्त मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी 14793 कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. या पुरवणी मागण्यांमध्ये नक्कीच सर्व विभागांना जास्त निधी दिला असला तरी काही विभागांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

सभापती महोदय, कामगार विभाग - पृष्ठ क्रमांक 92, बाब क्रमांक 165. कामगार विभागासाठी 1 काटी 50 लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. नवनवीन कामगार कायदे येत आहेत. परंतु त्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी तेथे कर्मचाऱ्यांची फार कमतरता आहे. डेप्युटी लेबर कमिशनर, असिस्टंट लेबर कमिशनर, जीएलओ यांची निवृत्ती झाल्यानंतर नवीन भरती झालेली नाही. राज्यात कामगार कायद्याची अंमलबजावणी करायची असेल तर तेथे अधिकारी असणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांची संख्या वाढविणे फार महत्त्वाचे आहे. काही कामगार कार्यालयांची परिस्थिती बिकट आहे. कोणत्याही क्षणी तेथे छप्पर पडू शकते आणि एखादा अधिकारी दगाऊ शकतो. साताऱ्याला, कोल्हापूरला किंवा अन्य ठिकाणी लेबर ऑफिस आहे. जिल्ह्याच्या ठिकाणची कामगार आयुक्त कार्यालये व्यवस्थितपणे दुसरीकडे हलविली पाहिजेत किंवा ती व्यवस्थितपणे बनविणे गरजेचे आहे. राज्यात 36 माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. परंतु अजूनही त्या मंडळावर डेप्युटी लेबर कमिशनर दिलेले नाहीत, कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता लागते. मात्र कर्मचारी नसल्यामुळे कायद्यांची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....

सभापती महोदय, ऊसतोड कामगारांसाठी स्व. गोपीनाथ मुंडे साहेबांच्या नावाने एक वेगळे माथाडी मंडळ स्थापन करण्याची घोषणा केली आहे. परंतु अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही नाही. मंडळावर कोण चेअरमन असेल, किती कर्मचारी असतील, कशाप्रकारे ऊसतोड कामगारांना न्याय दिला जाईल, कशी योजना असेल हे माहीत नाही, तत्संदर्भात कुठेही प्रगती दिसलेली नाही. घरेलू कामगारांसाठी, घरामध्ये साफसफाई करणाऱ्या, काम करणाऱ्या महिलांसाठी कायदा बनविण्यात आला. परंतु अजूनही त्या मंडळावर कोणत्याही प्रकारे अध्यक्ष, आयुक्त किंवा इतर अधिकारी यांची नियुक्ती न केल्यामुळे तो कायदा चांगल्या पध्दतीने राबविला जात नाही.

सभापती महोदय, गुमास्ता कामगारांची संख्या खूप आहे. त्यामुळे त्या लोकांना किमान वेतन कायदा लागू झाला पाहिजे. मागच्या सरकारने चेकने पेमेंट करावे असा कर्मचाऱ्यांना फतवा काढला पण त्याचीही अंमलबजावणी होत नाही. कारण कामगार आयुक्त कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या फार कमी आहे. सभापती महोदय, हे शहर आहे, शहरात कामगार कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी करायची असेल तर कर्मचारी द्यावे लागतील, त्यांना पैसा द्यावा लागेल. माननीय वित्त मंत्र्यांनी यामध्ये लक्ष घालून भविष्यात तरी कर्मचाऱ्यांसाठी अतिरिक्त सोय करावी. जेणेकरून सर्व कामगार कायदे व्यवस्थितपणे लागू करता येतील.

सभापती महोदय, वीज निर्मितीचे खाते याच विभागात आहे. पवन चक्क्यांच्या माध्यमातून वीज निर्मिती करणे, सोलर एनर्जीचे नवीन प्लँटस उभे करणे गरजेचे आहे. शासनाने असे केल्यास विजेचा मोठ्या प्रमाणात असलेला तुटवडा नाहीसा होईल. बीओटी तत्वावर करण्यापेक्षा, कोणाला तरी अनुदान देण्यापेक्षा सरकारने स्वतः यामध्ये पुढाकार घेऊन स्वतः पैशांची गुंतवणूक केली तर भविष्यात सरकारला त्याचा फायदा होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, जलसंपदा विभाग - पृष्ठ क्रमांक 150, बाब क्रमांक 135. मी धरणाचा विषय मांडू इच्छितो. सरकारने शेतकऱ्यांच्या शेतीसाठी धरणे बनविली आहेत. धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साठला आहे आणि तो गाळ काढण्यासाठी तरतूद करणे गरजेचे आहे. भविष्यात शासनाने या संदर्भात तरतूद करावी, जेणेकरून धरणे ज्या उद्देशाने बांधली आहेत तो उद्देश पूर्ण

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....

होईल आणि मे महिन्यात जेव्हा पाण्याचा तुटवडा असतो तेव्हा तरी शेतकऱ्यांना पुरसे पाणी मिळेल. धरणाचे पाणी इतर दुष्काळी भागात वळविण्याचा सरकारचा विचार आहे, जेणेकरून दुष्काळी भागाला पाणी मिळेल.

सभापती महोदय, पुनर्वसन व मदत कार्य विभाग - पृष्ठ क्रमांक 27, बाब क्रमांक 35. धरण करायचे असेल तर धरणग्रस्तांना त्यांच्या जमिनीचा मोबदला दिला पाहिजे, पर्यायी जमीन दिली पाहिजे. आजही काही धरणाची कामे बाकी आहेत. सन 1995-99 मध्ये भाजप-शिवसेना पक्ष काळात नारळ फोडलेल्या धरणाची कामे अजूनही पूर्ण झालेली नाहीत आणि त्याचे कारण एकच आहे तेथील धरणग्रस्तांना पैसे मिळालेले नाहीत किंवा त्यांना जमीन देण्यात आली नाही. कृपया आता तरी आपण या संदर्भात पुढाकार घ्यावा आणि आपण जी धरणे नियोजित केली होती, आपल्या माध्यमातून ज्यांची उद्‌घाटने झाली होती ती यंदा तरी आपल्या नेतृत्वाखाली पूर्ण करावीत आणि त्या धरणग्रस्तांना पैसे मिळावेत एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदय, आता मी पणन विभागावर बोलणार आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या मालाला चांगला बाजारभाव मिळाला पाहिजे या संदर्भात सातत्याने शासनाकडून माननीय मंत्री श्री. चंद्रकांत पाटील साहेब मागणी करीत असतात आणि ते खरे आहे. बाजार समित्यांचे सक्षमीकरण करणे फार गरजे आहे, त्यांचा दर्जा वाढविला पाहिजे. शेतकऱ्यांना ऑरगॅनिक फार्मिंगकडे हळूहळू वळविणे गरजेचे आहे. आपल्या बाजारपेठामध्ये शेतमालांसाठी खूप रसायने, औषधे आहेत. कोणतीही कंपनी सांगते की, अमुक हे रसायन टाका आणि उत्पन्न वाढवा, पिकांवरील रोग दूर करा. आपण आज रसायने टाकलेल्या भाज्या खात आहोत आणि त्यामुळे आपल्या सर्वांचे आयुष्य, आरोग्य धोक्यात आले आहे.

सभापती महोदय, जगातील कोणत्याही देशात ऑरगॅनिक फार्मिंगने केलेल्या वस्तुलाच मान्यता मिळू लागली आहे. शासनाने ऑरगॅनिक फार्मिंगकडे शेतकऱ्यांना वळविणे गरजचे आहे. शासनाने फॉरेन एक्सपोर्टकडे पाहता ऑरगॅनिक फार्मिंगकडेच जास्त लक्ष देण्याची गरज आहे. पणन विभागाने ऑरगॅनिक फार्मिंग करणाऱ्या शेतकऱ्यांना वेगळी बाजारपेठ मिळवून दिली तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

त्यांच्या शेतमालाला चांगला बाजारभाव मिळेल असे मला वाटते.

..4



श्री. नरेंद्र पाटील ....

सभापती महोदय, नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मोठ्या प्रमाणात कामे काढली आहेत. गेली 3 वर्षे तेथे रस्त्यांची कामे होऊ शकलेली नाहीत. अजूनही तेथे संरक्षक भिंत तुटलेली आहे. मी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करतो की, आपण त्यांना थोड्याशा जास्त प्रमाणात पैसे दिले तर बाजारपेठेत असलेला व्यापारी, कामगार सुरक्षित वातावरणात व्यापार करू शकेल. कारण तेथे वारंवार चोऱ्या होतात आणि कधी कधी या चोऱ्या जीवावर बेतल्या जातात. माझी पुन्हा एकदा विनंती आहे की, माननीय वित्त मंत्र्यांनी कामगार व पणन या दोन विषयांवर भर देऊन त्यांना जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून द्यावा. सभापती महोदय, आपण मला 2-3 विषयावर बोलण्यास परवानगी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद !

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, आपण मला पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. नियोजन विधेयक पारित झाले आहे आणि आता पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरूआहे, हे एक अनाकलनीय विशेष माझ्या दृष्टीने आहे. परंतु तरीही बोलण्यास संधी आहे म्हणून त्या संधीचा उपभोग व उपयोग करण्याचा मी प्रयत्न करतो.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - बाब क्रमांक 66 ते 79. प्राथमिक शाळांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थाना सहाय्य याकरिता तरतूद केली आहे. नगरपरिषद, मनपा यांच्या प्राथमिक शाळांना 50 टक्के अनुदान देण्यात येते तर खाजगी संस्थांच्या प्राथमिक शाळांना 100 टक्के अनुदान देण्यात सेते. मनपा शिक्षण कर लोकांकडून घेऊन शासनाला देते. त्यामुळे शासनाने मनपा, नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळांना 100 टक्के अनुदान द्यावे. शासनाने खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व वर्ग-तुकड्या अनुदानास पात्र ठरविल्या आहेत, त्यांना अनुदान देण्यासाठी तरतूद करावी अशी मी विनंती करतो. सर्व शिक्षा अभियानासाठी आवश्यक असलेली तरतूद न केल्यामुळे या योजनेचा उद्देश सफल होऊ शकत नाही म्हणून त्यात वाढ करावी अशीही मी विनंती करतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार........

राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांना 1 लक्ष रुपये देण्यासाठी शासनाने तरतूद केली आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. दिनांक 5 सप्टेंबर, 2006 ते दिनांक 13 सप्टेंबर, 2013 या कालावधीत राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना दोन वेतनवाढी देण्याची तरतूद शासनाने केलेली नाही, ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 288 ते 302 अन्वये प्राध्यापकांनी परीक्षेवर बहिष्कार टाकला होता. परंतु, त्यांनी नियमित काम केले आहे. परीक्षेच्या कामाचे मानधन त्यांना देण्यात आले असले तरी नियमित वेतन देण्यात आलेले नाही. त्यांना नियमित वेतन अदा करावे, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, शारीरिक शिक्षण महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे पूर्णपणे हस्तांतरित झालेली नाहीत, ती त्वरित करण्यात यावीत, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, समाजकार्य महाविद्यालयेही उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरित झाली पाहिजेत, अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, ग्रंथालयांसाठी शासनाने 62 कोटी, 27 लाख, 54 हजार रुपये एवढा निधी मंजूर केला आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि ग्रंथालयात काम करणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवा निर्धारित करणारा कायदा करावा, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या बाब क्रमांक 258 ते 260 अन्वये शासकीय वैद्यकीय शिक्षण महाविद्यालय, नागपूर या ठिकाणी बी.एस्सी. नर्सिंग आणि एम.एस्सी. नर्सिंग महाविद्यालय सुरु करण्यात आले आहे. तथापि, तेथे आवश्यक प्राध्यापक, प्राचार्य, कर्मचारी आणि भौतिक सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या नाहीत. त्याची पूर्तता करावी, अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. तथापि, पाच मिनिटात सर्व विषय कसे मांडावेत, असा प्रश्न माझ्यासमोर आहे. तरी देखील काही महत्वाचे मुद्दे या निमित्ताने मी मांडणार आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 68, 69 व 70 वर मी बोलणार आहे. आपल्यालाही हा विषय चांगला माहीत आहे. राज्यात सन 2009 मध्ये 'कायम' हा शब्द वगळण्यात आला आहे. परंतु, सन 2012 पासून अनुदान देण्याचे धोरण शासनाने जाहीर केले आहे. या सर्व शाळांचे मूल्यांकन होऊनही त्यांना शासनाने अद्याप अनुदान दिलेले नाही. त्याचप्रमाणे अनुदानित शाळेत एकूण 6000 तुकड्या विनाअनुदानित आहेत. त्यांनाही अनुदान देण्याची तरतूद आपण केलेली नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित पदे आहेत. त्या पदांवर 5-6 वर्षांपासून लोक काम करीत आहेत. ज्युनिअर कॉलेजमधील प्रस्तावित पदांसाठी कोणतीही तरतूद केलेली नाही, याबद्दल मला अत्यंत खेद वाटतो. हे शिक्षक 10 ते 15 वर्षांपासून विनावेतन काम करीत आहेत. त्यांना वेठबिगारासारखे राबवून घेतले जात आहे. त्यामुळे मी या निमित्ताने मागणी करतो की, तातडीने माध्यमिक, उच्च माध्यमिक, प्रस्तावित तुकड्या किंवा प्रस्तावित पदांना तातडीने अनुदान सुरु करावे व त्यासाठी आवश्यक ती तरतूद करावी.

सभापती महोदय, मराठी भाषा विभागाच्या बाब क्रमांक 396 अन्वये ज्ञानपीठ विजेते माननीय श्री.भालचंद्र नेमाडे यांच्या सत्कारासाठी तरतूद करण्यात आली आहे, ही अतिशय चांगली गोष्ट आहे. मला अशीही सूचना करावयाची आहे की, ज्ञानपीठ विजेते माननीय श्री.भालचंद्र नेमाडे यांचे सर्व साहित्य अल्पदरात जनतेला उपलब्ध करुन द्यावे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी एक मुद्दा या निमित्ताने उपस्थित केला आहे. जळगाव महानगरपालिकेच्या शाळा शिक्षकांना 14 महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. शासनाने आपला 50 टक्के हिस्सा दिला असला तरी महापालिकेने 50 टक्के हिस्सा द्यावयाचा आहे. भिवंडी, मालेगांव, मुंबई या ठिकाणीही असाच प्रश्न निर्माण झाला होता.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन 100 टक्के अनुदान महानगरपालिकांना द्यावे.  आपण

...3....



डॉ.सुधीर तांबे........

शिक्षण हक्क कायदा केला आहे.  असे असताना शिक्षकांना 14 महिने वेतन मिळणार नसेल तर ते बरोबर होणार नाही.  हा काही एक-दोन महिन्यांच्या वेतनाचा प्रश्न नाही.  तेथील सय्यद नावाच्या एका शिक्षकाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता.  त्यामुळे ही बाब अतिशय गंभीर आहे. यामध्ये शासनाने लक्ष घालावे, अशा प्रकारची विनंती करतो आणि आपण संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 90, पृष्ठ क्रमांक 70 वर बोलत असताना मी सांगू इच्छितो की, ज्या नवीन नगरपरिषदा निर्माण झाल्या आहेत, त्यांच्यासाठी पुरेशी तरतूद करावयास हवी होती, ती शासनाने केलेली नाही. ज्या ग्रामपंचायतींचे नगरपरिषदेमध्ये रुपांतर झाले आहे तेथील कामगार आणि कर्मचाऱ्यांना समाविष्ट करुन घेण्यात आलेले नाही. नगरपरिषद क्षेत्रातील कामाकरिता विशेष अनुदान सहाय्याची तरतूद केलेली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी नगरपरिषदेला 4 वर्षे पूर्ण झाली आहेत. या नगरपरिषदेला आकृतिबंध व समावेशाप्रमाणे कर्मचाऱ्यांचे वेतन प्रदान करण्यासाठी सहायक अनुदान मंजूर केलेले नाही. या नगरपरिषदेसह राज्यातील अन्य सर्व नवीन नगरपरिषदांचा समावेश करुन घेण्यात यावा आणि त्यांना या तरतुदीपासून वंचित ठेवण्यात येऊ नये, त्यांच्यासाठी देखील तरतूद करावी, अशी माझी विनती आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 103, पान क्रमांक 91 अन्वये राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पोलीस इमारती व दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या ठिकाणी गृह राज्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. आर्णी येथील पोलीस स्टेशन इमारत जुनी झालेली असल्यामुळे नवीन इमारत बांधकामासंबधीची ग्वाही त्यांनी हिवाळी अधिवेशनात दिली होती. परंतु, त्यासाठी विशेष तरतूद करण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा एक गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. तेथील नदीच्या पात्रात जीवंत दारुगोळा सापडला होता. अद्याप त्याचा छडा लागलेला नाही. त्या ठिकाणी असलेली इमारत ब्रिटिशकालीन आहे. त्यामुळे नवीन इमारतीसाठी तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 246, पान क्रमांक 284 अन्वये यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीकरिता तरतूद करण्यात आली आहे. आदरणीय आरोग्य मंत्र्यांना मी ट्रामा केअर युनिट बाबत बोललो आहे व त्यांनी ते मान्य केले आहे. नागपूर-बोरी-तुळजापूर रस्त्यावरील आर्णी हे एक मोठे शहर आहे. या शहराला लागून 80 ते 90 खेडी आहेत. ते मोठ्या

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग.........

वाहतुकीचे ठिकाण आहे. नवीन यंत्रसामुग्रीसंबंधी माहिती पाठविण्यात आली आहे, प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, त्यासाठी आवश्यक ती तरतूद करावी, अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यामध्ये टेक्सटाईल पार्कची घोषणा करण्यात आली आहे. परंतु, त्यासाठी तरतूद केलेली नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सभागृह नेते व महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना मी सांगू इच्छितो की, आमच्या तालुक्यामध्ये सहकारी बँका, पतसंस्था आणि राष्ट्रीयकृत बँका आहेत. मी एका तालुक्याचे निरीक्षण व पहाणी केली. त्या ठिकाणी 4 सहकारी पतसंस्था, 3 अर्बन बँका आणि 4 राष्ट्रीयकृत बँका आहेत. मी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एका शाखेच्या उदघाटनासाठी गेलो असताना विचारपूस केली की, आपल्या शाखेमध्ये एकूण किती खाती आहेत व त्यामध्ये नॉन ऑपरेटिव्ह खाती किती आहेत ? मला अशी माहिती मिळाली की, त्यांच्याकडे एकूण 18000 खाती असून त्यापैकी 4 ते 5 हजार खाती नॉन ऑपरेटिव्ह आहेत. एका नॉन ऑपरेटिव्ह खात्यात किमान 1 हजार रुपये शिल्लक गृहित धरली तरी ज्याला आपण डेड इन्व्हेस्टमेंट म्हणतो, जी रक्कम कुणाच्याही कामाची नाही, अशी एका तालुक्याची मिळून रक्कम किती होत असेल.

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग..........

तो निधी बँकेच्याही कामात येत नाही आणि असेल तर त्या बँका त्याचा काय उपयोग करतात, याची मला माहिती नाही. परंतु, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना अशा प्रकारचा जो डेड निधी आहे त्याला कोणी मायबाप आहे की नाही ? आपल्याला हा निधी कोणत्या ना कोणत्या निमित्ताने एकत्र करता आला तर ते खूप चांगले होईल. एका तालुक्यात असा निधी 1 ते 1.5 कोटी रुपये असेल तर एका जिल्ह्यातील निधी 20 कोटी रुपयांपर्यंत होऊ शकतो आणि संपूर्ण महाराष्ट्रातील निधी 750 ते 1 हजार कोटी रुपयांपर्यंत होऊ शकतो. आपण त्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत करु इच्छितो. आपल्याला या निधीचे व्यवस्थित नियोजन करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी हा निधी वापरण्यात येईल काय ? येणाऱ्या काळात आपल्याला या निधीचा योग्य प्रकारे विनियोग करता येईल काय, यासाठी शासनाने प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

-------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो.

सभापती महोदय, पुरवणी मागण्या ही एक constitutional provision आहे. आपण according to Article 205 of the Constitution पुरवणी मागण्या मांडतो. आपण पुरवणी मागण्या मांडतो त्यासाठी घटनाकारांनी क्रायटेरिया सेट केलेला आहे. एखादी बजेटरी प्रोव्हिजन असते आणि त्या प्रोव्हिजनसाठी एक्सेस फंड लागतो त्यावेळी आपण पुरवणी मागणी करतो. तसेच, एखादी बाब अशी असते की, ती बाब बजेटमध्ये घेतलेली नसते, ती include करण्यासाठी आपण पुरवणी मागणी सादर करतो. परंतु, आज सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्या बघितल्यानंतर हे एक fiscal imbalance आणि fiscal indiscipline चे उत्तम उदाहरण आहे, असे मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मी काही बाबींकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. General Administration Department, पृष्ठ क्र.4, बाब क्र.1, 2, 3, 4, 5 व 6 अन्वये शासनाने गाड्या खरेदी करण्यासाठी व कार्यालयांच्या नूतनीकरणासाठी पुरवणी मागणी सादर केलेली आहे. दिल्लीमध्ये माननीय मुख्यमंत्री व राज्यपाल महोदयांसाठी बुलेटप्रुफ गाडी खरेदी करण्यासाठी 1 कोटी 40 लाख रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आलेली आहे. दिल्ली येथे गेल्यानंतर त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी दिल्ली पोलिसांची असते. त्यामुळे ही जबाबदारी राज्य शासनाने घ्यावी काय आणि राज्यातील शेतकरी कठीण परिस्थितीत असताना राज्य शासनाने हा खर्च करावा काय, याचा विचार शासनाने स्वतःच करावा, असे मला वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.11, बाब क्र.12, interception devices साठी आपण 1.5 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर केलेली आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, interception बद्दल देशात काय प्रकार सुरु आहेत. आपण दिल्लीमध्ये बघितले तर केंद्रीय मंत्री श्री.अरुण जेटली किंवा इतर मंत्री असतील त्यांची कार्यालये bug करण्याचा प्रकार झाला. Illegal interception झाले. आपण ज्यावेळी या interception ला allow करीत आहोत किंवा interception साठी खर्च करीत आहोत, तेव्हा हे interception योग्य रितीने होईल यासाठी

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर........

अधिक कडक कायदे करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. According to Article 21 of the Constitution, Right to life and personal liberty ही शासनाची जबाबदारी आहे. हे Fundamental Rights आहेत. हे Fundamental Rights प्रत्येक नागरिकाला आहेत. Right of Interception चा वापर करुन ज्यावेळी illegal interception होते त्यावेळी Article 21 चे निश्चितपणे infringement आहे, असे मी समजतो.

सभापती महोदय, महसूल विभाग, पृष्ठ क्र.21, बाब क्र.25, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी 488.5 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर देखील सांगितले की, आम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कोणत्याही प्रकारचे loan waiver देऊ इच्छित नाही. आम्ही शेतकऱ्यांना स्वावलंबी करुन त्यांच्यासाठी remedial measures introduce करु इच्छितो. कोणत्याची प्रॉब्लेमचे दोन aspect असतात. एक म्हणजे, short-term measures आणि दुसरे म्हणजे long-term measures. आपण जे करीत आहात ते long-term measures आहेत. आपण शेतकऱ्यांना वीज, पाणी पुरविणार आहात. परंतु, ती वीज वापरण्यासाठी, पाण्याचा वापर करण्यासाठी तो शेतकरी जगला पाहिजे, याचे भान आपण ठेवणे आवश्यक आहे. आपण आज शेतकऱ्यांना loan waiver दिले नाही तर तो उदासिनतेपोटी आत्महत्या करेल. आपण सन 2015-16 मध्ये 488.5 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करीत आहात तर आपण यावर्षी देखील ती तरतूद करुन जास्तीत जास्त पैसे farmer loan waiver साठी provide करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.23, बाब क्र.32, 1984 च्या Sikh riot victims साठी.... (...अडथळा...) आपल्याला समजले नाही तर माननीय श्री.दिवाकर रावते साहेब सांगतील. आपण महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियमाचे पुस्तक वाचावे. त्यामध्ये सन्माननीय सदस्यांना सभागृहात कोणत्या भाषेत बोलता येते हे नमूद केलेले आहे. (...अडथळा...) तुम्हाला कळले नाही तर मी ते पुन्हा ट्रान्सलेट करीन. त्यामुळे आपण काही चिंता करु नका. सन 1984 मध्ये जे Sikh riots

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर.......

झाले त्या पिडीतांसाठी आपण आज तरतूद करीत आहोत. आपण योग्य वेळी मदत दिली नाही तर त्या मदतीचा काय उपयोग आहे. Justice delayed is justice denied. याचा देखील विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.24, बाब क्र.36, पावसामुळे ज्या घरांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी ही पुरवणी मागणी सादर करण्यात आलेली आहे. कालच असा रिपोर्ट आलेला आहे की, मुंबई येथील Doppler Radar 10 दिवसापासून बंद आहे. नैसर्गिक आपत्तीसाठी शासन दोषी नाही किंवा अन्य कोणी दोषी नाही. परंतु, आपण जे टाळू शकतो, आपल्याला जर योग्य वेळी पावसाबद्दलचा अंदाज समजला, पावसाची परिस्थिती समजली तर आपण remedial measures घेऊ शकतो. तो रडार 10 दिवसापासून बंद आहे. परंतु, आपल्याला काहीही करता आले नाही. मुंबईत 2 दिवसापासून पावसाने थैमान घातले आहे. पाऊस पडत आहे, ही चांगली गोष्ट आहे. परंतु, ज्या परिस्थितीत पाऊस पडत आहे आणि त्यामुळे जे संकट येणार आहे ते आपण हे रडार सुरु असते तर टाळू शकलो असतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.42, बाब क्र.65, मत्स्यव्यवसाय विभाग, मत्स्यव्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी लोनची प्रोव्हिजन केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी देखील हा मुद्दा मांडलेला आहे. मी सांगू इच्छितो की, एमसीडीसीकडून जे लोन मिळते त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचा देखील काही हिस्सा असतो. मागील कित्येक वर्षापासून मासेमारी करणाऱ्या बांधवांना लोन मिळलेले नाही. मी याकडे देखील शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, विधी व न्याय विभाग, पृष्ठ क्र.155, बाब क्र.159 व 160, शासनाने या पुरवणी मागणीच्या माध्यमातून विधी व न्याय विभागासाठी तरतूद केलेली आहे. शासन Law and Judiciary बद्दल किती गंभीर आहे याचा उल्लेख मी सकाळीच केलेला आहे. राज्य शासनाने एक महिन्यापासून ॲडव्होकेट जनरल यांची नियुक्ती केलेली नाही. ॲडव्होकेट जनरल ही constitutional post आहे.

यानंतर श्री.खर्चे वि......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहूल नार्वेकर...

ही अतिशय महत्वाची नियुक्ती आहे, शासनाला मार्गदर्शन करण्याचे काम ॲडव्होकेट जनरल करीत असतात, एका महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला तरी शासनाने ॲडव्होकेट जनरल यांची नियुक्ती केलेली नाही. शासनाच्या विधी व न्याय विभागाची भूमिका कशी आहे हे यावरुन दिसून येते. एनसीएल या दाव्यामध्ये शासनातर्फे चार वेळा पुढील तारखा घेतल्या आहेत. या सर्व बाबींचा शासनाने विचार करावा व योग्य ती कार्यवाही करावी. महाराष्ट्राच्या जनतेला दिलेले वचन हे शासन पूर्ण करेल अशी अपेक्षा बाळगतो व माझे भाषण संपवितो, धन्यवाद.

-----------

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : मंत्री महोदयांनी उत्तरास सुरुवात करावी.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी द्यावी माझे नाव यादीमध्ये आहे.

**तालिका सभापती** : आपले नाव माझ्याकडील यादीमध्ये नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, परिवहन विभागाच्या बाब क्रमांक 17,18 आणि 24.....(गोंधळ)...

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांचे नाव माझ्याकडे देण्यात आलेल्या यादीत नाही. आपण जी यादी दिली त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांचे नाव आहे, परंतु जी यादी तयार झाली त्यामध्ये सन्माननीय सदस्यांचे नाव नव्हते. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पाच मिनिटात संपवावे व मी बेल वाजविल्यानंतर आपण भाषण थांबवावे.

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपणाला फार फार धन्यवाद देतो आणि माझे नाव नसल्याबाबतचा घोळ आपण करुन ठेवला त्याबाबत मी तुमचे आभार मानतो. सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत तसेच काही उपाय देखील सांगितले आहेत, सन 2015-2016 या वर्षाचे खर्चाचे पूरक विवरण पत्र भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 अन्वये विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर मंजुरीकरिता सादर करण्यात आले आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी 14,793 कोटी रुपयांच्या मागण्या सादर केल्या आहेत, ते आमचे मित्र आहेत, विरोधी बाकावर सन्माननीय सदस्य बसत असताना त्यांची भाषणे आम्ही ऐकली आहेत, ती भाषणे ऐकताना नियमित अर्थसंकल्प इतक्या मोठ्या रकमेचा असताना पुरवणी मागण्या कशासाठी सादर केल्या असे सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार त्यावेळी बोलत होते. आता वित्त मंत्री असताना पहिल्यांदाच (अडथळा...) सभापती महोदय, मागील काही दिवसांपूर्वी असे ठरले होते की, जो कोणी वक्ता बोलत असेल तर सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलू नये.

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य आपणाला भाषणासाठी थोडाच वेळ आहे, त्यामुळे आपण कमी वेळात जास्त मुद्दे मांडावेत. मी बेल वाजविल्यावर आपणाला भाषण थांबवावे लागेल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे मी अभिनंदन करतो. 14793 कोटी रुपयांच्या पूरक मागण्या मंजुरीकरिता सभागृहात सादर केल्या आहेत. या ठिकाणी सत्ता पक्षात जो मित्रपक्ष आहे, त्यांच्याकडे असलेल्या खात्यासाठी या शासनाने किती निधी दिला, याबाबत प्रश्नार्थक चिन्ह आहे, 14793 कोटी रुपयांपैकी मुख्यमंत्री महोदयांच्या नगरविकास खात्यासाठी 2411 कोटी रुपये असा सर्वात जास्त निधी देण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागासाठी 93 कोटी रुपये देण्यात आले आहेत. गृह विभागाला 213 कोटी रुपये देण्यात आले आहेत, श्री.एकनाथराव खडसे यांच्या खात्यांसाठी 400 कोटी रुपये देण्यात आले आहेत, ग्रामविकास आणि जलसंधारण खात्यासाठी 935 कोटी रुपये देण्यात आले आहेत.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भाषणाबाबत आमचा कोणताही आक्षेप नाही, फक्त सन्माननीय सदस्य कोणत्या बाबीवर बोलतात हे आम्हाला कळले तर ती बाब आम्हाला बघता येईल, त्यांनी भाषण करताना बाब क्रमांक व पृष्ठ क्रमाकांचा उल्लेख करावा.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब बोलत असताना आम्ही त्यांच्या भाषणात कधीही अडथळा आणलेला नाही, त्यांचे भाषण चालू असताना आम्ही एकही शब्द बोलत नाही, आम्ही शांतपणे ऐकतो कोणाच्याही विरोधात बोलत नाही, आपण भाषण करणाऱ्या सदस्याला अडथळा आणून त्याला बोलू द्यावयाचे नाही असे करणे बरोबर नाही. आपणाला माझे भाषण ऐकायचे नसेल तर मी खाली बसतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये आपणाला बोलण्याची संधी दिलेली आहे, आपण माझ्याकडे बघून बोलावे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, जलसंपदा विभागाला 1583 कोटी रुपये देताना शिवसेना पक्षातील मंत्री महोदयांच्या खात्याला सार्वजनिक आरोग्य विभाग सोडला तर इतर विभागांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली आहेत, ही बाब आपण समजून घेतली पाहिजे. त्यानंतर आपण चर्चा करायला पाहिजे होती, आमचे वित्त व मुख्यमंत्री हुशार आहेत, त्यांनी स्वत:च्या

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये...

खात्याला भरपूर निधीची तरतूद करुन खात्याला न्याय दिला आहे, विदर्भाला न्याय दिला आहे. त्याचे कारण असे आहे की, पृष्ठ क्रमांक 7 वरील सन 2015-2016 मधील योजनांसाठी 54,999 कोटी रुपयांचा नियतव्यय राज्य शासनाला उपलब्ध होईल, असा अंदाज करण्यात आला होता. सन 2015-2016 मध्ये ही रक्कम आता अर्थसंकल्पित होत आहे. 14793 कोटी रुपयांमध्ये 65 कोटी रुपये विदर्भ विकास महामंडळास देण्यात आले आहेत. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ, किंवा उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ यांना एक रुपया देखील दिलेला नाही. मी जरी विदर्भाचा असलो तरी हा विषय मी मांडू शकतो. 65 कोटी 98 लक्ष रुपये विदर्भ विकास महामंडळास दिले आहेत, याबाबत मी शासनाचे अभिनंदन करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवासाठी 125 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे वर्ष आपण समतेचे वर्षे म्हणून साजरे करीत आहोत. या ठिकाणी समतेचे नाही तर समरसतेचे वर्षे साजरे करण्यात येत आहे, समरसतेचे वर्ष बदलून आपण समतेचे वर्षे साजरे करावे अशी मी सूचना करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 197 पृष्ठ क्रमांक 219 डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथे वास्तव्य असलेल्या घराची खरेदी करण्यासाठी 40 कोटी रुपये उपलब्ध करण्यात आले आहेत. या सरकारने छाती ठोकपणे सांगावे की, आम्ही या वर्षाच्या अखेरपर्यंत म्हणजे सहा डिसेंबरच्या अगोदर लंडन येथील घर खरेदी करुन दाखवू.

सभापती महोदय, या राज्यातील साखर कारखाने अडचणीत आले आहेत, बाब क्रमांक 280 पृष्ठ क्रमांक 312 साखर कारखान्यासाठी 80 कोटी रुपयांची आवश्यकता होती, मी वित्त मंत्री महोदयांना विनंती करतो की, साखर कारखाने अडचणीत आहेत, त्यांना 20 कोटी रुपये देण्याऐवजी 80 कोटी रुपये देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मला आणखी दोन तीन सूचना करावयाच्या होत्या त्यासाठी, मला थोडा वेळ द्यावा.

**तालिका सभापती** : आपण आपले भाषण संपवावे.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय मी वेळेअभावी मी माझे भाषण येथेच संपवितो

------- या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या 14793.07 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, ही विनंती करीत असताना काही सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले की, .....(अडथळा)...माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी त्यांचे मुद्दे लेखी स्वरुपात माझ्याकडे द्यावेत.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये आपण खाली बसावे. मी पुढे जाऊन पुन्हा मागे आलो आणि आपल्याला बोलण्याची संधी दिली होती. आता आपण कृपया खाली बसावे. माननीय वित्त मंत्र्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन 2015-16 च्या 14793.07 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. मी माननीय सदस्यांची भाषणे अतिशय मन लावून ऐकत होतो, लक्ष देऊन ऐकत होतो. थोडी अधिक तयारी केली असती तर जे मुद्दे माननीय सदस्यांनी उपस्थित केले ते करण्याची आवश्यकता भासली नसती. एका माननीय सदस्यांनी सांगितले की, 14 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. मी सभागृहाच्या माहितीसाठी जूने आकडे देतो. मागील वर्षी जून, 2014 मध्ये 20338 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. जुलै, 2010 मध्ये ...(अडथळा)....मी मागील 15 वर्षांचे आकडे सांगतो.....(अडथळा)...मी 15 वर्षाचे आकडे सांगतो, ऐकून घ्या. तुम्ही भाषण करीत असताना मी उठलो नव्हतो. फक्त इंग्रजी शब्द सांगितले आणि तुम्ही 331 पृष्ठांपैकी 2 पृष्ठे विचारात घेतली. 1.40 कोटी रुपये वाहनासाठी पुरवणी मागणी सादर केली त्याबद्दल सांगितले. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून सरकारला 1.40 कोटी रुपयांची वाहने खरेदी केली. शेतकऱ्यांचे प्रश्न असताना का वाहने घेतली जातात? असे प्रश्न आपण करतो का? याचा अर्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आजपासून एकही अधिवेशन घेता कामा नये. शेतकऱ्यांना पैसा दिला पाहिजे. आपण काय भावना व्यक्त करता? 331 पानांपैकी एकाच पृष्ठावरील 1.40 कोटी रुपयांची वाहने माननीय मुख्यमंत्री व माननीय राज्यपाल यांचे जीवन अमूल्य नाही?.....(अडथळा)...मुद्दे मांडताना कोणते मुद्दे मांडावेत याला सुध्दा महत्व आहे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी पुरवणी मागण्यांच्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक-4 वरील बाब क्रमांक 1 संबंधी उल्लेख केला आहे. 1.40 कोटी रुपयांची वाहने माननीय मुख्यमंत्री व माननीय राज्यपाल यांच्यासाठी खरेदी करण्यात आली. या सभागृहात वित्त मंत्री व वित्त राज्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय मुख्यमंत्री व माननीय राज्यपाल जेव्हा दिल्ली येथे जातात त्यावेळी त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणावर असते याचा खुलासा पहिल्यांदा करावा.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर द्यायला तयार आहे. परंतु भाषण सुरु असताना प्रश्नोत्तरे होऊ नयेत एवढीच माननीय सदस्यांनी नोंद घेतली पाहिजे. माननीय सदस्य अर्धवट माहितीच्या आधारे मध्येच उठून भाष्य करतात, त्याबद्दल उत्तर दिले जाणार नाही. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, 14793 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या का आहेत? पहिली गोष्ट म्हणजे यातील वित्तीय भार किती आहे? 14793 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडताना जे सूत्र आघाडी सरकारच्या वित्त मंत्र्यांनी अवलंबिले होते ते मी पुढील वर्षी बदलणार आहे. 70 टक्के, 20 टक्के आणि 10 टक्के हे सूत्र गृहित धरुन अर्थसंकल्पात तरतूद केली जाते. म्हणून 54999 कोटी रुपयांपैकी ज्या विभागाला 20 टक्के याच वेळी द्यायचे होते ते 20 टक्के आपण घेतले. हे सूत्र मागील सरकारच्या वित्त मंत्र्यांनी तयार केले होते. मी हे सूत्र पुढील अर्थसंकल्पाच्या वेळी बदलणार आहे. केंद्र सरकारने त्यांच्या योजनांतून जे पैसा दिला ते अर्थसंकल्पात घ्यावे लागतात. हे पहिल्यांदा केले. आपण खरे तर याबद्दल सरकारचे कौतुक केले पाहिजे. मागील पाच वर्षाच्या पुरवणी मागण्या आपल्या पहा.

सभापती महोदय, एका माननीय सदस्यांनी सांगितले की, आऊट ले पेक्षा जास्त पैसा दिला. कशासाठी आऊट ले पेक्षा जास्त पैसे दिले? अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे हातावर पोट आहे. तुम्ही निवडणुकीपूवी त्यांच्या मानधनामध्ये वाढ करणारा जीआर काढला. एक रुपयाची देखील तरतूद केली नाही. ती तरतूद करण्याची जबाबदारी आमच्यावर आली. म्हणून आम्ही आऊट ले वाढविला. तुम्ही सांगितले, विधि व न्याय विभागाला आता पैसे दिले. आम्ही आता पैसे दिले. तुम्ही सांगितले, न्यायदानाला उशीर म्हणजे न्यायाचा खून आहे. कोणी खून केला? 15 वर्षे कोणाचे सरकार होते? मनाची नाही तर जनाची तरी बाळगा. आजच्या आज

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार...

राजीनामा द्या. ज्या सरकारने 15 वर्षे अन्याय केला त्याबद्दल बोला. 15 वर्षे कोणी अन्याय केला? 15 वर्षे आम्ही अन्याय केला का? तरतूद आम्ही केली त्याचे कौतुक नाही. फक्त विचारले की, कशासाठी तरतूद केली ते सांगा......(अडथळा)....अहो, आपल्या सरकारने 15 वर्षे निधी दिला नाही. तो निधी आम्ही दिला. शब्द काय वापरता? न्यायाचा खून होतो. खून केला कोणी? खून तुमच्या आजूबाजूला बसणाऱ्या लोकांनी केला. ज्यांच्या बैठकीमध्ये तुम्ही त्यांचे भाषण ऐकता त्यांनी खून केला. ज्या पक्षात तुम्ही पक्ष सोडून गेला त्या लोकांनी केला. कुठे गेला तुम्ही. जे शब्दाला जागणारे लोक आहेत त्यांना सोडून तुम्ही तिथे गेला. पुन्हा अर्थमंत्र्यांच्या भाषणाच्या वेळी सांगता की, 15 वर्षे अन्याय झाला. आम्ही काय केले. आम्ही 10 महिन्यात पैसे दिले आहेत. कशासाठी हात वर करता?.....(अडथळा)....सभापती महोदय, आधी हे घटनेचे कलम सांगत होते. पण यांनी कौल आणि शकधर यांचे पुस्तक वाचले नाही.

**तालिका सभापती :** मंत्री महोदय मी माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांना म्हणणे मांडण्याची संधी देत आहे, त्यांनी मुद्दा मांडल्यांतर आपण भाषण पुढे सुरु करावे.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, माझ्या माहितीनुसार आज चर्चा पुरवणी मागण्यांवर धेण्यात येणार होती. माझे पक्ष सोडणे आणि पुरवणी मागण्याशी काय नाते हे मला माहीत नाही. याबाबत वित्त मंत्री अधिक सांगू शकतील. फक्त आरोप करताना त्याबद्दल स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी दिले तर अधिक योग्य ठरेल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मी स्पष्टीकरण देतो. सन्माननीय सदस्यांनी घटनेचे आर्टिकल, सेक्शन, सब सेक्शन, नियम सांगितले. त्यांनी कौल आणि शकधर यांचे पुस्तक व त्यातील सेक्शन वाचले पाहिजेत. मी उभा राहून भाषण करीत असताना मध्ये उभे राहून त्यांनी भाष्य करता कामा नये. याबद्दलची तरतूद त्यांनी वाचले नाही. फक्त बजेट कोणत्या सेक्शनखाली येते, किती हजार कोटीचे बजेट आहे, किती हजार कोटीच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत हे सांगितले. मी पुढे हेही सांगतो मागच्या सरकारने काय काय केले. मागील शासनाने 20 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या होत्या. आताच्या या पुरवणी मागण्या सर्वसामान्य, दिनदुर्बल, शोषित, गरीब माणसांच्या कल्याणासाठी सादर केल्या आहेत. एका माननीय सदस्यांनी

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार....

सांगितले की, शिवसेना पक्षाच्या मंत्री महोदयांच्या खात्याला पैसा दिला नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाला 1272.17 कोटी रुपये दिले आहेत. तुम्ही वाचता काय? वाचताना नॉन प्लॅन, प्लॅन, योजनांतर्गत, योजनेतर वित्तीय भार, केंद्र सरकारचा निधी हे एकत्रितपणे करुन 14793 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. तुम्ही काय भेद केला, त्यातील प्लॅनचा पैसा किती हे सांगितले. सभापती महोदय, मी प्रत्येक विभागाच्या मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली आहे. एस.टी.महामंडळाबाबत कधी विचार केला होता का? मागील दहा वर्षाची आकडेवारी काढा. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांना मी धन्यवाद देतो. त्यांनी 126 कोटी रुपयांची एस.टी.बस स्थानकांच्या नूतनीकरणाची योजना तयार केली. आम्ही कारमध्ये बसून येतो. माझ्याकडे इनोव्हा कार आहे. तुमच्याकडे कोणती कार आहे मला माहीत नाही. मी यादी काढली तर आपल्यापैकी प्रत्येक जण कारमध्ये बसून प्रवास करणारे आहेत हेच दिसून येईल. एस.टी.मधून शेतकरी, कास्तकरी प्रवास करतात. माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांच्यासारखे आमदार एस.टी.मधून प्रवास करणारे आहेत.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.अनिल परब)**

नंतर 2एक्स.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार....

त्यांच्यासाठी आम्ही 126 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्याचे आपण कौतुक करीत नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांना सांगू इच्छितो की, या पुरवणी मागणीमध्ये विश्वरत्न, भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीसाठी 125 कोटी रूपये दिले. त्यामुळे पुरवणी मागण्या फुगल्या. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानासाठी 40 कोटी रूपये दिले म्हणून आम्ही चूक केली काय ? आपल्यापैकी काही सन्माननीय सदस्य पथकर रद्द करावा अशा प्रकारची भूमिका मांडत होते. आमच्या जाहीरनाम्यामध्ये पथकर रद्द करण्याचे नमूद केले होते. त्यामुळे आम्ही सर्व समाजाची, लोकांची इच्छा पूर्ण केली. आम्ही 799 कोटी रूपये पथकरासाठी दिले तर काय चूक केली ? पण त्याचे कौतुक होता कामा नये. व्यापक पीक विमा योजने अंतर्गत माननीय श्री.खडसे साहेबांनी रूपये 1260 कोटी रूपयांची नुकसान भरपाई दिली आहे. त्यात आपण चूक केली आहे काय ? नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना रूपये 481.84 वित्तीय सहाय्य देण्यासाठी पुरवणी मागणी केली आहे. ती चूक आहे काय ? राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली आहे. आपण सर्वजण उपचारासाठी लिलावती रूग्णालयात, बॉम्बे हॉस्पिटलमध्ये जाऊ. पण जो गरीब कष्टकरी माणूस आहे, ज्याच्या हातावर पृथ्वी आहे त्याच्यासाठी जीवनदायी आरोग्य योजना चांगल्या पद्धतीने करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल मी डॉ.सावंत साहेबांचे अभिनंदन करतो. त्यांनी 474 कोटी रूपये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी पुरवणी मागणीमध्ये मंजूर केले आहेत. यात त्यांनी कोणती चूक केली ? मी माननीय मंत्री श्री.विष्णू सवरा यांचे देखील अभिनंदन करतो. आज पर्यंत देशातील कोणत्याही मंत्र्यांनी विचार केला नव्हता तो विचार त्यांनी केला आहे. 5 टक्के निधी म्हणजे 258.50 कोटी निधी आपण पुरवणी मागणीमध्ये देत आहोत. आता मुंबईतून निर्णय होणार नाही. 2835 आदिवासी बहुल ग्रामपंचायती आहेत, आदिवासी सरपंच आहेत तेथे थेट निधी मिळणार आहे. आता आम्ही थेट निधी अर्थसंकल्पात आणलेला आहे. देशातील राज्यात असे कोणी केले नाही. ते माननीय श्री.विष्णू सवरा यांनी केले आहे. यावर आपण नक्की टीका कराल.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार...

सन्माननीय श्री.खडसे साहेबांनी 1 टक्के व्याज दराने अल्प मुदतीत पीक कर्ज देण्यासाठी 175 कोटी रुपये दिले आहेत. स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपालिकांना 177 कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. शासकीय वैद्यकीय रुग्णालयासाठी 147 कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी माननीय डॉ.दीपक सावंत साहेबांचे अभिनंदन करतो. कारण शासकीय रुग्णालयांमध्ये कोणीही श्रीमंत रुग्ण जात नाही. 10 वर्षे आपण धडक विहिरी पूर्ण केल्या नाहीत. आपण टीकेसाठी टीका करू नका. एकूण 331 पानांच्या पुरवणी मागण्या आहेत. 91 पानांची अनुक्रमाणिका आहे. या 442 पानांमध्ये आपण दोन-तीन पाने वाचून टीका कराल तर ते योग्य नाही. आपणाला कधीही 11 कोटी 97 लाख जनता माफ करणार नाही. ज्या चांगल्या तरतुदी करण्यात आल्या आहेत त्याबद्दल आपण काहीच बोलावयास तयार नाहीत. अनुसूचित जातीच्या घटकांना मोफत घरगुती वीज उपलब्ध करून देण्यासाठी 76 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केली आहे.

**तालिका सभापती (प्रा.जनार्दन चांदूरकर) :** मंत्री महोदय, आपण सर्व पुरवणी मागण्यांवर एकत्रितपणे उत्तर देणार आहात काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : होय. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी 48.85 कोटी रुपयांची पुरवणी मागणी आहे. आता मी मागची आकडेवारी वाचून दाखवितो. सन 2013 च्या पुरवणी मागण्यांमध्ये काय केले होते ते सांगातो. माझी एवढीच विनंती आहे की, या सभागृहाने विनियोजन बिल मंजूर केले आहे. पुरवणी मागण्यांच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. या पुरवणी मागण्यांमध्ये आक्षेपार्ह बाब आहे असे या सदनातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांना वाटले तर मी आपल्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना आवाहन करतो की, त्यांनी त्या आक्षेपाबद्दल लेखी द्यावे. त्याचे उत्तर हे सरकार देईल. कारण हे एक पारदर्शक सरकार आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंतीच्या वर्षात या सरकारने या राज्याला न्याय देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. पुरवणी मागण्यांच्या चर्चेत भाग घेताना सन्माननीय सदस्य जे मुद्दे उपस्थित करतात त्याला त्या त्या विभागाचे मंत्री उत्तरे देतात. एकत्रितपणे उत्तरे देण्याची देखील नियमात तरतूद आहे. पण ही आपली नेहमीची पद्धत नाही. सभागृहात आता सगळे मंत्री देखील उपस्थित आहेत. आता एकत्रितपणे पुरवणी मागण्यांवर उत्तर देण्यात येत आहे. त्यामुळे माझे एवढेच म्हणणे आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले आहेत त्यासंबंधी आपण पत्र पाठविले पाहिजे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी ही विनंती.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मला माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांना एक नम्र विनंती करावयाची आहे. काही वेळा आपण सत्ताधारी पक्षावरून तर काही वेळा विरोधी पक्षावरून बोलत असतो. यापूर्वीच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना विरोधी पक्षाकडूनसुद्धा ज्या पद्धतीची भाषा वापरली जायची आणि ज्या पद्धतीने टीका केली जायची त्याला समर्पक पण योग्य शब्दात उत्तर दिले जात होते. आपण देखील अतिशय आक्रमक न होता उत्तर द्यावे अशी अपेक्षा होती. आपण टीकेचा भाग वगळला तर ज्या ज्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या त्या प्रत्येक मागणी विषयी काही तरी कमी पडते आहे तेथे आपण अधिकची तरतूद करावी असा खूप सकारात्मक भाग सुद्धा या सगळ्या सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये होता. एक सारखे मागचे उकरून न काढता कामा नये अशी आमची अपेक्षा आहे. आपण नव्या दम्याचे आहात. नव्या पद्धतीने कारभार करीत आहात. अर्थसंकल्पात आपण सुधारणा करणार आहात. या सगळ्या गोष्टी मान्य केल्या तरी ज्या सकारात्मक बाबी सभागृहासमोर आल्या आहेत त्याची आपण दखल घ्यावी. एकीकडे आपण म्हणतो की, पुरवण्या मागण्या एवढ्या मोठ्या केल्या. आम्हीच सांगतो की, आम्हाला त्यात अधिकची तरतूद हवी आहे. हा एक विरोधाभास आहे. हा विरोधाभास असला तरी सुद्धा त्यातील तो भाग वगळून आपल्याला शक्य असेल तर जेथे जेथे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा आदर करावासा वाटतो त्या बाबींचा अंतर्भाव आपण पुरवणी मागण्यांमध्ये करावा अशी आपल्याला पुन्हा एकदा नम्र विनंती आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिाक सभापती :** सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर सभागृहाने विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून उद्या गुरूवार, दिनांक 23 जुलै 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 11.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीमध्ये लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक 6 वाजून 58 मिनिटांनी गुरूवार, दिनांक 23 जुलै 2015 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION